Dr. B.R. Ambedkar's While evaluating his works, he has spent most of his life in the environment of books and libraries. This shows how useful the library was to Dr. Ambedkar. From this, the young generation of today should take this example and realize that the library is useful for making drastic changes in our lives. The person who happens to be in the book does not survive without being known to the world. This is evident from the life work of Dr. B. R. Ambedkar.

## References:

1. Government of Maharashtra. Directorate of Libraries. Retrieved form: https://dol. maharashtra.gov.in/en/dr._babasaheb_ambedkar_utkrushta_sarvajanik_granthalaya_puraskar.
2. Prahar Newspaper. Accessed on 14th April 2017. Article of Prakash Pandit: Dr. Babasaheb Ambedkar.
3. Salagare, M. B. (2018). Article of Dr. B. R Ambedkar views on Education. https:// www.researchgate.net/publication/322695770_Dr.BR._Ambedkar's_views_on_Education.
4. Sarang, G. H. (2014). Dr. B. R. Ambedkar Educational Thoughts and Rights To Education Act: A Narration. http://www.newmanpublication.com/br/10%20dec% 20ISSUE %20%202014.pdf
5. Selected Works of Dr. B. R. Ambedkar. (2009). Retrieved form: https://drambedkar books .files.wordpress.com/2009/03/selected-work-of-dr-b-r-ambedkar .pdf
6. Wikipedia. Established Newspapers by Dr. BR Ambedkar. Retrieved from: https://mr. wikipedia.org/s/3qeg

❖❖❖

# हिंदी उपन्यासों में धर्म

डॉ. यादव नामदेव मोरे
हिंदी विभाग
मोरेश्वर कला,वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, भोकरदन,
ता. भोकरदन, जि. जालना (महाराष्ट्र) (India)
भ्रमणध्वनी ७७४४८१२९१५

## प्रस्तावना:—

प्राचीन काल से ही भारतीय समाज को संचालित करने वाले तत्वों के अन्तर्गत धर्म का महत्वपुर्ण स्थान है।मनुष्य जीवन के लिए धर्म एक सत्य भी है और आस्था भी।अनगिनत लोग जीवनभर धर्म एवं धार्मिक मान्यताओं के साथ जुडा रहता है। धर्म मानव समाज को अपनी पूर्व पीढियों से सामाजिक विरासत के रूप में प्राप्त होता है।''धर्म क्या है? उसके स्वरूप की परिभाषा करना अत्यंन्त कठिन है! डॉ.राधाकृष्ण के अनुसार 'धर्म वह अनुशासन है जो अन्तरात्मा को स्पर्श करता है और हमें बुराई और कुत्सितता से संघर्ष करने में सहायता देता है। काम,क्रोध और लोभ से हमारी रक्षा करता है। नैतिक बल को उन्मुक्त करता है, संसार को बचाने के महान कार्य के लिए साहस प्रदान करता है।"[१]धर्म का संबंध समाज से है लेकिन वर्तमान में बदलते जीवन मुल्यों की वजह से धर्म का स्थान ज्यादात्तर विज्ञान ने ले लिया है। परन्तु इतने बदलाव के बावजूद आज भी समाज में धर्मान्धता दिखाई देती है।

धर्म का सामाजिक में पर्यावसन से अनगिनत प्रश्न खडे हुए है। कौन सा कार्य धार्मिक अथवा अधार्मिक है यह तय करना धार्मिक मान्यताओं के आधार पर होता है परंतु इसमें बदलाव आ रहा है! बदलते जीवन मूल्य और आधुनिकता बोध ने धर्म के स्थान में परिवर्तन किया है।इससे सभी का धार्मिक दृष्टिकोण में बदलाव आ रहा है लेकिन पूरी तरह से परिवर्तन आज भी नहीं हुआ है। धर्म में नैतिक मुल्यों का पतन,धार्मिक अंन्धविश्वास,रूढिगत मान्यताएँ,आस्तिकता,देवी—देवताओं तथा पीर पैगम्बरों की पूजा, भूत, प्रेत में विश्वास,तथा अज्ञानता,धार्मिक आस्था का विघटन आदि का चित्रण हिंदी के अनेक उपन्यासों में दिखाई देता है।

## आस्तिकता:—

धार्मिक सन्दर्भ में मनुष्य के सामाजिक जीवन में धर्म का गहरा प्रभाव है! धर्म उनके अच्छे जीवन का मार्ग प्रशस्त करता ह।आस्था वाले लोगों में आलौकिक शक्ति के प्रती विश्वास जगाता है।उनके जीवन में अनेक धर्म के रंग रंगे हुए है। उनका पारिवारिक समााजिक,आर्धिक जीवन सभी धार्मिकता की भावनाओं तथा मनोरंजन के साधन भी धार्मिकता के साथ जुडे हुए है।

विवेकी राय के 'सोना माटी' उपन्यास में भगवान के प्रति कैसी आस्था है यह गॉव में सत्यनारायण की कथा—पूजा के रूप में दिखाई देता है। रामरूप रामनंदन से पूछता है कि तुम्हारे पास कम जमीन होने के बावजूद तुम्हारा गुजर बसर कैसे हो रहा है। तब वह कहता है कि "मैं नही जानता कि किस प्रकार हो रहा है। या कि गौसैयां जानते है या या ई काली जी जानती है।''[२]

इससे पता चलता है कि धार्मिक आस्था के कारण मान्यता रही है कि गौसेयॉ या कालीजी अर्थाभाव में सहयोग करती है।

मार्कण्डेय कृत लिखित 'आग्निबीज उपन्यासों में मुस्लिम समाज के लोगों की ताबीज दाएँ हाथ में बॉधना उनकी आस्था रहती है।उन्हें लगता है कि इससे आपदाओं,उत्कण्ठाएँ,बांधाएँ, जीवन की अनिश्चितताएँ उन्हें पीडा नहीं करती इस कारण ही बाकर अपने बेटे मुराद से कहता है कि, "यह क्या किया तुमने? भूरे पीर के पोर की ताबीज है, यह इसे देह से हटाना असगुन है, मुराद। इसमें बडी दुआएँ है।''[३] बाबा व्दारा ताबीज हाथ में बॉधना हर बाधाओं से छुटकारा पाना यह मुस्लिम समाज की आस्था दिखाई देती है।

मिथिलेश्वर के 'यह अंत नहीं'उपन्यास में जोखन एवं उसके साथी ढलाई का काम शुरू करते वक्त निम्ननुसार करते है, 'ढलाई की शुरूआत के अवसर पर देव—शिल्पी विश्वकर्मा के नाम अगरबत्ती जलाने लड्डू

चढाने और सगुन देने की परंपरा के अनुसार अवसर पर उपस्थित कल्पना सेठ ने हेड मिस्त्री के व्दारा अगरबत्ती जलवाने तथा प्रसाद बॉटने के साथ–साथ सभी चारों मिस्त्रियों को ग्यारह–ग्यारह रूपए नगद भी प्रदान कराएँ ।''[४] उनकी आस्था के कारण देवी–देवता की पूजा की जाती है। जिससे ढलाई करते वक्त बाधा न आए और अधिक दिन ढलाई मजबूत रहे।

## देवी–देवताओं एवं पीर पैगम्बरों की पूजा :–

सामाजिक जीवन में धर्मिक चेतना का पक्ष सबल है।देवी–देवताओं पीर पैगम्बरों की पूजा ज्यादात्तर लोग करते है।स्थानीय देवता इनके लिए ईश्वर के प्रतिक रूप है ।धर्म का प्रतिक रूप इसे कहा जा सकता है ।आस्था के केंन्द्र–बिंदु यही देवी देवता है। स्थिती के अनुरूप शरण में जाते है तथा विशेष अवसरों पर उनकी पूजा करते है । वर्तमान जीवन में ईश्वर का लोप होता जा रहा है गॉवो में इन्हीं देवी–देवताओं के रूप मेंधार्मिकता बचि हुई दिखाई देती है।विवेकी राय के 'सोना माटी' उपन्यास में हनुमान प्रसाद नवरात्र में कमच्छा देवी की पुजा करने जाता है।इस पीर पैगम्बरों के प्रति आस्था का सूचक है।''[५] उपन्यास में रज्जे बाबा महाबीरजी के बरगद की पूजा, कुँवर बाबा की कालीजीकी पुजा, पॉच पीर की पूजा तथा मानर पूजा का वर्णन भी है. जो देहातों की देवी–देवता एवं संक्षेप में अनेक धर्म की देवा–देवताओं के पूजा का वर्णन उपन्यास में आया है।

## भूत–प्रेत में विश्वास तथा अज्ञानता:–

भारतीय समाज भूत–प्रेत का असर देहातों में दिखाई देता है। अन्य अन्धविश्वास में भी उनकी आस्था रहती है। इसका मुख्य कारण उनकी अज्ञानता एवं अवैज्ञानिक दृष्टी के वजह से अंधविश्वास की भावना पनप रही है। रामदास मिश्र के 'जल टूटता हुआ' उपन्यास में गॉव के बनवारी बाबा सॉप ने काटने परझाड –फूॅक की चिकिस्ता करते है।सॉप को भूत–प्रेत का रूप कहते है और बार–बार झाडा लगाते हुए मंत्रोच्चार करते हुए कह रहे कि,

''इन्द्र राजा चले बियाहन
बान्हें कन्डड बान्हें के  नेउरा कहे मोर नेउरी दिखादे
हत हिरिया जिरिया बंगालिनि
राजा जन मे जय....... ।''[६]

बनवारी बाबा द्रवारा झाड–फूॅक तथा मंत्रोच्चार करते हुए बेचारी लडकी मुरझाकर गिर पडती है।देहातों में भूत–प्रेत आदि संबंधी अंधविश्वासों में फॅसे देहातों के बनवारी बाबा जैसे उल्लू बनाते है, इससे साबित होता है कि देहातों में न चिकित्सालय है, न वाचनालय विवेकी राय के 'सोना माटी' उपन्यास में निम्ननुसार वर्णन आया है। दुध का मंगल कार्य में सामने पडना निषिद्रध है । कन्या के गृह का अन्न–जल धरमी लोग नहीं छूते।क्योंकि "जे ब्रत वाली सिरिया पानी पी लीही ओकर मछरी के जनम होई। एही तेरे अनाज खायो वाली मेहरारू सुअरि के दूध पीये वाली नागिन के आएह दिन मीठा खाये वाली चउंटी के जनम पाई।"[७]संक्षेप में कह सकते है कि देहातों में जनता अंधविश्वास में जी रही है । वर्तमान में भी अनेक मंदिर में संकल्प के साथहवनपूजन और किर्तन होता है, कही पुत्र प्राप्ति के लिए देवी–देवताओं की मनौती रखी जाती है।

'जल टूटता हुआ में तिवारीपुर का कुंजूभूत–प्रेत आदि अंधविश्वासों को मानता है।
बिरजू जब मास्टर को पत्थर मारकर घर लौटता है तब उसे पूछा जाता है की अब तक कहॉ रहा था? वह बताता है कि, "राजा की बारी में उस  समेल के पीछे तू छिपा था? उस पर तो जलिम नट रहता है, बडा शैतान है,साला एकदम नेटूआ है।''[८]इससे साबित होता है कि, कुंजू की बाते काल्पनिक है। क्योंकि उसे खुद अनुभूति नहीं हुई है। वर्तमान में भी समाज में भूत–प्रेत के संबंध में अंधविश्वास है।लेकिन शिक्षा के कारण समाज में अंधविश्वासों के प्रति जागृकता हो रही है।

## धार्मिक आस्था का विघटन:–

उपन्यासों में सांस्कृतिक पर्वों से समाज में असीम आस्था होने के बावजूद कुछ हद तक कम होते हुई दिखाई दे रही है।जिसका अंजाम यह हो रहा है कि सांस्कृतिक पर्व आनंद उल्लास के साथ न मनाते हुए वहॉ पर गुंडागर्दी एवं अनैतिकता दिखाई दे रही है। आधुनिक युग–संचार के कारण समाज जीवन की आस्थाओं एवं

मान्यताओं में परिवर्तन ला रही है! विज्ञान,तंत्रज्ञान के कारण धार्मिक कृत्य एवं बदलती मानसिकता की वजह से धार्मिक स्थल धोखेबाजी, लुटारू एवं अनैतिकता दिखाइ दे रही है। पूजा सिर्फ स्वार्थ को देखकर कि जाती है। इसका चित्रण समाज तथा उपन्यासों में दिखाई देता है।

विवेकी राय के 'सोना माटी' उपन्यास में रामरूप सोचकर कहता है कि, "पर्व त्योहार के सुत्रधार इन बूढी माताओं के कॉपते हाथ कितने दिनों तक उन्हें संभाल पाएँगे? उम्मीद नहीं कि अगली नयी पीढी इन खूबसूरत मूर्खताओं की कीमत आंक सकेगी लोग अब बुद्रधिमान होने लगे हैं और जब वे बहुत अधिक बुद्रधिमान हो जायेगे। तब क्या होगा? शायद मेला नही लगेगा।''[९]

देहातों के जीवन में मेलों त्योहारोंके धार्मिक प्रथा एवं परंपरा से जो त्योहार के दिन लगते है,लेकिन नई पीढी इसके प्रति उदासिन दिखाई देती है।

रामदास मिश्र के 'जल टूटता हुआ' उपन्यास में जो लोग अनपढ और गॅवार है, वे धर्म को पूजते है मगर शिक्षा प्राप्त लोग धर्म को नहीं पैसे को पूॅजते है ।''[१०]

लडके पढने के कारण शहरों में वे सिनेमा के गीत गाते है। पूजारी भी जहॉ दान अच्छा मिलता है वहॉ पूजा करते जहॉ मिलने की संभावना नहीं है वहॉ पर पूजा उनके लिए मायने नहीं रखती। इससे धार्मिक कृत्यों एवं परंपराओं का अवमूल्यन तथा लोगों की आस्था कम हो रही है।

संक्षेप में कह सकते है कि भारतीय समाज में देवी–देवताओं एवं पीर–पैगम्बरों पर ज्यादात्तर आस्था है।यही इनके भगवान है। इनकी पूजा ढलाई के वक्त सत्य नारायण के व कथा के वक्त ताबीज का देह से हटना,विभिन्न अवसरों पर इनकी पूजा की जाती है तथा देवी–देवाता जाति के अनुरूप विभिन्न होते है। कह सकते है कि भारतीय समाज में देवी–देवताओं के प्रति ज्यादात्तर आस्था है। दहातों में अज्ञानता एवं अवैज्ञानिक दृष्टि के वजह से लोगों में अन्धविश्वास की भावना पनपती है। इन उपन्यासों में विभिन्न तरह की मान्यताओं एवं अंधविश्वास दिखाई देता है। जिससे समाज के मानस में घर कर रखा है। शिक्षा एवं आधुनिकता के कारण त्योहारों के प्रति लोगों का उत्साह कम है। धार्मिक आस्था के प्रति नयी पिढी उत्साह कम है।

## संदर्भ सुची:–


1. रामदास मिश्र के उपन्यायों में ग्राम–चेतना, बी.के.डॉ. ममता शर्मा पृ.१३३
2. सोना माटी, विवेकी राय पृ.१०५
3. अग्निबीज, मार्कण्डेय, पृ.२१
4. यह अंत नही, मिथिलेश्वर पृ.१५०
5. सोना माटी, विवेकी राय पृ.२२७,३८५,३८७,१६९
6. जल तुटता हुआ, रामदास मिश्र पृ.३१
7. सेना माटी, विवेकी राय पृ.४११
8. जल टुटता हुआ, रामदास मिश्र पृ.१०१
9. सोना माटी, विवेक राय पृ.४०
10. जल टूटता हुआ, रामदास मिश्र पृ.२१५


❖❖❖

# वेश्याओं की समस्याओं का चित्रण मोहनदास नैमिशराय के 'आज बाजार बंद है' उपन्यास के संदर्भ में

डॉ. शिवाजी सांगोळे
हिंदी विभाग प्रमुख
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन
जि. जालना ४३१११४, महाराष्ट्र (India)
shivaji.sangole.99@gmail.com भ्रमणध्वनी ९४२२२१९५९२

आज हम २१ वी सदि में बेटियों को बडे सम्मान से बेटी पढ़ाओं बेटी बचाओं का नारा लगाते है। हमारी सरकार कौनसी बेटिओं को बचाना चाहती है। जिनका परिवार बडे – बडे नेताओं अफसरों का सफेद पोश लोगों के गुडों का तथा पुलिसवालों का हो, इनकी बेटियों को पढाया जाता है, लेकिन गरीब परिवार की बेटियाँ पुरूष प्रधान समाज व्यवस्था की वजह से चकोलों पर चली जाती है। वहाँ पर राजनेता, बड़े अफसर . दलाल,गुंडे, पुलिस वाले फोकट में राष्ट्र की बेटियों का जिस्म नोचते है। चकला पर आने वाने वाली हर बेटी दलित परिवार की होती है। शायद दलितों को लूटने के लिए वेश्या व्यवसाय को किसीने बंद नही किया। बल्की दलितों की बेटियोंको चकला घरों में बंद कमरों के भीतर पुरूष प्रधान समाज व्यवस्था में जकड दिया है।

मोनदास नैमिशराय द्वारा लिखित सन २००४ मे प्रकाशित 'आज बाजार बंद' उपन्यास महत्वपूर्ण है। अपन्यास में वेश्याओं की समस्याओं का चित्रण है। वेश्याओं के जीवन का यथार्थ अंकन करनेवाला यह उपन्यास अंत में आदर्श तथा कल्पना की ओर झुक जाता हे। मोनदास नैमिशराय ने भारतीय समाज में होनेवाली वेश्यावृत्ति के पीछे होनेवाले कारणों का गहन अध्ययन किया है। लेखक ने उपन्यास की भूमिका मे स्पष्ट किया है "वेश्याओं के जीवन संघर्ष तथा उनकी समस्याओं पर लिखने का विचार मन में काफी समयसे था। क्यों की अब तर एक भी ऐसा उपन्यास नहीं लिखा गया, जिसमें वेश्याओं की समस्याओं को संपूर्णता से अभिव्यक्त किया गया हो। वेश्या व्यवसाय से संबंधित कुछ फिल्मों और किताबों में उनका चित्रण तो हुआ है, परंतु वहाॅ उन्हें ग्लॅमराइजड़ करने की कोशिश अधिक रही है।"[१] हम इस बात से परिचित है की आज के बाजारवाद के युग में हर क्षेत्र में व्यावसायिकता हवी हो रही है। दरअसल वेश्याओं के दर्दनाक, घुटनभरे जीवन को बहुत कम लोगों ने समझने का प्रयास किया है।

उपन्यास का आरंभ थाने पर रंडियो द्वारा किए गए पथराव से होता है। इस घटनासे गॉव के प्रतिष्ठित लोगों को जैसा धक्का सा लगता है, कि इन रंडियो की यह हिम्मत की वह थाने पर पथराव करें। अखबार वालों ने इस बात को अधिक प्रसिध्दि देकर इस विषय को अधिक गर्म किया था। और पुलिस थाना काफी चर्चा में था। यह कोठे से सटकर होने के कारण अधिक कमाई कर सके। परंतु वेश्याओं को इस कार्य से उनकी नाक कट गई थी। कुछ लोग वेश्याओं मे निर्माण हुई विद्रोही चेतना और सामाजिक बदलाव के रूप में की गई पहल की दृष्टीसे देखते थे। यह बाजार है, जहाॅ औरत की अस्मत बेची और खरेदी जाती है। इस बाजार पर ध्यान देना पुलिस का काम होते हुए भी पुलिस इस बाजार का उपयोग अपने स्वार्थ के लिए करती है। वश्याओं से हप्ता लेना, उन्हें रात को थाने में बुलाकर शारीरिक शोषन करना, उनके साथ मारपीट करना इत्यादी बाते आमतौर पर से होती थी। इसी उत्पीड़न को पत्रकारों ने अखबारों में उठाना आरंभ किया था।

वेश्या जीवन से बेखबर राष्ट्र पुरूषों पर कडा प्रहार करते हुए मोहनदास नैमिशराय उपन्यास क आरंभ में लिखते है की "पुरूष शारीरिक भूख मिटाने के लिए भारतीय समाज और विशेष रूप में हिन्दू समाज ने वेश्यावृत्ति को जायज माना है। देश में बहुत कम ऐसे महापुरूष हुए जिन्होंने वेश्यावृत्ति समाप्त करने के लिए आंदोलन किए ।"[२] आजाद भारत में वेश्याओं को छोडकर सभी स्त्री–पुरुष ने स्वतंत्रता का एहसास किया। वेश्याओं पर होने वाले अन्याय अत्याचार को वाणी देने के लिए कुछ पत्रकार वेश्याओं का साक्षात्कार लेने कोठे पर पहुँचते है। कोठे पर नीचे शराब की अनेक दुकानें थी जहाँ ग्राहक पहले शराब पीते और बादमें वेश्याओं के पास जाकर अपनी कामवासना का शमन करते। यहाँ के मकान मालिकोंने अपने मकान वेश्याओं

को किराए पर दिए हुए है, उन्हें वश्याओं से किराया लेना तो अच्छा लगता है, परंतु वे वेश्याओं से गंदी , पापी, संसार की पाप ढोने वाली कहकर उन्हें हिन समझते है। पत्रकारों की टीम साक्षात्कार लेने जैसे ही कोठेपर पहुँचती है वहाँ का अत्यंत सजीव चित्रण लेखकने किया है। "भीतर में दो – तीन औरतें लापरवाही से बैठी थी, गर्मी के कारण एकने दोनों जाघों तक पेटीकोट खिसकाया था, दुसरी जैसी ब्लाउज को हुक लगाना भूल गई थी, मुँह मे पान, सुर्खहोठ, आँखों में काजल उनके बीच भरे बहन औरत खुली हुई और बाल लापरवाही से बिखरे हुए थे। किसी शयर की गज़ल जैसी, उसकी आँखों में रहस्मपूर्ण मुस्कान थी। तीसरी ने खाली स्कर्ट पहना था और वक्षस्थल पर लापरवाही से गीला तौलिया रखा हुआ था।"[३] उन पत्रकारों में एक पत्रकार महिला रश्मि भी थी, उसका यहाँ आना वेश्याओं को अच्छा नहीं लगा इसी कारण एक वेश्या घुस्से से कहती है" इसे यहाँ क्यों लाया? यह देखने के लिए की रंडिया कैसी होती है?"[४] भारतीय समाज व्यवस्था में वेश्योओं को अपमानजनक एवं दर्दनाक जीवन जीना पडता है। वेश्याएँ अपने मन का दर्द पत्रकारों को बताते हुए कहती है।" अब ग्राहक का कुछ पता है क्या? किसी की बीवी तो है नहीं हम कि आने वाले खसम समझकर मना कर दे। वह आया नहीं की दनदनाते हुए कहता है चल जल्दी खोल, इधर लेट, तिरछी हों,से हो, वैसे हो, हाड़मास का शरीर न हुआ रबर की हम गुडीयाँ हो जैसे जिस तरह से ग्राहक चाहता हमें बिस्तर बनना ही पडता है।"[५] उपन्यास में इस प्रकार के अश्लील लगने वाले परंतु वास्तव भरे संवाद मिलते है। इर ग्राहक के रूप का सामना वेश्याओं को करना पडता है। इसका सशक्त चित्रण उपन्यास में हुआ है। पुलिस को जब पैसों की आवश्यकता होती है वे कोठे पर छापा मारते है, और हप्ते के रूप में वेश्याओं का शोषन करते है। आज की बाजारवादी मानसिकता का उल्लेख करते हुए एक वेश्या कहती है, "आज के युग में सब कुछ बिकाऊ हुआ है। कौन नहीं बेच रहा अपने आपको ? हम तो केवल अपने जिस्म ही बेचते है, लोग तो अपने जमीर को, अपने देश को बेच रहे है।"[६] पत्रकारोंने वेश्याओं पर होने वाले अन्याय अत्याचार उत्पीडन की खबर बनाकर इसे अच्छी तरह से हवा दी है।

चलके की मालकीन शबनबाई एक हिंदू युवती थी उसने एम. ए. इतिहास से पास किया और पी.एच. डी कर अध्यापक बनना चाहती थी। लेकिन वह किसी नवाब की मुहब्बत में फंस जाती हे, वह नवाबजादा इससे शादी कर इसे मुसलमान बनाता है। एक साल तक उसका उपभोग लेता है और बाद में उसे कोठे पर बेच डालता है। शबनबाई पार्वती के बारे में पत्रकारों से कहती है – "यह पार्वती है, बिना शिव पार्वती, शिवने पहले मंदिर में बिठाकर देवदासी बनाया गया वहाँ गाँव के प्रतिष्ठित लोगों ने उसे भोगा, मंदिर के पुजारी ने उसे इसका शारीरिक शोषन किया। बादमें गाँव के सामंत साहुकार ने बाजी मार दी।"[७] हसीना नामकी स्त्री एक अनाथालय में पली पढ़ी। लेकीन अनाथालय के जीवन से उबकर वह वेश्या बस्ती में जाकर आश्रय लेती है। क्योंकी अनाथालय में भी उसके साथ वेश्या जैसा व्यवहार होता है। अनाथालय और वेश्यालय की समानता पर प्रकाश डालती हुए शबनम पत्रकारों से कहती है, "हसीना अनाथालय में रहती थी, भागकर वह रहने आ गयी। क्योंकी वहाँ भी यही काम होता था और यहाँ और यहाँ भी।"[८] अनाथलय और वेश्यालय में इतना अंतर था की वहाँ मुफ्त में सरकारी अधिकारी उसके शरीर को भोग रहे थे, और यहाँ पैसे देकर।

उपन्यास में सरकारी विभागों में चलने वाले अत्याचारों कि ओर संकेत किया गया है। आज कल काम करवाने के लिए वेश्याओं का सहारा लिया जाता है, किसी का तबादला करना हो या प्रमोशन, कोई टेंडर पास करना हो या बिल, अधिकारियों को खुश करने के लिए वेश्याएँ भेजी जाती है। उपन्यास कारने वेश्याओं के जीवन से जुडी एक एक समस्या को उसके मूल कारणों सहित बहुआयामी ढंग से प्रस्तुत किया हे। जेसे की हर नौकरी व्यवसाय में 'काम का समय' निश्चित होता है, और यदि अनिश्चितता भी होती है तो इतनी नहीं कि स्वीच ओन करते ही आदमी मशीन की तरह काम करने लग जाये । अखिर वह मशीन नहीं, हाडमास का पुतला हे । लेकिन यहाँ आनेवालों का कोई समय निश्चित नहीं है। यहाँ आनेवाला ग्राहक देर सवेर, रात या बडे सवेरे कभी भी दनदनाता हुआ आता है। और इन्हें जिस तरह से भी ग्राहक चाहता है उसका हमबिस्तर बनना पडता है। इतना ही नहीं एक ग्राहक जाने के बाद उन्हें फिर से अपनी खाल नुचवाने के लिए तैयार रहना पडता है। भीतर की लाख अनिच्छाओं के बावजूद कथाकारने अपने हृदय की पूर्ण संवेदना और सहानुभूति के साथ इनके दर्द का चित्रण किया है। भारतीय समाज व्यवस्था में नारियों के प्रति रूख बडा ही क्रूर रहा है । घर से भागी और भगाई गई या फिर बेची गयी लडकी के साथ पुराने सारे रिश्ते – नाते अपने आप टूट जाते है। इसके दुष्परिणाम स्वरूप वे लडकी से औरत इन्हीं बंद पिजरों में होती है। अपनी जडों से विस्थापित होने का दर्द सीने में दबाए हुए शबनबाई का अतीत के उस क्रुर अन्याय की यदि याद आते ही लगता है कि

वे जख्म फिर से हरे हो गये है, और जख्मों को कोई कूरेद रहा है। इसके मन पर क्या बीतती होगी, यह जानने की न तो किसी को फुर्सत है आर न ही इच्छा। उपन्यासकारने राष्ट्र पुरूषों की ओर उंगुली उठाते हुए कहा है – " गोरे चले गये, पर इन्हें मुक्ति नहीं मिली। काले शासकों को आजदी की गूँज में उनके दु:ख दर्द सुनाइ ही नहीं दिये। नहीं ध्यान रहा कि देश में कई लाख ऐसे ही नागरिक है जो दोहरी गुलामी की जंजीरों मे कैद है। उनकी किसी को कोई चिन्ता नहीं थी।"(९)

सुमित इस अपन्यास का प्रमुख पात्र है। वह अलीगढ से नौकरी की तलाश में इबादपूर आ जाता है, परंतु आते ही शहर मे दंगे भडक जाते है । दंगे से बचने के लिए वह वेश्यालय का आश्रम लेता है। उसे यह पता नहीं है कि यह वेश्यालय है। करफ्यु के कारण कोठे में आश्रित सुमित की भेट पार्वती से हाती है, तब दानो एक दूसरे के प्रति आकर्षित होते है। वहाँ सुमित पार्वती तथा अन्य वेश्याओं का आत्मसम्मान जागृत कर वेश्यावृत्ति छोडने के लिए उन्हें प्रेरित करता है। सुमित के विचारों से प्रभावित पार्वती के सुन्दर, सुडैल शरीर के कारण ग्राहक उसकी माँग करते थे। इसलिए उसने अपने कमरे से बाहर निकलना छोड दिया था एक दिन उसी शहर के पुलिस थाने का इन्स्पेक्टर भानुप्रतापसिंह कोठे पर जाकर पार्वती के पास संभोग की माँग करता है। पार्वती उसके प्रस्ताव को नकारती है, वह उसे समझाती है कि उसने वेश्यावृत्ति छोड़ दि है। फिर भी शराब के नशें में धुत भानुप्रतापसिंह उसे हम बिस्तर करना चाहता है। पार्वती उसका विरोध करते हुए उसे वहाँ से जाने कि सलाह देती है, तब भानुप्रतापसिंह उसे धमकाते हुए कहता हे – " क्या तू जा, तू जा बकवास कर रही है। तुझे पता नहीं में इस एरिया का पुलिस इन्स्पेक्टर हूँ और इसी थाने में मेरी पोस्टिंग हुई है।"(१०) इस घटनासे समझ में आता है कि जनता के रक्षक किस तरह भक्षक बन जाते है। पुलिस थाने के आसपास ही वेश्यातृत्ति कायम रहना पुलिस की रिश्वत खोर वृत्ति का सबूत है। जब कोठे नं आठ से पुलिस थाने हप्ता नही पहुँचता तब पार्वती को पुलिस थाने बुलाया जाता है। कोठे नं. आठ की वेश्याएँ तय करती है कि अगर हम धंदा नही करती तो पुलिस थाने हप्ता भी नही पहुँचाएगी। यह बात इन्स्पेक्टर गुलाबसिह को अच्छि नही लगती। वह पार्वती और सुमित के संबंधों को लेकर पार्वती से सवाल पूछता है तब पार्वती उसे बताती है कि सुमित के साथ वह विवाह करेगी लेकिन गुलाबसिंह उसे कहता है " रंडिया कभी शादी कर अपना घर नहीं बसा सकती। हाँ कुछ दिनों के लिए पुरूषो का बिस्तर जरूर गर्म कर सकती है"(११) तब पार्वती उसे गालियाँ देती है। तब इन्स्पेक्टर उसे पिटाता है और सलाखों के पिछे फेंक देता है । इस घटनासे लेखक यह स्पष्ट करना चाहता है कि पुलिस गलत रास्ता छोड देने वाली वेश्याओं की मदत करने कि जगह उन्हें उसी व्यवस्था में रखना चाहती है। ताकी उनके हफ्ते सलामत रहे।

सुमित पार्वती की डायरी पढकर हैराण हो जाता है। डायरी में देश के नामी नेताओं के नाम थे जिनके वेश्याओं से संबंध थे। शहरों में जिन लोगों को प्रतिष्ठित माना जाता है। उन लोगों के उनमे नाम थे। लेखक कहते है " शरीफ घराने की लडकीयाँ घर से निकलकर कालिज जाती है या इन चलकों और होटलों में पार्ट टाईम देह व्यापर में लिप्त होती है किसे आगाज था इन सबका।"(१२) संसद सदस्यों का वेश्याओं के पास जाना गिरती राजनीति का प्रमाण है। जिसके भरोसे इस प्रकार की समस्याओं को सुलझाया जा सकता है। उनका ही नैतिक दृष्टिसे अध:पतन हुआ है। उसमें उँचे – उँचे ओहदे पर सरकारी तथा गैर सरकारी क्षेत्र में काम करने वाले उनेक अफसरों के नाम थे उँचे इनके साथ साथ कछ गृहणियों के नाम थे जो गृहणी और कॉलगर्ल का काम करती है उस डायरी को पढकर सुमित को लगता है कि सफेदपोश समझे जाने वाले लोग इतने गिर गए है। वेश्याओं को सुमित अपने परिवार का लगता था । पार्वती को सुमित अच्छा लगने लगा था । वह सुमित के सामने अपने मन का दु:ख व्यक्त करते हुए कहती है – " कोई हमारे प्रति अपनत्व के भाव नहीं रखता लोग आतेही हुक्म चलाते है ।"(१३) सुमित पार्वती से कहता है की यदि आप लोग हिम्मत दिखाओं तो आपकी मुक्ति हो सकती है । यह शबनबाई तथा अन्य वेश्याओं को इस व्यवसााय को छोडने के लिए प्रेरित करती है।

पार्वती सुमित की बात मानकर वेश्यावृत्ति छोडने का निर्णय लेती है। सुमित को कोठेपर रहकर वेश्याओं की समस्याओं की अच्छि जानकारी हुई थी। सभी वेश्याएँ उसे अपना मानती थी। शबनमबाई उसे बेटा मानती थी। सुमित का मानना है की वेश्याओं के जीवन में परिवर्तन लाना है तो उसे ही पहल करनी होगी। इसीलिए वह पार्वती से विवाह करने का निर्णय लेता है। सुमित वेश्याओं की बस्ती का अभिन्न हिस्सा बन जाता है। सभी वेश्याएँ उसे अपना मानती है। धीरे – धीरे सुमित सभी वेश्याओं की वेश्यावृत्ती छोडने के लिए मनाता है। वह कहता है कि पहले आप अपना यह अपमानित जीवन त्याग दीजिए यह वेश्या व्यवसाय छोड़ दीजिए पेट भरने के लिए हजारों रास्ते मिल जाएगे। जब तक आप यह धंदा नही छोडती तब तक अपनी

मुक्ती संभव नहीं है। सुमित को वेष्याओं को वेश्यावृत्ति से परावृत करना अनेक लोगों को अच्छा नहीं लगा। उन्होंने सुमित पर हमला किया उसे अस्पतालमे भर्ती किया जाता है। उसे मिलने के लिए पार्वती और शबनमबाई जाती है। सुमित उनसे कहता है कि जिस उदेश्यों के लिए संघर्ष कर रहा हूँ यह होना तय था। आगे भी हो सकता है। सात दिन के बाद सुमित को मिलने सभी वेश्याएँ आती हे और वह सुमित को वचन देती है कि अब हम आगे से वेश्यावृत्ति नहीं करेगी। कोठा नं आठ से कोई हप्ता न मिलने से पार्वती को थाने बुलाया जाता है, वहाँ पार्वती और इन्स्पेक्टर में झगडा होता है, और असे हवालात में बंद करते है। तब शबनमबाई राष्ट्रपति को टेलिग्राम करती है। राष्ट्रपती स्वंय थाने पहुँच जाते है। थाने में कैद पार्वती और सुमित को आजाद किया जाता है। यहाँ आकर ऐसा लगता है कि लेखक का दृष्टिकोन आदर्श से प्रेरित है।

## सारांश

उपन्यासकार मोहनदास नैमिशरायने 'आज बाजार बंद है' अपन्यासमे वेश्याओं की कथा – व्यथा का चित्रण किया है। वेश्याओं की पीडा एवं कटू यथार्थ को उपन्यास में सराक्त रूप से चित्रण किया गया है। वेश्याओं की समस्याओं को उठाकर सामाजिक दायित्व का निर्वाह किया है। भ्रष्ट पुलिस व्यवस्था का कडा विरोध कर समाज को नैतिकता का सबक सिखाते है। वेश्याओं को राष्ट्र की बेटियाँ कहकर उनके प्रति नयी सोच और सम्मान की भावना जगाने में उपन्यासकार सफल हुए है। सुमित के माध्यमसे यह संदेश देते है कि पूरे समाज का यह दायित्व है कि वह वेश्याओं को उनका हक और अधिकार प्रदान करे । वेश्याओं में जागृती लाकर उनमें मुक्ति की भावना भरने के साथ–साथ वेश्यावृत्ति को को बनाए रखने के लिए प्रयासरत शक्तियोंका पर्दाफाश करना भी उपन्यास का प्रमुख उदेश्य है। सभी समस्याओं को संसंद मे उठाया जात है लेकिन वेश्यावृत्ति जैसे गीभीर और संवेदनशील मद्दोपर संसद में कोई बहस नहीं करना चाहता। उपन्यासमें हिंदू धर्म की परम्पराओं प्रथाओं तथा कुरीतियों के दबावकश तथा कार्यवाद, भाग्यवाद स्वर्ण – नरक, पुर्नजन्म, जैसे धर्म के अप्रत्यक्ष दमक के तहत दलित वर्ग की युवतियों को तथाकथित धर्म के ठेकेदारों एवं सामंत साहूकारों के द्वारा देह–व्यापार घृणित व्यवसाय में धकेले दिये जाने की दारूण कथा का चित्रण है।

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृष्टभुमिसे |
| २ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. ०५ |
| ३ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. २५ |
| ४ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. २६ |
| ५ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. २६ |
| ६ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. ३३ |
| ७ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. ७९ |
| ८ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. ८६ |
| ९ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. १२३ |
| १० | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. ७९ |
| ११ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. १४१ |
| १३ | आज बाजार बंद है | मोहनदास नैमिशराय | पृ. १३२ |


❖❖❖

# मराठी भाषेपुढील आजची आव्हाने

डॉ. कैलास सुदामराव वानखडे
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, महाराष्ट्र (India)
kailasswankhade@gmail.com भ्रमणध्वनी ९४२१७९२८३३

## प्रस्तावना

प्रत्येकच काळामध्ये भाषेसमोर आव्हाने असतात. याचे मुख्य कारण आहे मानवी समाजात होणारे बदल. भूतकाळाचा विचार केल्यास महाराष्ट्रावर अनेक परकीय सत्तांची आक्रमणे झालेली आहेत. याचा परिणाम भाषेवर अपरिहार्यपणे पडला आहे. परिणामत: भाषिक प्राबल्य आज इंग्रजीचे दिसून येते. अशावेळी मराठी भाषा समृध्दीचा विचार येतो तेव्हा भाषेच्या वापरावरच लक्ष केंद्रीत करावे लागते. मराठी भाषेच्या समोर आजचे सर्वात मोठे हेच आव्हान आहे. आपली भावना व्यक्त करिण्यासाठी मराठी भाषा वापरावी ही भावना कमी होत आहे. जरा कोणी हिंदीवाला भेटला की आपली हिंदी सुरू होते. इंग्रजीवाला भेटला की इंग्रजी सुरू होते. दुकानात तसेच, बाजारत तसेच. त्याला गरज असेल तर तो दुकानदार आपली भाषा शिकेल ना. आपल्या भाषेचा वापर वाढला तरच तिचे भविष्य सुरक्षीत राहील. जोपर्यंत मराठी माणूस आहे आणि जो पर्यंत तो आपली संस्कृती, संस्कार, अस्मीता टिकवून ठेवतो तोपर्यंत मराठी भाषेला काहीही होऊ शकत नाही. पण असे मानून केवळ डोळे बंद करून बसणे योग्य नाही. इंग्रजीचा वाढता प्रभाव स्थानिक भाषांना मारक ठरत आहे. महाराष्ट्रातील मराठी शाळांना विशेषत: शासकीय मराठी शाळांना आज घरघर लागलेली दिसते. भाषा व संस्कृतीच्या दृष्टीने शाळा हे भाषावृध्दी आणि भाषाशुध्दीचे केंद्र असते. या संस्कार केंद्रांनाच घरघर लागली तर भाषेच्या दृष्टीने हे फारच धोक्याचे आहे. आजच्या पालकांमध्ये मुलांच्या भवितव्याविषयी एकप्रकारची धास्ती आहे. 'माझ्या मुलाच्या भवितव्यासाठी इंग्रजीशिवाय तरणोपाय नाही', 'इंग्रजी बोलता येणे म्हणजेच सर्व काही' अशी मते रूढ झाली आहेत. अशा परिस्थिमध्ये मराठी भाषेपुढे आज कोणकोणती आव्हाने आहेत, याचा शोध घेऊन त्याची मांडणी या शोधनिबंधात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## शोधनिबंधाचा हेतू

मराठी भाषेसमोरील आजच्या आव्हानांचा शोध घेणे व त्यावरील उपाय शोधणे हाच या शोधनिबंधाचा हेतू आहे.

## शैक्षणिक केंद्रांची आजची स्थिती

संपूर्ण देशभरात जवळपास सर्वच गावांमध्ये (अपवाद वगळता) प्राथमिक शाळा आहेत. महाराष्ट्राच्या प्रत्येक गावात असलेली जी. प. प्राथमिक शाळा आज कोणत्या स्थितीत आहे हा संशोधनाचा विषय आहे. माझ्या खेड्याचा जेव्हा मी विचार करतो तेव्हा तेथील ती शाळा माझ्या डोळ्यापुढे उभी राहते. चार वर्गांना शिकविण्यासाठी दोनच शिक्षक आणि एकाएका खोलीत दोनदोन वर्गाचे विद्यार्थी बसतात. अशा परिस्थितीमध्ये शैक्षणिक दर्जाचे दूरच राहू द्या, भाषा समृध्दी तरी कशी होईल हा प्रश्न आहे. हीच अवस्था बहुतांश खेड्यांची दिसून येते. शहरातीलही कधीकाळी दर्जेदार असलेल्या जुन्या मराठी शाळा आज बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. हेच आजचे वास्तव आहे.

## इंग्रजी शाळांचा प्रभाव

'इंग्रजीशिवाय आज तरणोपाय नाही' अशी परिस्थिती मराठी माणसाने आपल्या मनामध्ये निर्माण केलेली आहे. यामध्ये तत्थ्यही आहे. ते आपण स्वीकारलेही पाहिजे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत सर्वच पालकांना आपल्या पाल्यांना डॉक्टर किंवा इंजिनिअर्स बनवायचे आहे. याकरिता इंग्रजीकडे कल वाढत आहे. काळ बदलतो तसे आपण बदलावे यातूनच हा परिणाम समोर आला आहे. आज खेडेगावातील पालकही इंग्रजीच्या प्रेमापोटी आपल्या मुलांला पंचविस किमी अंतराहून शहराच्या इंग्रजी शाळेत पाठवितात. अशावेळी शाळेत इंग्रजी (जमेल

तशी) आणि घरात ग्रामीण बोली. इंग्रजी पाहिजे तसे जमत नाही आणि मराठीही मूलत: शिकता आली नाही. एक ना धड, भाराभर.... अशा व्दिधा अवस्थेमध्ये आजचा विद्यार्थी शिकत आहे. हा इंग्रजी शाळांचा प्रभाव आहे.

## मार्ग काढला पाहिजे

इंग्रजी कालखंडापासून आजपर्यंत मराठी भाषेचे जे नुकसान झाले ते भरून निघणार नाही हे सत्य असले तरी यापरिस्थितीमध्ये मराठीचा आज विकास कसा होईल हे पाहणे आवश्यक आहे. नव्या उमेदीने कामाला लागले पाहिजे. प्रयत्नपूर्वक कार्य केल्याशिवाय मार्ग निघणार नाही. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे परंतु, केवळ तेवढयानेच प्रश्न सुटतील असे नाही. दर्जा सोबतच भाषेचा वापर वाढविणे आवश्यक आहे. मराठीमध्ये ग्रंथ निर्मिती करणे या सोबतच भाषेचा व्यवहारातील वापर वाढला पाहिजे. आपलीच भाषा चांगली असा दुराभिमान असू नये. भाषेमध्ये जे काही चूक असेल किंवा बरोबर असेल ते लोकच हेरतात, त्याचा अचूकपणे वापर करतात आणि तेच समाजात रूढ होते. भाषा कधीही स्थिर नसते तर कधी ती साचेबध्दही नसते. आपले भाषिक कौशल्य आपणच निर्माण केले पाहिजे. मराठी ही राजभाषा असल्याचा अभिमान वाढवला पाहिजे. तो दुरावत जावू नये, याचा प्रत्येकानी स्वत:साठी विचार करायला पाहिजे.

## मराठी समारील आव्हाने

मराठी भाषेसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे मराठी माणसाची उदासिनता हेच आहे. आपल्या भाषेचा रास्त अभिमान बाळगणे मराठी माणूस विसरत चालला आहे. भाषेविषयी आपले काही देणे लागते हेच तो विसरत चालला आहे. इंग्रजीचा विरोध करून मराठी कधीच मोठी होऊ शकत नाही. आपण कोठे कमी पडतो याचा शोध घेतला पाहिजे. इंग्रजीचा विचार करता त्या भाषेतील शब्दकोश दर दोन वर्षांनी अद्ययावत होतात मराठीचे काय. बहुभाषिकतेने भारतातील बऱ्याच भाषांचे नुकसान झाले आहे. असे असले तरी इंग्रजी भाषेतूच भारताने आयटी क्षेत्रात जगामध्ये आपली ओळख निर्माण केली आहे, हे तितकेच सत्य आहे. भारतातील बहुसंख्य लोक इंग्रजीतून बोलू शकतात परंतु त्यांची विचारकरण्याची भाषा मात्र त्यांची मातृभाषाच आहे. याचाच अर्थ ज्ञानभाषा ही आपली मातृभाषाच असते. ही जाणीव मराठी माणसातून कमी होताना दिसते. या सर्व विपरित परिस्थितीमध्ये मराठी भाषेच्यापुढे अनेक आव्हाने उभी झालेली आहे.

'युनेस्कोच्या आग्रहानुसार किमान प्राथमिक शिक्षण तरी मातृभाषेतूनच द्यायला हवे. असे ठरले असले तरी आत्ता केवळ लज्जारक्षणापुरते मातृभाषेचे शिक्षण आपल्याकडे उरले आहे' असे भालचंद्र नेमाडे यांनी आपले मत मांडले आहे ते अगदी वास्तव आहे. जेथे मराठी भाषेचे मूल्यशिक्षण अपेक्षित आहे, तेथेच उणीव असणे ही मोठी समस्या आहे.

सामाजिक संस्कती, सामाजिक व्यवहार आणि समाजमूल्यांवर आधारीत असलेले साहित्य यांच्यावर भाषेचे अनुशासन असते. हे अनुशासन कुठेतरी खिळखिळे होत चालले आहे. ते मजबूत कसे करता येईल हे आजचे मोठे आव्हान आहे. संस्कृतीमध्ये मोठया प्रमाणावर ढवळाढवळ होत आहे. व्यवहार व्यवसायामध्ये प्रचंड बदल होत आहेत. या सर्वांचा प्रभाव जसा समाजजीवनावर होत आहे तसा साहित्यावर आणि भाषेवर होत आहे. यासर्वांवर परभाषांचा वाढता प्रभाव थांबवणे आजचे आव्हान आहे.

परकीय भाषेची आक्रमणाने मातृभाषेतील ज्ञानासाठी व आपल्या सांस्कृतीक मूल्यवृध्दीसाठी अडथडे ठरत आहेत. परक्या संस्कृतीमधून आपल्या संस्कृतीमध्ये येणारी मूल्ये समाजाला विस्कळीत करतात. समाज विस्कळीत झाला की भाषाही विस्कळीत होते, हा विस्कळीतपणा थांबवणे हे आव्हानच मानले पाहिजे.

## कोणते प्रयत्न करावे

भाषेचा वापर अधिकाधिक होईल याचे सजगपणे प्रयत्न करावेत. जेथे जेथे शक्य आहे तेथेतेथे भाषेचा जाणीवपूर्वक वापर करावा. भाषेमुळे सामाजिक समुहांना, जाती–समुहांना सुसंघटीत करता येते. संस्कृती टिकवून ठेवता येते. भाषांना संस्कृतीचे वाहक मानले जाते. संस्कृती संपली की माणूस संपतो. अर्थात त्याची भाषा सुध्दा संपुष्टात येते.

भाषा आणि संस्कृती या एकमकींवर विसंबून असतात त्यामुळे एकीचा ऱ्हास म्हणजे आपोआपच दुसरीचा ऱ्हास आहे. दोन्ही सांभाळण्याचे आव्हान आज आपल्यापुढे आहे. संस्कृतीचे संक्रमण थांबवता येत नाही आणि इंग्रजीचा मोह टाळता येत नाही. अशी आजची स्थिती आहे.

आपण मराठी भाषेचा उपयोग केवळ भावनिक होऊन करू नये किंवा केवळ स्वभिमानासाठीही करू नये तर, तिची उपयुक्तता टिकण्यासाठी गरज म्हणून करावा. हा विचार रूजविणे गरजेचे आहे. हे सुध्दा आजचे मोठे आव्हानच आहे.

इंग्रजी भाषकांची जी धोरणे आहेत, त्याच धरतीवर मराठी भाषेसाठी धोरणे आखली पाहिजे. त्यासाठी तज्ञांची समिती गठीत केली पाहिजे. जगण्याची गरज म्हणून जर भाषेला मानले तर भाषेचा वापर व दर्जा दोन्ही वाढतील हे प्रत्यक्ष कृती करण्याचे आव्हानच आहे.

प्रसारमाध्यमांच्या जगतामध्ये मराठी भाषेच्या विविध वाहिण्यांनी, मराठी वृत्तपत्रांनी, लेखक—अभ्यासकांनी, शिक्षण संस्थांनी, शाळा महाविद्यालयांनी यासाठी कार्य केले पाहिजे. मराठी भाषेच्या मूलभूत ग्रंथांना पुनर्मुद्रित करून त्याचा प्रचार प्रसार करावा. अद्ययावत भाषाकोश निर्माण करावे. ग्रंथसूची करावी. शब्द संकलन करावे. भाषाप्रयोगावर भर द्यावा. व्यवहार व्यवसायासाठी आपल्याच भाषेचा शक्य तितका उपयोग करावा. संशोधनाला चालना द्यावी. प्रकाशनाला अनुदान द्यावे. मराठी भाषेला सत्तेचा आश्रय द्यावा. त्याव्दारे विकास करावा. इतर भाषकही मराठीकडे आकर्षित कसे होतील यासाठी योजना आखाव्या. आजच्या गरजेनुसार मराठीचा वापर सुलभ होण्यासाठी प्रयत्न करावे. मराठीला अधिकाधीक राजाश्रय व लोकाश्रय मिळवावा. मराठीच्या विकासातील तोंडदेखलेपणा काढून टाकावा. भाषा प्रदूषण दूर करावे दुसऱ्या भाषेवर टिका करण्यापेक्षा मराठीला समृध्द करावे.

## समारोप

मराठी भाषेच्या समोर आज प्रश्न खूप आहेत पण तरीही मराठी भाषा खंबीरपणे उभी आहे याचा अर्थ तिच्यात कोणत्याही परिस्थितमध्ये टिकण्याची क्षमता आहे. सक्षम भाषेमध्ये मूळात टिकावूपणा असतो म्हणून ती टिकते ज्या भाषेत समाजाची मूल्ये नसतात, ती भाषा टिकत नाही. मराठी भाषा जोपर्यंत समाजाची गरज पूर्ण करीत राहील, तोपर्यंत तिला कोणताही धोका होऊ शकत नाही. असे असले तरी आपण गाफील राहू नये. वस्तू कितीही चांगली व दर्जेदार असली तरी ती लखलखीत ठेवण्यासाठी रोज घासूनपुसून ठेवावीच लागते. असेच भाषेबद्दल समजावे.

## निष्कर्ष

- भाषा समृध्दीसाठी तिचा वापर वाढला पाहिजे.
- परभाषेचा व्देश करण्यापेक्षा स्वभाषेचा विकास केला पाहिजे.
- मराठी भाषा ही आपली राज्यभाषा आणि ज्ञानभाषा आहे ही जाणीव दृढ केली पाहिजे.
- समाज, लेखक, प्रकाशक, अभ्यासक यांना शासनाची भरीव मदत मिळाली पाहीजे.
- आपली संस्कृती जीतकी महत्वाची आहे तितकेच महत्व भाषेला दिले पाहिजे.
- भाषेमध्ये जी अंगभूत मूल्ये असतात तीच भाषेला टिकवून ठेवतात.
- आपल्या भाषेविषयी अभिमान बाळगून त्यासाठी कार्य करण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारली पाहिजे.

## संदर्भ

- पाटील भास्कर सुभाष, २०११, जागतिकीकरण मराठी भाषा आणि शासन, औरंगाबाद, चिन्मय प्रकाशन.
- खेर सी. प., २००८, जागतिक समस्या आशय आणि अनुभव, पुणे, दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
- कांबळे उत्तम, 'आमची श्रीवाणी' अंक २ रा : लेख — जागतिकीकरण
  मराठी भाषा व साहित्य : सद्यस्थिती आणि भवितव्य, धुळे, का.स.वाणी प्रगत अध्ययनसंस्था धुळे.
- नेमाडे भालचंद्र, २००६, साहित्य संस्कृती आणि जागतिकीकरण, मुंबई, लोकवाङ्मय गृह.
- सानप किशोर, २००४, ''समतेसाठी बहुजन संघर्ष — चौधरी नागेश (संपा) (मायबोली
  विशेषांक—२००४)'' : लेख — बोली भाषा आणि न्यूनगंड, नागपूर.

❖❖❖

Research Journal of India / Vol. 6 / Issue 1 / Oct. 2019 / ISSN 2349-9370 /
Peer Reviewed International Indexed Journal with Impact Factor 5.455 (SJIF) / 45

# अध्यात्मिकता : मर्ढेकर – कुसुमाग्रजांच्या संदर्भात

डॉ. प्रवीण कारंजकर
श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय
वडनेर, जि. वर्धा, महाराष्ट्र (India)
pkarnjkar@rediffmail.com भ्रमणध्वनी ९७६५६२३२३४

## प्रस्तावना

मराठी साहित्यात बाळ सीताराम मर्ढेकर आणि विष्णू वामन शिरवाडकर ही दोन्ही नावे त्यांच्या साहित्यकृतींमुळे अजरामर झाली आहेत. मर्ढेकर आणि शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यां दोघांनी ही काव्यलेखन केलेले आहे. मर्ढेकरांची कविता यंत्रयुगाचे दुष्परिणाम सांगणारी आहे तर कुसुमाग्रजांच्या कवितेत भांडवलशाहीचे दुष्परिणाम प्रतिबिंबित झालेले दिसतात. यातूनच पुढे माणसासमोर प्रतिकूल वातावरण निर्माण होऊन त्याचा चांगुलपणावर आणि पर्यायाने ईश्वरावरचा विश्वास उडायला लागतो. हाच डळमळीत होणारा विश्वास मर्ढेकर आणि कुसुमाग्रज यांच्या कवितांतूनही दिसून येतो. खुरच या जगाचा नियंता कुणी आहे काय? असेल तर ही उलथापलथ होत असताना तो चूप कसा, हे प्रश्न त्यांच्यासमोर उभे राहतात व त्यातूनच आस्तिक – नास्तिक असा मनाचा संघर्ष निर्माण होतो व हाच विचार कवितांतून शब्दबद्ध होत जातो.

प्रारंभी असणारा कडवटपणा नंतर दोघंच्याही कवितांतून मावळताना दिसतो आणि परत एकदा चांगुलपणाचा विजय होणार असतो. आपल्या हातून चूक झाल्याचे दोघेही मान्य करतात अणि जगाची जडण घडण करणारी सकारात्मक शक्ती पुढे नतमस्तक होताना दिसतात.

मर्ढेकर जेव्हा मानवी अस्तित्वाचा विचार करतात तेव्हा त्यांना याची जाणीव व्हायला लागते की संपूर्ण विश्व व त्याच्या घडामोडी हे काही मनुष्याच्या बुद्धीला आकलन होणे शक्य नाही. विश्व व या विश्वामधील मानवाचे अस्तित्व हे संपूर्णपणे असंबद्ध वाटू लागते. त्यामुळे त्याच्या अस्तित्ववादी जाणिवांत निराशेचा सुर दिसतो. मनाला पटते ते बद्धीला पटत नाही व बुद्धीला पटते, ते मनाला पटत नाही. त्यावेळी विचाराची अक्षरश: झोंबी चालते व अशा वेळी संतापून ते निरीश्वरवादाकडे वळतात. याच्या खाणा–खुणा 'शिशिरागम'मध्येच दिसायला लागतात.

'जे अज्ञानात जन्मले । आणि अज्ञानात मेले
त्यांस देचा तू धरिले । काय पोटी ।।'[१]

'जरी आत्मविश्वास आम्हा । आणि सत्याचाही पान्हा तरी ढोरांचाच कान्हा । शेवटी तू ।।'[२]

अशी प्रारंभी सौम्य विरोधाची धार पुढे पुढे जास्तच वाढत गेलेली दिसते. याचे कारण म्हणजे या जगाच्या पसाऱ्याचा संचालक तू असतानासुद्धा ह्या जगात जो सावळा गोंधळ चालला आहे त्याकडे तुझे दर्लक्ष का बरे? तू खरंच आहेस की नाही अशा शंका त्यांच्या मनात निर्माण झालेल्या आहेत .अशीच शंका कुसुमाग्रजांच्या मनातही निर्माण झाली होती. ते म्हणतात –

'म्हणतात तुझ्या दयेला ना अंत
पुकारती संत थोरी तुझी
चिमण्याच्या घरा लावशी मशाल
केवढी विशाल दया तुझी
तुझ्या महिम्याची प्रचंड पुराणे
गमती तराणे अर्थहीन'[३]

अशी नास्तिकतावादी विचारांशी जवळीक करून कुसुमाग्रज पुढे म्हणतात,

'भीरुतेत माझ्या तुझे संगोपन
मीच केले मन रंजवाया
आहेस की नाही आज नसे चिंता
दोन्ही मध्ये आता भेद नुरे'[४]

पण कुसुमाग्रजाच्या नास्तिकतावादी आकर्षणापेक्षाही मर्ढेकरांचा नास्तिकतावाद तीव्र स्वरुपाचा आहे. ते म्हणतात,

'राव सांगतात देव कुणाला
शहाजोग जो शहामृगा समान'[५]

'पान पान जाळी जाळी झाले
गेल्या वर्षाचे पोथीत किडे व्याल'[६]

'कष्ट झालेल्या हो मनी
जळी स्थळी नि पाषाणी
सांगा पाहिला कधी देव कुणी?'[७]

मर्ढेकराचा हा निरीश्वरवादी अस्तित्ववाद समजून घ्यायला कुसुमाग्रजांची एक मुलाखत महत्त्वाची ठरते. ते म्हणतात, ''नास्तिकता हा सुद्धा ईश्वरासंबधीच्या ओढीचाच एक भाग आहे. अस्तित्वाचा शोध घेताना ते जाणवत नाही, पटत नाही म्हणून मानव नास्तिकतेत गुरफटून जातो. ईश्वरविषयक शोधातल्या या अपरिहार्य अवस्था आहे असे मला वाटते. त्यात वैचारिकता वा तर्काचा भाग नाही. चिंतनातून या परिस्थितीतून येणारी ती एक भावस्थिती आहे'' असे  कुसुमाग्रज म्हणतात. यालाच उद्देशून कदाचित 'आत्म्याची काळोखी रात्र' असा उल्लेख डॉ. रानडे यांनी केला असावा.

मर्ढेकरांच्या या नास्तिकतावादी आकर्षणाची दोन टोके आहेत. एक म्हणजे बुद्धीला न गवसणारे वैश्विक सत्य, दुसरा म्हणजे बद्धीविषयीचा अपार जिव्हाळा –

'आहे बुद्धीशी इमान । जाणे विज्ञानची ज्ञान'
'आहे रक्तात उजाळा । सूक्ष्मदर्शी चष्मा डोळा
नाही बुद्धीचा पांगळा । मानव मी'[८]

हा त्याचा बुद्धिवादी दृष्टीकोन होता. पण याला तडे जायला सुरुवात झाली आणि मर्ढेकराच्या मनाचे दोन भाग पडले –

'एकला असोनी । मनी दोन झालो
आता  मात्र भ्यालो ।  मला मीच'[९]

हा मनाचा  दुसरा भाग म्हणजे त्याचे अस्तित्ववादी आकर्षण होय हे आकर्षण का व कसे निर्माण झाले ते आपण वर पाहीले आहेच त्यातही एक बाजु आणखी आहे ती कुसुमाग्रजाच्या कवितेचा आधार होऊन विषद करतो –

'मला हवी आहे नास्तिकता
पण सहस्त्रवर्ष
मनाला मिठी घालुन बसलेली
ही आस्तिकता होत नाही कर माझ्या पासून'[१०]

याला कारण आहे –

'रोज प्रार्थना मीही करतो
हात जोडल्याविना  जिवाला बरे न वाटे'[११]

कुसुमाग्रजांच्या कवितेतील या दोन्ही कडव्यातून मर्ढेकरांचा नास्तिकतावादाकडून आस्तिकतावादाकडील प्रवास  लक्षात यायला मदत होते.

मर्ढेकराच्या या प्रवासाचे थोडक्यात मानसशास्त्रीय परीक्षण पाहू आपले मन जणू एखाद्या तलावासारखे असते आणि आपण करीत असलेला प्रत्येक विचार म्हणजे जणू त्या तलावात उठणारा एकेक तरंग, एकेक लाट आहे. ज्याप्रमाणे तलावात तरंग किंवा लाटा उसळतात आणि विरुन जातात त्याप्रमाणे चित्तातही विचारांच्या लाटा वा तरंग सतत उठतात आणि विरुन जात असतात. पण त्या अजिबात नाहीशा मात्र होत नसतात. चित्तात उठणारे तरंग वा लाट क्रमशः अधिकाधिक सूक्ष्म होत जातात, परंतु अजिबात नाहीशा होत नाहीत. त्या सूक्ष्म स्वरुपात विद्यमान राहतात आणि प्रयोजन पडताच परत फिरुन उदीत होण्यास तत्पर असतात. मर्ढेकराच्या बाबतीतही हेच झाले. मर्ढेकरांचे घराणे मूळचे भवतीमार्ग रामदासाचे अनुयायांच्या घराण्यात झाले. लहान वयात मर्ढेकरांवर आध्यात्मिक संस्कार झाले. हेच संस्कार मर्ढेकर इंग्लडला गेल्यावर क्रमसंकोचित झाले व तेथील महायुद्ध, यंत्रयुद्ध आणि मानवाची ससेहोलपट पाहून या आध्यात्मिक संस्कारांना  जणू बधिरता आली. भारतात

परतल्यावर तर त्यांनी या साधूसंताच्या रचनापद्धतीची रचना करुन आपली कविता सिद्ध केली. यामधून त्यांच्या ईश्वरनिष्ठेला गेलेला तडाच दिसून येतो पण नंतर यात बुद्धिवादाचा धीटपणा दिसून आला. विश्वाच्या अवाढव्य असिम व आश्चर्य स्तंभित करणाऱ्या पसाऱ्यात पृथ्वीचे स्थान पाहून मर्ढेकरांचे परंपरागत आध्यात्मिक संस्कार क्रमविकसित व्हायला लागले. वास्तवाच्या दर्शनाने ज्या संस्कारांना बधिरत्व आले होते, विज्ञानाची अफाट प्रगती बुद्धिवादाचा डांगोरा व बहिर्मुख वृत्तीमुळे ज्या आध्यात्मिक संस्काराचा क्रमसंकोच झाला होता, त्याच संस्काराचा क्रमविकास होण्यास विज्ञान व बुद्धिवादाची कवटी कारणीभूत ठरली.

याच कारणाने मर्ढेकराच्या मनात जे प्रश्न निर्माण झाले होते, शेकडो बिंदू निर्माण झाले होते ते हळूहळू वितळायला लागले आणि आपले वर्तमान व त्यांचा भविष्याकडे पाहण्याचा प्रवाह या सर्वांना 'तूच निर्मिले आहे' याची त्यांना खात्री पटायला लागली –

'त्या स्नायूंच्या तारकांचा रे
तुझ्याच हाताखली स्वीच'[१२]

या ओळी मर्ढेकराच्या ईश्वरावरील विश्वासाचे प्रतीक आहे. पुढे एका कवितेत मर्ढेकर म्हणतात,

'काय मागावे परी म्या
तूही कैसे काय द्यावे
तूच देणारा जिथे अन् तूच घेणारा स्वभावे ।।'[१३]

शेवटी शेवटी तर –

'हासडल्या तुज शिवया तरीही
तुझ्याच पायी आलो लोळत'[१४]

अशी कबुलीही ते देतात व आपण कसे अपात्र , दोषी व अपराधी आहे याचा पाढाही ते वाचतात –

'तुझ्यासाठी देवा । काय म्या झुरावे ।
झुरळाने कैसे । पतंगावे ।।
साधु संत जेथे । बैसले तिष्ठत: ।
मना कष्टवित । अहोरात्र ।।
काय तेथे माझी । लांडी धडधड ।
कीरटी पकड । भावनेची।।
काय बोलु आता । उघड नाचकी ।
अंतरात पक्की । बोळवण ।।'[१५]

असा हा मर्ढेकराचा दोन टोकांवरचा प्रवास साकार झाला आहे.

## निष्कर्ष

१) मर्ढेकर आणि कुसुमाग्रजांची नास्तिकता वाईटाच्या विजयातून निर्माण होते.
२) मर्ढेकर यंत्रयुगामुळे संतप्त आहेत तर कुसुमाग्रज भांडवलशाहीमुळे पोळून गेलेले दिसतात.
३) मर्ढेकर आणि कुसुमाग्रज प्रत्यक्ष ईश्वराच्या अस्तित्वावरच शंका घेताना दिसतात.
४) मर्ढेकर कठोर शब्दात आपल्या प्रतिकूल भावना व्यक्त करतात तर कुसुमाग्रजांची भावना बऱ्याच सौम्य शब्दांत व्यक्त होते.
५) मर्ढेकर आणि कुसुमाग्रज शेवटी आपले आस्तिकपण स्वीकारतात आणि झाल्या गेल्याबदल पश्चात्तापही व्यक्त करतात.

## संदर्भ

१) मर्ढेकर, बा.सी., मर्ढेकरांची कविता, मौज प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण २०१८, पृष्ठ क्रमांक २८
२) त्रतैव, पृष्ठ क्रमांक ३२
३) बोरकर, वैद्य (संपादक), रसयात्रा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०, पुनर्मुद्रण २००९, पृष्ठ क्रमांक ८५
४) त्रतैव, पृष्ठ क्रमांक ८७

५) मर्ढेकरांची कविता, पृष्ठ क्रमांक ५६
६) त्रतैव,पृष्ठ क्रमांक ८६
७) त्रतैव,पृष्ठ क्रमांक २६
८) त्रतैव,पृष्ठ क्रमांक ३२
९) त्रतैव, पृष्ठ क्रमांक ३६
१०) रसयात्रा, पृष्ठ क्रमांक १४५
११) त्रतैव, पृष्ठ क्रमांक ११२
१२) मर्ढेकरांची कविता, पृष्ठ क्रमांक ६३
१३) त्रतैव, पृष्ठ क्रमांक ७३
१४) त्रतैव, पृष्ठ क्रमांक ६७
१५) त्रतैव, पृष्ठ क्रमांक १००

❖❖❖

# संत तुकारामांच्या अभंगातील बंडखोरी व आक्रमकता

प्रा. मधुकर जाधव
मराठी विभाग
श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देऊळगाव राजा, जि. बुलढाणा, महाराष्ट्र (India)
madhumeet007@gmail.com भ्रमणध्वनी ९४२१३२७६८९

## प्रास्ताविक

महाराष्ट्र ही संतांच्या विचारांनी पावन झालेली भूमी आहे. विविध संप्रदायातील संतांनी "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती देह कष्टविती परोपकारी'' हे धोरण समोर ठेवून जगाच्या कल्याणाचा वसा घेतला व आपल्या साहित्यातून आचार विचारातून समाजप्रबोधन करण्याचे कार्य केले. वारकरी संप्रदायाचा विचार करता संत ज्ञानेश्वरांपासून तर संत तुकारामांपर्यंत आणि याच संप्रदायातील इतर संतांनी आपल्या लेखनाच्या माध्यमातून समाजाचा कैवार घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. वारकरी संप्रदायातील प्रत्येक संतांनी आपापल्या काळामध्ये तत्कालीन व्यवस्थेच्या कचाट्यतून सर्वसामान्यांना सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. वारकरी संप्रदायाचा कळस मानले जाणारे संत तुकाराम यांचे समाजप्रबोधनाच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचे योगदान मानले जाते.

## संत तुकाराम : अल्पपरिचय

आपल्या प्रखर वाणीने समाजमन हादरवून सोडणारे एक आगळेवेगळे संत व्यक्तिमत्व म्हणून संत तुकाराम सर्वांना परिचित आहेत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासात संत तुकाराम यांचे स्थान ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ आहे. जगातल्या सर्व महात्म्यांच्या अंत:करणातील भूतदया करुणा मानवता त्यांच्या अभंगातून सहजतेने व्यक्त होताना दिसते.

''जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा, देव तेथेचि जाणावा'' (अ. क्र. २०४) [१]

संत तुकारामांनी साधूच्या केलेल्या व्याख्येवरून संत तुकारामांचे सर्वसामान्यप्रति असलेले धोरण लक्षात येते.

## संत तुकारामांच्या अभंगातील बंडखोरी व आक्रमकता

सर्व संतांप्रमाणे संत तुकाराम महाराजांनी देखील अभंगांच्या माध्यमातून समाजामध्ये विचार पेरण्याचे कार्य केले. व्यवस्थेविरुद्ध निर्भयपणे संत तुकारामांनी दंड थोपटले. कर्मठ रूढी–प्रथा–परंपरा यांचा फोलपणा आपल्या अभंगातून, कीर्तनातून जाहीरपणे मांडला. ब्रह्मस्वरूपाची झालेली ओळख जगाला करून देणे आणि समाजाला कर्मकांडातून मुक्त करून भक्तीचा, सदाचाराचा, नैतिकतेचा परिचय करून देणे हे तुकारामांचे ध्येय होते. मूळात भागवत धर्माच्या चळवळीची सुरुवात आणि प्रसार याच प्रेरणेतून झाला आहे.

बहुजनाची दिशाभूल करणारे कर्मठ वेदाभिमानी संत तुकारामांच्या तावडीतून सुटत नाहीत. त्यांचा समाचार घेताना तुकोबा म्हणतात की,

''वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा, येरांनी वाहावा भार माथा
खादल्याची गोडी देखील्यासी नाही, भार धन वाही मजुरीचे'' (अ. क्र. २१८०) [२]

वेदांचे केवळ पठण करणारे वैदिक भारवाही हमाल आहेत. जन्मभर धर्मग्रंथाचा भारा डोक्यावर वाहून ज्ञान मात्र त्यांच्या डोक्यात शिरले नाही. प्रत्यक्ष खाण्याची गोडी जसा पाहणारा अनुभवू शकत नाही अथवा धनाचा हंडा वाहून नेणाऱ्याला जसा धनाचा लाभ होऊ शकत नाही ह्या वैदिकांचेही तसेच झाले आहे. जगाच्या उत्पत्ती, स्थिती व लयाचे मूळ कारण जो पांडुरंग आहे त्याला हस्तगत केलेल्या आम्हालाच वेदांचे खरे स्वरूप कळले आहे आणि वेदातील ज्ञानाचे फळही आम्ही मिळविले आहे असे तुकोबा अगदी निरूसंकोचपणे सांगतात तेव्हा त्यांच्या मनात भीती वा अहंकाराचा लवलेशही नसतो.

तुकोबा केवळ भोळे भाविक किंवा आत्मस्तुतीत गुंग झालेले संत नव्हते तर समाजाच्या सर्व अवस्थांचे भान असलेले सजग समाजसुधारक होते. समाजात विविध स्तरात चालणाऱ्या घडामोडींची सर्व समस्यांची सूक्ष्म माहिती त्यांना होती शिवाय त्यांचे अनुभवजन्य मत ते व्यक्त करायला कधीच घाबरले नाहीत.

तुकोबांची स्वत:ची भूमिका कितीही प्रामाणिक असली तरी जगामध्ये दांभिकता नव्हती असे नाही. याची जाणीव ठेवून संतप्रवृत्ती बरोबरच अपप्रवृत्ती ही जगामध्ये असणारच, प्रामाणिक भक्तांसोबत भोंदूही असतातच अशा भोंदूंचा समाचार तुकोबा खास शैलीत घेतात तो पुढीलप्रमाणे...

''ऐसे कैसे झाले भोंदू, कर्म करोंनी म्हणती साधू
अंगा लावूनिया राख, डोळे झाकूनि करती पाप
दाऊनी वैराग्याची कळा, भोगी विषयाचा सोहळा
तुका म्हणे सांगो किती, जळो तयांची संगती'' (अ. क्र. ३२६८)[०३]

असे कसे भोंदू ह्या जगामध्ये निर्माण झाले जे वाटेल ते कर्म करतात आणि स्वत:ला साधू संन्यासी म्हणून घेतात. अंगाला राख फासून साधूत्वाचे सोंग आणले जाते, वैराग्याचे नाटक केले जाते आणि लोकांची नजर चुकवून विषयाचे भोगही घेतले जातात. संन्याशाच्या आवरणाखाली पापाचरण चालते अशा भोंदू साधू विषयी आणखी काय सांगावे अशा साधुत्वाच्या संगतीला आग लागो, असे संत तुकाराम जाहीर करतात. ही बाब त्या काळाचा विचार करता धाडसाची वाटते.

लबाड ढोंगी साधूंचा निषेध त्यांची वर्तणूक स्पष्ट करताना संत तुकाराम म्हणतात की,

''घालुनिया मध्यवर्ती, दाटुनि उपदेश देती
ऐसे पोटभरे संत, तया कैसा भगवंत'' (अ.क्र.३२१५)[०४]

आपणास गुरू करावे म्हणून कुणालातरी मध्यस्थी करायला लावून हे ढोंगी स्वार्थापोटी उपदेश देतात. हे पोटार्थी संत जे उपदेश देतात त्याच्या अगदी उलट त्यांचे वर्तन असते त्यांचे आचरण असे तमोगुणी युक्त असते मग त्यांना भगवंत भेटणार तरी कसा?

तुकोबा दांभिकांना धारेवर धरताना म्हणतात की, सदासर्वकाळ लोभाची आशा धरणाऱ्याने कुटिल हेतू बाळगणाऱ्याने गळ्यात माळ घालू नये दया—क्षमा—शांती त्यांच्या मनामध्ये नाही त्याने विभूती अर्थात अंगाला भस्म फासू नये कारण विभूती लेपन म्हणजे वैराग्य नव्हे. आपल्या ज्ञानाचा अहंकार बाळगू नये हे सांगताना ते म्हणतात की...

''कोडियाचे गोरेपण, तैसे अहंकारी ज्ञान ।
त्यासी आता रिझे कोण, जवळी जाता किळसवाणे ।।'' (अ.क्र. ३३६४)[५]

शरीरावर कोड फुटलेली व्यक्ती स्वतरूला गोरी समजू लागते परंतु वस्तुत: इतर लोक त्या व्यक्तीचा तिरस्कार करतात ज्ञांनाचा अहंकार बाळगणार्या व्यक्तीच्या बाबतीतही काही वेगळी परिस्थिती नसते हे तुकोबा याठिकाणी सुचवितात.

## निष्कर्ष

१) संतांनी आपली सबंध हयात समाजप्रबोधनात घालवली.
२) नैतिकता, सदाचार आदी मूल्ये समाजाला दिली.
३) संत तुकारामांची प्रबोधनाची आगळी वेगळी शैली होती.
४) निर्भीडपणा व स्पष्टवक्तेपणा तुकारामांच्या व्यक्तिमत्वाचा एक पैलू होता.
५) जे सत्य आहे ते चिरकाळ टिकते.
६) संत तुकारामांचे विचार हे सार्वकालिक आहेत.

## संदर्भ

१) गोसावी, र.रा. (संपा.) श्रीसकलसंतगाथा खंड दुसरा. पुणे, सारथी प्रकाशन. १५—०७—२०१६, पृ क्र. ६५५
२) तत्रैव, पृ क्र. ८३४
३) तत्रैव, पृ क्र. ९७८
४) तत्रैव, पृ क्र ९८८

❖❖❖

# सदानंद देशमुख यांच्या 'रगडा' या कथासंग्रहातील ग्रामीण वास्तव

डॉ. वर्षा चिखले
सहयोगी प्राध्यापक
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय
अमरावती, महाराष्ट्र (India)
vnchikhale@gmail.com / भ्रमणभाष क्र. ८८०६०९६६९९

## सारांश

नव्वदोत्तर मराठी ग्रामीण साहित्यात नवीन पिढीचे प्रतिनिधित्व करणारे सदानंद देशमुख यांच्या कथा, कादंबरीने ग्रामीण वास्तव मोठ्या ताकदीने टिपले आहे. ग्रामीणत्व हे ग्रामीण कथेचे वैशिष्ट्य असते. ग्रामीण कथेला साधारणत: १९३९ पासून सुरूवात झाली. आजतागायत ग्रामीण कथा विविध विषय घेऊन विस्तारात आहे. वि.स. सुखठणकर, द.मा. मिरासदार, रा. रं. बोराडे, आनंद यादव, ग.ल. ठोकळ, र.वा. दिघे, श्री.म. माटे यांनी ग्रामीण चित्र कथांमधून रेखाटले आहे. नंतर वामन चोरघडे, उद्धव शेळके, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील इत्यादींनी ग्रामीण कथा अधिक समृद्ध केली.

साठोत्तरी कथांमधून बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण समोर येते तर नव्वदोत्तरी कथा ग्रामीण वास्तव रेखाटण्यात यशस्वी ठरते. एकूणच आज ग्रामीण कथा नव्या सामर्थ्यांनिशी व जीवनाच्या चौफेर आकलनासह लिहिली जात आहे. सदानंद देशमुख यांनी 'रगडा' या कथासंग्रहात पात्रांच्या भावविश्वात लीलया प्रवेश करून त्यांचे प्रश्न, स्त्रियांच्या समस्या, घुसमट, संघर्ष, वेदना आणि विद्रोह यांना वाचा फोडली आहे.

बीजशब्द : ग्रामीण कथा, शेती, शेतकरी, माणूस, स्त्रिया, निसर्ग, जाणिवा, रगडा.

## प्रस्तावना

कथा हा प्राचीनतम वाङ्.मयप्रकार आहे. काळानुसार, स्थळानुसार तसेच व्यक्तिगणीक कथेचे स्वरूप बदललेले दिसते. भारतीय समाज हा ग्रामीण व्यवस्थेशी, ग्रामजीवनाशी व्यापलेला असल्यामुळे, ग्रामीणतेशी नाळ जुळलेली असल्यामुळे ग्रामीण लोकजीवनाचे संपूर्ण दर्शन मराठी ग्रामीण कथा दृगोचर करते. ग्रामीण जीवन, संस्कृती, रीतीरिवाज, सण—उत्सव, श्रद्धा, अंधश्रद्धा, गुरेढोरे, पीक—पाणी, शेती इत्यादींना कथेत स्थान दिल्यामुळे वाचकांच्या मनोविश्वात ती सहज प्रवेश करते. ग्रामीण जीवनातील वास्तववादी चित्रण अनेक कथाकारांनी साहित्यामधून केले आहे. तसेच जागतिकीकरणाचे ग्रामीण व्यवस्थेवर होणारे परिणाम सुद्धा अधोरेखित केले आहे. एकूणच नव्वदोत्तर ग्रामीण कथेमधून वरील वास्तव प्रकर्षाने जाणवते.

नव्वदोत्तर कथाकारांमध्ये वैदर्भीय कथाकार सदानंद देशमुख यांचा जन्मच शेतकरी कुटुंबात झाल्यामुळे कृषि संस्कृतीचे संस्कार त्यांच्यावर आपसुकच झाले. कथेचा पहिला संस्कार त्यांच्या आईने केला; परंतु अवघे १५ वर्षाचे असतानाच ते पोरके झाले. शेतीत काम करून शालेय शिक्षण पूर्ण करीत असतानाच महाराष्ट्र टाइम्सच्या पुरवणीत 'देवाघरचं मरण' ही पहिली कथा प्रकाशित झाली. त्यानंतर सातत्याने ते लिहित गेले. 'बारोमास' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. त्यानंतर तहान प्रकाशित झाली. या दोनही कादंबऱ्यांना मराठी साहित्यात मानाचे स्थान प्राप्त झाले. याशिवाय लचांड, उठावण, महालूट, रगडा, खुंदळघास, गाभुळगाथा, अंधारवड इ. कथासंग्रह, अमृतफळ, चारीमेरा या कादंबऱ्या गावकळा हा कवितासंग्रह आणि भुईरिंगणी ललितगद्य संग्रहाने त्यांच्या साहित्यसंपदेत भर घातली.

'रगडा' या कथासंग्रहातील ग्रामीण वास्तवाचा शोध घेणे हा संशोधनामागील उद्देश आहे. रगडा या कथासंग्रहात एकूण आठ कथा आहेत. 'अमृतफळ' या कथेमध्ये आंबराईच्या अस्तित्वाविषयी तीन पिढयांचा संघर्ष आला आहे. वडिलोपार्जित आंब्याची झाडे शेतात असल्यामुळे त्याच्या फळाची वाटणी भाऊबंदकीत करावी लागते.

बळीरामच्या शेतात ही झाडे आहेत. त्याच्या सावलीखाली पीके येत नाही म्हणजे ती जागा वाया जाते. हिस्सा मात्र सर्वांना द्यावा लागतो. आंब्याच्या झाडांमुळे बळीरामचे नुकसान होते म्हणून तो एक एक झाड वाळवतो. शेवटी खजुरल्या जातीचा आंबा खूप मधाळ रसाचा असतो. तो वाळवण्यासाठी बळीराम प्रयत्न करतो. वडिलांना (आबा) ते सहन होत नाही. ते म्हणतात, ‘‘काई गनिमीकावा शोधून काल्ढा रे दुस्मनायहो तुमी. अमृतफळाचं झाड हाय रे चांडाहयहो ते. खुनाचं पाप मस्तकी थापून राहयले तुमच्या तुमी. काई बरकत येणार नाई आशानं तुमाले...’’. आबाच्या या कथनामधून त्यांची अमृतफळा विषयी असलेली आसक्ती दिसून येते. येथे दोन जीवांची नुसती कुत्तरओढ होताना लेखक कथेला वेगळेच वळण देतात. बळीरामचा मुलगा शेताच्या बांधावर खडे खोदत असतो. खजुरल्या या अमृतफळाच्या बिया लावण्याकरिता.

ग्रामीण भागात पूर्वी आमराया भरपूर प्रमाणात होत्या. परंतु कथेतील आशयाप्रमाणे अलीकडे आंब्याची झाडे कापून त्या ठिकाणी इतर पीके घेणे जास्त सोयीचे असल्यामुळे वडिलांचे मुलगा ऐकत नाही; परंतु नातू खाण्यासाठी आंबे लागतील म्हणून बांधावर कोयी लावतो. आजोबांना त्याचे कौतुक वाटते ते त्याला मदत करतात. हे ग्रामीण वास्तव सदानंद देशमुख हुबेहुब रेखाटतात.

‘जंजाळ’ या कथेमध्ये समाधान हा सुशिक्षित बेरोजगार मुलगा. वीस एकर कोरडवाहू जमीन व सहा तस्मे घर असलेल्या बापाचा मुलगा. समाधानला प्रयोगशील शेती करायची असते म्हणून तो बॅंकेकडून कर्ज घेतो. विहीर खोदतो, पाणी लागत नाही, अपयशी ठरतो; म्हणून मोठा भाऊ त्याला जमीन देत नाही. रहायला कुटाराची खोली देतो. कथाकाराने त्याची अगतिकता दृगोचर करण्यासाठी मातीच्या गढीवरच्या कडूनिंबाचे फोकाटयाचे प्रतीक चपखलपणे योजले आहे. त्या दिमाखाने वाढू पाहणाऱ्या फोकाटयाच्या मुळया बुरूजात न घुत्कार बुरूजाच्या बाहेर पडल्या होत्या. एवढेच नव्हे तर वाघाटयाच्या वेलाने कडूनिंबाच्या फोकाची गोची केली होती. या निंबाच्या बुडात रात्रभर घुबडाचे घुत्कार घुमायचे त्यामुळे समाधानाची झोपमोड व्हायची. त्या लिंबाच्या फोकासारखीच अगतिकता, नैराश्य, दारिद्र्य यामुळे तो कासावीस होतो. त्यातच बायकोला दिवस गेले. ती बाळंतपणासाठी माहेरी गेलेली; परंतु बाळंतरोग झाल्यामुळे सासऱ्याकडून पैशाची मागणी त्यामुळे तो अधिकच खचतो. डेअरीवर कशीबशी नोकरी मिळते. परंतु तिथल्या काही प्रसंगाने तो आक्रमक होतो. मालकाला धमकावतो, विळ्याने कापण्याची भाषा बोलतो. तसेच भावाच्या अंगणात विळा घेऊन दाखल होतो. जिवे मारण्याची धमकी देतो. तेव्हा भाऊ हिस्सा दयाला तयार होतो.

पैशाच्या विवंचनेत असलेल्या समाधानात मजुरीचे पैसे व्यवस्थेने दिले नाहीत पण  हत्यार उचलताच त्याच्यापुढे व्यवस्थेने गुडघे टेकले एवढेच नव्हे तर त्याला नव्या नोकरीची ऑफर दिली. भरीत भर म्हणजे कामावर जायच्या अगोदरच आगावू रक्कम मिळाली. त्या पैशात तो आपल्या बिमार बायकोच्या औषधोपचार करणार आहे. अशा तऱ्हेने बिकट परिस्थितीच्या जंजाळात तग धरणारा निंबाचा फोका हे प्रतीक वापरून दाहकता आणि ग्रामीण वास्तव रेखाटण्यात देशमुखांनी कमालीचे यश मिळवले आहे.

‘रगडा’ ही कथा मन विदीर्ण करणारी आहे. सासुरवाशीण स्त्रीची नवरा व सासूकडून होणारी घुसमट व छळ याचे चित्रण यामध्ये आहे. पोटच्या पोरीसाठी टॉनीक आणायला सुनंदाकडे पैसे नसतात. थ्रेशरवर राबणारा नवरा ज्वारीच्या हंगामात पुरता बुडालेला असतो. त्याचे बायकोकडे व छोटया मुलीकडे अजिबात लक्ष नसते. माहेरी न्यायला आलेल्या सुनंदाच्या बापाला सासू परत पाठवते व टाकून बोलते त्याचे सुनंदाला खूप दु:ख होते. दूध पिणाऱ्या पोरीला घरी पाळण्यात सोडून ती सर्वा वेचायला जाते. परिस्थितीने अगतिक झालेली सुनंदा विचाराच्या गर्तेत सापडते. कशीबशी वाट तुडवत ती संतोष माडोकारच्या भावकीच्या दिराच्या मळयात सर्वा वेचणाऱ्या विचाराने घुसते तिथे संतोष माडोकार येतो. त्याची नजर तिच्या अंगप्रत्यंगावरून फिरते तिला ते सहन होत नाही. तरी सुध्दा नाईलाजाने काम करावे लागते. तो तिला गंजीवरील कणसाचे टोपले भरायला लावतो. टोपले उचलून देताना तिचा विनयभंग करतो. तिच्या मुलीसाठी तिचे दूध अमृततुल्य असते पण संतोषच्या घिसळघाईत पिळल्या जाते... वाया जाते तेव्हा ती खूपच कदरते... त्यावेळी आईचे वात्सल्य, माया टिपण्यात लेखकाचे कसब दिसून येते. सुनंदा ते सर्व झिडकारते. तिला भीती वाटते ती टोपलं घेवून निघते. संतोषची घालमेल वाढते. घडलेल्या प्रसंगाची वाच्यता करू नये म्हणून तो तिच्या टोपलीत चांगले कणसं आणि ५० रूपयाच्या चार नोटा टाकतो आणि कुठे सांगू नका म्हणून विनवतो. त्यावर सुनंदा म्हणते, ‘‘मी कशाले सांगू? माया संसार मीच कशाले मोडू? अशी चिंता व्यक्त करीत त्या ५० रूपयाच्या नोटा रस्त्यावर फेकते परंतु एक नोट टोपलीत राहते. घरी येताच अंगणात टोपलं ठेवून रडणाऱ्या हडकुळया मुलीकडे झेप घेते. दूध पाजते.

तेवढयात सासू बाहेरून येते. टोपल्यातील टपोरे कणसे आणि ५० रूपयाची नोट बघून ती सुनेवर देहविक्रीचा आळ घेते. त्यावेळी सुनंदा स्वाभिमानाने बोलते पण खोटं सांगते. कृषी केंद्रावर नोट सापडल्याचे सांगते. सासू नोट स्वत:कडे ठेवते. सुनंदाला त्या पैशातून मुलीसाठी टॉनीक आणायचे असते परंतु तिचा हाही डाव उधळल्या जातो. जखमेवर मीठ चोळण्याच्या उद्देशाने तिची सासू तिला उद्या असे कणसे आणायला सांगते.... अगतिक सुनंदापुढे मुलीच्या औषधाकरिता संतोषची लगट व सासूकरीता सर्व्याचे कणसे उजागार होतात.

एकूणच या कथेतील स्त्रीची अगतिकता, ग्रामीण व्यवस्थेतील परिस्थितीने तिच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, वाच्यता न करता जगणे, हे ग्रामीण वास्तव चित्रित केले आहे.

'उतारा' या कथेमध्ये कष्टाळू हिराबाईचा दारूबाज नवऱ्याची दुरावस्था चितारलेली आहे. दारू पिवून धिंगाणा केल्याने एस.टी. अडवतो. ड्रायव्हर त्याला खूप मारतो व जेलमध्ये कोंडतो त्यामुळे हिराबाई अगोदर सुखावते व मग पुरती धास्तावते कारण तिची मुलगी जावई घरी येणार असतात त्यांच्यापुढे हा तमाशा बरा दिसणार नाही या चिंतेत ती असते. हिराबाईच्या सुखी संपन्न संसाराची या दारूच्या घाणेरडया पाण्याचे राखरांगोळी केल्याचे दिवस तिला आठवतात. शेजारच्या मास्तरचा संसार त्याचा कावेबाजपणा व त्याच्या बायकोचा द्वेष तिला बोचतो.

गावातला संधीसाधू, लोचट वृत्तीचा, बायांच्या पुढच्या बाजूकडे वाईट नजरेने पाहणारा अजबाराव तिच्या घरी येतो. कडुबाला सोडवून आणायला पैशाची मागणी करतो. त्याचे उपकार ती नाकारते. ग्रामीण स्त्री ही हतबल जरी असली तरी स्वाभिमानाने जगताना दिसते. गावातल्या अडल्यानाडल्याची मदत करणारा नारायणभाऊ कडूबाला सोडवतो.

नवऱ्याचे लगट करणे तिला कधी कधी किसळवाणे वाटते. कडूबाचा आणि, हिराबाईचा संवाद तिची अवस्था कथाकाराने कमालीची शब्दबद्ध केली आहे. हिराबाईच्या भावाने तिच्या लेकीला नोकरीवाला नवरा मिळवून दिला असतो त्याचा संसार सुखाचा असतो. त्याचे चित्रण खुमासदारपणे आले आहे.

सकाळी हिराबाई चक्कीवर दळायला जाते तेव्हा कडूबा संधी साधून पोरीकडे 'उतारा' प्यायला पैसे मागतो. ती नकार देते. कडूबा तिची पोथ ओढतो, जबरदस्तीने हिसकायचा प्रयत्न करतो, ती भेदरते तेवढयात हिराबाई येते. कडूबाला काठीने मारून अर्धमेला करते. पुन्हा चिडून चुलीतच्या जळक्या लाकडाने पोटरीला जाळते. पश्चताप करते. मुलीला पोटाशी घेवून अंगणात धाय मोकलून रडते.

या कथेतील हिराबाईची दिनवाणी अवस्था, तिला दारूडया नवऱ्यासोबत संसार करताना येणाऱ्या अडचणी अशाही परिस्थितीत सहनशीलतेची परिसीमा व्यक्त करीत असताना ग्रामीण वास्तव प्रकर्षाने समोर येते.

'खाडा निवाडा' ही कथा विदर्भातील शेतकऱ्यांच्या फसवणुकीची कहाणी आहे. गवारेबुवा या शेतकऱ्याने सुभाष झोरे यांच्या बळीराजा कृषी केंद्रातून दुप्पट भावाने हायब्रिडच्या प्रमाणित बियाण्याच्या बॅगा नगदी पैसे देऊन घेतल्या. बियाणे शेतात पेरले. दुकानदाराने ओरिजनल बियाणे काढून त्या खाण्याची ज्वारी मिसळली त्यामुळे शेतात ज्वारी खूपच पातळ निघाली म्हणून गवारेबुबा चिंताग्रस्त झाले होते, त्यांना झोप येत नव्हती. त्यांच्या विपन्नावस्थेचे वर्णन करताना धुराने काळवंडलेली टीनपत्रे, बायकोला व मुलांना चावणारे मच्छर, पंखा नसल्यामुळे मच्छरांना आलेला ऊत व त्यामुळे गवारेची उडालेली झोप याचे वास्तव मनाला चटका लावते.

गवारेची मनोवस्था खूपच बिकट होते. बदल्याची भावना बळावते. सकाळी ज्वारीच्या शेतात रूतलेला काटा, बियाण्यात भेसळ करणारा सुभाष हे विदारक चित्र धोंगावते. घरी आल्या बायकोने खाडया निवाडयाचा दिलेला इशारा यामुळे त्याला एकदम बळ येते.

गवारे, बळीराजा कृषी केंद्रात जावून दुकानदाराला मारतो, चवताळून उठतो, दुकानदार नुकसान भरपाई देतो. आपले जरी साधले नसले तरी तो गावकऱ्यांची चिंता करतो नि कासाविस होतो. त्या पैशातून खूप हवा फेकणारा पंखा विकत घेतो. मुलांची व बायकोची मच्छरापासून सुटका करतो. एकूणच परिस्थितीवर बळाच्या जोरावर अन्यायाचा प्रतिकार करून मात करतो.

'हुलकावणी' या कथेचा नायक वसंता हा बेरोजगार तरूण युवक असतो. तो शेतात ट्रॅक्टर चालवित असतो. आता मेटॅडोर चालवायला यावा असे त्याला वाटते. त्यासाठी तो दिवास्वप्न पाहतो. ही संधी मिळावी

म्हणून माधोरावाच्या शेतात रात्री जागलीला राहणे, गुराढोरांना चारापाणी घालणे, शेण काढणे इ. कामे तो करतो. माधवरावच्या मटण पार्टीत पडेल ती कामे करतो, खाण्यापिण्यातही सहभाग घेतो.

एक दिवस माधोरावाच्या शेतात उभ्या मॅटेडोरला चोपडून तो ड्रायव्हर व होण्याच्या भावविश्वात हरपून जातो. तिकडे माधोराव दुकानदारासोबत दारू पिण्यात व मुलीच्या गोष्टीत रंगून गेलेला असतो. वसंताला ४०७ गाडीची सर्व माहिती असते त्या जोरावर वसंताने गाडी चालवायचे मनोमन निश्चित केले, त्याला भाऊ सुध्दा एस.टी. मध्ये ड्रायव्हर होता.

एका रात्रीच्या पार्टीत नागोरावाने वसंताला खाण्यासाठी हरण पकडून दे. या अटीवर तुला ड्रायव्हर करतो असे वचन दिले असते; म्हणून वसंता वाघरूळ लावून हरीण पकडायचा बेत आखतो.

ड्रायव्हर होण्याच्या ध्यासापाई बेभान झालेल्या वसंताने वडाराकडून वाघरूळ घेतली. रात्री माधोरावाच्या हौदाजवळ खोपडीमागे लावली. हरीण पकडायची पूर्ण तयारी त्याने केली. कुत्र्याला बांधून ठेवले त्याच्या डोक्यात विचारांनी थैमान घातले. तशी त्याला झोप लागली. कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाजाने जाग आली. वाघरूळात हरीण अडकल्यासारखे त्याला जाणवले तो तिकडे धावला. पुरता जाळयात अडकला ते हरीण नव्हतेच एक मोठे अस्सवल होते. अस्वलाने वसंताला हुलकावणी दिली. जीवे मारला बळी घेतला. हव्यासापोटी वसंताला जीव गमवावा लागला. श्रीमंत माणसे खाण्यापिण्याच्या नादाने एखाद्या गरीब माणसाला लाच दाखवून कसे बळी पाडतात हे वास्तव या कथेत सदानंद देशमख रेखाटतात.

'मनसुबा' या कथेत नापिकीने मेताकुटीस आलेल्या, नैराश्याने ग्रासलेल्या हतबल शेतकऱ्याचे स्वगत स्पष्ट करणारे चित्रण आहे. घर बांधायचा मनसुबा करून पीक झाले नाही. तो पुरता फसला आता हजर खावून मरण्याच्या विचार त्याने बायकोजवळ व्यक्त केला. या वामनदादावर राजुशेटचे दोन वर्षापासून कर्जावू पैसे असतात. तो राजुशेटच्या नोकराला चारा देतो तेव्हा नोकर पुढे काय घडणार हे सांगतो. तसा वामन देणेकऱ्याचे नाव आठवतो. कपडयावाला, किराणावाला, खतावाला, शेकडा दहा रूपये व्याजाने पेरणीसाठी घेतलेले राजुशेटचे पाच हजार त्याचे किती झाले या चिंतेत तो असतो. बँकेचे कर्ज, राजुशेटकडे कोरा स्टॅम्पपवर सही करून तो काय लिहितो याची चिंता, जिकडे तिकडे कर्जाचा डोंगर या विचाराने वामन हैराण होतो. वामनचा मित्र देवमन कर्जापायी आत्महत्या करतो. देवमन मेला त्या जागेवर बसून वामन विचार करीत असताना एक शेतकरी रायभान तिथे येतो. शेती विकून शहरात जायचा निश्चय बोलून दाखवतो. शेतीची बिकट अवस्था वास्तवतेच्या दाहकतेने मांडतो. शेती केल्यापेक्षा चोरी केलेली बरी असा निश्चय व्यक्त करतो. ते दोघेही घरी येतात.

वामन सायंकाळी जेवायला बसतो त्याचा मुलगा सुध्दा जेवत असतो. तोच देवमनच्या मुलाची घर बांधायची गोष्ट काढतो. त्याच्या बाप मेला पैसे देवून गेला.. एक लाख. तो तकदीरवाला हाय. आपले तकदीर कुठे झोपले काय माहीत आपल्याला. एक लाख रूप्ये भेटले असते तर घर बसे बांधले असते याचा मनसुबा जिवंत बापाच्या तोंडावर बोलून दाखवतो. बापाला व आईला अपार यातना होतात पण मनसुबे रचणाऱ्या सुन्याला त्याचे काहीच वाटत. त्यात दोन पिढीच्या संघर्षाचे वास्तव लेखक रेखाटतात.

'थकीतबाकी' या कथेचा नायक संतोष बकऱ्यांच्या व राजा नावाच्या बोकडाच्या भावविश्वात रमलेला असतो. बकऱ्यांवर व राजा बोकडयावर त्याचा भारी जीव असतो. येथे भूतदया ग्रामीण माणसाच्या हृदयात ठासून भरलेली असल्याचा प्रत्यय देणारी ही कथा आहे.

शेतीच्या कामासाठी एखादी बकरी किंवा बोकड विकला तर संतोष रूसायचा. त्याच्या वडिलाने शेतात विहीर खोदण्यासाठी बँकेचे कर्ज काढले. विहीर खोदली पण पाणी पुरेसे लागलेच नाही. त्यामुळे तो हतबल झाला. त्याचे घरावर जप्ती आली. बाप आत्महत्या करेल अशी मायने सत्य परिस्थिती कथन केल्यावर संतोषने बकऱ्या विकायला संमती दिली. बकऱ्या  जाफरला विकल्या त्याचे संतोषला दु:ख झाले.

साहेबांच्या पार्टीसाठी त्याचा जीव की प्राण असलेला राजा बोकड त्याच्यासमोर कापला जातो याचे बारीकसारीक व तपशिलवार वर्णन देशमुख करतात. संतोषच्या मनाची अवस्था फार बिकट असते. त्याच्या मनात बदल्याची भावना बळावते. तो बँकेच्या साहेबांना पार्टीत रमू देतो व त्यांच्या फोरव्हिलरच्या गाडीच्या चाकावर चारा कापण्याच्या विळयाने सपासप वार करतो नि थकीतबाकी वसूल करतो.

एकूणच व्यवस्थेविषयीची चीड यातून व्यक्त होते. शिवाय ग्रामीण लोकांच्या समस्या, त्यांचे जिवघेणे प्रश्न सदानंद देशमुख प्रखरपणे रेखाटतात. त्या संदर्भात डॉ. भास्कर शेळके लिहितात, ''नव्वद नंतरची ग्रामीण कथा ग्राम जीवनातील ताण तणावाबरोबरच तेथील राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक बदलाबरोबरच ग्रामीणपणाचे कलह, समस्या, अज्ञानाबरोबरच ग्रामीण माणसाच्या जीवनातील प्रांजळपणाचे प्रतिबिंब या कथेत उमटले आहे.''

## निष्कर्ष

१. सदानंद देशमुख यांनी ग्रामीण कथेला वास्तवाभिमुख तर केलेच शिवाय ग्रामीण जीवनाचे दर्शन सर्वार्थाने घडविले आहे.
२. लेखकाचे सूक्ष्म निरीक्षण आणि त्यांनी दिलेले तपशिल लक्षणीय आहे.
३. खेड्यातील दाहक वास्तव लेखकाने नितळ पारदर्शी पद्धतीने साकार केले आहे.
४. व्यसनाधीन पुरूषाच्या सोबतीने स्त्री जगत असली तरी स्वाभिमानाने जगताना दिसते.
५. शेती आणि शेतकऱ्यांचे दाहक प्रश्न संवेदनशीलतेने मांडले आहे.
६. पात्रांच्या भावविश्वात शिरून त्यांचे जगण्याचे छोटे मोठे प्रश्न, संघर्ष, घुसमट, स्वप्नांचे मनोरे, स्वप्नभंग इत्यादींचा वेध घेत सदानंद देशमुख यांनी ग्रामीण वास्तव टिपले आहे.

## संदर्भग्रंथ सूची

१. देशमुख सदानंद, रगडा, मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई २००६.
२. शेळके भास्कर, ग्रामीण साहित्यातील प्रादेशिकता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९८५.
३. मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद १९९२.
४. नलगे चंद्रकुमार, ग्रामीण वाङ.मयाचा इतिहास, शैलेंद्र प्रकाशन, पुणे, १९९६.
५. यादव आनंद, ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८१.

❖❖❖

# 'गरूडझेप' एक प्रामाणिक आणि संघर्षमय आत्मकथन

प्रा. संजय जीवनलाल सिंगनजुडे
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स,
३१०—ब, नवीन नंदनवन, नागपूर, महाराष्ट्र (India) ४४०००९
sanjayssinganjude@gmail.com भ्रमणध्वनी ९७६६९६२७२३

## प्रस्तावना

'गरूडझेप — एक ध्येयवेडा प्रवास' हे भरत आंधळे यांचे आत्मकथन आहे. ह्याच दशकातील महत्त्वाचे आणि स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांना प्रेरणादायी ठरणारे आत्मकथन आहे. प्रस्तुत आत्मकथन स्टडी सर्कल पब्लिकेशन, मुंबईतर्फे २०१२ मध्ये प्रकाशित झाले. एखाद्या प्रामाणिक व्यक्तीने स्वत:शी प्रामाणिक राहून इतरांना आपल्या लहानपणीच्या गोष्टी तपशिलासह सांगणे महत्त्वपूर्ण ठरते, असा प्रामाणिकपणा 'गरूडझेप'मध्ये आलेला आहे. गावातले लहानपण, प्राथमिक शाळेतील वर्णन, वर्गातील मोठ्या व बंड मुलांनी लहान मुलांची चड्डी सोडून मुलींत फेकणे, दमदाटी करणे, लेखकाचे मोठ्या मुलांविषयी मनात भीती बाळगून शाळेला दांडी मारणे, चोरी पकडल्यावर चोप बसणे, काही गोष्टींसाठी पैसा नसल्याने युक्ती करून ती मिळवणे. उदाहरणार्थ, गारीगार विकत घ्यायला पैसे नसल्याने गारीगारच्या डब्याला एका कोपऱ्यात प्लॅस्टिक पिशवी लटकवून गारीगारचा थेंब थेंब सांडणारे पाणी जमा करून ते पाणी पिऊन गारीगार खाण्याची हौस भागवणे. शाळेत वर्गात सर्वात लहान असल्याने उंचीप्रमाणे पहिल्या नंबरवर बसून वर्गात पहिला आल्याचे खोटे सांगणे. तसेच सातवीपर्यंत सातत्याने 'स.पा.'चे (सवलतीसह पास) संपूर्ण पास असे खोटे सांगणे. त्यामागचे कारण कुटुंबात असलेला निरक्षरपणा हे आणि घरातून एकुलता एक शिकणारा मुलगा म्हणून आंधळे प्रेम म्हणता येईल.

लेखकांच्या आत्मकथनात हे स्पष्टपणे जाणवते. त्याच्या सांगण्यातून गावाकडच्या प्राथमिक शिक्षणाची स्थितीगतीचे नेमके वर्णन येते. ते असे, 'मराठी शाळेतलं वातावरण एकदम मस्त होतं कारण 'बाई' म्हणजे आमच्या मॅडम दिवसातून दोनदाच वर्गात यायच्या, एकदा शाळा भरताना आणि नंतर सुटताना!' (पृष्ठ क्र. १६) शाळेच्या समोरचा खडक म्हणजे आमच्या सर्व शिक्षक लोकांच्या गप्पांचा कट्टा होता. तिथं खुर्च्या टाकून हिवाळ्यात चहा—भजी खाणं त्याचं कायमच चालायचं वर्गात प्रचंड गोंधळ चालू असायचा.' (पृष्ठ क्र. १६) याचा परिणाम मुलांवर काय होऊ शकतो, याची कल्पना येते. लेखकाला दुसरी—तिसरीपर्यंत वाचता लिहिता येण्याचा पत्ता नसतो. पाचवीत गेल्यानंतर लेखकाची पंचाईत होते. तेथे दर ४५ मिनिटांनी शिक्षक बदलतात. भुरट सरांच्या नजरेतून लेखकाची अभ्यासातील अधोगती लक्षात येते. परंतु आजीच्या विनंतीवरून भुरट सर त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. सातव्या वर्गापर्यंत भुरट सर ढक्कलगाडी सुरू ठेवतात. येथे लेखकाने स्वत:विषयी काहीही लपवले असेल असे जाणवत नाही.

लेखकाला काही गोष्टींबद्दल कुतूहल असायचं. त्या गोष्टींच्या आकर्षणातून त्या प्राप्त व्हाव्यात या हेतूने कृती करताना दिसतो. शेजारच्या पानसरेच्या घरी रेडिओच्या आकर्षणातून ते चोरी करणे, गारीगारचे पाणी गोळा करून ते पिणे, तमाशाचे आकर्षण असल्याने ते पाहण्यासाठी पडद्यामागून घुसण्याचा प्रयत्न करणे, नाहीतर बाभळीच्या झाडावर चढून मजा लुटणे आणि सकाळी उठून तमाशा उतरलेल्या जागेवर फेरफटका मारून लोक बसलेल्या ठिकाणी काही सापडते काय याचा शोध घेणे. मराठी शाळेत गोणपाटावर बसत असल्याने पाचवीत बसायला बेंचेस असल्याने पाचवीचे आकर्षण असणे. गावाशेजारी 'केळी' नावाच्या गावी शिवरात्रीला यात्रेत काहीतरी चोरण्याचं वेड. मित्राबरोबर विड्या ओढण्याचं आकर्षण, तर शाळेतील स्टॉफरूममध्ये जमा असणाऱ्या मुलांच्या निबंधाच्या वह्य वर्षाअखेरीस गुपचूप घरी नेऊन त्यातील कोरे पान काढून शिवून पुढच्या वर्षासाठी नवीन वह्या बनवणे, ह्या काही घटना पाहिल्यावर यातून काही गोष्टीचे लहान मुलांना आकर्षण असते. हे खरे असले तरी त्या आकर्षण मागे गरिबी दिसून येते. शाळेतून वह्या चोरण्याचे कारण 'घरातून वह्या घ्यायला बऱ्याचदा पैसे नसायचे' असे

लेखक सांगतो. यावरून परिस्थिती काहीवेळा ह्या गोष्टी करायला भाग पाडते, असे स्पष्ट जाणवते. परंतु चोरी, वाईट गोष्टी केल्यामुळे बसलेला 'चोप' त्याला ती गोष्ट आता पुढे करायची नाही, हा धडा' तो घेताना दिसतो.

सातवी झाल्यावर आठवीचा खर्च भागविण्याची तयारी म्हणून दुसरीकडे दहा रुपये रोजाने कांदे वाहायला जातो. तेथे स्वच्छ कपडे घालून दुपारी मोटारसायकलवर एक नाना नावाचा मुलगा आपल्या आईच्या भेटीला येतो. त्या पोराचे एकूण वर्तनाचे लेखकाला आकर्षण वाटते. तेव्हा तो त्याच्या आईला 'नाना काय कामाला आहे?' असे विचारतो. तो नाशिकला कंपनीत साहेब असून त्याला तीन हजार रुपये पगार असल्याचे समजते. तसेच त्याने दहावीनंतर आयटीआय केल्याचे समजते. हे सर्व ऐकून त्याला आश्चर्याचा धक्का बसतो. हे आपल्याला करायचे आहे. असे स्वतःच्या मनात स्वप्न बाळगतो. ह्या स्वप्नाला वास्तवात आणण्याकरिता तो प्रयत्नाची पराकाष्ठा करतो. अभ्यासातल्या ज्या गोष्टी त्याला जमत नाही तो त्या उणिवा दूर करण्याचा प्रयत्न करतो. या प्रयत्नातूनच त्याच्या जीवनाला एक नवी दिशा मिळते. सातवीपर्यंतच्या निकालात विषयांच्या नावा खाली लाल शाईने अधोरेखित केलेल्या असायच्या, अर्थात सातवीपर्यंत सातत्याने 'सवलतीसह पास' होणाऱ्या मुलात अचानक परिवर्तन होते. आयटीआय होऊन शहरात नोकरीला असणाऱ्या मुलाला पाहून कोणी गबाळ मुलाने एखादी गोष्ट करण्याची मनावर घेणे हे चित्र सहसा पाहयला मिळत नाही; परंतु लेखकाच्या रूपानेपुढे काही करण्याची जिद्द निर्माण होणे व ती पूर्ण करू शकणे ही एक प्रेरणादायी घटना आहे, हे ह्या प्रसंगावरून सिद्ध होते. या प्रसंगातून धडा घेऊन आठवी पासून सर्व विषयात पास होऊ लागतो. आणि तेथून त्याच्या जीवनाला, अभ्यासाला एक नवे वळण मिळते. पुढे लेखकांच्या जीवनात आयटीआय केल्यावर एका मागून एक घटना घडतात. संजय शिंत्रेशी भेट झाल्यावर नवीन स्वप्न स्पर्धापरीक्षेच्या रूपाने त्याला मिळते. पीएसआय व्हायचे स्वप्न साकार होते. पुन्हा नव्या मित्राची म्हणजे युपीएससीची परीक्षा पास होणाऱ्या अजित जोशी भेटतो. त्याची भेट, त्याच्या समजावण्यातून पुन्हा युपीएससीची परीक्षा देण्याचे नवीन स्वप्न त्याला मिळते. आणि मिळालेल्या यशाला मागे टाकून पुढचे सर्वोच्च शिखरावरील स्वप्नाच्या दिशेने वाटचाल करतो. अनेक अडचणी सहन करून यश—अपयश याच्या लपंडावात मनातून न खचता अंतिम घटकेपर्यंत लढत राहतो. अभ्यास करतो आणि मोठ्य पाहिलेल्या स्वप्नांची आकर्षणाची पूर्ती शेवटी होते. यातून असे दिसते की माणसाने खचून न जाता मनात आशावाद ठेवून चिकाटीने एखादी गोष्ट मिळविण्याचा प्रयत्न केला तर ती गोष्ट अनेक अडचणी येऊनही मिळवता येते. जर ती नाही मिळाली तरीही खचून न जाता माणसाने दुसरा पर्याय स्वीकारण्याची तयारी असावी हे ह्या आत्मकथनातून समजते.

या आत्मकथनाचा एक पैलू म्हणजे जीवनसंघर्ष हा होय. घरची परिस्थिती दयनीय असतानाही शिक्षणाची गोडी असल्याने स्वतःच्या शिक्षणाचा भार स्वतः पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी दरवर्षीप्रमाणे नववीपर्यंत परीक्षा झाल्यावर दहा रुपये रोजाने कांदे वाहायला जातो. घरात आईवडिलांचे लक्ष मुलांकडे नसले तरी आजीचे लक्ष त्याच्याकडे असते. ती त्याला आधारस्तंभासारखी वाटते. वडिलाना जुगाराचा छंद त्यामुळे शेतीकामाकडे दुर्लक्ष. आई व काकू या स्त्रीयांना घरकामाबरोबर शेतीही सांभाळावी लागते. घरात नेहमी पैशांची चणचण असते. अशातच मोठ्या बहिणीच्या लग्नात कर्ज होते. वडिलांनी टोमॅटोच्या पिकापासून मिळालेले तीस हजार लग्नात झालेल्या खर्चाचे देणे होणार असते; ते तीस हजार घेऊन गायब होतात. कुटुंबावर संकट येते. लहान भावाचे शाळा सोडणे, वडिलाचे फारशे लक्ष शेताकडे नसल्याने भाऊबंद आणि शेजारीपाजारी कायम आजी व आई यांच्याशी भांडतात. प्रसंगी आजीच्या अंगावरही धावून जायचे, आजी खंबीर असल्याने ती कुणालाच भीक घालत नव्हती. लेखकाला दहावीपर्यंत बरच आयुष्य शेजारच्या दीपक पानसरेच्या आईने दिलेल्या जुन्या कपड्यांवर निघून गेले होते. आयुष्यात पहिल्यांदाच आठवीची शाळा सुरू झाल्यावर पॅरागॉनची नवी कोरी चप्पल मिळते. पुढे तो बरेच वर्षांपर्यंत ती वापरतो. ही चप्पल त्याला आजी घेऊन देते. दहावी पास झाल्यावर रोजंदारीने जातो. आयटीआय करतानाही नाशिकच्या मोरवाडीपासून सातपूर येथे असणाऱ्या आयटीआयला सात किलोमीटर पायी जायचे, कारण खोली राहण्याच्या भाड्याची पंचायत असल्याने आयटीआयला जाण्यासाठी खिशात

पैसेच नव्हते. दुसरा संघर्ष म्हणजे येथे जगण्याचा. जगायचे आहे तर पोटाची खडगी भरणे भाग पडते. त्यासाठी कशातरी कच्च्या भाजलेल्या बाजरीच्या भाकरी थापून पाण्यात मिरची टाकून भाजी समजून खाणे, व पुढे शनिवारी–रविवारी आयटीआयला व्यक्तीच्या वेल्डिंग वर्कशॉपमध्ये दोन दिवस कधी तर शिळे पाव खाऊन दिवस काढले. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतानाही अनेक अडचणींना समोर जाऊन हॉस्टेलवर पॅरेसाईट म्हणून दिवस काढण्याची पाळी येते. हे सर्व आपल्या नजरेसमोरील ठरविलेले ध्येय आणि ते प्राप्त करण्याची जिद्द ह्या दोन्ही गोष्टी डोक्यात असल्यावर कितीही संकट आलेतरी ते पार करण्याची उर्मी आपोआपच मनात येते, यावरून म्हणता येते. लेखकाचे जीवन संघर्षमयचं आहे.

स्पर्धा परीक्षेत मिळणाऱ्या अपयशामुळे व मिळालेल्या सरकारी नोकऱ्यांचा त्याग केल्याने गावची मंडळी व घरची मंडळीचा लेखकाला त्रास होतो. घरचे त्याच्या लग्नाच्या मागे लागतात. गावचे लोकही त्याला टाकून बोलतात. कारण त्याच्याबरोबरीच्या मित्रांचे लग्न होऊन तीन पोरांचे बाप झाले असे टोमणे गावकरी मारायचे. तर त्याच्या परिचयाच्या एकाने तर 'तो वेडा झाला', 'त्याने पळून जाऊन प्रेमविवाह केला'. ह्या गोष्टींचा त्रास त्याच्या बरोबर त्याच्या मोठ्या बहिणीलाही होतो. यावरून समाजाच्या एखाद्या व्यक्तीकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टीकोन स्पष्ट होते. तसेच जनरीतीचे कुटुंबातील सदस्यांवर वाईट परिणाम दिसून येते.हे सर्व सोसून लेखक गावाकडे जास्त फिरकणे बंद करतो. आणि आपल्या ध्येयापासून विचलित होत नाही. पुण्यात 'आपणास कधीतरी दिवस चांगले येतीलच' असे स्पप्न पाहून एक एक दिवस काढू लागतो.

समाजात सर्वच लोक वाईट नसतात, त्यात काहींच्या सल्ल्यांमुळे आपल्या जीवनाला एक दिशा प्राप्त होऊ शकते. याचे दर्शन प्रस्तुत आत्मकथनातून होते. भरत आंधळेला लहानपणी आजीचा आधार असते. विवेकानंदाचं पुस्तक वाचण्यासाठी देणारा त्याच्या वडिलाचा मावसभाऊ दिनकर नाना, 'हिंदुस्थान फास्टनर' कंपनी मालक श्री हरपाल सिंग याने त्याला कसे वागावे, बोलावे, बसावे यासारख्या सवयी शिकवल्या. तसेच तीनशे रुपये अॅडव्हॉन्स देऊन पॅरागॉन चप्पल ऐवजी कंपनीत बूट घ्यायला लावतो. इंग्रजी चांगले येत नसल्याने भरतला इंग्रजी व्याकरण शिकवतात. तेथेच बिट्टू नावाचा तरूणाने लेखकाच्या चुका सुधारून त्याला बऱ्याच गोष्टी शिकविल्या. संजय पाटीलच्या सल्ल्याने त्याने बाहेरून पदवीचे शिक्षण नोकरी सांभाळून पूर्ण केले. लेखकाच्या सात पिढ्यातला तो पहिला ग्रॅज्युएट होतो. नाशिकला पोलीस प्रशिक्षण केंद्रात गेल्यावर संजय शिंत्रेची भेट झाल्यावर पीएसआयविषयी माहिती त्याला मिळते. युपीएससीचे स्वप्न दाखविणारा अजित जोशी तर या युपीएससीच्या परीक्षेसाठी उत्तम मार्गदर्शक ठरलेले जयपाल कांबळे सर आणि त्याचे बरेच मित्रांच्या साथीमुळे आणि होणाऱ्या पत्नीच्या विश्वासामुळे त्याला हे यशाचे शिखर गाठण्यास बळ मिळते.

पुणे विद्यापीठातील जयकर वाचनालयातून लेखकाला बरेच कटू अनुभव आले. तेथून स्पर्धा परीक्षा देणाऱ्यांची बरेचदा हकालपट्टी व्हायची. त्यामुळे रस्त्यावर अभ्यास त्यांना करावा लागायचा. अशा संघर्षात आपल्या आयुष्याचे पुढे काय होईल. असा प्रश्न लेखकापुढे निर्माण होतो. यातून 'जीवनात प्रचंड कष्ट घेतल्याशिवाय काही मिळत नाही.' अशी जाणीव लेखकाला होते. पैशा अभावी कोचिंग क्लास लावण्यास असमर्थ होते. अभ्यास केल्यानेच आपला स्पर्धा परीक्षेचा मार्ग सुकर होईल, असा आशावाद बाळगून पुढे युपीएससीच्या तयारी करिता मुंबई गाठतो आणि एसआयएसीला प्रवेश मिळवतो. प्रथम युपीएससीची पूर्वपरीक्षेत लेखक नापास होतो. यातून 'अपयश हीच यशाची पहिली पायरी असते.' असा विचार करून पुन्हा नव्या दमाने अभ्यासाच श्रीगणेशा करतो. युपीएससीची पूर्वपरीक्षा २००६ मध्ये पास होतो. यातून आपणही युपीएससीची परीक्षा पास होऊ शकतो, असा आत्मविश्वास त्याला येतो; परंतु मुख्य परीक्षेत तो नापास होतो. पुन्हा नव्याने तयारीला सुरुवात हा युपीएससीच्या परीक्षेच्या अभ्यासातील संघर्ष सातत्याने त्याचा पिच्छा सोडत नव्हता. पुढच्या परीक्षेत पूर्व व मुख्य परीक्षा पास, पण यावेळी मुलाखतीत नापास होतो. या मुलाखती प्रसंगी त्यानी केलेल्या चुका त्याच्या लक्षात येतात. त्यावरून यापुढे अशा चुका करायच्या नाही, असे तो ठरवतो. परंतु २००८ पुन्हा एकदा अपयश त्याच्या पदरी पडते. २००९ मध्ये मात्र युपीएससीची पूर्व व मुख्य परीक्षा पास करून मुलाखतीची तयारी करतो.

यावेळेस सर्व तयारीनिशी मुलाखत देतो. त्याचा निकाल ६ मे ला लागतो. ५०३ वा रँकने पास झाल्याची सुखद बातमी त्याचा मित्र फोन वरून सांगतो. आणि त्याच्या आयुष्याची कायापलट होते. परीक्षेच्या काळात आपले आप्तसंबंधी, मित्र आणि होणारी पत्नी या सर्वांचा त्याग करून, दिवसरात्र एक करून अभ्यास केल्यास यश संपादन करता येते. हे आत्मकथन वाचून वाचकांना कळते.

येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, ती म्हणजे 'छोटी स्वप्ने पाहणे अपराध आहे' हे वचन योग्य आहे. मोठी स्वप्न मनात बाळगली की छोटी स्वप्न आपोआपच मोठ्या स्वप्नातून पूर्ण होतात. परंतु ग्रामीण भागात अशी मोठी स्वप्ने दाखविणाऱ्यांचा अभाव असतो. निदान लेखक भरत आंधळे यांच्या कुटुंबाची स्थिती पाहता आणि गावातील लोकांचे विचार पाहता अशी मोठी स्वप्ने दाखविणाऱ्यांचा अभावच दिसतो. हे मात्र खरे आणि याच पार्श्वभूमीतून भरतच्या जीवनात नवीन गोष्टींच्या आकर्षणातून लहान लहान स्वप्न मनात बाळगून ते पूर्ण होता न होताच नवीन स्वप्नांच्या दिशेने भरारी घेतो. त्या प्रयत्नातून 'शैलजा पॅकेजिंग कंपनी', 'हिंदुस्थान फास्टनर' अशा प्रायव्हेट कंपनीतील नोकरी सोडून पुढे २००३ मध्ये पीएसआय, २००४ मध्ये रेल्वे टीसी, २००५ मध्ये जलसंपदा विभाग, २००६ मध्ये एलआयसी विकास अधिकारी, २००७ मध्ये समाजकल्याण निरीक्षक खात्यातील नोकरी अशा सरकारी नोकऱ्या सोडतो. तर एमपीएससी तो एकूण ७ मुख्य परीक्षा देतो. त्यात ५ मुलाखती व शेवटी २०१० मध्ये बीडीओपदी निवड होते. तर युपीएससी ४ मुख्य परीक्षा, २ मुलाखती देऊन शेवटी ५०३ रँकने IRS संवर्गात २०१० मध्ये त्याची निवड होते. जीवनात पाहिलेले अशक्यप्राय: स्वप्न पूर्ण करतो. नाशिक जिल्ह्यातील 'ठाणगाव' या लहानशा गावात राहणारा जो आपले शुन्यातून विश्व घडवतो, असा हा विद्यार्थी आपले स्वप्न ग्रामीण भागातील मुलांना देऊ पाहणारा भरत आंधळे खऱ्या अर्थाने समाजाशी बांधिलकी सांगणारा भूमीपूत्र म्हणता येईल.

माणसाच्या हातातून सर्व संधी निघून गेल्यावर त्यांच्या हाती काहीच उरत नाही समाजात त्याची किंमत शुन्य होते. याचा प्रत्यय भरतला येतो. यातून समाजात लोकांचा नको तो सल्ला ऐकून घेणे भागच असते, अशी बोलणी भरतलाही सहन करावी लागतात. घरा बाजूची मंडळी म्हणते, ''आमचा पोरगा तुमच्या भरतच्याच बरोबरचा तो आता मुंबईत फावड्यनं पैसे कमवतो.'' याप्रकारची बोलणी त्याला ऐकावी लागतात. यावर त्याला काही उपाय सापडत नाही, म्हणून तो गप्प बसून हे सर्व सहन करीत असतो. आणि योग्य संधीची वाट पाहतो. तर युपीएससीच्या निकालात नापास झाल्यास गावात आधार देणारे कुणी नसल्याने तो पुण्याला जायचे ठरवतो. तेथे काही संकट कोसळल्यावर आधार मिळू शकले याची त्याला खात्री असते. त्याने बऱ्याच परीक्षा दिल्या असल्याने त्यांचाही निकाल मे महिन्यात लागणार असतो. ४ मे ला एमपीएससीचा STI पूर्व परीक्षेत नापास झाल्याने त्याला मोठा धक्का बसतो. आपले वाईट दिवस सुरू झाले का अशी एक जाणीव त्याला होते व आता मोठी स्वप्ने पाहणारा भरत बीडची तलाठी पदासाठी फॉर्म न भरल्याचे त्याला मनातून वाईट वाटते. व्यक्तीला मनासारखे यश मिळत नसल्यास त्याचा इतर गोष्टींवरही किती परिणाम होऊ शकतो, याचे हे जिवंत उदाहरण म्हणता येईल. दुसरे असे की, माणसाची मनोव्यस्था क्षणात कशी बदलते. हे या आत्मकथनातून पहायला मिळते. या सर्वांतून निराश झालेले मन नकारात्मक विचाराकडे झुकत जाते, तर नाशिकवरून संजय धिवरे ह्या मित्राचा फोन आल्यावर मन:स्थिती एकदम बदलून जाते. 'भरत अभिनंदन. तुझा ५०३ रँक आला आहे'. ही ह्या संदेशाने भरतचे डोकं सुन्न होते. आणि एक क्षणात 'एका कडवट, कठोर आणि वाईट जीवनाचा शेवट झाला.' असा अनुभव त्याला येतो.

आनंदाच्या क्षणी सर्व जवळ असतात. याचा सुखद अनुभव भरतला येतो. आतापर्यंत त्याच्या जीवनात काय सुरू आहे. याची कोणलाच उत्सुकता नसणाऱ्या, गेल्या आठ वर्षांत ज्यांनी कधीही भरतला फोन केलेला नव्हता. अशा लोकांची फोनची रीग लागते. हा त्याच्या जीवनातला नवीन अनुभव ठरतो. 'दु:खात कोणीच कोणाला विचारत नाही. मात्र आनंदच्या, सुखाचा क्षण साजरा करायला कोणीच मागे राहत नाही.' असा हा आगळा—वेगळा अनुभव त्याला मिळाला. शुन्य किंमत असणाऱ्याच्या जीवनात वेळ

कशी बदलवू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे भरत आंधळेचा युपीएससीचा निकालावरून ठरते. लोकांची वागणूक क्षणात कशी बदलते याचाही प्रत्यय ह्यावरून येते.

समाजात दोन प्रकारची लोक असतात. एक आधार देणारी तर दुसरी इतरांचे पाय ओढणारी याची जाणीव ह्या आत्मकथनातून होते. स्पर्धापरीक्षेला कमी लेखणारी मंडळी तर 'अशा परीक्षा अनेक मुलं देतात', 'काय कलेक्टर साहेब, नांगरणी करताय का?' अशी चेष्टा करणारी मंडळीही समाजात असतात. याबरोबर जीवनाचा उद्देश म्हणजे मुलगा मोठा झाला, त्याने कुठेतरी काम करावे आणि आपला संसार करावा' असा सामान्य जीवन जगणाऱ्या ग्रामीण भागातील लोकांच्या वागण्या—बोलण्यातून जाणवते. पण आपला मुलगा मोठी परीक्षा देऊन कलेक्टर व्हावा असा विचार सामान्य जीवन जगणाऱ्यांच्या मनात येत नाही. ही मानसिकता बदलने गरजेचे आहे. असा एक विचार 'गरूडझेप' ह्या आत्मकथनातून पुढे येते.

सारांश 'गरूडझेप एक ध्येय वेडा प्रवास' हे आत्मकथन लेखक भरत आंधळे ह्या एक लहानशा खेड्यातून शून्यातून मोठ्या पदावर जाण्याच्या जीवन संघर्षाची कहाणी होय. या आत्मकथनातून प्रामाणिकपणा दिसून येतो. लहानपणीच्या आठवणी,मुलांवर होणारे बरे—वाईट संस्कार, शिक्षणाची ओढ, जीवन संघर्षातून ध्येय प्राप्तीकडे वाटचाल, पुढे यश मिळाल्यानंतरही आपण साकार केलेले युपीएससीचे स्वप्न ग्रामीण भागात शिकणाऱ्या आणि स्पर्धा परीक्षेपासून वंचित असणाऱ्यातसेच शहरी भागात धडपडणाऱ्या नवतरुणांना प्रेरणादायी ठरणारे आहे. तसेच भरतच्या व्यक्तिमत्त्वातील सकारात्मकता सर्वांना भावणारी आहे.

❖❖❖

Research Journal of India / Vol. 6 / Issue 1 / Oct. 2019 / ISSN 2349-9370 /
Peer Reviewed International Indexed Journal with Impact Factor 5.455 (SJIF) / 61

# 'संवेदनशील मनाचा भावनिक वेध'

## (डॉ. दिनेश काळे ह्यांच्या 'मनाची अभिलाषा' कथासंग्रहावर समीक्षा)

डॉ. विजया जितेंद्र राऊत
मराठी विभाग प्रमुख तथा असिस्टंट प्रोफेसर
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, नंदनवन
नागपूर, महाराष्ट्र (India) ४४००२४
jkraut7777@gmail.com भ्रमणध्वनी ९८५००५३४१४

साहित्य कला आहे आणि कला ही आनंददायी असते व ती जीवन साकारण्याचे कार्य करीत असते. आयुष्य जगायला शिकवणाऱ्या आठवणीतूनच डॉ. दिनेश काळे ह्यांचे बालपणापासून व्यक्तिमत्वाच्या विविध वैशिष्टयांची ओळख होते.त्यांचे विविध लेखन लेखनकार्य हयाची प्रचिती देते. मूळचे नागपूरचे असून शालेय शिक्षण संजुबा शाळेतझालेले आहे. वयाच्या बाराव्या वर्षापासूनच कला,साहित्य,चित्रपटसृष्टी ह्याबाबत विलक्षण ओढ व त्यादृष्टिने सतत प्रयत्नशील असल्याने येणाऱ्या अडचणींवर मात करून मुळात कलावंत असल्याने कलेच्या नजरेने पाहणा—या डॉ. दिनेश काळे ह्यांचे संवेदनक्षम मनावर सकारात्मक परिणाम झाला.हयामुळेच आयुष्यात निरागस सुख व आनंद शोधण्याची त्यांची वृत्ती आहे.सभोवतालच्या वातावरणाविषयी कमालीची आवड,त्यात होणारा काळानुसार बदल, विविध स्वभाव वैशिष्टयांची माणसे, त्यातील नाविण्य, नातीगोती, ओलावा, निसर्ग व त्याची लोभस रूप अशा नानाविध पैलूंना लेखकांनी स्पर्श करून त्यातूनच एक नवा विचार वाचकांपुढे ठेवतात.

माणूस जसा मोठा होतो तसा तो स्टेटसच्या नावाखाली मुखवटा परिधान करत असतो, परंतू बालपणाकडे डोकावले तर नक्कीच त्यातून एक सात्विक समाधान मिळते. हयाचा प्रत्यय लेखकाला आहे. बालपणीतील बुंदिच्या लाडुची भुरळ आजही त्यांना आहे. त्याची चव,सुगंध आजही शोधण्याचा प्रयत्न त्यांचा आहे.त्यांच्यामते त्यावेळेसच्या लाडवाची चव आजच्या खाद्यपदार्थात नाही, काळानुसार हा बदल झालेला आहे ह्यातूनच पूर्वीचा काळ व आजच्या काळाचा फरक ते स्पष्ट करतात.

लेखक मुळात कलावंत असल्याने प्रयोगशील लिखानाकडे वळावे हया विचाराने नाटयलेखन,बालसाहित्य, कथासंग्रह,कविता इत्यादि वाङ्मयप्रकार लिहावे हा ध्यास ठेवून 'कृतान्त' या कादंबरीचे लेखन केले व त्यानंतर नाटयलेखनही केले. आकाशवाणी,वृत्तपत्रे,मासिके,दिवाळीअंकासोबतच चित्रपटासाठी देखील डॉ. काळे हयांनी लेखन केले. कथा व तिचा अवकाश प्रत्येक माध्यमात कसा बदलत जातो व त्यातून मनाला कसे समाधान प्राप्त होते हयाचा प्रत्यय त्यांचे कथालेखनातून येतो. बारा कादंबऱ्या, सात एकांकिका,नऊ बालकथासंग्रह,दोन बालकविता संग्रह,बारा बालचरित्र,एक हिंदी कहानी संग्रह (मन कि तलाश),तीन इंग्रजी पुस्तके, व तीन कथासंग्रह(सारे दिवस सारखेच, अनपेक्षित, मनाची अभिलाषा) एवढी सर्व ग्रंथसंपदा लक्षात घेतली तर मराठीतील सर्व वाङ्मय प्रकारात लीलया संचार करणारे बहुआयामी व्यक्तिमत्वाचे लेखक म्हणून डॉ. दिनेश काळे हयांची दखल घ्यावी लागेल.डॉ. काळे हे उत्कृष्ट अभिनेते सुध्दा आहेत त्यामुळे फक्त लेखक म्हणून न बघता अभिनेता म्हणूनही त्यांच्याकडे बघावे लागेल कारण एकच व्यक्ती लेखनात व अभिनयात समरस होते तेव्हा कलेचा उत्तुंग अविष्कार घडविला जातो हयाची प्रचिती सुध्दा त्यांचे व्यक्तिमत्वातून घेता येतो.

मनाचा विचार,मनाचे अनेक रंग,मनाच्या भावना,संवेदना व मनाचे खेळ या सर्व मनातील छटा 'मनाची अभिलाषा' या कथासंग्रहात मनोवेधक ठरत आहे. बदलत चाललेल्या संस्कृतीच वास्तव चित्रण व वैवाहिक तसेच विवाहबाहय संबंधावर टाकलेला प्रकाश या कथासंग्रहातील छोटया छोटया कथेतून वाचकांना प्रत्ययास येतो. या कथासंग्रहातील काही कथांवरील समीक्षेच्या दृष्टिने विचार मांडण्याचा माझा अल्पसा प्रयत्न येथे करीत आहे.

डॉ. काळे हयांचा 'मनाचा निर्धार' या कथेतील नायिका स्वतंत्र विचाराची असून चार भिंतीच्या आतील बंदिस्त जीवन टाळून स्वच्छंदपणे वावरणे तिला आवडते.परंतु आईवडिलांच्या काळजीमुळे ती आवडत्या मित्राला लग्नासाठी होकार देत नाही. आपल्या नंतर आई—वडिलांची काळजी घेणारं कुणीच नाही या विचाराने सतत तिच्या मनात घालमेल झालेली होती. शेवटी मनाचा निर्धार करून प्रियकरास म्हणते,'मिलिंद,आपण लग्न नाही

केलंतर चालणार नाही कां? हे ऐकून प्रियकरास धक्काच बसतो. मुळात कथेतील नायिका जबाबदारीचा डोंगर गिळून जीवन जगत आहे.स्वत:च्या लग्नाचा विचार दूर सारून म्हाताऱ्या आई—वडिलांना आधार देत मनातील इच्छा व भावनांना दाबून जीवन व्यतित करणाऱ्या नायिकेचा जीवनप्रवासाचे वास्तव चित्रण लेखकाने या कथेव्दारे मांडले आहे.

'एक भूतकाळ' हया कथेत लेखकाने एकाकी जीवन जगणाऱ्या यशवंतरावांचे वर्णन केलेले आहे. यशवंतरावांना वाचनाची आवड असल्याने पुस्तकातील विचारांचे ते व्यक्तिगत जीवनाशी नाते जोडत असत त्यामुळे त्यांच्या मनाला अतीव समाधान लाभत असते तसेच वाचन केल्याने त्यांचेसमोर भुतकाळ समोर उभा राहतो व त्यांना तारूण्या गेल्यासारखे वाटते हयाचे कल्पित वर्णन मार्मिकतेने लेखकाने मांडले आहे.हया कथेत आईला केंद्रस्थानी ठेवले असून तीच्या आजारपणाच्या काळजीने स्वत:चे जीवन स्थापित न केल्याची खंत नायकाला आहे त्यामुळे वारंवार भुतकाळात डोकावून त्यातील आठवणी समोर ठेवून स्वत:चे समाधान करून पुढले आयुष्य व्यतित करण्याचे ठरवतो हयांचे अत्यंत संवेदनशील व मनमोहक वर्णन या कथेव्दारे लेखकाने केले आहे.

विचाराचे चक्र व्यक्तिमनाला कधी कसा विचार करायला लावेल हे काही सांगता येणार नाही हयाची प्रचिती डॉ. काळे हयांचा 'मनातील समाधान' या कथेत दिसून येते. हया कथेतील विश्वासराव हे व्यक्तिचित्र सारखे विचारांच्या मागे धावणारे असेच आहे मग त्याला दिशा असो किंवा नसो हे माहीत असूनही त्यातूनही आनंद घेण्याची कसब व आलेल्या परिस्थितीला हसत हसत स्विकार करण्याची सवय त्यांच्यात होती. वारंवार नोकरीनिमित्त अनेक शहरात स्थलांतरीत होण्यामध्ये काहि बदल व्हावा व कुठेतरी स्थिर स्थावर व्हावे अशी पत्नीच्या मनातील इच्छा तिच्यासमोर प्रकट केली परंतु तीने आलेल्या परिस्थितीत समाधान मानण्याच्या घेतलेल्या भुमिकेमुळे पत्नीबद्दलची आदरयुक्त भावना विश्वासरावांच्या मनाला समाधान करून गेल्याने त्यांच्या मनातील सततच्या विचारांचा अंत झाल्याचे आनंददायी वर्णन लेखकाने प्रस्तुत कथेत वाचकांपुढे ठेवले आहे.पतीपत्नीचे संबंध हे एकमेकांच्या विचारावर टिकणारे असावे हेच लेखकाला यातून स्पष्ट करावयाचे आहे व एकमेकांबाबत भावनांचा आदर व्हावा हाच या कथेचा मुळ गाभा होय.

'भावनांचा खेळ' हया कथेत नायक पदवीधर अनिल पुढे नोकरी करावी की शिकावे? या संभ्रमात असतांना त्याच्या जीवनात येणा—या विविध पैलूंचा सर्वकक्ष विचार वाचकांपुढे लेखक डॉ. काळे ठेवतात. या कथेतील नायक अनिल व नायिका दक्षता हे दोघेही लग्न करून सुखी संसाराचे स्वप्न रंगवतांना त्यांच्या नात्यात येणारी कटुता व दूरता हयांचे विवेचन अत्यंत मार्मिकतेने लेखकाने केलेले आहे. नायिकेच्या आवडीनिवडीचा विचार न करता घरच्यांनी तीचे लग्न दुसऱ्या मुलाशी करण्याचे ठरवतांनाच नायिकेच्या आईला आलेल्या हृदयविकाराचे झटक्याने तिची नाजुक अवस्था बघता कोणताही त्रास होणार नाही हयाची काळजी नायिका घेते. हयामुळेच प्रेमसंबधाविषयी दक्षता आईला काहिही सांगु शकत नाही. आईच्या आजारपणामुळे व्यथित झालेली नायिका जबाबदारी समोर आपल्या प्रेमाचे बलिदान देते. हया कथेत सुध्दा आईवडिलांच्या इच्छेपुढे नायिकेचा नाइलाज झालेला दिसून येत आहे तसेच नायक नायिकेच्या मनातील भावनांशी परिस्थिती कसा खेळ खेळतो हयाचे उत्कट दर्शन हयातून लेखकाने घडविले आहे.

'यालाच जीवन म्हणायचे' या कथेत आयुष्याच्या बदलत्या रूपरंगाचे वर्णन लेखक करतात. कथेतील नायक समीर व नायिका अनिता हयांच्या जीवनलहरीत होणारे बदल आणि त्यातून परिस्थितीनुरूप जबाबदारीत वाढ,विचारांची देवाणघेवाण, आयुष्यातील विविध घटनांना वेगळया जीवनदृष्टिने पाहण्याची क्षमता तसेच दोन व्यक्तिमधील प्रेमाचे, जिव्हाळ्याचे व भावनांचे नाते ह्या सर्व बाबीवर अंतर्मनाने लेखकाने प्रकाश टाकून जीवन असेच असते हयाला पुष्टीही येथे दिली आहे. आयुष्य एका वळणावर सुरू होवून हळूहळू पुढचा प्रवास करत जातो. सुख आणि दु:ख या दोन आयुष्याच्या बाजू. सुखाचे दिवस लवकर गेल्यासारखे वाटते पण दु:ख हे प्रदीर्घ काळ आयुष्याला चिकटूनच राहते. आयुष्यात जर एखादवेळेस आनंदाचेक्षण निर्माणझाले तर आयुष्याला संजिवनी मिळाल्यासारखे महत्व प्राप्त होते तसेच काहिसे समीर व अनिताच्या जीवनातही झाल्याचे दिसून येते. त्या दोघांच्या जीवनात अंकुर जन्माला येणार हया कल्पनेने त्यांच्या आनंदाला उधान आले होते. जीवापाड प्रेम करणाऱ्या या दाम्पत्याचे मने एकमेकांचे प्रेमात कसे गुंफले आहे हाच धागा पकडून दोघांच्या पारदर्शक मनाचा विचार लेखकाने कथेत मांडलेला आहे. उदयास येणारा अंकुर जगात येण्याअगोदरच नाहिसे झाल्याने बघितलेले स्वप्न, आशा व आकांशा ह्या हवेतच राहिल्या केवळ आठवणीच्या रूपात मनात साठवून होत्या. आपल बाळ जगलं नाही ही एकच भावना दोघांच्या मनाला सारखी सलत होती. पण या कथेतील नायकाने ही बाब

सकारात्मक वृत्तीने घेत हेच आयुष्य आहे अशा रितीने स्वत:ला समजुन घेतो. व्यक्तिच्या जीवनात सुखापाठोपाठ दु:ख आणि दु:खापाठोपाठ सुख येतच राहणार, हेच आयुष्य आहे,जीवनातील हा कटु अनुभव लेखकाने वाचकांपुढे सकारात्मक दृष्टिने या कथेतून मांडलेला आहे.

'अभिलाषा' हया कथेत लेखकाने खेडेगावातील संस्कृती,वातावरण व बहुरंगी माणसं हया त्रिसुत्री गोष्टिंचा विचार यात प्रकट केलेला आहे. गावातील अविवाहित व पन्नाशीला असलेला श्रीमंत इनामदार आपल्या चार नोकरांसह एकटाच मोठया वाडयात राहत असतो अशा या इनामदाराला स्त्री सुखाची अभिलाषा त्यांचा मनात निर्माण झाली होती पण त्यात कुठलाही वासनेचा गंध नव्हता.इनामदार श्रीमंत तरी असले तरी लाजाळू स्वभावाचे होते. समाजाचे भान ठेवणारे,सामाजिक बांधिलकी जोपासणारे व्यक्तिमत्वाचे ते धनी होते. भरपूर पैसा व जमीन असुन जीवनाला आधार असे हक्काचे कुणीही नसतांना असे एकाकी जीवन निरर्थक त्यांना वाटत होते. त्यामुळे एकला जीवन प्रवास करणे त्यांच्या नशीबी होते. लेखकाने मनुष्याच्या आयुष्यातील एकाकी जीवनाचे रंग तरंगाचे उत्कट वर्णन या कथेत प्रस्तुत केले आहे.

'आभासातील सुख' हया कथेत सुध्दा एकटेपणाची जाणीव वाटयाला आलेला नायक दिसत आहे. प्रेमविवाहानंतर लगेच सहा महिण्यात पुण्याहून मुंबई येथे बदली झाल्याने त्याचा परिवार पुण्याला व तो मुबईला वास्तव्यास असतो.धकाधकीच्या मुंबई शहरातील वातावरणात एकाकी जीवन व्यतीत करतांना नायकास होणाऱ्या विरहाचे वर्णन यात मार्मिकतेने शब्दबध्द केले आहे.तसेच नोकरीमुळे होणारी त्याची मानसिक आणि शारीरिक पातळीवरची अवस्था कमालीची अस्वस्थ करणारी आहे हे सुध्दा लेखकाने या कथेत स्पष्ट केलेले आहे.

'कल्पनेतून वास्तवात' या कथेत नायक सुहास यास जीवनात येणाऱ्या तरूणी फार आकर्षित करीत असतात. विविध वळणावर भेटणाऱ्या व आकर्षित करणाऱ्या मुलींच्या कल्पनेची सतत हुरहुर मनात सुरू राहते. चर्णी रोडच्या समुद्रकिणाऱ्यावर एका अनोळख्या मुलीचे दिसणे नायकाला कल्पनेच्या वेगळया विश्वात घेवून जाते व दुसऱ्या बाजुला अगोदरच असलेला समीराचा सहवास हयामुळे नायक सुहासच्या मनाची अस्वस्थता कमालीची होते. काही दिवसांनी संध्याकाळी सुहास आई—वडिलांसोबत वर्तकांकडे मुलगी बघायला गेल्यावर ज्या इमारतीत त्याचं बालपण गेले तेथील जुन्या आठवणी डोळयासमोर येते त्याचवेळी समोरून येणारी मुलगी जी चर्नी रोडच्या समुद्रकिनाऱ्यावर अनपेक्षितपणे जवळ येत दूर निघून गेली होती तीच ही स्नेहा जिचं सौंदर्य डोळयात साठवून कित्येक दिवस कल्पनेत व्यतीत केले होते ती वास्तवात नायकाच्या पुढयात येते.त्यामुळे कल्पनेतील मुलगी माझी जीवनसंगीनी होणार हयासाठी आतूर झालेला असतो तर दुसरीकडे समीरा आपल्या प्रेमाची कबुली देण्यासाठी सुहासची मनोमन वाट पाहात असते. समीरा व सुहास ह्या दोघांच्याही जीवनात येणाऱ्या सुखाच्या अविष्काराची जाणीव ही कल्पनेतून वास्तवाकडे जाणारी आहे अशा रितीने लेखकाने कथा सादर केली आहे.

'अपरिहार्य बदल' हया कथेत सुध्दा प्रेमाचाच अविष्कार होतांना दिसतो. या कथेतील नायक व नायिकेच्या मैत्रिचे रूपांतर प्रेमात होवून दाघेही विवाहबध्द होतात व त्यांचे संसारात एक नवीन फुल उमलणार होते हयामुळे त्यांच्या जीवनात नावीण्यपूर्ण व्यक्तिजीवन सुरू होणार होते व जबाबदारीही वाढणार होती. कॉलेज चे लग्नाअगोदरचे जीवन व विवाहानंतरचे जबाबदारीचे जीवन दोन्ही भिन्न स्वरूपाचे असून बघता बघता दोघांचे जीवन बदलून गेले होते. हा झालेला बदल या कथेतून लेखक मोठया जिव्हाळयाने मांडतात.

'दिशाहीन वादळ' या कथेत लेखकाने निसर्गाशी तादात्म पाळून आकाशातील इंद्रधनुष्यासारखं मनुष्याचे आयुष्य असावे असे नायिकेच्या मुखातून वदवून घेतलेले आहे.सुख हे वादळासारखे क्षणभंगुर असते. या कथेतील नायिकेला नायक जगापेक्षा काही वेगळा करेल असे वाटत असते तर दुसरीकडे एक कर्तबगार व्यक्ती आपल्या आयुष्यात आले या विचाराने नायिका भारावून जाते पण कालांतराने हयाच विचारांचा नायकाचेमनाला तिचा वीट यायला लागते. आपली एक बायको आहे, संसार आहे,काही जबाबदाऱ्या आहेत हे चक्क नायक विसरून जातो.नायकाच्या आयुष्यातील नायिकेचे स्थान म्हणजे समाजाला दाखवायला एक बायको हवी. एवढया पुरतेच आहे त्यामुळे त्यात कोणताही भावनिक ओलावा,प्रेम व मनाची ओढ दिसून येत नाही. नायक हा आपलाच आहे की दुसऱ्याचा? हयाच विचाराचे वादळ नायिकेच्या मनात थैमाण करीत जाते. असा विचार कथेतून लेखकाने मांडण्यात आलेला आहे.

डॉ. दिनेश काळे हयांनी प्रेम आणि मनाची सांगड घालतांना कुठेही पांडित्याचे प्रदर्शन केलेले नाही किंवा ओढून ताणून शब्द रचना करून अलंकाराचा सोसही बाळगत नाही. कथांमधील शब्दरचना गुंतागुंताची,क्लिष्ट किंवा अकालनीय वाटत नाही. सरळ, साध्या सोप्या भाषेत व्यथा वाचकांसमोर ठेवतात. जीवनाशी निगडीत अनेक प्रश्न व समस्या वाचकांपुढे उपस्थित करून जीवनाचे वास्तव तळ कथांमधून

शोधण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे.जीवन म्हणजे सुख–दु:खाची संमीश्रता असते.सुखदु:खाचे खेळ माणसाला खेळावेच लागतात. हा संसार,प्रपंच असा ऊनपावसाचा खेळ आहे म्हणून जीवनाकडे आनंदीवृत्तीने पाहण्याचा सल्ला लेखक कथेद्वारे देत आहे. समंजसपणा,सोशिकता आणि सजगपणा घेवून कथा साकारलेल्या आहेत व डोळसवृत्तीने मानवतेचा संदेशही देतात.कोणत्याही संवेदनशील मनाच्या ह्दयाला पाझर फोडण्याची ताकद ह्या कथांमधून दिसते. 'कल्पनेतून वास्तवात','मनाचा निर्धार','एक भूतकाळ','अपरिहार्य बदल','दिशाहीन वादळ','प्रेमाला वय नसतं' या व अन्य कथा हया प्रेम व मन हयाभोवती गुंफलेल्या असून खूपच ह्दयस्पर्शी आहेत तसेच मनावर फटकारे मांडणारे आहे. 'मनाची अभिलाषा' यातील कथा चिंतनशील व जीवनवादी असून मानवाचे विवाह व विवाहबाहय संबंधावर प्रकाश टाकते तव्दतच त्या वाचकांच्या मनाला अंतर्मुखतेकडे नेते.

तसेच डॉ. दिनेश काळे हयांनी त्यांचा कथेत प्रेमाचा अविष्कार अधिक असून प्रेमशृंखलेत गुरफटलेल्या आहेत जीवनात प्रेमाव्यतिरिक्त अनेक प्रसंग व घडामोडी घडत असतात फक्त प्रेम हा जीवनात महत्वाचा पैलू असू शकत नाही परंतू लेखकाच्या कथांमधून प्रेमालाच अधिक महत्वाचे स्थान दिल्याचे दिसून येते.

'मनाची अभिलाषा' हा कथासंग्रह नुसता सुखदु:खात्मक नाही तर त्यापुढे जाऊन जगण्याचे श्वास होतो आणि स्पंदन घडवितो,नवप्रेरणा देतो. म्हणून या कथेतील अवकाश व्यापक आशय व्यक्त करतो.डॉ. दिनेश काळे हयांच्या कथेचे सामर्थ्य व क्षमता 'मनाची अभिलाषा' हा कथासंग्रह वाचतांना अधोरेखीत होते.

रसिक, वाचक, संशोधक नक्कीच 'मनाची अभिलाषा' या कथासंग्रहाचे स्वागत करतील तसेच आपण सर्वानी हा कथासंग्रह जरूर वाचावा अशी अपेक्षा !

❖❖❖

# महात्मा गांधी यांच्या राजकीय व आर्थिक विचारांची प्रासंगिकता : एक विश्लेषणात्मक अभ्यास

डॉ. दिनकर संतुकराव कळंबे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख व संशोधक
मार्गदर्शक, मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविदयालय, भोकरदन
ता. भोकरदन, जि. जालना, महाराष्ट्र (India) ४३११९४
kalambedinakar@gmail.com भ्रमणध्वनी 9422219593

## प्रस्तावना

महात्मा गांधीजीचें समग्र विचार सत्य, अहिंसा या नितीमूल्यावर आधारित आहेत. त्यामूळे त्यांच्या राजकीय व आर्थिक विचारवरही या तत्त्वांचा केवळ प्रभाव पडला नसून याच तत्वाशी केंद्रीभूत त्यांचे विचार आहेत. महात्मा गांधीजीचें विचार केवळ भारतीयांच्याच दृष्ट्रीने महत्वाचे नसून संपूर्ण जगातील मानवासाठी महत्वाचे आहेत त्यांनी आपल्या संपूर्ण विचारात आणि कृतीत आदर्श नितीतत्वांचा विचार केलेला आहे. आजच्या वर्तमान जगात महात्मा गांधीनी सांगितलेले संपुर्ण विचार निश्चीतपणे प्रासंगिक आहेत. त्या अनुषंगानेच ‘महात्मा गांधीच्या राजकीय व आर्थिक विचारांची प्रासंगिकता : एक विश्लेषणात्मक अभ्यास’ या विषयावर संशोधन करत असतांना महात्मा गांधीजींचा जीवन परिचय ते त्यांच्यावर झालेले विचारांचे संस्कार, त्यांच्यावर पडलेल्या विविध व्यक्ती, विचारवंत व घटनांचा प्रभाव, स्वातंत्र्य आंदोलनातील त्यांचे योगदान,त्यांच्या राजकीय व आर्थिक विचाराचे स्वरूप व सद्यस्थीती अशा विविध स्वरूपाच्या विचाराचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

महात्मा गांधीचे राजकीय व आर्थिक विचार हे एखाद्या राज्यशास्त्रज्ञ व अर्थतज्ञ यांच्यासारखे सैध्दांतीक व शास्त्रीय स्वरूपाचे नाहीत तसे ते अर्थतज्ञ व राज्यशास्त्रज्ञ नव्हते पण त्यांनी या विषयावर केलले विश्लेषण संपूर्ण मानवी कल्याणास, केंद्रीत मानणारे होते हे जगातील अनेक विदवानांनी मान्य केले आहे. देशातील राजकारण खुप गंभीर स्वरूपाचे बनले आहे. त्यामुळे महात्मा गांधीजींच्या राजकीय विचारांची प्रासंगिकता पूवीपेक्षा अधिक वाढली आहे. राजकारणात वाढलेले गुन्हेगारीकरण, अनैतिकता, नीतिमूल्यांचा अभाव, साम–दाम–दंड भेद याचा झालेला शिरकाव यामुळे भारतातील लोकशाहिला धोका निर्माण झालेला आहे. या सर्व अनेक गोष्ट्री राजकारणातून संपवायच्या असतील तर महात्मा गांधीजींच्या राजकीय विचाराशिवाय दुसरा पर्याय असु शकत नाही. गांधीजीनी राजकीय विचारात जी तत्वे किंवा सिध्दांत सांगितले आहेत. त्यांचा विचार आजच्या राजकारणात झाला पाहिजे. याचे विश्लेषण या संशोधन पेपरमध्ये करण्यात आले आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. महात्मा गांधीच्या विचारांची पाश्वभूमी अभ्यासणे,
२. महात्मा गांधींच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका असणा–या व्यक्ती आणि विचारांचा अभ्यास करणे.
३. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महात्मा गांधीच्या योगदानाचा आढावा घेणे.
४. महात्मा गांधींच्या राजकीय व आर्थिक विचारांचा अभ्यास करणे व त्यांची प्रासंगिकता अभ्यासणे.
५.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी संशोधकाने वर्णात्मक, व्यावहारिक व विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे. सामाजिक शास्त्रात कोणत्याही विषयावर संशोधन करत असताना केवळ एकाच पध्दतींचा अवलंब करणे अशक्य असते. यास सदरिल विषय अपवाद नाही. संशोधन पेपरसाठी प्राथमिक व व्दितीय साधनांचा वापर केला आहे. प्राथमिक साधनात महात्मा गांधीच्या विचारावरील ग्रंथ, तत्कालीन दस्त आणि महात्मा गांधीजींनी स्वयंलिखीत ग्रंथ व व्दितीय साधनात गांधी विचारांवरील संदर्भ ग्रंथ, मासिके,साप्ताहिके, नियतकालिके,विविध भाषेतील वर्तमान पत्रे इत्यांदींचा समावेश केला आहे.

## संशोधनाचे महत्व

आजच्या परीस्थितीत सामाजिक, राजकीय,आर्थिक क्षेत्रात नैतिक मूल्यांचा प्रचंड प्रमाणात —हास होत असताना दिसत आहे. याचा समाज व राष्ट्रावर गंभीर परिणाम होत आहे. विशेषत : भारतात राजकीय व आर्थिक क्षेत्रात मोठया प्रमाणात अनैतिक,मूल्यहिन वाईट गोष्ट्री मोठया प्रमाणात वाढल्याने समाजाचे आरोग्य ध्योक्यात आले आहे. सामाजिक मूल्ये नाहिसे होत असल्याने, समाज परिणामी देशाचे भवितव्य धोक्यात आलेले आहे मानवी जीवन समाज जीवन व देश सुखी आणि समृध्द ठेवायचा असेल तर महात्मा गांधीजीच्या विचाराशिवाय इतर पर्याय आजतरी दिसत नाहीत. म्हणुनच महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता सरळ आहे. आज जगात शांतता निर्माण करावयाची असेल, लोकशाहीची मूल्ये टिकवायची असतील, संघर्ष संपवायचा असेल आणि मानवी कल्याण केंद्रीत राज्य व समाज निर्माण करायचा असेल तर महात्मा गांधींच्या या विचारांची अंमलबजावणी होणे अत्यंत आवश्यक आहे.

## महात्मा गांधी जीवन परिचय

महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर येथे झाला.त्यांच्या वडिलांचे नाव करमचंद आणि आईचे नाव पुतळीबाई वडील तत्कालीन काठेवाड प्रांततील पोरबंदरमध्ये दिवाण होते. त्यांच्या आजोबांचे नाव उत्तमचंद गांधी होते. महात्मा गांधीचा विवाह १८८३ मध्ये कस्तुरबा माखनजी यांच्या सोबत झाला.१८८५ मध्ये गांधीजींना पहिले अपत्य झाले पण ते जास्त काळ जगले नाही. परंतु नंतर त्यांना चार अपत्ये झालीत

१. हरिलाल(1888) २. माणिलाल (1892) 3. रायदास (1897) ४. देवदास (1900)

## महात्मा गांधींच्या विचारवरील प्रभाव

१. कौटुबिक प्रभाव—महात्मा गांधीच्या विचारांवर त्यांच्या वैष्णव धर्मीय कौटुबिक वातावरणचा प्रभाव पडलेला होता. विशेषत: आईचे उपवास, व्रत आदी बाबींचा प्रभाव.

२. धर्मग्रंथ— घरातील धार्मिक वातावरणाचा तसेच भगवत गीता या धर्मग्रंथाचा मोठा प्रभाव पडला होता. गीता ही महान प्रेरणादायी शक्ती असल्याचे ते मानत त्याला आपले मार्गदर्शक मानले याशिवाय जैन बौध्द धर्माच्या अहिंसेच्या विचारांनी ते प्रभावित झाले श्रावनबाळ व हरिशचंद्र या दोन कथांचा प्रभाव होता.

३. जॉन रस्किन— महात्मा गांधीच्या विचारांवर जॉन रस्किनच्या 'अन टु दी लास्ट' या ग्रंथाचा प्रभाव पडल्याने सर्वोदयी विचार उदयास आला. श्रम संस्कृतीला दिलेले महत्व हा रस्किनच्या विचारांचा प्रभाव होता.

४. टॉलस्टॉय— अराज्यवादी विचार मांडणारे रशियन विचारंवत टॉलस्टॉय यांचा प्रभाव पडल्याने शांततापूर्ण प्रतिकार मार्गाचा स्वीकार गांधीजीनी केला तसेच रामराज्याला महत्व दिले.

५. नमदार गोसले — महात्मा गांधींच्या विचारांवर ना गोटलेंचा राजकिय विचारांचा प्रभाव पडला म्हणून गांधीजींनी त्याना आपले राजकीय गुरू मानले.

६. थोरो— थोरोच्या या निबंधातून त्यांना असहकाराचे तत्व सुचले अशा अनेक व्यक्ती व परिस्थितीचा प्रभाव त्यांच्या विचारांवर पडलेला आहे.

## महात्मा गांधींचा राजकीय प्रवेश

१९१६ नंतर भारतीय राजकारणात गांधींचा प्रवेश झाला. लोकमान्य टिळकानंतर १९२०भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व गांधींनी केले. राष्ट्रीय सभेचे नेतृत्व स्वीकारले डिसेंबर १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉग्रेसचे पूर्ण अधिकार गांधींना देण्यात आले. असहकार चळवळीने ब्रिटीशांच्या विरोधाला प्रारंभ झाला.

- १९२२ मध्ये चौरिचौरा येथे हिंसात्मक घटना झाली त्यामुळे गांधीनी असहकार कार्यक्रम मागे घेतला.
- १९२७ मध्ये भारतात सायमन कमिशन आले. 'सायमन कमिशन परत जा' अशा घोषणा देउन परत लावले.
- मार्च १९३० ला प्रथम मिठाच्या कराविरूध्द दांडीयात्रेला सुरूवात केली.
- १९३० ला इंग्लडमध्ये गोलमेज परिषद झाली पण गांधीजी उपस्थिती राहिले नाहीत. १९३१ ला गांधी आयर्विन करार.
- १९४२ ऑगस्ट मध्ये पूणे येथे गांधी व आंबेडकरांमध्ये पूणे करारझााला.

o १९४२ ऑगस्ट मध्ये चलेजाव चळवळ केली.

o ३० जानेवारी १९४८ रोजी बिरला मंदिरात प्रार्थनेसाठी जात असताना नथूराय गोडसेंनी त्यांना गोळी घातली तेव्हा त्यांनी 'हे राम' म्हणुन आपला प्राण सोडला.

१९२० ते १९४७ पर्यत महात्मा गांधीनी देशाच्या स्वातंत्र्य लढयाचे अत्यंत समर्थपणे नेतृत्व केले. विविध आदोलने, चळवळीच्या माध्यमातून ब्रिटीश सरकारला नमविण्याचे महान कार्य त्यांनी केले. महात्मा गांधीच्या विचाराने कतृत्वाने व नेतृत्वाने स्वातंत्र्य आंदोलनाला फार मोठी शक्ती मिळाली, संपूर्ण राष्ट्रात राष्ट्रवादाची भावना जागृत करण्यात गांधीजींचे योगदान अतुलनीय होते आणि एकूण असे म्हटले जाते की, स्वातंत्र्य आंदोलनात सर्वात जास्त योगदान महात्मा गांधीचेच होते. सत्य, अहिंसा, सत्याग्रह, साध्य,आणि साधन सुचिता,ग्राम स्वराज्य, रामराज्य, राज्यासंबंधी विचार, धर्म व राजकारण,आध्यात्मिक राजकाराणाचे आधार, सत्तेचे विकेंद्रीकरण, लोकशाही संबंधी विचार, राष्ट्रवार व आंतरराष्ट्रावाद,समता, सर्वधर्म समभाव, हिंदू मुस्लिम ऐक्य, स्त्री पुरूष समानता इत्यादी तत्वांून त्यांच्या आदर्श स्वरूपाच्या विचारांचे प्रतिबिंब दिसून येते. महात्मा गांधीनी आर्थिक विचारात अनेक धोरणे स्पष्ट केले आहेत. आर्थिक विकेंद्रीकरण  स्वावलंबन, शोषण रहित अर्थव्यवस्था, श्रमप्रतिष्ठा, सर्वोदय, औद्योगिकरण आणि भांडवलशाहित विरोध, खादी उद्योग स्वदेशी वस्तुंचा वापर, ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी, लघु उद्योग, कुटीर उद्योग, शाश्वत विकास व पर्यावरण यांना महत्वाचे स्थान त्यांनी दिले आहे. या सर्व धोरणाचा विचार करून महात्मा गांधींचे राजकीय व आर्थिक विचार किती आवश्यक ठरतात याचाच विचार या संशोधन निबंधात केला आहे.

## समारोप

महात्मा गांधी यांच्या जीवनाचे अध्ययन केल्यानंतर त्यांचे जीवन आधुनिक समाजसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे हेच दिसते. भारतीय स्वातंत्र्यलढयाकरिता अहिंसा व सत्याग्रहांचा नाविण्यपूर्ण मार्ग निवडला, जो सर्वसामान्य माणसाला अनुसरता येईल. म्हणुन भारतीय समाजाच्या सर्व स्तरावरिल लोकांचा सहभाग या आंदोलनात प्रचंड प्रमाणात निर्माण होउन या आंदोलनास सर्वसामान्यांच्या व्यापक अशा लोकलढयाचे स्वरूप प्राप्त झाले ख—या अर्थाने स्वातंत्र्य आंदोलनातस यश मिळाले. महात्मा गांधीनी त्यांच्या राजकीय विचारात सत्तेच्या विकेद्रीकरणाला महत्व दिले. असुन राजकिय राजकिय क्षेत्रात विकेंद्रीकरण आवश्यक आहे. हे त्यांनी सांगितले कारण जर सत्तेचे केंद्रीकरण झाले तर व्यक्तीस्वातंत्र्यावर मर्यादा निर्माण होउन ते नष्ट्र होते.  महात्मा गांधींनी सत्तेच्या विकेंद्री करणासाठी पंचायत राज संस्था महत्वाच्या मानल्या व त्यांच्या स्वायतत्तेवर भर दिला. महात्मा गांधीच्या आर्थिक विचारात सर्वोदयाची संकल्पना प्रमुख मानली जाते. त्यांच्या या संकल्पनेवर रस्किनच्या अन टु दी लास्ट या ग्रंथातील विचारांचा प्रभाव दिसून येतो. महात्मा गांधीच्या मते, 'सर्वोदय म्हणजे समाजातील सर्वाचा उदय, किंवा विकास, सर्वांचे सुख, आरोग्य आणि कल्याण होय' प्रत्येकाचा आदर प्रत्येका प्रती सहानुभूति हा सर्वोदयाचा मार्ग आहे. गांधीनी सर्वोदय हा त्यांच्या विचारांचा आधार मानला आहे.आजच्या परिस्थितीत विषमता, शोषण, अज्ञान आणि अन्याय या सर्वापासून मुक्ती मिळवायची असेल तर महात्मा गांधींजीचा सर्वोदयाचा विचार उपयुक्त आहे.गांधीजी सर्वोदयामध्ये विश्वास ठेवतात आणि म्हणुनच सर्वांचे कल्याण त्यांच्या विचारांचा आधार होता. योग्य तंत्रज्ञान आणि अहिंसक माध्यमांचा वापर करून गरिबी निर्मुलन करणे हेच एकमेव ध्येय असावे. आणि या सर्वांची गरज ही आधुनिक काळामध्ये आहे. याची जाणीव होते.

## संदर्भ

१. प.सि.काणे— राजकिय सिध्दांत आणि राजकिय विचार —पिंपळापुरे पब्लीशर्स नागपूर १९९८
२. डॉ. ना.य.डोळे.— भारतीय राजकिय विचारवंत — विद्या बुक्स पाब्लीशर्स, औरंगाबाद २०००
३. भा.ल.भोळे— आधुनिक भारतातील राजकिय विचार —पिंपळापूरे पब्लीशर्स नागपूर २००१
४. नलिनी पंडित— महात्मा गांधी — ग्रंथाली, मुंबई
५. महात्मा गांधी —  ग्राम स्वराज्य— नवजीवन प्रकाशन, अहमदाबाद

❖❖❖

# अण्णाभाऊंची शाहिरी : अनमोल साहित्यठेवा

डॉ. प्रवीण बनसोड
नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंत
जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९४२३४२५१२९

## प्रस्तावना :-

अण्णाभाऊंचा जन्म 1 ऑगस्ट 1920 सालचा. साधारण 1941 ते 1969 हा त्यांचा कार्यकाल. 8 पोवाडे, 10-12 गाणी, 1 प्रवासवर्णन, 1 नाटक, 9 लोकनाट्ये, 15 वगनाट्य, 30 कादंबऱ्या, 30 कथा, अशा 52 ग्रंथाशिवाय 20 पेक्षा जास्त पुस्तिका असे एकूण 79 हून अधिक ग्रंथ पुस्तिका या स्वरूपातले वाङ्मयाचा तर हिशेबच नाही. अण्णा भाऊंनी केवळ ललित लेखन केले असे नाही, तर 'लोकयुध्द', 'युगांतर', 'युध्दनेतृत्व' इ. नियतकालिकांमधून स्फुट स्वरूपाचे खूप लेखन केले. यापैकी बहुतांश लेखन त्यांनी 'युगांतर' मध्ये चालविलेल्या 'वाट्टेल ते लिहितो' या सदरातून केले.

सन 1944 च्या सुमारास शाहीर अण्णाभाऊ, अमरशेख आणि गव्हाणकारांनी एक कलापथक स्थापन केलं आणि टिट्वाळा येथील शेतकरी परिषेदेच्या निमित्तानं त्यांनी कार्यक्रम सादर केला. शेतकरी हा जगाचा पालनकर्ता असूनही त्यालाच वंचित राहावे लागते, असे अण्णाभाऊंना वाटलं तेव्हा ते एका लावणीतून शेतकऱ्यांना हे जग बदलविण्याचे आवाहन करतात. ती लावणी अशी -

तू मराठमोळा शेतकरी घोंगडी शिरी।
जुनी ती काठी, जुनी लंगोटी।
बदल ही दुनिया सारी रे।
चल बदल ही दुनिया सारी रे।

अण्णाभाऊ शेतकऱ्यांना हे जग बदलविण्याचे आवाहन कां करतात ? कारण शेतकरी उन्हात, पावसात आणि थंडीत राब-राब राबून मोत्याप्रमाणं पिक पिकवितो आणि जनतेला जगवितो. परंतु येवढ्या मेहनतीनं पिकविलेलं अन्न येथील सरकारी कायदाच त्यांना खाऊ देत नाही. म्हणून अण्णाभाऊ शेतकऱ्यांना हे जगं बदलविण्याचे आव्हान करतात आणि पुढील कडव्यात म्हणतात -

तू खाशी कांदी, भाकरी बसूनि आंधारी।
भूकेला कोंडा, निजेला धोंडा-बदल ही दुनिया सारी।।

शेतकरी हा जगाचा पालनकर्ता आहे. तो विश्वनिर्माता आहे. त्यांचीच ह्या जगावर सत्ता आहे. परंतु सरकारी व्याजानं त्याला भीक मागायला प्रवृत्त केलं म्हणून अण्णाभाऊंनी शेतकऱ्यांना त्या कायद्याविरूध्द बंड करण्यास चेतविलं.

## पोवाडा हा लोककला :-

पोवाडा हा सर्वांगाने विचारपूर्वक पण कलात्मकतेने रचावा लागतो,हे अण्णाभाऊ पर्णपणे समजून होते. म्हणून त्यांच्या पोवाड्यात सौंदर्याचे ताजमहाल पदोपदी ऐकणाराला दिसून येतात. उदाहरणार्थमहाराष्ट्र देश रंगवायचा प्रयत्न अनेकांनी केला. पण अण्णाभाऊंचा महाराष्ट्र पाहायचा तर त्यांचा हा पोवाडा रसिकांनी मुद्दाम डोळ्यातून घालावा ते म्हणतात -

मराठी मायभू आमुची। मराठी भाषिकांची। संत महंताची।
ज्ञानवंतांना जन्म देणार। नव रत्नांचे दिव्य भांडार। समर धीर घेति जिथे अवतार। जी जी जी.

त्यांनी लिहिलेला बंगाल दुष्काळाचा पोवाडा इतका गाजला की, श्री. विनय रॉय यांनी मराठी पोवाड्याच्याच चालीवर त्याचे भाषांतर करून कलकत्याला रेकॉर्ड केला व त्याच्यावर बंगालच्या उड्या पडत होत्या. पंजाब, दिल्ली दंग्याचा पोवाडा व त्यातील सौंदर्यस्थळे व त्यातील हाक आग अन् विशाल मानवतेचे शाहीर अण्णा भाऊ, तो पोवाडा वाचल्याशिवाय कळणार नाहीत.

पोवाड्याच्या केलेला वेगळी बैठक देणारे अण्णा भाऊ, पोवाडा सौंदर्यपूर्ण उभा करणारे अण्णा भाऊ, पोवाड्याद्वारे जनजागृती साधून-जनशिक्षण करून जनतेच्या हातून पराक्रम घडवून अणणारे अण्णा भाऊ, आपल्याला जाणवतात.

अण्णाभाऊ जसे लोकनिष्ठ शाहीर होते, तसेच ते देशनिष्ठही होते. म्हणून लोकनिष्ठा आणि देशनिष्ठेसंबंधी म्हणत –

“जो जनतेची कदर करतो, जनता त्याचीच कदर करते. माझा या देशावर नि त्याच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. हा देश सुखी, समृध्द व्हावा, इथं समानता नांदावी, या महाराष्ट्र भूमीचं नंदनवन व्हावं. याची मला रोज स्वप्नं पडतात. ती मंगल स्वप्न पाहत पाहत मी लिहीत असतो.”

अण्णाभाऊ सतत लिहीत होते. सामाजिक जाणीवांच्या व्यथा आणि या व्यथांच्या पोटीच त्यांनी एका नवजात विद्रोही शाहिरीला जन्म दिला होता. तिला आपल्या वैचारिक विद्रोहाचं दूध पाजून समर्थपणे जनतेसमोर उभं केल होतं.

अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरीचं स्थान स्वतंत्र आहे. खरं म्हणजे तिच्यात कल्पना विलास नाही तिच्यात देव देवता नाहीत, त्यामुळं तिला हिणकसपणा नाही. विद्रुपता तर मुळ्ची नाही. तिच्यात आहे सर्व उपेक्षित समाजांच्या जीवन जाणिवा. तिच्यात आहे दलित माणसांच्या मरगळलेल्या जीवनात प्राण ओतणारी सर्वस्पर्शी क्रांती. म्हणून अण्णाभाऊंच्या शाहीरीचे स्थान स्वतंत्र आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊंच्या लावण्या नि पोवाडे महाराष्ट्रातील जनतेच्या जीभेवर नाचत होत्या. पैकी महाराष्ट्राची परंपरा, माझी मुंबई मैना गावावर राहिली, उठला मराठी देश, तू मराठमोळा, संयुक्त महाराष्ट्र येतसे पहा. इत्यादी लावण्यांनी सारा महाराष्ट्र खवळून जागा झाला होता. त्यांच्या लावण्यांनी संपूर्ण मराठी माणसांच्या भावनांना जागृत केलं होतं. अण्णाभाऊंच्या लावणीतील सामाजिक विषमता आणि शोषणांची दर्दभरी वर्णने ऐकून गिरणीत काम करणारा मजूर किंवा शेतात काम करणारा शेतकरी त्यावर विचार करीत होता. नव्हे त्यातील विचार गोरगरीब जनतेला कळत होता. कारण त्यामध्ये त्या जनतेचं वास्तव चित्रण होतं. आता या मुंबईच्या लावणीविषयीचं पहा ना. मुंबई शहराचं वर्णन आणखी काही शाहिरांनी केलं. तेव्हा त्यांना मुंबईत श्रीमंत आणि भांडवलदार दिसलेत. त्यामुळं त्यांनी केलेलं वर्णन एकतर्फी आणि अवास्तव वाटतं. परंतु अण्णाभाऊंच्या वर्णनात किती वास्तवता आहे. ते म्हणतात –

मुंबईत उंचावरी मलबार हिल इंद्रपुरी।
कुबेराची वस्ती। तिथं सुख भोगती।।
परळात रहाणारे। रात्रंदिवस राबणारे।
मिळेल ते खाऊनी। घाम गळती नारी ग।।
फोरास रोड तीन बती। गोलपिठा नाक्यावरती।
शरीर विकुनी किती पोट भरती। नारी ग।।

अशा प्रकारे अण्णाभाऊंना मुंबईत जे जे दिसलं ते ते त्यांनी शाहिरी वाङ्मयाच्या माध्यमातून जनतेसमोर मांडलं. मलबार टेकडी म्हणजे श्रीमंतांची नि भांडवलदारांची जणूकाही इंद्रपूरीच आहे. परंतु परळमध्ये राहणारे गरीब, दुःखी, कष्टी लोक रात्रंदिवस घाम गाळून मिळेल ते खातात. तर फोरस रोडवरील गोपपिठा नाक्यावर कित्येक स्त्रिया देह विक्री करून पोटं भरतात. असं हे मुंबईचं वास्तव वर्णन माणसाला एका वेगळ्या विश्वात घेऊन जातं आणि जगत असलेल्या जीवनाची जाणीव करून देतयं.

अशीच त्यांची गाजलेली लावणी माझी मैना. वर वर पाहिलं तर या लावणीत आपल्या नवऱ्याला प्राणप्रिय पत्नीचा विरह जाणवतो. त्यामुळं अनेकांना त्या लावणीचं आकलणही झालं नाही. अण्णाभाऊंनी मैनेचं वर्णन इतक्या दिलखुशपणे केलंय की, शाहीर अमरशेख आणि आचार्य अत्रे यांना देखील या लावणीनं भूरळ घातली होती म्हणतात. ती लावणी अशी –

माझी मैना गावावर राहिली।
माझ्या जीवाची होतीया काहिली।।
ओतीव बांधा रंग गव्हाळा। कोर चंद्राची। उदात्त गुणाची।
मोठ्या मनाची। सीता ती माझी रामाची।
हसून बोलायची। मंद चालायची। सुगंधी केतकी सतेजं कांती।
घडीव पुतळी सोन्याची। नव्या नवतीची। कांडी दवण्याची।
रेखीव भूवया। कमान जणू इंद्रधनूची। हिरकणी हिऱ्याची।
काठी आंधळ्याची। तशी ती गरीबाची।
मैना रत्नाची खाण। माझा जीव की प्राण।
नसे सुखाला वाण। तिच्या गुणांची छक्कड मी गायली।
माझ्या जीवाची होतीया काहिली।।1।।

अण्णाभाऊंनी वरील कडव्यात उपमा, अलंकार वगैरेचा उपयोग केल्यामुळं निश्चित असं वाटतं की, कुण्यातरी प्रियतमेच्या सौंदर्याचं वर्णन केललं आहे. परंतु या लावणीत जी मैना संबोधिली ती कोण? याची प्रचिती संपूर्ण लावणी वाचल्यावरच येते. बरं, या लावणीची विशेषता अशी की, एक बेकार तरूण आपल्या प्राणप्रिय पत्नीला गावीच ठेवून पोटाच्या विवंचनेत भटकत मुंबईला येतो आणि मुंबईस आल्यावर त्याला काय काय दिसतं याचं वास्तव वर्णन अण्णाभाऊ खालील कडव्यात करून जातात.

या मुंबईत गर्दी बेकाराची। त्यात भरती माझी झाली एकाची।
मढ्यावर पडावी मूठभर माती। तशी गत झाली माझी।
माडीवर माडी हिरव्या माडीची। पैदास इथं भलतीच चोरांची।
ऐतखाऊंची, शिरजोरांची, हरामखोरांची। भांडवलदारांची।
पोटासाठी वाट धरली मी कामाची। पर्वा नाही केली उन्हाची,
थंडीची, पावसाची।। पाण्यानं भरलं माझं खिसं।
वाण मला एका छत्रीची।।

मुंबईमध्ये गेल्यावर त्या तरूणाला बेकारांची गर्दी दिसते. आकाशाला भिडणाऱ्या उंचच उंच इमारती दिसतात. त्याच बरोबर चोर, हरामखोर, कुरघोडी करणारे आणि गरिबांचं रक्त शोषण करणारे भांडवलदारही आढळतात. अशा त्या मुंबईत पोट भरण्यासाठी म्हणून तो तरूण कामाची शोधाशोध करतो. परंतु कुणीही काम देत नाही. किंवा सहानुभूतीनं एका शब्दानही विचारत नाही. तेव्हा त्याला आपल्या मैनेचा विरहं जाणवतो. मेलेल्या माणसाच्या मढ्यावर मुठभर माती टाकून त्याला त्या मातीत दफन करावं अशा प्रकारे त्या तरूणाची स्थिती झालेली असते. मैनेच्या विरहानं तो सारखा तडफडत असतो. मैनेच्याच दुःखात सहभागी होण्यासाठी म्हणून तो संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत उतरतो.

मराठी वाङ्मयामध्ये शाहिरी वाङ्मयाला स्वतःचे असे स्वतंत्र स्थान आहे. शाहिरी वाङ्मयात वीरसाची अभिव्यक्ती करणारे पोवाडे महत्वाचे आहेत. शाहिरी वाङ्मयात मौलिक भर घालणाऱ्या शाहिरांमध्ये दलित समाजातील शाहिरांचाही अंतर्भाव होतो. पारंपारिक शाहिरीचे अनुकरण करणारे, म.फुलेप्रणीत सत्यशोधक समाजाचा प्रभाव असणारे व आंबेडकरी चळवळीचा प्रभाव असणारे अशा तीन प्रकारच्या शाहिरांचा अंतर्भावशाहिरांमध्ये होतो.

अण्णाभाऊ साठे हे जरी त्यांच्या कथांसाठी व कादंबऱ्यांसाठी मराठी साहित्यसृष्टीत नावाजले जात असले व वाचकांमध्ये लोकप्रिय असले, तरी 'लोकशाहीर' म्हणूनच त्यांचा अधिक नावलौकिक आहे. प्रथम इ.स. 1931 मध्ये ते वयाच्या अकराव्या वर्षी आई-वडीलांसमवेत मुंबईला आले व पुढे तारूण्यात पदार्पण करण्यापूर्वीच ते कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीचे अनुयायी व समर्थक बनले. त्यातून त्यांनी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यक्रमासाठी, पोवाडे व कवने गाण्यास सुरुवात केली. इ.स. 1944 मध्ये कम्युनिस्ट पक्षाचा प्रचार करण्यासाठी ते स्वतः, अमर शेख व द.ना. गव्हाणकर अशा दिघांनी मिळत 'लाल बावटा कलापथक' स्थापन केले.

अण्णाभाऊंनी इ.स. 1942 मध्ये 'नानकिंग नगरापुढे' हा आपला पहिला पोवाडा लिहिला व त्याचबरोबर 'सुगी' ही पहिली लावणीही लिहिली. त्यांनी एकूण 15 पोवाडे लिहिले असले, तरी सध्या नऊच उपलब्ध आहेत. ह्या रचना अण्णा भाऊंनी प्रसंगपरत्वे विविध कलापथकातून व लोकनाट्यातून गायिल्या आहेत. अण्णा भाऊंचे हे सर्व काव्यवाङ्मय प्रामुख्याने शाहिरी वळणाचे आहे. ते केवळ कामगार चळवळीपुरते मर्यादित नाही, तर त्यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नही त्यांनी उपस्थित केले आहेत.

प्रा. रा.ग. जाधव हे अण्णा भाऊंच्या लिखाणाविषयी म्हणतात,"कृत्रिम रंग वेचण्याची त्यांना आवश्यकता वाटली नाही. या विलक्षण व्यक्तिमत्त्वाला कलानुरूपी जी सोबत लाभली ती मार्क्सवादाची प्राकृतिक संवेदनक्षमता ही अण्णाभाऊंना लाभलेली मोठी देणगी होय." अण्णा भाऊंच्या वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक डॉ. बाबुराव गुरव यांनी अण्णाभाऊंच्या एकूण वाङ्मयाचे अंगीभूत वैशिष्ट्ये सांगितली आहेत, ती म्हणजे "अनघड जिवंतपणा आणि भावप्रवेगी विकसन".

प्रा. रा.ग. जाधव यांनी उल्लेखिलेली 'प्राकृतिक संवेदनशीलता' आणि डॉ. बाबुराव गुरव यांनी सांगितलेला 'अनघड जिवंतपणा' हा अण्णाभाऊंच्या प्रत्येक कलाकृतीत दिसतो. कथा, कादंबऱ्यांतील भाषेविषयी खूप काही लिहिले गेले आहे. पण त्यांची गीते, पोवाडे यांच्यावर म्हणजे त्यातील शब्दकळेवर, प्रतिमा सृष्टीवर फारसे काही लिहिल्याचे दिसत नाही.

1942 साली लिहिलेला 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा' अत्यंत अभ्यासपूर्ण आहे. रशियाविरूध्द हिटलरच्या नाझी फौजा घुसल्या होत्या. या पोवाड्यात नुसता तोफगोळ्याचा मारा नाही. तर शहर सेनापती यांच्या नावासह युध्दाची तपशीलवार मांडणी आहे. अभ्यासपूर्ण पोवाडे, सोप्या भाषेत लिहिणे, त्याला गेयता आणणे ही साधी गोष्ट नाही, अण्णा भाऊंच्या प्रतिभेने ती लिलया पेलली आहे. मुळातच हा पोवाडा वाचण्यासारखा आहे. शिवाजी महाराजांच्या उदयाचे वर्णन कवीने, शाहिरांनी

केलेले असेल. पण अण्णा भाऊंनी जे शब्दशिल्प उभे केले आहे त्याला तोड नाही. ज्या परिसरात शिवाजी महाराज घडले तो सबंध परिसर जिवंत झाल्यासारखा वाटतो. ते म्हणतात,

'जुलुमाच्या मध्यरात्रीला
तेव्हा स्वातंत्र्याचा वारा वाहू लागला
लोटूनढग बाजूला
मावळा तारा होऊन चमकू लागला'

पुढे ते म्हणतात,

'करवंदी पार झिंगलेली। ऐकुनी हाक हर्षली
दरडीने जांभई दिली। कळाकाने मान डुलविली
किल्ल्याचे धाप टाकली। बुरूजाने बाहु उभवीली
त्या भयाण जाळीखाली। तलवार चमकू लागली
घोड्याची टाप वाजली। वर धूळ उडू लागली'

'मुंबईचा गिरणी कामगार' या पोवाड्यात त्यांनी गिरणी कामकारांच्या लढ्याचा, संघर्षाचा इतिहास सांगितला आहे. त्याला गौरविताना ते म्हणतात,

'हिंद मुक्तीचे भले
शिंग वाजले
रशियामध्ये लेनिन वदले'

इतक्या मराठमोळ्या शब्दात आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या क्रांतीकारकाने गिरणी कामगारांचा केलेला गौरव मनाला भावतो.

अण्णाभाऊंचं बालपण ज्या निर्सर्गाच्या सान्निध्यात गेलं त्या निसर्गाशी ते इतके तादात्म पावले होते की निसर्गातील घटना आणि मानवी मनाची घातलेली प्रत्यकारी सांगड 'रवि आला लावुनी तुराय या गीतात दिसते. मराठी कवितेतील ही श्रेष्ट निसर्गकविता आहेण

'रवि आला लावुनि तुरा
निघाली जिंदगी भरभरा
दीप गगनाचा डोईवर लागला
ढग तिमिराचा त्यानं निवारिला
पानापानांत नाचे हा वारा
भूप रागाच्या छेडितो सारा
हासे कोकीळ वनी। मोर नाचे वनी
सप्तरंगाचा फुलवून पिसारा'

अण्णाभाऊंनी ज्या वर्गासाठी गाणी लिहिली त्या वर्गाची म्हणजे शेतकरी-कामगार कष्टकऱ्यांची भाषा आणि प्रतिमा त्यांनी वापरल्या, त्या इतक्या चपखल आणि समर्थ आहेत की अण्णा भाऊंच जीवन त्यांनी केलेल्या वर्गलढ्याच्या तत्वज्ञानाचा स्वीकार आणि त्यांच्यातील प्रतिभावंत कलावंत कसे एकजीव झाले होते. याचं प्रत्यंतर देणाऱ्या आहेत 'शिवारी चला' या गीतात ते म्हणतात,

'संदी लई नामी आलीया आवंदा
सावकारशाहीची विखारी कुंदा
आरपार खुरपून पाडायचा रेंदा'

याच गीतात ते 'भांडवलशाहीचा चिवट कोणा' किंवा 'उपटून मुळी घाल पायदळी' अशी प्रतीकं वापरताना दिसतात.

## सारांश :-

अण्णा भाऊंनी मराठी लोककलेला योगदान देऊन मराठी सांस्कृतिक जीवन समृध्द केले आहे. विशेषतः कला ही वर्गातील नसते, ती वर्गीय असते. चळवळीचे ती माध्यम व हत्यार असू शकते. हे अण्णाभाऊ साठे यांनी सप्रमाण सिध्द केले. त्यांच्या लोकनाट्यात अनेकदा धोंडी हे कामगारांचे प्रतिनिधित्व करणारे पात्र येते.

अण्णा भाऊंनी नवे तमाशे किंवा ज्याला वगनाट्य म्हणत त्याचे 'लोकनाट्य' असे नामांतर केले ती गोष्ट फार मजेशीर आहे. पां.तु. पाटणकर यांनी ही गोष्ट सांगितली आहे. ते लिहितातत, 'लोकनाट्य हा तमाशा आधुनिक अवतार.

लोकनाट्य शब्दाचे जन्मकर्तृत्व मात्र गमतीदार योगायोगाने अण्णा भाऊंकडे आले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या आधीचे दिवस होते ते महाराष्ट्रापासून मुंबई तोडून गुजरातच्या पारड्यात टाकण्यासाठी किंवा स्वतंत्र ठेवण्यासाठी महाराष्ट्रदेष्ट्या राजकारण्यांची तेव्हा जोरात खटपट चालली होती. अण्णा भाऊ तेव्हा लालबावटा कलापथकाद्वारे लेखणीचे फटकारे ओढीत होते. त्यामुळे चिडून जाऊन मोरारजी देसाईंनी त्यांच्या कलापथकावर व तमाशावर बंदी आणली. त्यामुळे त्यांनी 'माझी मुंबई' हा वग लाखो कामगारांसमोर सादर केला. व सुरूवातीला स्टेजवरून जाहीर केले की, 'मायबाप सरकारने तमाशावर बंदी आणली आहे. म्हणून आम्ही आज आपल्यासमोर 'माझी मुंबई' हे 'लोकनाट्य' सादर करीत आहोत.' टाळ्यांच्या कडकडाटात व पोलीसांच्या उपस्थितीत तमाशाचे लोकनाट्य असे बारसे करण्याचे एक ऐतिहासिक कार्य अण्णा भाऊंनी केले. अण्णाभाऊंचे लोकनाट्य आणि शाहिरी म्हणजे महाराष्ट्रातल्या लोकजीवनाचा अनमोल साहित्यठेवाच होय. हा साहित्यठेवा अधिक तेजस्वी ठेवण्याचे आव्हान आजच्या संशोधक साहित्यिकांपुढे आहे.

## संदर्भ :-

1) दलित साहित्य - उगम आणि विकास
- डॉ. अविनाश सांगोलेकर
प्रतिमा प्रकाशन, प्रयमावृत्ती

2) अण्णाभाऊ साठे - जीवन आणि साहित्य
- नानासाहेब कठाळे
समता सैरिक दल प्रकाशन द्वितीयावृत्ती

3) आपले वाङ्मयवृत्त जुलै 2019

4) अण्णाभाऊ सांगून गेले
संपादक- विलास रणसुभे
श्रमिक प्रतिष्ठान प्रकाशन.

❖❖❖

Research Journal of India / Vol. 6 / Issue 1 / Oct. 2019 / ISSN 2349-9370 /
Peer Reviewed International Indexed Journal with Impact Factor 5.455 (SJIF) / 73

# आदिवासी काव्यातील आंबेडकरी विचार आणि दर्शन

प्रा. रेखा व्ही. इंगोले
मराठी विभाग प्रमुख
मा.सु.पा.कला,विज्ञान व कै.पां.ठा.वाणिज्य महाविद्यालय,मानोरा, जि.वाशिम, महाराष्ट्र (India)
rekhaingole09@gmail.com भ्रमणध्वनी ९४०४५४७२७१

## प्रस्तावना :

साठोत्तर काळात लोकशाही समाजरचनेमुळे तळागाळातील मुक समाजाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समानतेबरोबर शिक्षणाची संधी मिळाली ही त्यांच्यासाठी पर्वणी ठरली. साठोत्तर कालखंडात फुले, आंबेडकरी विचारांचा वारसा घेऊन दलित साहित्याचा झंझावात भारतीय समाज आणि साहित्यात निर्माण झाला. नंतर ग्रामीण साहित्य, जनवादी साहित्य म्हणजेच बहुजनांच्या साहित्याने पुरोगामी विचारांचे अधिष्ठान घेऊन दलित साहित्याच्या पावलावर पाऊल ठेवले. आदिवासी साहित्यिकही त्याला अपवाद ठरले नाहीत. त्यातूनच आदिवासी साहित्य प्रवाह १९८० च्या आसपास मूळ धरत विस्तार पावत गेला. त्यात कथा, कादंबरी आणि नाटयादी साहित्य प्रकारापेक्षा कवितेची वाटचाल जोमाने झाली.कविता ही श्रृंगार आणि मनोरंजनासाठी नसून सामाजिक प्रश्न आणि समस्याचे उग्ररुप प्रकट करणारे ते एक प्रभावी माध्यम आहे. ग्रामीण दलित कवितेप्रमाणेच आदिवासी कविताही बंडाच्या भाषेतून सामाजिक सांस्कृतिक निष्ठाही सांगते. समाज संस्कृती आणि ऐतीहासीक वारसा या विषयी काव्यविचार मांडणे ही आदिवासी कवींच्या कवितेची भूमिका असून त्यांची कविता प्रस्थापित विषमतामूलक भेदाने विमुक्त जीवन मूल्यांच्या विरोधात बंडखोरी करते, आणि समाज परिवर्तनासाठी विद्रोहाचे उद्‌गार काढते. त्यामुळे प्रस्थापित हिंदुप्रणित समाज व्यवस्था आणि आदिवासींचे जीवन जगणे या संदर्भातील परस्पर संबधाचा आशय आदिवासी काव्यातून प्रकट होतो. लोकशाही मूल्यांच्या जाणिवा शोषित, पिडीत आणि तळागाळातील माणसांबरोबरच आदिवासी कविंनाही होऊ लागल्या.

## आदिवासी कवितेतील आंबेडकरी विचार :

हिंदू धर्मव्यवस्थेने विषमतावादी जीवन मूल्ये बंधनकारक आणि अपरिवर्तनीय मानलेली होती. वर्ण आणि जातिभेदांच्या भक्कम भिंती उभ्या करुन शुद्रातिशुद्र, अस्पृश्य, भटके–विमुक्त आणि आदिवासी यांना माणूस म्हणून माणूसपणाचे हक्क नाकारले होते. त्यांचे जगणे पशुवत ठेवून त्यांना गुलामीत जगणे भाग पाडले होते. या जातिसमूहांना दास्यमुक्त करुन मानवतेच्या पातळीवर आणण्यासाठी विषमतेच्या भिंती तोडण्याचे काम चार्वाक, बुध्द आणि म.फुले यांनी केले. त्यांचा वारसा घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भेदनिती पाळणारी भिंत पूर्णपणे उद्‌ध्वस्त केली. परंतु प्रस्थापितांच्या मनातून जातीय विषमतेचे खूळ अजूनही गेले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात उपेक्षा, वंचना, शोषण, फसवेगिरी, अन्याय, अत्याचार त्यांनी चालूच ठेवला शोषित पीडितांच्या पिढीला येणारे दाहक अनुभव त्यांनी साहित्यातून मांडले. तेव्हा त्यांनी प्रस्थापित विषमतामूलक व्यवस्थेला हादरविण्यासाठी आंबेडकरी विचाराला हत्यार मानले तसेच आत्मभान, आत्मजागृती, चळवळी, संघटना, शिक्षण, नकार, विद्रोह, बंडखोरी, स्वाभिमान व स्वावलंबन हे विचार काव्यातूनही उद्‌धृत केले आहेत.

रानावनात, डोंगरदऱ्यात राहाणाऱ्या आदिवासींना आपल्या जिवनाचा अर्थ रानावनात जरी शोधावा लागत असला तरी ते आपल्या झोपडयांमध्ये गुदमरलेल्या अवस्थेत जगताहेत, त्यांना जगण्याची धडपड करतांना प्रस्थापित व्यवस्थेने गुन्हेगार ठरविले. चोर, दरोडेखोर मानले. लोकशाही राज्यात सर्वांसाठी समान कायदा असला तरी दरिद्री, उपेक्षितांना न्याय मिळतोच असे नाही. कायद्याच्या राज्यातही त्यांच्या बाजूने न्याय झालेला दिसत नाही. म्हणून कवि वाहारु सोनवणे म्हणतात की,

‘कायद्याचे मायबाप
तुटलेल्या धाग्यांना
गाठ मारुन
जाळे विनतात
कोळयाच्या जाळयाप्रमाणे
जीव–जंतू–दुर्बलांना अडकविण्यासाठी’ (पृ. १२९)

इथल्या प्रस्थापित व्यवस्थेने आदिवासींकडे माणूसकीच्या नात्याने कधी पाहिलेच नाही. आदिवासी समाजाला प्रस्थापितांनी मालकी हक्क नाकारला, त्यांच्या जीवनात वणवा पेटला भाकरतुकडयासाठी ते तडफडत राहिले. या अनुभवांनी बाबाराव मडावी यांच्या कवितेने विद्रोह पुकारुन परिवर्तनाच्या दिशेने ती झेप घेवू लागली. आदिवासीच्या व्यथा समजून घेवून ती प्रस्थापित व्यवस्थेवर आघात करु लागली. या व्यवस्थेला छिनाल समजून माणसाला गुलाम बनविण्याचे मनसुबे उधळून लावण्यासाठी नव्या क्रांतीचे शस्त्र मडावी आपल्या कवितेतून मांडतात आणि म्हणतात की,

''स्वातंत्र्य, समता बंधुत्वावर घाला घालून
आमच्या ढुंगणाची लंगोटी लुटणाऱ्यांनो
आता आम्ही सावध झालो लोकशाहीत उजेडाच्या गावी आलो।''[१]

या व्यवस्थेने भारतीय समाज जीवन दुषित केले असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली लोकशाही प्रामाणिकतेवर आधारलेली असल्याची ते सांगतात आणि प्रस्थापितांच्या दास्यातून मुक्त होण्यासाठी आवाहन करतात. विषमतेवर तुटून पडून समतेच्या युध्दासाठी सुरुंग पेरतात. कुपोषण आणि भूकेने मरण्यापेक्षा ते क्रांतीसाठी आदिवासींना सज्ज व्हायला सांगतात.

कृष्णकुमार चांदेकर हे चळवळीत कार्य करणारे कवी असून पुरोगामी विचार त्यांच्या काव्यातून प्रकट होतात ते विषमतेची पेरणी करणाऱ्या संस्कृतीला वस्त्रहीन मानतात. माणूसकीच्या गोष्टी त्यांना झुठ वाटतात. उपेक्षीत आणि कुपोषित असलेल्या आदिवासींना ते म्हणतात.

''पुरे झाले राजा मुक्तीच्या रे गप्पा
मार आता गप्पा शोषितांच्या।''

चर्चा, आंदोलने, उपोषणे यांचा काहीही उपयोग न झाल्याने क्रांतीची भाषा व्रीव करुन शोषिंताविरुध्द त्यांची कविता विद्रोह करते. याच बरोबर सुनिल कुमरे (तिरकमठा) यांनी आदिवासींच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक व धार्मीक स्थितीगतीचा मागोवा घेऊन आदिवसींमध्ये अस्मिता चेतवणारे काव्य केले आहे. स्वाभिमानशून्य जगायला भाग पाडणारी सर्व प्रकारची विषमता आणि मानव्याचा नाश करणाऱ्या दंगलीचे विश्लेषण करतांना त्यांनी आदिवासींना बंडखोरी करायला सांगितले आहे की,

''धर्मांध व जातीयवाद्यांनी बाबासाहेबाना डागाळले
दलितांनी उभे शहर उद्‌ध्वस्त केले
जयभीम।
आपण असे लंगोटी–चिरकुट सांभाळायचे
भेदला पाहिजे तिरकमठयांनी आजवरचा काळोख
जय उलगुलान''

जाति धर्माच्या नावाखाली दलित आदिवासींची अवहेलना, विटंबना अन्याय, अत्याचार झाल्याचे वास्तव कविला जेवढे माहित आहे तेवढेच दलितांनी सवर्णांना केलेला प्रतिकारही तो जाणून आहे. म्हणून गप्प न राहता आदिवासींना विद्रोह करण्यास सज्ज होण्याची भाषा त्यांची कविता करते.

प्रस्थापितांच्या पोथ्यापुराणाचा पाढा वाचून जातीय व्याख्या विरोधी बंडखोरी करतांना मडावी म्हणतात,

''बाबासाहेब आता आम्ही कुठवर सहन करावं
समतेच्या क्रांतीयुध्दातील रंणागणातले आम्ही
भीमसैनिक झालो।''

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या सम्यक विचाराच्या क्रांतीचे तत्वज्ञान घेऊन मानवतेच्या मारेकऱ्यांची आणि जातीय वाद्यांची तक्रार ते बाबासाहेबांकडे करतात. याच प्रमाणे गणेश परतेकी आपल्या काव्यातून आदिवासींना आत्मभान आणून देण्याचा प्रयत्न करतो व स्वाभिमानाने जगण्याचा विचार मांडतो. प्रस्थापित व्यवस्थेतील स्तोम धुडकावून लावतो. नारायण आणि पारायण यांना नाकारतो. किर्तन परंपरा सोडून देतो. समाज परिवर्तन आणि प्रबोधन यावर भर देतो. देवापेक्षा माणूस बनवायला सांगतो आणि पूजाअर्चा, देवधर्म नाकारतो. जसे –

''ज्या दगडाने आम्ही घायाळ झालो
ज्या दगडाने आमचा जीव गेला
त्याच दगडाला छातीवर घेऊन कशाला उपवास ठेवता?''[२]

देवधर्माच्या श्रध्देपोटी शोषित समाज निमूटपणे गुलामगिरीचा स्वीकार करीत आलेला आहे. त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी गावात मंदिरच नकोत त्या मंदिरातील दगडात मन, भावना,हदय नाही अशा निर्जीव दगडाला मानणारी व्यवस्था माणसाचा छळ आणि विटाळ करते तेव्हा कविचे शब्द पेटतात. अन्यायाविरुध्द बंड पुकारतात. त्यावेळी धकाधकीच्या, धावपळीच्या आणि संघर्षाच्या जीवनात ते कणखर नेतृत्वाचा शोध घेतात आणि लिहितात की,

''लोक शोधतात सुख शांती
आणि मी शोधतो आदिवासींचा
डॉ.बाबासाहेब आंबेडकर''[३]

आदिवासी संस्कृतीचा वारसा घेऊन आलेला हा संवेदनशील मनाचा कवी गुलामीचे जोखड फेकून देण्यासाठी वि. द्रोह बनतो. फुले, आंबेडकर विचार वारसा त्याला त्याच्या मुक्तीचा पर्याय वाटतो.

वसंत कुलसंगे हा कवी वेगवेगळया गटात आणि समूहात विभागलेला आदिवासी समाज एकत्र येण्यासाठी कूळ आणि गोत्र टाकून द्यायला सांगतो रोटी—बेटी व्यवहार सुरु करणे काळाची गरज मानतो. आदिवासी समाजामध्ये सामाजिक अस्मिता व एकात्मता निमार्ण होण्यासाइी तो जसा कविता करतो तसाच आपल्या मनोगतात लिहितो की, ''दलितांचा उध्दार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या समाजातील लाडवन,कोसरे,बावणे,लिंगायत इत्यादी उपजातींना कायमची मूठमाती देऊन केला. परंतू आदिवासी समाजातील सत्तेचाळीस पोटजातीमधील अनेक राजकीय नेते व सामाजिक कार्यकर्ते जातिभेदाला खतपाणी देण्याचे कार्य करीत आहेत. आदिवासी समाजातील नेत्यांची हीच शोकांतिका आहे.''[४]

अर्थातच कुलसंगे आंबेडकरांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करुन आदिवासींचे प्रबोधन करतात. जातीयतेवर भाष्य करुन आदिवासींना समतेचे तत्व सांगतात. स्वतंत्र भारतात त्यांना कोणी वाली नसल्याचे स्पष्ट करुन राज्य घटनेचे भान ठेवतात आणि म्हणतात की,

''घटनेच्या व्दारे दिली, भारताला लोकशाही
घटनेची पायमल्ली होत आहे बेबंदशाही
स्वातंत्र्यानंतरही समानतेला थारा नाही
स्वातंत्र्य, बंधुता, समानता हे तुझे तत्व आहे''[५]

स्वातंत्र्यानंतर डॉ.आंबेडकरांनी राज्य घटनेची जबाबदारी पेलून भारतीय घटनेचे शिल्पकार बनले मात्र स्वतंत्र देशातील राज्यकर्त्यांनी घटनेची पायमल्ली केली. लोकशाही मूल्ये अस्तित्वात येवूनही समाधानकारक फायदे आदिवासींच्या वाटयाला आले नाहीत, तर त्यांचा भ्रमनिरास झाला. चळवळीशिवाय पर्याय उरला नाही. चळवळ करतांना त्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक उर्जास्त्रोत वाटले आणि त्यांनी ते स्विकारले. आदिवासींमध्ये बदल घडून येण्यासाठी त्याला स्वत:च्या अस्तित्वाचा विचार करावा लागला त्यावेळी वसंत कनाके आदिवासींमध्ये जागृती निमार्ण करु पाहतात. वैचारिक चिंतनात रमून प्रस्थापित व्यवस्थेवर भाष्य करतात. तसेच क्रांतीची मशाल पेटवून समाजक्रांती करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी लिहितात की,

''बा, आम्ही
जन्माने भीम असून
गेलो मागे महात्म्याच्या
ओशो गोयंकाच्या''[६]

समतेचे तत्वज्ञान सांगणारा बुध्द धर्म आदिवासींना समजलाच नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदर्श आणि प्रेरणा तो मानू शकला नाही. मित्र कोण शत्रू कोण, हे त्यांच्या लक्षात आले नाही. म्हणून स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणता आले नाही. म्हणून शिकूनही अडाणी राहित्याची खंत कविला वाटते, परंतू आंबेडकरी विचारांचे भान संपूर्ण भारतभर पसरत असल्याचे त्यांची कविता सांगते. भुजंग मेश्राम यांची कविता विषमतावादी प्रदूषित व्यवस्थेवर भाष्य करते. अज्ञान, अंधश्रध्देवर प्रहार करते. गावाबांधणीतील अज्ञान, अंधश्रदेवर शोषण भगतगिरी, दारिद्रय यास कारण असलेल्या व्यवस्थेच्या छाताडावर आग्यामोहळा सारखी बसू पाहते. वेठबिगारी करायला लावणारी संस्कृती नाकारते. एकात्म गणसमाजासाठी शोभा यात्रा काढणे. स्वातंत्र्योत्तर काळातही आदिवासींकडे दुर्लक्ष होते. त्याची दखल घेतली जात नाही. म्हणून कवी लिहितो की,

''तुमचे केले जाते स्वागत
मंडलना काढले जाते निकालात

तुम्हाला दाखवला जातो राजघाट
ताजमहाल, लाल किल्ला
लपवला जातो. बस्तर, बेलखेडा, ज्योतिबा
आणि बाबा''[७]

भारतात आदिवासी नाहीत अशी स्वतंत्र सरकारने आंतरराष्ट्रीय पातळीवर बतावणी केली होती. अर्थात ''संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक आदिवासींच्या हक्काचा जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. १२ डिसेंबर १९९२ ते ११ डिसेंबर १९९३ पावेतो आदिवासी वर्ष जगात साजरे झाले असे असतांना भारतातील आदिवासी आदिम जमातीत मोडत नाहीत अशी भूमिका घेऊन भारत सरकार जगापुढे भारतातील आदिवासींचे अस्तित्व नाकारत आहे.''

## निष्कर्ष :

शतकानुशतके अन्याय, अत्याचाराला बळी पडणाऱ्या समाजाला डॉ.बाबासाहेबांनी ज्ञानाचा नवा मार्ग सांगितला आणि बुध्दाचा सन्मार्ग दाखवून तुम्ही स्वतःचे शिल्पकार आहात, असा बहिस्कृतांना महामंत्र दिला. याची जाणीव विनोद मेश्राम, पी.डी.अत्राम, माधव सरकुंडे, प्रभु राजगडकर यांनी आपल्या काव्यातून व्यक्त केल्या आहेत. डॉ.बाबासाहेब यांनी 'शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा दिलेला महामंत्र स्वाभिमान, अस्मिता, आत्मसन्मान याच बरोबर संविधानातील सरनाम्यामध्ये जाहीर केलेली समता स्वातंत्र्य, बंधुता, न्याय ही लोकशाही मूल्ये या सर्व गोष्टी मानसाला माणूस म्हणून जगवण्यासाठी त्यांनी जो आग्रह केला त्याचा स्वीकार आदिवासी कवींनी केलेला आहे. म्हणून आदिवासी काव्याच्या प्रेरणा, बुध्द, फुले, आंबेडकर हे असून आंबेडकरी विचारांचे दर्शन त्यामधून घडल्याशिवाय राहत नाही.

असे असले तरी भारतातील बहिस्कृत जातिसमूह स्वातंत्र्योत्तर काळातही डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे विचार यांच्यापासून कोसो दूर आहेत. त्यांच्यात आपापसात इतकी विषमता आहे की, प्रत्येक जात स्वतःला दुसऱ्या जातीपेक्षा श्रेष्ठ समजते. परंतू आंबेडकरी विचारधारेखाली एकत्र येत नाही. कारण महारेतर जातिजमाती (काही अपवाद वगळता) बाबासाहेबांना मानायला तयारच नाहीत. उदाहरणार्थ, प्रकाश चव्हाण यांच्या 'उदई' आत्मकथनात बौध्दाच्या विवाहप्रसंगी पंक्तीतल्या उष्टया पत्रावळीवर पारधी लोक तुटून पडतात, तेव्हा यजमान बाबासाहेब व बुध्द यांचे फोटो तिथे ठेवतो, ते पाहून पारधी लोक पळून जातात. यावरुन बऱ्याच बहिष्कृ त जातिसमूहांना बाबासाहेबांबद्दल आदर नाही. तर त्यांचे फोटो पाहून महाराच्या घरचे लग्न असल्याचे समजते. त्या वेळी भुकेपेक्षा पारध्यांना जातीचा विटाळ करणे महत्वाचे वाटते. अशा वेळी बहिष्कृत जातींचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. परंतू शिकलेल्या आदिवासी तरुणांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची जाणीव ठेवून कृ तज्ञताच पाळली नाही तर त्यांचे विचार काव्यातून प्रकट केले आहेत.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१) पाखरं : सावध, बाबाराव मडावी, उ.नि.पृष्ठ १४
२) जगण्याचे संदर्भ : दगड, उ.नि.पृष्ठ ३७
३) तत्रैव : शोध, पृष्ठ ५५
४) अस्मितादर्श : वसंत सितारामजी कुलसंगे, मालबोली प्रकाशन, मुंबई, व्दितीयावृत्ती, पृष्ठ २
५) तत्रैव : शिल्पकार, पृष्ठ २५
६) सुक्का सुकूम : बा.वसंत कनाके, पृष्ठ ३९
७) शतकातील आदिवासी कविता : ग्रॅंडफादर, भुजंग मेश्राम, संपा : डॉ.विनायक तुमराम, हरिवंश प्रकाशन

❖❖❖

# ज्ञानरचनावादामुळे प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेत झालेले सकारात्मक परिवर्तन....!

[१]श्रीमती मंदा उमाठे
मुख्याध्यापिका,
स्व. प्रकाशभाऊ उमाठे विद्यालय, नागपूर
भ्रमणध्वनी ९९६०७३२२२६
umathemanda@gmail.com

[२]प्रा.डॉ. रेणू बायस्कर (सदार)
सहायक प्राध्यापक
पदव्युत्तर शिक्षण शास्त्र विभाग,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
renubayaskar@gmail.com ९४०३४१८९६३

## प्रस्तावना :

२२ जून २०१५ रोजी एक महत्वाचा शासन निर्णय निर्गमित झाला आणि या शासन निर्णयाने महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात इतिहास घडविला. या शासन निर्णयाने मरगळलेली शिक्षण व्यवस्था सचेत झाली. या निर्णयाने शिक्षकांना, विद्यार्थ्यांना जणू जीवदान दिले. विद्यार्थ्यांच्या हितासाठी कळकळीची तळमळ शिक्षकांच्या, पर्यवेक्षकांच्या मनात निर्माण झाली. एका नव्या वेगळ्याच ऊर्जेने सगळेच प्रेरित होऊन जणू खडबडून जागे झालेत. हा निर्णय होता "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" कार्यक्रमासंबंधी !

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणक्षेत्रात वेळोवेळी बदल होत गेले. कधी कोठारी शिफारशीमुळे तर कधी नवीन रचनावादामुळे. परंतु प्रत्येक वेळी बदलाचा केंद्र बिंदू 'शिकविणे' हाच होता. शिक्षकांनी शिकविले परंतु विद्यार्थी शिकू शकले काय? याचे उत्तर कोणीच शोधू शकणार नाही आणि नेमका हाच विचार प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत केला गेलाय. शिकविल्याने मुले शिकतीलच असे नाही. त्यांना शिकण्यासाठी प्रवृत्त केले, संधी दिली तर मात्र ती निश्चित शिकतील. असा सकारात्मक विचार ज्ञानरचनावादाने मांडला. एक **chinese** म्हण आहे.

"I hear and I forget
I see and I remember,
I do and I understand"

साध्या, सोपी भाषेत याचा अर्थ असा कि मुले ऐकून, पाहून शिकत नाहीत तर शिकण्याच्या क्रियेत त्यांना सामावून घेतले तर ती अधिक शिकतात, समजूतदार होतात. शिकण्याच्या प्रत्यक्ष अनुभवाने मुले संस्कारित होतात आणि असे शिकलेले संस्कार अमिट, कायमस्वरूपी असतात. हीच विचारसरणी ज्ञानरचनावादाचा पाया आहे.

## स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षण :

आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राधाकृष्णन आयोग, मुदलियार आयोग, कोठारी आयोग आणि यांच्याद्वारे प्रेरित विचार बदल घडवून आणण्याचे उद्देशाने शिक्षण पद्धतीत, शिक्षण प्रणालीत समाविष्ट झालेत. शिकविण्यासाठी बरेच प्रयत्न झालेत. पण मुले स्वतंत्रपणे स्वत:हून शिकू शकली नाहीत. त्यांच्या लेखी शाळा या बंदिशाळाच ठरल्या. शिक्षक जसे म्हणतील तसे आणि जे म्हणतील ते शिकायचे असा प्रघात पडल्याने जे शिकवतोय ते मुलांना आवडते आहे की नाही, मुले ते शिकले की नाही, याबद्दल शिक्षकांना काही घेणे देणे नव्हते. आपण जिद्दीने, तळमळीने, प्रयत्नपूर्वक शिकवतोय एवढाच विचार असायचा; पण मुले प्रत्यक्षात शिकताहेत किंवा नाही, असल्यास किती शिकताहेत हा विचारही नव्हता. गुरुजींच्या हातातील छडी, हाताची घडी, तोंडावर बोट अशा स्थितीत मुले शिकणे शक्यच नव्हते. मॉन्टेसरी पद्धती, **play & way method** चाही विचार झाला. पण मुलांना स्वारस्य न वाटणाऱ्या खेळातूनही ते शिकू शकले नाहीत. १९८६ च्या नवीन शैक्षणिक धोरणात व त्यावर आधारित १९९२ चे सुधारित शैक्षणिक धोरण आले. त्यानंतर आलेल्या २००१ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आराखड्यात शिकण्याच्या प्रक्रियेत मूल्यमापनाला झुकते माप मिळाले. त्यातूनच सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन (Cumulative Comprehensive Evaluation) ची कल्पना उदयास आली. त्याचबरोबर मुले नापास झालीत तर त्यांच्यात न्युनगंड निर्माण होऊन ती नकारात्मक प्रवृत्तीची होतील या दृ

ष्टिकोनातून त्यांना प्राथमिक स्तरावर म्हणजे इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत नापास न करता, त्या त्या इयत्तेच्या क्षमता विकसित करून विद्यार्थ्यांना वरच्या वर्गात प्रवेश देण्यात आला. परंतु हाहि प्रयोग विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून विचार करता असफल ठरला. परिणामी ५ वी, ६ वीतल्या विद्यार्थ्यांच्या साध्या बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, लेखन, वाचन, संभाषण या पायाभूत क्षमताही विकसित झाल्या नाहीत. या बिकट परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम समोर आला आणि एखादी जादूची कांडी फिरावी इतक्या जलद गतीने त्याचा परिणाम दूरवर दिसू लागला.

## प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम :

अशी काय जादू आहे या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमात? कसे शिकतात मुले या कार्यक्रमांतर्गत? यांचे प्रत्यक्ष निरीक्षण करायचे झाले तर ग्राममंगल सारख्या रमेश पानसेंच्या किंवा प्रतिभा भराडेंच्या कुमठेबिटमधील एखाद्या शाळेला भेट देऊन अनुभव मिळविणे, ज्ञानरचनावाद समजून घेणे आवश्यक ठरेल. ग्राममंगल किंवा कुमठे बीटातील शाळांना भेट देणे भौगोलिक अंतरामुळे शक्य नव्हते. म्हणून खराशीच्या जि. प. प्राथमिक शाळेला भेट दिली. मुलांना हसत खेळत शिकतांना पाहून शिक्षकांचे तणावरहित, मुक्त चेहरे पाहून, प्रगत शिक्षण काय आहे याची कल्पना येते. मुलांना प्रश्न विचारल्याबरोबर उत्तर देण्यासाठी साऱ्या मुलांचे हात लगेच वर होतात आणि प्रश्नांचे उत्तर देण्यासाठीची आतुरता त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येते. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देता आल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर पसरलेले समाधान विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करते, त्यांचा आत्मविश्वास वाढविते आणि हे सर्व कशामुळे होते तर केवळ ज्ञानरचनावादाच्या अंतर्भावामुळे !

## ज्ञानरचनावाद :

विद्यार्थ्यांनी स्वत:हून शिकण्याचा प्रयत्न करणे, स्वत:हून ज्ञानाची रचना करणे म्हणजे ज्ञानरचनावाद! ही शिकण्याची नैसर्गिक पद्धती आहे. वरून ती जबरदस्ती लादली जात नाही. आतूनच ती उस्फूर्तपणे उदयाला येते. जमिनीत पडलेली बी ज्याप्रमाणे पडल्यावर उगवून बाहेर येते, बघता—बघता चिमुकले रोपटे होते अन कालांतराने त्याचा वृक्ष होतो. त्याचप्रमाणे ज्ञानरचनावादातून मिळालेले ज्ञान, शिक्षण असे आतून उगवल्यासारखे नैसर्गिक, स्वाभाविक असते. त्यामुळे ते सहज व आनंददायी होते. सृजनाचा अमर्याद आनंद देते. ज्ञानरचनावादातून शिकतांना विद्यार्थी आपल्या पूर्वज्ञानाचा उपयोग करतो. जर ते अपूरे असेल तर तो अधिक माहिती मिळविण्याचा स्वत: प्रयत्न करतो. जिज्ञासेपोटी तो बुद्धीला चालना देऊन विविध मार्गाने ज्ञान गोळा करतो. त्याला स्वत:ला व्यक्त होण्याची संधी प्राप्त होत असल्याने तो स्वत: प्राप्त केलेल्या ज्ञानाची स्वत:च्या शब्दात मांडणी करून व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. यातून त्याच्यामध्ये प्रचंड आत्मविश्वास निर्माण होतो आणि स्वत: ज्ञानाची रचना केल्याचे समाधान, सृजनशीलतेचा आनंद त्याला प्राप्त होत असतो. आणि हेच आहे ज्ञानरचनावादाचे यश.

ज्ञानरचनावादामुळे असाध्य गोष्टी साध्य होतांना दिसत आहे. ज्ञानरचनावादामुळे केवळ विद्यार्थीच शिकतात आनंदी होतात असे नाही तर शिकणाऱ्या शिक्षकांनाही तसाच आनंद प्राप्त होतो. मुले शिकू लागली, बोलू लागली, स्वत:चे आत्मप्रकटीकरण करू लागली की वर्ग आनंदी होतो. शिक्षकांना समाजात सन्मान मिळतो.

विद्यार्थ्यांनी मिळविलेला आत्मविश्वास शिक्षकांच्या चेहऱ्यावरही परिवर्तीत होतो. शाळा नीरस, कंटाळवाणी न वाटता रोज शाळेत जाण्याची, नवे काही शिकण्याची ओढ लागते आणि असे विद्यार्थी, असे शिक्षक अशा शाळा समाजात कौतुकाचा विषय ठरतात. असे दृश्य म्हणजे शिक्षण क्षेत्रातील नवोदय आणि नवसृजनपर्वच असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणासंदर्भात निरनिराळे प्रयोग, संशोधन करूनही मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची गळती होतच राहिली. बऱ्याच विद्यार्थ्यांना शाळेत जाणे आवडेनासे झाले त्यामुळे समाजाची व्हावी तशी प्रगती झाली नाही. त्यातच शिक्षणाच्या खाजगीकरणाची भर पडून शासकीय शाळांतील व स्वायत्त शाळांतील विद्यार्थ्यांच्या तुलनेत बरीच तफावत झाली. शासकीय शाळा अधिकाधिक दुर्लक्षित झाल्या. आपले नेमके चुकतेय कुठे? हा शासनाला गहन प्रश्न पडला. पण ज्ञानरचनावादामुळे या प्रश्नाला चोख उत्तर सापडले.

बालकांत जन्मजात कुतुहल, जिज्ञासावृत्ती असते. त्यांच्या जिज्ञासू वृत्तीचे समाधान ज्ञानरचनावादामुळेच होते. कारण त्यांच्या कुतुहल, उत्कंठा व जिज्ञासा या नैसर्गिक प्रवृत्ती ज्ञानरचनावादात पोषण केल्या जातात, पूर्ण होतात. त्यामुळे मिळालेला आनंद तनामनातून ओसंडून वाहतो. ज्ञान मिळाले, आत्मसात झाले की,

आत्मविश्वासही वाढतो. आणि पूढे काय? पूढे काय? असे नवनवे आव्हानात्मक प्रश्न निर्माण होतात. ज्ञान मिळविण्याची प्रक्रिया, ज्ञानलालसा आणखी प्रबल होत जाते. आकलन, तर्क, अनुमान, अद्भूत, अकल्पनीय कल्पना साकार होतात. सृजनास चालना देतात. विद्यार्थ्यांना समृद्ध करतात. आणि त्यांचा शिकण्याचा वेग वाढतो. शिवाय हे शिकणे आपल्या सवंगड्यसोबत होत असल्याने अशा नवनिर्मितीचा आनंद विलक्षण असतो. इतकेच नव्हे तर आपण काय शिकलो आणि किती शिकलो याचे आत्मपरिक्षण ही विद्यार्थ्यांना करता येते. आणि जे नव्याने शिकले त्याचा पूर्व ज्ञानाशी संबंध जोडता येतो. असा संबंध जोडता येणेही खरी ज्ञानाची नवी रचना! आणि यातून मिळालेला आनंदच पूढे शिकण्यात, नविन शिकण्यास प्रेरित करतो. त्यामुळे आधुनिक काळातील शिक्षण क्षेत्रातील हे एक क्रांतिकारी पाऊल ठरले आहे. ज्ञानरचनावादामुळेच विद्यार्थ्यांच्या ज्ञानात्मक, भावनात्मक आणि क्रियाकौशल्यात्मक विकास होत असल्यामुळे बेंजामिन ब्लूम या शिक्षणशास्त्रज्ञाच्या विचारांना पुष्टी मिळते. विद्यार्थ्यांना शिकण्यातून नवी दिशा मिळते. असे वातावरण, असे विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांच्या अडचणीत तत्परतेने सहाय्य करणारे शिक्षक ज्या शाळांत असतील त्या शाळा प्रगत शाळा म्हणून नाव लौकिकास पात्र होतील हे नि:संशय! आपली शाळा खरेच प्रगत झाली आहे किंवा नाही हे शासनाने ठरविलेल्या २५ निकषांद्वारे कोणालाही तपासून पाहता येईल आणि अशाप्रकारे अधिकाधिक शाळा प्रगत होत गेल्यातर लवकरच अवघ्या महाराष्ट्रात शैक्षणिक प्रगती होईल. विशेष म्हणजे आपली शाळा प्रगत झाली असेल तर ते शाळेच्या शिक्षकांनीच निकषांच्या आधारे मूल्यांकन करून घोषित करायचे. शिक्षकांवर विश्वास करणारी ही प्रणाली आहे. कारण शाळा प्रगत करण्याची जबाबदारी शिक्षक आणि गावकऱ्यांवरच असल्यामुळे शाळेच्या मुल्यांकनाची जबाबदारीही शिक्षकांवरच आहे.

## भाषेची तयारी :

भाषेमुळे ज्ञानग्रहण आणि संवर्धन होते. यासाठी भाषा समृद्ध होणे गरजेचे आहे. प्राथमिक शाळेत प्रारंभीच्या वर्गात भाषेविषयक कौशल्ये म्हणजे श्रवण, भाषण, वाचन व लेखन समृद्ध झाली की ज्ञानग्रहण सोपे होते. त्यामुळे ज्ञान, आकलन, उपयोजन, तर्के, अनुमान, विश्लेषण या व्यक्तिमत्व सपन्न करणाऱ्या बाबीही विद्यार्थी आनंदाने शिकू लागतात.

प्रारंभिक वर्गात वर्णाक्षरांवरून निरर्थक, निर्जिव वाचन न शिकविता अर्थपूर्ण शब्दचित्रांचा जोड्या जुळवून आशय एकसंघ केला जातो आणि अशा असंख्य शब्दचित्रांच्या साह्याने विद्यार्थी आनंदाने वाचन करतात. पहिल्या इयत्तेतच चार सहा महिन्यात मुले आत्मविश्वासाने वाचायला लागतात आणि अभिव्यक्तही व्हायला लागतात.

## गणिताची तयारी :

गणिताचे अंक, संबोध स्पष्ट होण्यासाठी वस्तू सानिध्याचा वापर केला जातो. कारण वस्तू सानिध्याच्या माध्यमातून अंक संबोध चटकन समजतात. निर्जिव निरर्थक अंकांना अर्थ बोधाचा संबोध स्पष्ट करून दिल्यास गणितातील मुलभूत क्रिया बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार यांचे आकलन होते. ज्ञानरचनावाद विद्यार्थांना शिकण्यास प्रेरित करतो, शिकवीत नाही. एकदा शिकण्याचा आनंद मिळू लागला की, विद्यार्थी आपल्या गतीने शिकू लागतात. या पद्धतीत शिकू लागलेल्या विद्यार्थ्यांना ज्ञानाचे क्षितीज कवेत घेता येते.

## शिक्षकांची उपलब्धी :

ज्ञानरचनावादाच्या पद्धतीने एकदा विद्यार्थी शिकू लागले की, शिक्षकांनाही आपल्या श्रमाचे श्रेय मिळाल्याचा आनंद होतो. त्यांची भूमिका दुय्यम असते. त्यांना विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी प्रेरित करण्याचे महत्वाचे काम प्रसन्न वदनाने करायचे असते. यदाकदाचित एखादा विद्यार्थी अडलाच तर त्याला मदत करायची असते. वर्तनवादाच्या प्रभावांतर्गत वर्गात शिकवीत असतांना शिक्षकांनी गेली ७० वर्षे घाम गाळला, खडु झिजविले, प्रसंगी मुलांचा रोषही ओढवून घेतला पण विद्यार्थी मात्र पाहिजे त्या गतीने आणि पद्धतीने तसेच आनंदाने शिकू शकली नाहीत. जे विद्यार्थी थोडे फार शिकले, स्पर्धेत टिकले त्यांना प्राथमिक शिक्षण म्हणजे जीवनातील एक अप्रिय कालखंड वाटत राहिला. कारण त्या शिक्षणात विद्यार्थ्यांपुढे आव्हाने नसायची, उत्कंठा नसायची, जिज्ञासा

निर्मिती व पूर्तीची सोय नसायची. शिक्षकांनी परिश्रमपूर्वक शिकविले तरी विद्यार्थी शिकेलच ही शाश्वती नसायची.

ज्ञानरचनावादातून स्वत:हून शिकल्यामुळे विद्यार्थ्यांची प्रज्ञा, प्रतिभा, अभिरूची, अनुमान, आकलन, सामर्थ्य विकसीत होऊ लागले. शिकण्याची प्रक्रिया सहज होऊ लागल्यामुळे शिक्षण कंटाळवाणे ओझे वाटत नाही. रचनावादाने शिक्षणाचे स्वरूप बदलवून टाकले. शिक्षक आता ज्ञानाच्या रथाचे सारथी झालेत. "सांगेन गोष्टी युक्तीच्या चार" असे गीतेत श्रीकृष्णाने म्हटल्याप्रमाणे अर्जुनाचे सारथ्य केले पण लढाई तर अर्जुनालाच लढावी लागली. त्याचप्रमाणे शिक्षक आता विद्यार्थ्यांच्या ज्ञानरूपी रथाचे सारथी झालेत. लढाई मात्र विद्यार्थ्यांनांच लढायची आहे.

## महाराष्ट्रातील शालेय शिक्षणातील विकास :

२२ जून २०१५ पासून महाराष्ट्रात "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" हा कार्यक्रम सुरू झाल्यापासून साऱ्या महाराष्ट्रात एक नवीन लहर प्रवाहित झाली आहे. गेल्या ४–५ वर्षात शाळा आनंदी झाल्यात. पालकांमध्ये विश्वास आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झालाय. सारा गाव शाळेकडे आकृष्ट होत आहे. समाजात सन्मान मिळू लागल्याने शिक्षकही आनंदले आहेत. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या डिसेंबर २०१८ अखेरच्या प्रक्रिया अहवालानुसार– शिक्षणातील गुणात्मक बदलाच्या या चित्राची खालील तक्त्यावरून कल्पना येईल.

| अ.क्र. | घटक | संख्या |
|---|---|---|
| १. | प्रशिक्षणाची स्वत: मागणी करणारे शिक्षक | पाच लाख एकेवीस हजार दोनशे चवदा |
| २. | ज्ञानरचनावादी शाळांना शिक्षकांच्या स्वखर्चाने भेटी | सात लाख एकोन्नसाठ हजार तीनशे अठरा |
| ३. | ज्ञानरचनावादाचा अवलंब करणाऱ्या शाळा | सदुसष्ठ हजार आठशे सत्तावीस |
| ४. | प्रगत प्राथमिक शाळांची संख्या | छत्तीस हजार तीनशे पंचवीस |
| ५. | लोक सहभाग निधी | तीनशे कोटी त्रेसष्ट लाख |
| ६. | डिजीटल शाळांची संख्या | त्रेसष्ट हजार दोनशे पंच्याण्णव |
| ७. | शिक्षकांकडून निर्मिती वेब/ब्लॉग | सहा हजार चारशे सदतीस |
| ८. | आय.एस.ओ. शाळा | तीन हजार तीनशे पंच्चवीस |

ज्ञानरचनावादाने महाराष्ट्राचा शालेय शिक्षणाचा झालेला विकास वरील तक्त्यावरून आपल्याला दिसून येतोच आहे. एवढेच नव्हे तर ज्ञानरचनावादामुळे जे असाध्य होते ते ही साध्य होतांना दिसत आहे. महाराष्ट्रातील दुर्गम वाड्या ताड्यांमध्येही शिक्षणाचा विकास झालेला आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात प्रथमच इंग्रजी माध्यमांच्या शाळा सोडून लाखो विद्यार्थी मराठी शाळांकडे वळलेले आहेत. तीन–चार वर्षापूर्वी राज्यातील जिल्हापरिषदेच्या मराठी माध्यमांच्या शाळा विद्यार्थ्यांअभावी बंद पडायच्या मार्गावर होत्या. परंतू, आता परिस्थिती बदललेली आहे. आज इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांकडून जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांकडे विद्यार्थ्यांचा ओघ सुरू झालेला आहे. आणि ज्ञानरचनावादी शिक्षण पद्धतीच्या वापरामुळे विद्यार्थी स्वत: शिकू लागले आहेत. त्यांना शिक्षणात रस वाटू लागलाय. त्यांच्या ह्य परिवर्तनाचे प्रतिबिंब शाळांच्या निकालातही दिसू लागले आहे. जादूची कांडी फिरावी तसा मराठी माध्यमांच्या शाळांचा कायापालट झालेला आहे.

## समारोप :

ज्ञानरचनावादी शिक्षण ही २१ व्या शतकातील महत्वाची शैक्षणिक क्रांती आहे. ही शैक्षणिक क्रांती ज्यांनी घडवून आणली अशा ज्ञानरचनावादी शाळा आणि त्यातील शिक्षकांनी महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाला सोनेरी दिवस प्राप्त करून दिलेले आहेत. असे ज्ञानरचनावादी शिक्षक नक्कीच कौतुकास पात्र आहेत. शिक्षणात

आपले महाराष्ट्र राज्य केवळ देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही अव्वल स्थानी घेवून जाण्यासाठी आमच्या शिक्षकांची घोडदौड सुरू झाली आहे. त्यांनी गेल्या चार वर्षात हे सिद्ध करूनही दाखविले आहे.

ज्ञानरचनावादी शिक्षण ही शिक्षण क्षेत्रातील गेल्या १०० वर्षातील नक्कीच अभूतपूर्व क्रांती आहे. या राष्ट्र कार्यासाठी आपण सारे कटीबद्ध होऊ या आणि शिक्षणाचा हा क्रांतीकारी विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सर्वदूर १०० टक्के कशा प्रकारे यशस्वी होईल यासाठी वचनबद्ध होऊ या!

शेवटी गुरूवर्य दुर्गादास बोर्डे सरांच्या काव्याने या सृजनशील विचाराला पुर्ण विराम देऊ.

"विद्यार्थी हे दैवत माझे। हा माझा विश्वास असे।।
एकमेकांचे रूप मनोहर। घडविण्या मी सज्ज असे।।"

## संदर्भ :

१) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय २२ जून, २०१५
२) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय १६ सप्टेंबर, २०१६
३) जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम ९ जानेवारी, २०१७
४) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय १७ जानेवारी, २०१७
५) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम शासन निर्णय २१ जून, २०१७
६) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम प्रक्रिया अहवाल डिसेंबर, २०१८ अखेर
७) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अध्ययन निष्पत्ती प्राथमिक स्तर— मार्गदर्शिका प्रथम आवृत्ती डिसेंबर, २०१७
८) "प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र" क्रांतीकारी शैक्षणिक कार्यक्रम जीवन शिक्षण मासिक (जून जुलै, २०१६)
९) मुलांचे शिक्षण : पालक व शासन, लेखक : प्रा. रमेश पानसे

❖❖❖

# संत साहित्यातील पर्यावरणविचार व त्याची आधुनिक काळात उपयुक्तता

डॉ. राजकुमार किशनराव यल्लावाड
मराठी विभाग प्रमुख
कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय,
परळी वै., जि. बीड, महाराष्ट्र (India)
yellawadrk@gmail.com भ्रमणध्वनी ९८८१२९४१९५

## प्रस्तावना

मानवी जीवन सुखी, संपन्न व समृघ्द व्हावे असे प्रत्येकालाच वाटते. तशी स्वप्ने माणूस रंगवतो ; पण त्या दृष्टीने जी योग्य पावले उचलायला हवीत, ती मात्र उचलत नाही. विज्ञानाने खूप प्रगती केली असली तरी माणूस जीवन जगताना अस्वस्थ असल्याचा प्रत्यय आपणास सदोदित येतो. मग नेमके असे का होते ? जीवनातला खराखुरा आनंद आम्ही गमावून बसलो आहोत का? असे एक ना अनेक प्रश्न आम्हाला भेडसावू लागतात. भौतिक सुखाच्या पाठीमागे लागलेला माणूस निसर्गाचा  ऱ्हास करुन निसर्गसुखापासून कोसो दूर जात आहे. आज आमच्या जीवनात ज्या काही समस्या निर्माण झालेल्या आहेत, त्याच्या मुळाशी निसर्गाची झालेली हानी, बदलेले पर्यावरण हे मोठया प्रमाणात कारणीभूत आहे. ग्लोबल वॉर्मिंग, अनावृष्टी, अतिवृष्टी यासारख्या समस्या मानवी जीवनातील सुख हिरावून घेत आहेत. त्याकरिता पर्यावरण संरक्षण व संवर्धन ही काळाची गरज आहे. संत साहित्यात आलेला पर्यावरणविचार गांभीर्याने लक्षात घेतला व त्यानुसार कृती केली तर निश्चितच आधुनिक काळात आम्हाला सुखा समाधानाने जीवन जगता येईल.

## बीजभाष्य

संत साहित्यात विविध विषयाला स्पर्श केलेला आहे. अंधश्रध्दा निर्मूलन, भ्रष्टाचार मुक्ततेसाठी विचार, नीतिमूल्ये अगदी तसाच पर्यावरणाविषयीचा विचार....! संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत रामदास, आदी संतानी मांडलेला पर्यावरणाविषयीचा विचार आधुनिक काळातही उपयुक्त आहे. ते विचार जनमानसात रुजणे काळाची गरज आहे. दुर्भिक्ष्य, अतिवृष्टी व पूर, जलस्थिती, शुध्द हवा व वृक्षाचे महत्त्व, अरण्ये, वने, जंगल, डोंगर, नद्या, पशू—पक्षी आदी पर्यावरणीय घटकांच्या संदर्भात संतांनी आपल्या रचनांच्या माध्यमातून जनजागृती केलेली आहे. त्या संतवचनांचा आधार घेवून अनेक पर्यावरणप्रेमी आज पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. अर्थातच त्यांना जनजागृतीसाठी संतांच्या ह्या रचना सुभाषितासारख्या उपयुक्त ठरतात. पर्यावरणप्रेमीप्रमाणेच सर्वसामान्य नागरिकांनीही वसुंधरेचं सौंदर्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला तर निसर्गसौंदर्य खुलेल व मानवी जीवन सुखकर होईल.

## संत साहित्यातील पर्यावरणविचार व आधुनिक काळ

आपल्या सभोवताली असलेल्या ज्या नैसर्गिक बाबी आहेत.त्या सर्व पर्यावरणाचा भाग आहेत. निसर्गत: जे घटक आहेत. ते जोपासणे गरजेचे तर आहेच; पण त्याशिवाय निसर्गसौंदर्य वाढीस लागण्यासाठी काही भर माणसाने घातली पाहिजे. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आपण वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करणे अगत्याचे ठरते. त्यादृष्टीने सध्याचे शासन १ जुलैला वृक्ष लागवड करण्याची मोहीम हाती घेते; आणि वृक्ष लागवडही केली जाते. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही संकल्पना काही आधुनिक नाही. तर ती संत साहित्यातूनही प्रत्ययाला येते. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी —

“नगरे चि रचावी । जलाशये निर्मावी ।
म्हावने लावावी । नानाविधे ।।”

असे जलाशयाचे व वृक्षाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. मानवी जीवनाच्या सुखसमृध्दीकरिता संत ज्ञानेश्वरांनी दिलेला हा मूलमंत्र महत्त्वपूर्ण आहे. आज आम्ही नगरांची रचना करताना नेमके या मूलमंत्राकडे दूर्लक्ष करतो. घर

बांधताना प्रत्येक घरी 'बोअरवेल्स' ने 'बोअर' घेतले जातात. भूगर्भात असलेले पाणी आम्ही जास्तीत जास्त काढण्याचा प्रयत्न करतो. परिणामस्वरुप आज पाणीपातळी खूप खोलवर गेलेली आहे. म्हणूनच आज पर्जन्यछायेच्या प्रदेशात दुर्भिक्ष्याने हाहाकार माजलेला दिसतो. वास्तविक संत ज्ञानेश्वरांनी केलेल्या उपदेशाप्रमाणे 'जलसाठा' वाढविणे आवश्यक होते; पण आम्ही मात्र विसंगत वागतो. जलसाठे मृत होईपर्यंत त्याकडे लक्ष देत नाही. खरं तर 'पाणी आडवा, पाणी जिरवा' ही मोहीम हाती घेणे गरजेचे असताना आम्ही मात्र 'याची आडवा, त्याची जिरवा' यातच मग्न राहतो; आणि नैसर्गिक व मानवी संकटे ओढवून घेतो. ही संकटे आमच्या जीवनात नको असतील तर '' नगरांची रचना करताना अगोदर जलाशयाची निर्मिती करावी'' हा संदेश महत्त्वपूर्ण आहे. तशी जलाशयाची निर्मिती केली तरच आम्हाला पाणी प्रश्न भेडसावणार नाही. हा प्रश्न सोडविण्यासाठी – 'प्रथमपुरुषी सुधारणा' आवश्यक आहे. एकमेकावर आरोप करुन प्रश्न सुटणार नाही. शासनाने जलसिंचनाच्या योजना आणल्या. त्या भ्रष्टाचाराच्या विळख्यात अडकलेल्या आहेत. त्याची योग्य अंमलबजावणी कशी करता येईल? याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. दुर्भिक्ष्याची भयावहता कमी करावयाची असेल तर महावने लावावे लागतील. म्हणून संत ज्ञानेश्वरांनी मांडलेला उपर्युक्त मौलिक विचार आजही उपयुक्त आहे.

विज्ञानयुगात औद्योगिकदृष्टया आम्ही पुढे पुढे जात आहोत. औद्योगिक प्रगती बरोबर प्रदूषणही वाढले. त्यामुळे माणसाला मोकळा श्वास घेणेही अवघड जात आहे. शुध्द ऑक्सीजन पेक्षा कार्बनडायऑक्साईडचे प्रमाण वाढले; आणि माणूस जगण्यातला खरा आनंद गमावून बसू लागला. या प्रदूषणावर मात करावयाची असेल तर वृक्षांची लागवड करणे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. संत तुकाराम तर वृक्षाचे महत्त्व सांगताना 'अभंगगाथेत' म्हणतात –

''वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ।
पक्षीही सुस्वरे । आळविती
येणे सुखे रुचे एकांताचा वास ।
नाही गुण दोष अंगा येत ।।''

असं निसर्गाशी तादात्म्य पावून वृक्षाची महती सांगतात. त्यांच्या या विचारातून 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश आज पर्यावरणप्रेमी देताना दिसतात. मन प्रसन्न, एकांत व शांत फक्त निसर्गाच्या सान्निध्यातच राहू शकते. तिथे मिळणारा आनंद हा उच्च कोटीचा असतो. वृक्षवल्ली, फुलाफळांनी बहरलेला निसर्ग आमच्या जीवनात चैतन्य निर्माण करत असतो. हे सर्व माहीत असूनही केवळ भौतिक सुखासाठी वृक्षतोड करणारा आजचा मानव आपल्या जीवनातील चैतन्य गमावून बसू लागला आहे. त्याच्या जगण्यात एक प्रकारचा कृत्रिमपणा आलेला आपल्याला पाहावयाला मिळतो. म्हणून त्याच्या खऱ्या विश्रांतीचा ठाव ठिकाणा पर्यावरणीय सान्निध्य रुपातच आहे. हे आपल्याला संतांच्या रचनेतून लक्षात येते.

वृक्षाचे महत्त्व प्रतिपादन करताना संत एकनाथ 'एकनाथी भागवता'तील एका ओवीमध्ये म्हणतात–

''सर्वांगे सर्वभावेसी ।
सर्वकाळ सर्वदेशी
पराधीन ही आवे सर्वांसी ।
हे वृक्षापासी शिकलो ।।''

वृक्ष कधीही स्वत:चा विचार करत नाही. सतत दुसऱ्यांना सावली देणे. हा त्याचा परोपकारी गुणधर्म... भेदा भेदविरहीत....! तो गुणधर्म माणसाने स्वीकारावा यादृष्टीने ही ओवी आज उपयुक्त आहे. सावली देणे, ऑक्सीजन देणे, पर्यावरण समतोल राखणे ही सर्वकाळ सर्वदेशी अनुभूती झाडांच्या बाबतीत येते.

अरण्य सहवासाबरोबरच अरण्यातील वनस्पती औषधीयुक्त असतात. त्या मानवी आयुष्याला उपयुक्त आहेत. म्हणून पर्यावरणातील अरण्यजीवनाच्या संदर्भात समर्थ रामदासांनी 'दासबोधा' मध्ये मांडलेले विचार येथे लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते.

''नाना वल्लीमध्ये जीव । नाना फळी फुली जीवन ।
नाना कंदमुळी जीवन । गुणकारके ।।''

'दासबोधा'त केलेले अरण्याविषयीचे हे वर्णन आपल्या मनात अरण्याविषयी अर्थातच पर्यावरणाविषयी आपुलकी भाव निर्माण करते.

संत साहित्यात विशेषत: समर्थांच्या ‘दासबोधा’ त जीवसृष्टी व पर्यावरणाविषयी अत्यंत सोप्या भाषेत माहिती दिलेली आहे. त्यातील जैवविविधता व विविधतेत एकता याचे सुरेख वर्णन समर्थांच्या शब्दवाणीत आढळतं ते म्हणतात.

‘‘झाडास झाडे खतपाणी । घालून पाळिली प्रतिदिनी ।।
वल्लीमध्ये जळ संचरे । कोरडेपणे हे वावरे ।
बोलेवाचून नाथिरे । काही केल्या ।।’’

खरं तर समर्थांनी किती मोजक्या व समर्पक शब्दात झाडाचे महत्व विशद केले आहे. ‘वृक्ष’ जोपासले तरच ‘जल’ संचार होऊ शकतो. अन्यथा सर्वत्र कोरडेपण याचीच प्रचिती यायला लागते.

संत निळोबारायांनी आपल्या एका अभंगात –

‘‘ नाचती मयुरे रोमांचित दाटी
अमृताची वृष्टी जीवनकळा ।।’’

असे वर्णन केले आहे. खरं तर पर्यावरणीय समतोल असला तरच मयुरांच्या विहंगम नृत्याचा अनुभव घेता येतो. त्यातील विलोभनीयता अनुभवता येते. त्याचे नयनमनोहरी नाचणे आम्हाला रोमांचित करु शकते. संत निळोबा रायांचा हा अभंग केवळ ‘मयुरा’चे नाचणे इतकेच वर्णन करुन जात नाही तर पर्यावरणातील वन्यप्राण्याचे आमच्या जीवनातील महत्त्व विशद करुन जातो.

संतांनी पर्यावरणाविषयी केलेल्या जाणीव जागृतीकडे आम्ही काळजीपूर्वक लक्ष दिले नाही. उलट पर्यावरणाविषयी अनास्थाच जास्त बाळगली गेली व त्याचा परिणाम मानवी जीवनावर झाला; आणि त्या परिणामातून समाजातील घटक आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू लागले. निसर्गशांत असेल तरच विश्व शांत राहील अन्यथा वैश्विक तापमान वाच्यार्थाने व सुचितार्थाने वाढलेले असेलच ......! म्हणून संतांचा उपदेश लक्षात घेवून दररोजच्या जीवन जगण्यात वसुंधरेला सुंदर बनविण्यासाठी आपण सर्वांनी तिची काळजी घेणे अत्यावश्यक आहे.

संत साहित्य व पर्यावरण यांचे नाते स्पष्ट करताना संत साहित्याचे अभ्यासक डॉ.रामचंद्र देखणे म्हणतात–‘‘ संतांनी तत्वज्ञानाचे सिध्दांत सांगताना हेतुपूर्वक निसर्गाचेच दृष्टांत दिले आहेत. यावरुनच पर्यावरणाशी नाते सांगणारी संतांची पर्यावरण दृष्टी ही दूरगामी होती, हे लक्षात येते. भारतीय संस्कृती,परंपरा आणि जीवनदृष्टी लक्षात घेता केवळ भौतिक नव्हे, तर भावनिक अंगानेही पर्यावरणाशी नाते प्रस्थापित होणे गरजेचे आहे.’’ (संदर्भ www.esakal.com – पर्यावरणाशी नाते जोडा)

डॉ. देखणे यांचे मत लक्षात घेतल्यास संत साहित्यातून अभिव्यक्त झालेले पर्यावरणीय विचार व त्याविचाराची महती अधोरेखित होते. त्याचबरोबर आजच्या काळात संत साहित्याचे महत्त्व सांगताना डॉ.रामचंद्र देखणे म्हणतात, ‘‘ वेद, उपनिषदे,प्राचीन साहित्य आणि संत वाङ्मयातून व्यक्त झालेले पर्यावरणाविषयीचे चिंतन आजच्या लोकजीवनालाही वेगळी दृष्टी देवून जाते. साहित्य म्हणजे एकीकडे अंतर्मनाशी, तर दुसरीकडे लोकमनाशी केलेला शब्दसंवाद आहे. हा संवाद मानवी पातळीवर सीमित न राहता माणूस निसर्गाशी बोलू लागतो. तेव्हाच निसर्गसंवाद घडतो; परंतु सध्या वाढती लोकसंख्या औद्योगिकरण, शहरीकरण, प्रदूषण, बदललेली जीवनशैली, आणि निसर्गाला दुखावून काही तरी मिळवण्याचा हव्यास यातून पर्यावरणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. ’’ (संदर्भ www.esakal.com ) अर्थातच भौतिक सुखाच्या आहारी न जाता निसर्गाशी संवाद साधण्याची वृत्ती वाढीस लागण्याचा विचार संत साहित्यांच्या अनुषंगाने डॉ. रामचंद्र देखणे यांनी मांडलेला आहे.

संत साहित्यात प्रामुख्याने संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, कबीर, संत रामदास,संत तुकाराम, संत सावतामाळी, संत चोखामेळा, संत निळोबाराय आदी संतांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून माणसाला निसर्गावर प्रेम करण्याची शिकवण दिली. निसर्गाशी तादात्म्य पावण्याची वृत्ती रुजवली. त्यांचे हे विचार आज जर समाजात मोठया प्रमाणात रुजवले तर आम्हाला सद्य:स्थितीत भेडसावणाऱ्या समस्या निश्चितच कमी होतील असा सार्थ विश्वास आहे.

## निष्कर्षात्मक समारोप

१. संत साहित्य हे विविध विषयाला स्पर्श करणारे साहित्य आहे. त्यात पर्यावरणाच्या समतोलाचा विचार सूक्ष्मपणे चर्चिला गेलेला आहे.

२. आधुनिक काळात निर्माण झालेल्या ग्लोबल वॉर्मिंग, प्रदूषण, जलस्थिती, दुर्भिक्ष्य यासारख्या समस्यावर मात करण्यासाठी संत साहित्यातील पर्यावरणविषयक विचार उपयुक्त आहेत.

३. संत साहित्यातून भौतिक सुखापेक्षा निसर्गसंवाद महत्त्वाचा मानल्याची प्रचिती येते.
४. निसर्गसंवाद व निसर्गावर प्रेम करण्याची वृत्ती वाढण्यास संत साहित्य उपयुक्त आहे.
५. संत साहित्यातील पर्यावरण विचारानुसार माणसाने कृती केली तर आधुनिक काळात माणूस सुखी जीवन जगू शकेल. यात तीळमात्र शंका नाही.

साहित्य हे त्या त्या काळाचे अपत्य असले तरी 'अक्षर' साहित्य काळाच्या मर्यादा ओलांडून सार्वकालीक ठरते. संत साहित्य हे 'अक्षर' साहित्य आहे. ते सार्वकालिक आहे. कालातीतता या गुणधर्मामुळेच संत साहित्यातील पर्यावरणीय विचार आजही महत्त्वाचा आहे. भौतिक सुखाच्या मागे धावणाऱ्या माणसाच्या डोळयात अंजन घालून, त्यांच्या जीवनाचे नंदनवन करण्यास उपयुक्त ठरणारा आहे.

## संदर्भ

१. कानडे (डॉ.)मु.श्री. – संतांची भेटी– स्नेहवर्धन प्रकाशन पुणे – प्रथमावृत्ती–१९९१
२. पठाण (डॉ.) यु.म. – संत साहित्य : शोध आणि बोध – दिलीपराज प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती –२०१४
३. फड (डॉ.) विजयकुमार – तरंग आनंदाचे – कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती –२०१३
४. भावे वि.ल. – महाराष्ट्र सारस्वत – खंड १ व २ – पॉप्युलर प्रकाशन मुंबई, सहावी आवृत्ती १९८२
५. www.esakal.com

❖❖❖

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद सामाजिक–सांस्कृतिक, आर्थिक अनुबंध

डॉ. इंद्रजीत ओरके
मराठी विभाग प्रमुख
डॉ. म.वा. पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय, नागपूर, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९४२२१४७५८५

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे व एकसंघ राष्ट्राचे हित पाहणारे नेते होते. भारतीय समाजव्यवस्थेत आमुलाग्रबदल करण्याच्याहेतूने त्यांनी विविध चळवळी उभारून व बाहुपेढी मांडणी करून स्वत:ला आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणून सिद्ध केले.

तत्कालीन भारतीय समाजजीवनात असणाऱ्या जिवंत व ज्वलंत प्रश्नांचा त्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास केला. त्यामुळे एक व्यासंगी व निस्पृह विचारवंत म्हणून त्यांचा जगाला परिचय झाला. विसावे शतक हे नवसमाज निर्मितीचे व प्रबोधनाचे शतक म्हणून ओळखले जाते. या शतकात संपूर्ण भारत हा ब्रिटिश राजवटीच्या अंमलाखाली होता, म्हणजे संपूर्ण देशावर ब्रिटिशांची राजसत्ता होती. या काळात भारतात अनेक जटील प्रश्न होते. कामगार, शेतकरी यांच्या प्रश्नासोबतच जातीव्यवस्था, जातीव्यवस्थेतील उतरंड, स्त्रीवर होणारे अन्याय, अत्याचार, आदिवासींची शोषणमुक्ती, रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धांचे थैमान व पराकोटीची विषमता अशा अनेक प्रश्नांच्या गुंतागुंतीच्या जाळ्यात भारतीय समाज जीवन फसले होते. या जाळ्यातून माणसांची मुक्ती करण्याचे अथक परिश्रम व प्रयत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी करून भारतीय समाजातील विशेषत: हिंदू समाज व्यवस्थेतील जन्मसिद्ध विषमता आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी ते आयुष्यभर झगडत राहिले म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे विसाव्या शतकातील भारतामधील एक महापुरूष होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही."[१]असा डॉ.आंबेडकरांचा गुणगौरव नलिनी पंडित करतात त्यात कुठेही अतिशयोक्ती नाही.

सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय अशा स्वरूपांच्या चळवळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारून २०व्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतीय समाजाचे नवजागरण केले. शोषनमुक्ती व त्यातून नव्या माणसाचा शोध ते सातत्याने घेत होते. त्यासाठी त्यांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. "समाजवादी अर्थव्यवस्थेची सूत्रे विधीमंडळाच्या हातात न सोपवता ती कायदेशीर रित्या संविधानातच समाविष्ट करण्याची दृढ इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. संसदीय बहुमतानेही समाजवाद बदलता येऊ नये यासाठी संविधानाचा तो शाश्वत भाग मानावा."[२] असे त्यांना वाटत होते. लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी व लोकप्रतिनिधीची विधान मंडळ व लोकसभा या संस्था सुद्धा समाजवादी अर्थव्यवस्थेची बूज राखतील असे त्यांना वाटत होते.
आजचे विधानसभेचे व लोकसभेचे स्वरूप पाहिले की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाला तिलांजली देणारेच वाटते. त्यामुळे लोकांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वीकारलेल्या भूमिकेचे स्वागत करण्याऐवजी राज्यातील व केंद्रातील सरकारे केवळ त्यांच्या नावाचा जयघोष करून जनसमूहांना पर्यायाने भारतीयांना भूलीचे रसायन (ॲनेस्थेसिया) देत असल्याचा प्रत्यय येतो. ते पुढे म्हणतात, "It is only by this that one can achieve triple object, namely to establish socialism retain parliamentary democracy and avoid dictatorship."[3] अशा सांकेतिक स्वरूपाची मांडणी करून त्यांची समाजवादाशिवाय असलेल्या लोकशाहीचे भवितव्यातील चित्र उभे केले होते.

## समाज आणि सत्ता

मानवी जीवनांचा प्रवास हा व्यक्ती, कुटूंब, समाज आणि राज्य अशा संस्थात्मक उदयांनी झालेला आहे. त्यामुळे राज्य आणि राज्याची सत्ता कुणाच्या हातात आहे, त्यावर त्या राज्यातील जनतेचा विकास अवलंबून आहे, त्यामुळे सत्तेतून समाजपरिवर्तनाची अपेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकर गृहीत धरतात."सत्ता हे समान परिवर्तनाचे नुसते प्रभावी साधन नाही तर सर्वात प्रभावी साधन आहे आणि ते जसे समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, तसे समाजपरिवर्तन गोठविण्याचेही साधन आहे, कारण सत्ता हे साधन आहे. समाज परिवर्तन करू इच्छिणाऱ्या पक्षाच्या हातात ते समाजपरिवर्तनाचे साधन उरते. प्रश्न सत्ता कुणाच्या हातात आहे हा असतो.

समाजपरिवर्तनाच्या घोषणा करणाऱ्यांच्या हातात सत्ता असली म्हणजे समाज परिवर्तन होत नाही. कारण घोषणा आणि कृती यात फार मोठे अंतर असते. सत्तेकडून घडणारी कृती समाजपरिवर्तन घडवते, सत्तेत असणाऱ्यांच्या घोषणा समाज परिवर्तन घडवत नाही."[४] हे नरहर कुरूंदकर या विचारवंताचे मत समाज परिवर्तनाचे हत्यार वापरू पाहणाऱ्या विशेषत: आंबेडकरवादाच्या संदर्भात सत्ता आणि समाजपरिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या अभ्यासक कार्यकर्त्यांना उद्बोधक ठरते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्टेट ॲण्ड मायनारिटिज मध्ये म्हटले होते मोठमोठे आणि मूलभूत उद्योग राज्याच्या मालकीचे असावेत, जेणेकरून त्या उद्योगाचा लाभ वंचितापर्यंत पोहोचेल. परंतु राज्याच्या मालकीचे उद्योग चालविणारे सरकार आणि प्रशासन याविषयी किती गंभीर आहेत. यावर त्या उद्योगाचे राज्याचे भवितव्य अवलंबून आहे. आपली स्वातंत्र्यापूर्वीची व नंतरची नोकरशाही ही संपूर्ण तळात जगणाऱ्या माणसाविषयी फारशी उत्साही असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे राज्यसंस्थेचे वर्गचारित्र्य न तपासता अभ्यासकाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय विचारांचे पुरेसे आकलन होत नाही.

अलीकडील सरकारे ही पक्षनिष्ठ पक्षाची सरकारे नाहीत. जागतिक स्तरावरील कार्पोरेट जगत, स्वातंत्र्याच्या सहा दशकात उदयास आलेले प्रत्येक जातीतील अमीर–उमराव, धनदांडगे, गुन्हेगारी प्रवृत्तीचे अघोषीत पुढारी, दलाल, व विशेष म्हणजे कुठलेही लोककल्याणकारी व राजकीय प्रशिक्षण न घेतलेले मुखंड, यांच्या पोलादी युतीतून अलीकडील केंद्र व राज्यसरकारे अस्तित्वात आली आहेत, येत आहेत. यातील बऱ्याच प्रतिनिधींना 'लोकशाही आणि संविधान' याचा कुठलाही गंध नाही आणि लोकशाही व संविधानातील मूल्यांची दखल घेण्याइतपत कुठलाही वैचारिक विवेकी व विज्ञाननिष्ट संस्कार लोकप्रतिनिधीवर नाही. हे आजचे भयानक व भयभीत करणारे वास्तव मी अधोरेखित करीत आहे.

या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भारतीय राष्ट्रवादाविषयीची मते महत्त्वपूर्ण आहेत.

## डॉ.बाबासाहेब आणि राष्ट्रवाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रवादाचा पाया लोकशाहीला मानतात. त्यांनी लोकशाहीची व्यापक संकल्पना मांडली आहे, ते म्हणतात, "Democracy is a form of government where revolutionary changes occur without blood shed."[५] रक्तपातविहीन क्रांती म्हणजे लोकशाही होय. असे लोकशाहीचे महत्त्व व मूल्य विशद करून त्यांनी वेळोवेळी राष्ट्रवादाविषयी आपली मते मांडली आहेत. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांनी त्यांच्या लोकशाहीला भक्कम रूपबंध प्राप्त झाला. आपल्या जीवापेक्षाही लोकशाहीवर अधिक जीव लावणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र्य भारताच्या आधुनिक शिल्पकारापैकी एक प्रभावी शिल्पकार आहेत.भारतीय संविधानाचे शिल्पकार तसेच आधुनिक भारताचेही प्रभावी शिल्पकार म्हणूनही त्यांची नाममुद्रा भारतीय सांसदीय लोकशाहीच्या व संघटनात्मक लोकशाहीच्या सोनेरी पानावर मुद्रीत झालेली आहे. लोकशाहीवर आपली निष्ठा, प्रेम, आणि जिव्हाळा त्यांनी व्यक्त केला ते म्हणतात ßIt seems to me that lies on us a very important to see that democracy does not vanish from the earth as a governing principle of human relationship. If we believe in it, we must true and loyal to it, we must not only be staunch in our faith in democracy, but we must resolve to see that in whatever we do, we do not help the enemies of democracy to unroot the principles. A liberty, equality and fraternity"[६] हे त्यांचे लोकशाहीविषयक मत म्हणजे लोकशाहीचा गौरव तर आहेच. परंतु ती वाचविण्याची जबाबदारी आपण सर्वांनी स्वीकारावी असे त्यांना वाटते. ती पृथ्वीतलावरून नामशेष होऊ नये असे त्यांना वाटते. कारण लोकशाही ही मानवी संबंधातील नियंत्रणाचे तत्त्व आहे. म्हणून आपण सर्वांनी लोकशाहीप्रती निष्ठा व्यक्त करून ती संपुष्टात आणणाऱ्या तिच्या शत्रूला मदत होईल असे कृत्य करू नये.

'मी प्रथम भारतीय आहे, शेवटीही भारतीय आहे आणि भारतीय असल्याखेरीज अन्य कोणीच नाही.'[७] असे ते १९३८ सालात म्हणालेत. भारतीय खंड हा विविध धर्म विविध संस्कृती, अनेक पंथ व भिन्न भिन्न उपासना पद्धती, हजारो जाती, इत्यादींच्या वैविध्यपूर्ण जाळ्यांनी विणलेले राष्ट्र आहे. सर्वांनी आपापल्या संकुचित सांस्कृतिक–भावनिक बाबी दूर ठेवून'राष्ट्रीय' प्रवाहात येऊन व्यापक अशा राष्ट्रभावनेला, व्यापक राष्ट्र संस्कृतिला तडा जाणार नाही याची प्रत्येकाने दखल घेऊन राष्ट्रभावनेला तडा देणारी दुसरी कोणतीच निष्ठा जोपासणे गुन्हाच मानला पाहिजे, असे त्यांना वाटते.

त्यांनी आपला राष्ट्र विचार'थॉटस् ऑफ पाकिस्तान' रानडे–गांधी आणि बॅ.जीन्ना, 'राज्य आणि अल्पसंख्याक''जातियता निर्मूलन' इत्यादी वैचारिक ग्रंथातून राष्ट्रवादासंबंधीचे विचार व्यक्त झालेले आहेत. राष्ट्रवाद

ही एक व्यक्तिनिष्ठ भावना आहे. तसाच तो नाजूक विचारही आहे आणि म्हणूनच राष्ट्रवादाचा संबंध माणूस आणि मानवी व्यवहारांशी असतो. त्यांच्या मते, "राष्ट्रवाद या भावनेत प्रचंड सामर्थ्य असून तिची मुळे खूप खोलवर रूजलेली असतात. मोठमोठी साम्राज्ये ती उलथून टाकतात. जिला कितीही विवेकशून्यात पाहिले तरी ती मात्र अतिप्रबळ शक्ती आहे. राष्ट्रवादी भावनेने जगाच्या इतिहासात हिंसाचार हाहा:कार जसे घडवून आणले, तसेच राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे संरक्षण संपादनही केलेले आहे. ती जेवढी विध्वंसक तेवढीच विधायक शक्ती आहे."[८] असे त्यांना वाटते. परंतु तिची विध्वंसक बाजू लक्षात घेऊन "युरोपमधील सिडने, ब्रुक्स, नर्शर्मल ऐंजिल या राजकीय विचारवंतांनी तिला 'मानवतेचे शत्रू' म्हणून संबोधले. रॉबर्टसन या विचारवंताने 'राष्ट्रवाद' या भावनेविषयी बोचरी प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. राष्ट्रवाद ही एक अबौद्धिक भावना आहे. त्यामुळे मानवतेचे काहीच भले होणार नाही."[९] यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सौम्य प्रतिक्रिया देऊन म्हणतात, "राष्ट्रवाद ही भावनेची एक विध्वंसक बाजू असली तरिही तिला विधायकतेचेही दुसरी बाजू आहे."'राष्ट्रवाद'या संकल्पनेचा परामर्श घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय विषमता नष्ट करण्यासाठी व समाजाचे ऐक्य बळकट करण्यासाठी राष्ट्रवादाचे सुप्त सामर्थ्य त्यांनी अधोरेखीत केल्याचे दिसून येते.

भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरही उपेक्षितांच्या डोळ्यातील अश्रू पाहून जोपर्यंत सर्वांना समान संधी व मानवी हक्क मिळत नाहीत, तोपर्यंत माणसांची मुक्ती शक्य नाही, देश स्वतंत्र होतात आणि जनता मात्र पारतंत्र भोगते, देश मुक्त होतात आणि माणसे मात्र दास्यात जगतात. हा अनुभव त्यांनी प्रचंड वाचनाने व उघड्या डोळ्याने घेतला होता. अमेरिका स्वतंत्र झाली पण काळा मात्र काळोखातच चाचपडत राहिला. म्हणूनच डॉ. आंबेडकरांच्या राष्ट्रवादाचा शोध आपल्याला उपेक्षितांच्या, सवर्णांच्या, शोषितांच्या, कष्टकऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या वर्गीय विकासक्रमात घ्यावा लागेल. तद्वतच देशातील साधन संपत्ती, खनिज संपत्ती, जमीन, यांवर सर्वांचा मालकीहक्क  रोजगारक्षेत्र, उद्योगक्षेत्र, वैज्ञानिक संशोधन, आरोग्य सेवा, व कृषीक्षेत्राचा विकास, लोकसंख्या नियंत्रण इ. राष्ट्रीय योजनांशी सर्व भारतीयांचे नातेबंध ते 'राष्ट्रवाद' या संकल्पनेशी जोडतात.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते 'राष्ट्रवाद' ही व्यापक विचारसरणी असून देशातील तमाम नागरिकांचे हित जोपासणारी अनुस्यूत शक्ती आहे. तद्वतच ती राष्ट्रीय संपत्तीत सर्वांना सहभागी होण्याची संधी व नागरिकांचे जीवनमान उंचावणारी प्रेरणा देते व सर्वांना सुरक्षा प्रदान करण्याचे व लोकशाहीला संवर्धीत व समृद्ध करण्याचे अभिवचन देते.

भारतीय राष्ट्रवादाचा विचार एकांगी करुन चालणार नाही, कारण भारताच्या भूमीवर वेगवेगळ्या धर्माची, पंथाची, विचारांची मजबूत पण गुंतागुंतीची पकड कायम आहे. परिवर्तनाचे साध्य घेवून भारतीय राजकारणात दोन प्रवाह स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच अस्तित्वात होते. आधी सामाजिक सुधारणा की राजकीय स्वातंत्र्य या दोन्ही भूमिकेवर भारतात चळवळी उभारल्या गेल्यात. परंत प्रस्तुत दोन्ही भूमिकांचा विचार वर्तमानात सुटा सुटा करुन आपल्याला सामाजिक परिवर्तनाचे लक्ष गाठता येणे अवघड आहे. देशाच्या अखंडप्राय प्रदेशातील सामाजिक मागासलेपणा, आर्थिक दुर्बलता, पराकोटीचे दारिद्र्य, कुपोषण, वाढती भयानक बेरोजगारी, अतीजलद वाढणारी लोकसंख्या, आणि वाढत्या लोकसंख्येने निर्माण केलेले आरोग्य, अन्नधान्य बेरोजगारी, पर्यावरण, जलसंकट, भूमिप्रदूषण, वनावरील अतिक्रमण, नैसर्गिक संसाधनाचा ऱ्हास, दळणवळणाचे प्रश्न माणसांची स्थलांतरे, वाढता सामाजिक असमतोल, अशी गुंतागुंत असलेल्या प्रश्नांच्या आणि समस्येच्या किंबहुना संकटाच्या जबड्यात आपण सापडलो आहोत. त्यामुळे सामाजिक सुधारणा आणि राजकीय लढे यांची सांधाजोड झाल्याशिवाय म्हणजेच समन्वय झाल्याशिवाय राष्ट्रवादाचा विचार करणे पदरी अपयश पाडून घेणे होईल.

देशाच्या सीमांचे रक्षण करण्यासाठी तिन्ही सेनादलांचे आधुनिक शस्त्रास्त्र धोरण व रक्षणार्थ कृती जेवढी महत्त्वाची आहे. तेवढीच राष्ट्रांतर्गत सामाजिक सुधारणांची गती असली तरच आपल्याला भारतीय संविधानाप्रमाणे भारतीय राष्ट्रवादाचे साध्य गाठता येईल. इथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 'राष्ट्रवादी' भूमिकेतून मांडणीकरायची असल्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक सुधारकांची तळी प्राधान्याने उचलली होती. महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह, यासोबतच त्यांनी गोलमेज परिषद, पुणे करार, कामगार पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पार्टी आफ इंडिया अशा राजकीय भूमिकाही वठविल्या होत्या. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' अशा नावाने राष्ट्रीय स्तरावर राजकीय पक्ष काढण्याची कल्पना मांडली होती. तात्पर्य असे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक सुधारणे सोबतच राजकीय सुधारणांचा समन्वय साधला होता. त्यांच्या निधनानंतर मात्र त्यांच्या सामाजिक व राजकीय भूमिकांचा परामर्श त्यांच्यावर

अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना प्रभावीपणे व यशस्वीपणे घेता आला असता तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षित राष्ट्रवादाची व राजकीय भूमिकांची आज घडीस दिसते तेवढी वाताहात झाली नसती.

डॉ. बाबासाहेब यांच्या नावाने राजकारण करणाऱ्यांचा अक्षरश: महापूर आल्याचे दिसून येते. जगातील सर्व राजकीय पक्षांची बेरीज करा. त्यापेक्षा आंबेडकरांच्या नावाने उदयास आलेल्या कम अस्सल पक्षांची संख्या अधिक भरेल. हे पक्ष कसले काहींना टोळ्याच म्हणता येईल. हे सारेच पक्ष निवडणूकीच्या मोसमात बहरतात निवडणूक संपली की कुठल्या तरी कोपऱ्यात कोमेजलेल्या फुलाप्रमाणे आसनस्थ होतात. परत निवडणूका आल्यात की पुन्हा ताजेतवाने होवून सत्ताधारी पक्षाकडे ओंजळ घेवून तिष्ठित असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राजकीय वारसा चालविणारे प्रज्ञावंत, क्रांतदर्शी, निर्मोही, नि:संग व स्वाभीमानी राजकीय अशा सुजाण, मुसद्दी व्यक्तिमत्त्वाची पोकळी आपल्या नजरेपुढे सतत दिसते. त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक अशा संकल्पनांच्या अंत:रंगातील सूक्ष्म पण स्फोटक प्रश्नांची प्रभावी उत्तरे शोधणारा राजकीय वारसदार शोधूनही सापडत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने राजकीय उद्योग चालवणारे अनेक आहेत. त्याला ते आंबेडकरांचा वारसदार समजतात ते त्यांनी खुशाल समजावे. कारण त्यातच ते खुश आहेत. असे राजकीय उद्योग चालविणारे राजयोगी आपल्याच तंद्रीत आहेत. डॉ. आंबेडकरांची राष्ट्रवादी भूमिका डोळसपणे, डावपेचात्मक व घटनात्मक मूल्यांच्या आधारे स्वीकारून त्या भूमिकेचा वर्तमानात राजकीय अंमल करणारा द्रष्टा नायक हा भारतीय लोकशाहीची व परिवर्तनवादी भारतीयांची सर्वोच्च मागणी आहे. हा नायक कुठून कोणत्या पक्षातून उदयास येईल हे इतिहासच सांगू शकेल.

मानवी जीवनाला विविध कंगोरे असतात हे खरे आहे, परंतु मानवी विकास हा माणूस, कुटूंब, समूह, समाज, राजकारण अशा क्रमाने विकसित झालेला आहे. या विकासक्रमात सामाजिक, रूढी परंपरा, समूह धारणा, धर्ममूल्ये यासोबतच त्याला सर्वात जास्त प्रभावित करणारा घटक म्हणजे अर्थ होय. हजारो वर्षांपासून त्याचे जीवन अर्थमूल्य आहे. याकडे आपण गांभिर्याने पाहत नाही. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या सामाजिक आंदोलनावर आपले लक्ष केंद्रीत केले गेले. ते चूक नाही परंतु आंदोलने ही नेहमीच वर्तमान प्रश्न सोडविणारी असतात. याचे आपल्याला भान असावे. कृषी विकास, रोजगार, रस्ते, घरबांधणी, उद्योग, शिक्षण, आरोग्य या सर्व सोयी आर्थिकतेशी निगडीत असतात यांच्याकडे आपले फारसे लक्ष गेले नाही. आंबेडकरी चळवळ ही फक्त सामाजिक चळवळ आहे असा अट्टाहास ठेवल्यामुळे, समाज परिवर्तन घडवून आणणारी चळवळ पुढे पुढे क्षीण होत गेली. कारण आर्थिक प्रश्नांचे रसायन तिला मिळाले नाही. हे अनेक कारणापैकी एक कारण आहे. "आर्थिक प्रश्नच सामाजिक रूप धारण करतात, राजकीय प्रश्नांचे रूप धारण करतात. जे प्रश्न राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इत्यादी नावांनी ओळखतो, ते सगळे प्रश्न मूलत: आर्थिक असतात म्हणजे नुसते पैशाचे नसतात, तर हितसंबंधाचे असतात. उत्पादनांच्या साधनावर ताबा असण्याचे असतात. या उत्पादन व्यवस्थेशी संबंध असण्याचे असतात."[१०] अशी सुंदर मांडणी नरहर कुरूंदकर या विचारवंताने केलेली आहे. ती मांडणी आपणाला विचारात घ्यावीच लागेल. (इथे 'अर्थ' ही कल्पना पैसा यापेक्षा वेगळी आहे.) परंतु अशा मांडणीला आपण 'मार्क्सवादी' संबोधून मोकळे होतो. या मांडणीतील मर्म नीट अभ्यासले जात नाही. अशा मांडणीकडे दूर्लक्ष करून आपण यशस्वी होवू यासारख्या दुसरा भ्रम नाही. अर्थसत्ता किती मोठी, सत्ता असते. ती माणसे, मतदार विकत घेते, दूरचित्रवाणी, वेगवेगळ्या वाहिनी, मुद्रीत माध्यमे व नियंत्रणात ठेवणारी राजकीय सत्ताच ठरली आहे. देशातील काही धर्माच्या नावावर उदयास आलेल्या दहशतवादी संघटना या संघटनाचे सांस्कृतिक कार्यक्रम वरकरणी सांस्कृतिक वाटत असले तरी ते आर्थिक आहेत. "धर्म आणि जाती ही आपल्या देशात वरिष्ठ वर्गांनी सोयीने हाताळलेली हत्यारे आहेत." असे राम मनोहर यांनी म्हटले होते. ही हत्यारे हाताळण्यामागील कुणाचे हित आहे आणि कुणाचे अहित आहे हे समजल्याशिवाय वर्तमान राजकारण समजणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आपण जातवार संघटना उभ्या केल्यात. मुळात जातीअंत व वर्गअंत हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न आहे, जातीवार संघटनेमुळे जाती क्षीण न होता बळकट होत असल्याचे चित्र आहे. तथापी बाबासाहेबांना अपेक्षित 'राष्ट्र' निर्माणात अडचणी येतील हे मात्र खरे.

लोकशाहीला निवडणूकांच्या माध्यमातून बळकट करण्याचे स्वप्न आपण पाहतो. परंतु भारतीय मतदार हा विविध जाती, धर्म, परंपरा, प्रथा, वर्गीयसंबंध इत्यादींच्या जाळ्यात अडकलेला मतदार आहे. त्याच्या परंपरा व त्याची जातीय निष्ठा, धर्मनिष्ठा त्यांच्यातील परंपरा किती चिवट होत्या हे निदर्शनास आले. बेरोजगारी, शिक्षण,

महागाई कमी करू म्हणणाऱ्या त्याच्या विकासाचे गीत गाणाऱ्या पक्षांना, त्यांच्या जीवासाठी व जिंदगीसाठी लढणाऱ्या पक्षांना त्याने दगा दिला मात्र बेरोजगारी वाढविणाऱ्या जाती संबंधात तणाव निर्माण करणाऱ्या, मुस्लिमांना, ख्रिश्चनांना विलग करणाऱ्यांना व आर्थिक उन्नतीची खोटी आश्वासने देणाऱ्या पक्षाला त्याने निवडून दिले. भारत सरकार निर्माण करणाऱ्यापेक्षा मोदी सरकार हे व्यक्तीकेंद्री सरकार त्याने निवडून दिले हे असे का व्हावे याचे उत्तर म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राजकीय सत्ता ही सर्वोच्च संकल्पना आपण समजून घेऊ शकलो नाही. त्यांच्या संकल्पनेत, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरणीय प्रादेशिक अशा साऱ्याच तत्त्वांचा समावेश दडलेला आहे. म्हणूनच त्यांचा राष्ट्रवाद विचारात घेत असतांना आपल्यातील जातीय अहंकार, इतर वरिष्ठ जातीवरील प्रतिक्रिया याकडे दुर्लक्ष करून त्यांनी सांगीतलेल्या व्यापक अशा राष्ट्रवादाच्या मार्गाने मार्गक्रमण करावे.

केवळ जाती, केवळ वर्ग, केवळ सांस्कृतिक, केवळ धार्मिक असे सुटे सुटे संघर्ष न करता त्या संघर्षाचा समन्वय चिंतनाच्या व व्यवहाराच्या पातळीवर साधला जावा. अन्यथा निवडणूका येतील ते विजयी होतील आणि आपण निराशाच्या खाईत बसून लेखन करत राहू. हा मार्ग आपल्या आणि डॉ.आंबेडकरांनी व्यक्त केलेल्या भारतीयांच्या हिताचा नाही.

सर्व भारतीय राष्ट्राचा एकत्रित विचार करण्याइतकी चौरस व व्यापक वैचारिक भूमिका त्यांच्याजवळ होतीच, शिवाय ते अतिशय जहाल राष्ट्रवादी होते. फक्त महार समाजापूरताअसा विचार त्यांनी केला नाही, तर सर्व सवर्ण व दलित यांचा समावेश करणारा राष्ट्रहिताचा विचारही त्यांनी केला.[११] हा नरहर कुरूंदकर यांचा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील राष्ट्रवादी बाणा सिद्ध करतो.

## संदर्भ

१. नलिनी पंडित : आंबेडकर : ग्रंथाली प्रकाशन,मुंबई, १९९६
२. बाबासाहेब आंबेडकर : राईटिंग अण्ड स्पिचेस, खंड १, राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पृ.४१०
३. तत्रैव, पृ.४१२
४. नरहर कुरूंदकर : वाटा : माझ्या आणि तुझ्या,इंद्रायणी साहित्य, पुणे, १९९३ पृ.४५
५. बाबासाहेब आंबेडकर : उद्धृत आंबेडकर तत्त्वज्ञान : प्रचीती आणि आविष्कार : ताराचंद खांडेकर, प्रभा प्रकाशन, नागपूर १९८१ पृ.१४०
६. बाबासाहेब आंबेडकर : भाषावार राज्यमीमांसा सुगत प्रकाशन नागपूर १९८७ पृ.१५
७. बाबासाहेब आंबेकर : राईटिंग ॲण्ड स्पिचेस, खंड २,महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८२ पृ.१९५
८. बी.आर. आंबेडकर : पाकिस्तान आर द पार्टिशन आफ इंडिया, ठक्कर प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. १९४५ पृ. २०६.
९. बी.आर. आंबेडकर, : डा.आंबेडकर का राजनिती दर्शन, डी.आर. जाटव समता साहित्य सदन, जयपूर, १९९० पृ.५४
१०. नरहर कुरूंदकर : भजन : इंद्रायणी प्रकाशन, पुणे. २०००, पृ.२४
११. तत्रैव

❖❖❖

# नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील स्त्री प्रतिमा

**प्रा. ममता राऊत**
**जे. एम. पटेल महाविद्यालय, भंडारा, महाराष्ट्र** (India)
mamtaraut74@gmail.com **भ्रमणध्वनी ८८५७९४४७०३**

भारतीय इतिहासात मनुवादी, सनातनी, परंपरावादी संस्कृतीने शूद्र दलित स्त्रियांच्या चिरकाल दास्यत्वासाठी आणि तिच्यावरील आपल्या पुरुषांच्या वर्चस्वासाठी काही अनिष्ठ चालीरीती व रुढी परंपराची जी व्यवस्था अव्याहत चालू होती याला जगाच्या इतिहासात तोड नाही. तसेच सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक ह्यानुसार चालविलेल्या जुलूमाच्या चक्रव्युहात अक्षरशः चिरडली गेलेली स्त्री ही' दासीची ही दास' म्हणून पिढ्यान्–पिढ्यापासून माणुसकीहीन जीणे मुक्यानेच जगत आली आणि मुक्यानेच मरत गेली तीला एक व्यक्ती म्हणून स्वतंत्र अस्तित्व नव्हतेच.

डॉ. योगेंद्र मेश्राम लिहीतात त्याप्रमाणे – ''हिंदू संस्कृतीच्या परंपरावादी वाङ्‌मयाने कालपर्यंत स्त्रीला तुच्छ, अभद्र, किळसवानी विकृत अशी 'भोगाची बाहूली करुन ठेवली'.[1]

हे मत सूर्यप्रकाशा इतके खरे आहे. आपल्या पांढरपेशा आणि सनातनी मनुवादी समाजाने स्त्रीला भोगवस्तु, दुर्बल, अबला म्हणूनच वागणूक दिली. तीला चौकटीबाहेर पडू दिले नाही. परंतु स्त्रीला सन्मानाने आणि एक व्यक्ती म्हणून शाहू, फुले, आंबेडकर यांनी सर्वप्रथम स्त्रीकडे बघितले.

''शाहू–फूले–आंबेडकर यांच्या क्रांतीमय कार्य कर्तृत्वाने स्त्री जातीवर लादलेली पूर्वीची जाचक बंधने थोडीफार शिथिल झाली असली तरी आतापर्यंत स्त्री ही सामाजिक आर्थिक दृष्ट्या परावलंबीच राहीली होती स्त्रीकडे बघण्याचा सामाजिक दृष्टिकोन अद्याप बदललेला नव्हता कालांतराने आधुनिक विचार धारेच्या अट्टाहासाने 'स्त्री स्वातंत्र्य' विषयक कायदे सुधारणा व शिक्षणाच्या संस्कारानी आजची स्त्री थोडीफार पुढारलेली दिसते. तिला आत्मसम्मान व स्वअस्तित्वाची जाणीव होवू लागली. परंतु 'दलित' स्त्री मात्र आज सुद्धा वंचिताचे, शोषितांचे, न्युनगंडाचे जीने जगत आहे. ती मनुवादी विचारधारेच्या तीव्र टिकेचे बाण झेलतच आहे. अजूनही दलित स्त्री मनुवादी व्यवस्थेतच खितपत पडून आहे. ती लाचारीचे उपेक्षित व अपमानित जीणे कंठीत आहे. दलितांवर होणाऱ्या अन्याय–अत्याचारातील स्त्रीलाच प्रथम बळी जावे लागते. मग ते बलात्कार असो, वेठबिगारी असो, दारिद्रय असो किंवा पुरुषांची पाशवी नजर असो दलित स्त्रीयांचाच प्रामुख्याने बळी जात आहे. तिचे सारखे शारीरिक व मानसिक शोषण चालूच आहे. ह्या स्त्रियांचे हुंकार चाकोरी बद्ध समाज व्यवस्थेत अजूनही घूसमटत आहेत त्यांनी चित्कार जरी फोडले तरी ते राजकीय हुकुमशाही व बेबंदशाहीच्या दडपणाखाली दबल्या पिचल्या जातात. दलित स्त्रियांच्या ह्या अवनतीला कारणीभूत आहे. हिंदू जाचक रुढी –परंपरा, धर्म कायदे (मनूप्रणित, सनातनी), जातीवर्ग व्यवस्था हे सत्य नाकारता येत नाही.

या हिंदू व्यवस्थेमुळे गुदमरलेले मुके श्वास, कुजलेली स्वप्ने कोंदटलेले उकीरड्यावरचे जीवन, आयुष्यातील काळोखाला टकरा देत भेदरलेले भविष्य ह्या पांढरपेशा धर्मांध व्यवस्थेतून मुक्त होऊ पाहात होते. अगदी चोखामेळाच्या काळापासून (13 वे शतक) धडपडत होते. परंतु खऱ्या अर्थाने परमपुज्य डॉ. आंबेडकरांची लोकशाही प्रणीत तत्वे समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, बुदधी प्रामाण्यवाद, व्यक्ती स्वातंत्र्यवाद ह्या सामाजिक मुल्यांना प्रमाण मानणारी अन्याय–अत्याचाराविरुद्ध पेटून उठणारी मानव म्हणून जगण्याचा अधिकार–हक्कासाठी संघर्ष करणारी 'वाङ्‌मयीन चळवळ' 'आंबेडकरवादी चळवळ' म्हणून मराठी साहित्यात उद्‌यास आली आहे. आणि खऱ्या अर्थाने महात्मा फुले व सावित्रीबाई फूले यांनी सुरु केलेल्या स्त्री मुक्तीच्या लढयाला पुनर्जन्म मिळाले. आंबेडकरवादी दलित साहित्यामुळे ही चालना अधिक जोरकसपणे ज्वलंतपणे स्त्री मुक्तीचा, स्त्री हक्कांचा जाहिरनामा मांडू लागली नव्हे दलित चळवळ ह्या मनुवादी पुरुषप्रधान संस्कृतीविरुद्‌ध पेटून उठली.

आंबेडकरवादी दलित साहित्यातील पहिला जोरकसपणे विद्रोह करणारा वाङ्‌मय प्रकार म्हणजे 'कविता' होय. या कवितेव्दारे जे पिढ्यान्‌पिढ्या पासून अंध, सनातनी, अघोरी, एकेरी हुकुमशाही नितीमत्ता भ्रष्ट झालेल्या तानाशाहीच्या दडपणाखाली दबल्या गेलेले, कुढत राहिलेले, जिवंतपणे मरण यातना भोगत असलेले, जनावरापेक्षाही हीन–दिन जीवन जगलेले मुके स्वर विद्रोही

झाले आणि काव्याद्वारे वेदनेचा जहाल अविष्कार करु लागले या संदर्भात डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, ''उस्फूर्त, उद्रेकी भावनाविष्कार प्रथम कवितेतून कवितेच्या मुखातून बोलू लागला. विहीर उपसून झरे मोकळे करावेत त्याप्रमाणे आंबेडकरांच्या कार्याने आणि विचाराने केलेल्या मुलगामी मंथनाने बहिष्कृत प्रतिभांच्या गळ्यातील गाळ उपसला गेला आणि निर्मीतीचे झरे मोकळे झाले''[2]

डॉ. मनोहरांच्या विचार मंथनाप्रमाणे उत्स्फूर्त, उद्रेकी भावना विष्कार अधिक ज्वलंतपणे ठामपणे दलित कवितेत 'नामदेव ढसाळ' यांनी व्यक्त केलेले आहे. ढसाळांच्या पूर्वी दलित जिवनातील दुखाःचा काव्यात्मपूर्ण स्वर समर्थपणे स्वरुपात विद्रोह करीत होता. अनेक मर्यादांची बंधने स्वीकारुन निनादित होता. परंतु आतापर्यंतचा विद्रोह सामाजिक पातळीवर हृदयस्पर्शी असला तरी तो सर्वस्पर्शी रुप धारण केलेला नसून काहिसा व्यक्तीनिष्ठ पातळीवरुन वावरतांना दिसतो. हे सर्व स्पर्शीत्वाचे मूलगामी विद्रोह रुप कवितेला पहिल्यांदा कोणी दिले असेल, तर ते नामवंत कवी श्रेष्ठ नामदेव ढसाळ या कवीने डॉ. योगेंन्द्र मेश्राम यांच्या शब्दात ''एकूणच मराठी काव्य जगतात खळबळ माजवून देणारा अत्यंत सामर्थ्यवान, विद्रोही व बंडखोर कवी म्हणून नामदेव ढसाळ यांचे नाव मान्यता पावले आहे. मानवीद्रोहा विरुद्ध अफाट अशा विद्रोहाचा विस्तव या संस्कृतीच्या सडलेल्या अंगावर बेडरपणे झोकणारा, रुढी भंजन करणारा अंगार ओकणारा असा हा तरुण बंडखोर कवी विद्रोही दलित साहित्याची एक प्रभावी प्रारंभी शक्ती ठरावा यात आश्चर्य नाही.''[3]

नामदेव ढसाळ हे 'दलित पँथर' या संघटनेचे सक्रीय कार्यकर्ते होते. नाकारलेल्या समाजाला न्याय मिळावा म्हणून ते विविध लढे संघटनेव्दारे देत असत तसेच अस्पृश्यतेने व जातीयतेने व्यथित झालेल्या रुढीने ग्रासलेल्या व विषमतावादी अमानुष धर्म, संस्कृतीवरती आपल्या विद्राही कवितेतून ठिणग्या उधळून तुटून पडले. ज्या 'गोलपीठामुळे' नामदेव ढसाळ काव्यप्रांतात नामा रुपाला आले. 'गोलपीठातील' त्यांच्या कवितेने एकूणच मराठी काव्यसृष्टीला नवे वळण दिले आहे. ह्या रुढ संकेतांना भिरकावून एक निराळी प्रतिमा सृष्टी निर्माण करून दिली आहे. याच गोलपीठातील वेगळ्या विश्वाच एक भाग स्त्री आहे. ढसाळांना स्त्रीच्या गुलामीचा गौरव आणि दुय्यमत्वाला सन्मान मानायला शिकविणारी ही व्यवस्था एखादया अवघड कोड्यासारखी वाटते. रुढी आणि धर्माच्या नावाने स्त्रीला मंडीत केले, फक्त उपभोगाची वस्तू म्हणूनच तिच्याकडे पाहिले होते. डॉ. यशवंत मनोहरांचे म्हणणे रास्तच आहे. की, ''उच्च वर्णियांची स्त्री शुद्र असते शोषितांची स्त्री अतिशुद्र आणि गुलामांची स्त्री गुलामच असते''[4]

इतिहास साक्षी आहे की, कधी पोटाची खळगी भरण्यासाठी तर कधी दुटप्पीपणानी वावरणाऱ्या सत्ताधीशांच्या किंवा दलालांच्या पाशवी वृत्तींची बळी झालेली 'स्त्री' ही उच्चवर्णीयांची नसून फक्त दलितांची आहे, आदिवासींची आहे, शुद्र—अतिशुद्रांची आहे, कामगारांची आहे अशाच दुहेरी भोगी व्यवस्थांचे आक्रंदन ढसाळ 'वेश्येच्या धंदेवाईक प्रेरणतून' पान. 18 गोलपीठा या कवितेत व्यक्त करतात.

'मनगटावरच्या चमेलीं गजऱ्यात कवळ्या।
कलेजीची शिकार उरकून शेवटच्या
बसची वाट पहाणारे बाहेर ख्याली लोकं।। (गोलपीठा पृ.क्र. 18)

प्रतिष्ठीतपणाचे मुखवटे घालून वेश्या व्यवसायास प्रवृत्त करणारे हे बाहेरख्याली लोकांना ढसाळ गोगलगाय आणि गिधाड म्हणतात, कारण मनुवादी व्यवस्थेमुळेच स्त्रीयांना वेश्या व्यवसायच बाजारीकरणात स्वःताची अब्रु दावणीला टांगुन पोटाची, संसाराची खळगी भरण्यासाठी जीवंतपणी मरणयातना भोगाव्या लागत 'गोलपीठाच्या' प्रस्तावनेत विजय तेंडूलकर लिहीतात, की ''ढसाळांच्या गोलपिठ्याला, जेथे महारोगी शरीरेही किंमत देऊन रस्त्याकडे संभोगली जातात, संभोगा शेजारी अर्भके रडतात, वेश्या गिऱ्हाइकांच्या प्रतिक्षेत गळाभर प्रेमगीते गातात जेथून कोणी जिवानिशी पळू शकत नाही, पळाले तर परत येते तो गोलपिठात'[5]

छळ विटंबना, पिळवणूक, गांजवणुक यांनी भरलेले दास्याचे जीणे दलित शुद्र स्त्रियांच्या बाबतीत तर पराकोटीलाच गेलेले होते. गावगाड्याच्या रडगाड्यातून ह्या स्त्रीला मुक्त होता येत नव्हते. पिढीजात दास्याचं लेणंच लेवून दलित शुद्र स्त्री ही दावणीला बांधलेली असते हे सांगतांना कविच्या दुःखाचे कड क्रांतीसाठी पेटून उठले आहेत ते म्हणतात,

'या देशात किंमत नाही स्त्रीला,
शुद्राला, कष्टकऱ्याला, भूमिहीनाला'

हे सांगतांना कवी 'आईची समजूत' या कवितेत आईला उद्‌देशून म्हणतात,

'आई तो तुझा लाडका
इथल्या संस्कृतीच्या, रूढीच्या, परंपरेच्या, विचारांच्या
व्यवस्थेच्या, समर्थकांच्या विरूध्द बंड करून उठलाय.
(चिंध्याची देवी आणि इतर कविता पृ.क्र. 35)

नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील स्त्री प्रतीमा रेखाटतांना प्रभा गणोरकर लिहीतात, ''बाई जातीच्या वैश्विक रहस्याने त्यांचे अंतःरंग अनेक पातळ्यांवर व्यापून टाकले असल्याचा प्रत्यय या संदर्भातल्या स्त्री विषयक कवितातून येतो. आई, मावशी, बहिण, बायको, प्रेयसी, वेश्या अशी बाईची विविध रूपे अनुभवतांना नामदेवला मानवी अस्तित्वाचे आणि त्या अस्तित्वाशी निगडीत असलेल्या जगण्याच्या अनेकविध विभ्रमांचे भान येत गेले. ही सर्व रूपे अनुभवतांना, न्याहाळतांना तो तटस्थ, अलिप्त राहू शकला नाही. माणूसपणाच्या आतड्याच्या नात्याने त्यांच्याशी जोडला गेला''[6]

या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रीला दुयम दर्जा दिला, तिची विटंबना केली गेली. जाती–रुढी– धर्मामुळे तिला नरक यातना भोगाव्या लागल्या दारिद्र्याचे चटके शोषित तत्कालीन विषमतावादी वागणुकीमुळे आपल्या माय माऊल्या कशा जीवन कंठीत होत्या त्याचं प्रतीक म्हणजे ढसाळांची आई होय.

''आई गेली याचे दुःख नाही
प्रत्येकाचीच आई कधी–ना–कधी मरते
दुःख याचे आहे अज्ञानाच्या घोषात
तीने आयुष्याच्या वाटाघाटी केल्या
गाव सोडतांना ती तिथेच ठेऊन आली मरीमाईचा गाढा
विस्थापित होऊन बाप अगोदरच
धडकला होता शहरात
आई शहरात आली तेव्हाच झाडवान घेऊन
कष्ट खसता उपसल्या, भोगल्या
शिळ्या भाकरीचे तुकडे मोडून
तरीही तिच्या अद्‌भुतांचा शोध चालुच होता
तिच्या देहातली वाद्येही अशी झणकारत राहायची''
(चिंध्याची देवी आणि इतर कविता पृ.क्र. 66)

नामदेव ढसाळ या जाती धर्माची कीड लागलेल्या व्यवस्थेविरुद्ध ज्वलंत भडकतात आपल्या ह्दयाची आग ओकतात 'आपल्याला गुलामीशी बांधून आवळून ठेवणारे केवळच लगाम नाकारायचे नाहीत तर लगाम धरणारे हातही तोडायचे आहेत. त्याशिवाय माणूसपणाचे समानतेचे पीक जन्माला येणार नाहीत. यासाठी क्रांती तर करावीच लागेल.' 'आईच्या समजुतीसाठी ' या दिर्घ कवितेत ते म्हणतात –

'तूझा हा पोर, पोर राहीला नाही तर
या युगातला तो क्रांतीकारी पुत्र आहे.
त्याला चक्क दिसते आहे
स्वतःची पिळवणूक नी बळी जाणं (चिंध्याची देवी आणि इतर कविता पृ.क्र. 35)

स्त्री गुलामीचा हा भोगवटा नष्ट करण्यासाठी या स्वापदाच्या गुहेत शिरलेच पाहिजे यासाठी ढसाळ आईला आपली शक्ती व प्रेरणा बनण्याविषयी गळ घालतात. ढसाळांना व्यवस्थेपुढे नमणारी झुकणारी स्त्री नकोय तीने नकार दिला पाहिजे प्रतिकार करुन संघर्ष करायला पाहिजे मग कविची म्हातारी आई कां असेना ते म्हणतात,

या देशाने आई तुला काय दिले
भीक मागायला आणि व्याभिचार करायला
शिकणारा हा देश–आई माझ्या शस्त्राचा तू आधार हो''.(पान. 14)

ढसाळांच्या काव्यातून उफाळणाऱ्या स्त्रीवादाचा हा उद्रेक जरी वेदनादायी असला तरी विद्रोह करायला लावणारा माणुसकीचा हक्क ठामपणे मांडणारा आहे. स्त्रीयांच्या जीवनाची वाटचाल स्वाभीमानी आणि चौकटीच्या पलीकडे झाली पाहिजे. ती पाशवी रूढी परंपरेतून मुक्त झाली पाहिजे. तिला मोकळे श्वास घेता आले पाहिजे व अन्यायाविरूध्द लढता आले पाहिजे. असा आशावाद ढसाळ व्यक्त करतात ते आपल्या पत्नीलाही ह्या चाकोरीबध्द चौकटीतून, रुढी–परंपरेच्या कैदेतून मुक्त हो

म्हणतात. हिंदू समाज व्यवस्थेतील भोग वस्तू किंवा पुरुषांच्या ईशाऱ्यावर नाचणारी कठपुतळी अशाच दृष्टीने स्त्रीकडे बघितले जायचे. परंतु फुले आंबेडकरी विचारांनी प्रेरीत झालेले ढसाळ पत्नीला समानतेची व सन्मानाची वागणूक देवू असा विश्वास बाळगतात. स्त्री –पुरुषातील भेद नाकारतात तर अशा विचारसरणी विरुद्ध आपण मिळून बंड करु या.

'माझ्या काळ्या सावळ्या लाडक्या मादीस' या कवितेत ते म्हणतात,

''तू आता स्त्री स्त्री म्हणून राहीली नाहीस
मी आता पुरुष पुरुष म्हणून राहीलेलो नाही
नर आणि मादीच्या कल्पना या युगातच
कशा पायदळी तुडवितात,
तू माझी दासी नाहीस, मी तुझा राजा नाही
आपण कॉम्रेड, आपण प्राणांतीक साथीदार''

ढसाळांच्या कवितेतील स्त्री ही शोषित असून ती संस्कृतीला जपणारी नाही आहे. कविला लढावू बाणेदार स्त्री अभिप्रेत आहे. रांगड्या रुढी –परंपरेत अडकून स्त्रीने बंदिस्त न राहता स्वच्छंदी मुक्त राहावे, तसेच स्त्रीला तिचे अधिकार हक्क मिळविता आली पाहिजे. इतकी प्रबळ शक्ती स्त्रीयात संचारली जावू दे, निसर्ग नियमानुसार स्त्री विकास घडू दे तशी प्रबळ ईच्छा ते पत्नी जवळ व्यक्त करतात म्हणूनच ते म्हणतात की, आपण तमाम शोषित वर्गाच्या कामगार वर्गाचे नेंते बनू या सनातनी पांढरपेशी व्यवस्थेविरुद्ध मिळून लढा देवू या.

'माझ्या काळा सावळ्या मादीस' या दिर्घ कवितेच्या शेवटी ते पत्नीला उद्देशून म्हणतात,

'आता तू काळी सावळी लाडकी
मादी राहीलेली नाहीस
ह्या प्रचंड विषमतेच्या देशात
तू व्हिएतनामी योद्धी झालीयस'
(चिंध्यांची देवी आणि कविता इतर कविता पृ.क्र. 49)

नामदेव ढसाळांची कविता दलित स्त्रीच्या वेदना, आकांत, नरक यातना जशी व्यक्त करते तशीच ती यांच्याशी निगडीत बाह्यवास्तवाचा भाग असणारी राजकीय सामाजिक व्यवस्थेची परीमाणे शोधून काढते. स्त्रीयांनी भोगलेल्या नरकांचा, जखमांचा, यातनांचा ढसाळांना स्वतःचा जीवंत भयग्रस्त अनुभव असल्याने ते ह्या समस्त स्त्री जातीच्या दुःखाशी स्वतःला जोडून घेतात.

## संदर्भ

1) डॉ. मेश्राम योगेंद्र : दलित साहित्य उद्गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, पृ. क्र. 26
2) डॉ. मनोहर यशवंत : आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर – 2012, पृ.क्र. 69
3) डॉ. मेश्राम योगेंद्र : दलित साहित्य उद्गम आणि विकास, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, पृ. क्र. 96
4) डॉ. मनोहर यशवंत : आंबेडकरवादी मराठी साहित्य, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर – 2012, पृ.क्र. 190
5) तेंडूलकर विजय : 'गोलपीठा', प्रस्तावना
6) गणोरकर प्रभा : 'चिंध्यांची देवी आणि इतर कविता', लोक वाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई पृ.क्र. 7

❖❖❖

# 'झेल्या' कथेचे स्वरूप आणि चिंतन

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभाग प्रमुख
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकुर, जि. लातूर, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ८६९८५५४४०३

## १. प्रस्तावना

व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्म १९२७ साली सांगली जिल्ह्यातील माडगूळ या गावी झाला काही काळ त्यांनी प्राथमिक शिक्षकाची नोकरी केली. कोल्हापूरमध्ये काही दिवस वास्तव्य केले. तेथून पुढे मुंबई येथे काही काळ घालविला. पुण्याला येऊन स्थायिक झाले. आकाशवाणीवर कार्यक्रम अधिकारी म्हणून त्यांनी काम केले. १९८३ साली मराठवाड्यातील अंबाजोगाई येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. माडगूळकरांनी मराठीमध्ये समृद्ध व संपन्न दर्जाचे लेखन केले आहे माणदेशी माणसं, गावाकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस, उंबरठा, काळी आई इत्यादी कथासंग्रह बनगरवाडी, सत्तांतर इत्यादी कादंबऱ्या जंगलातील माकडांच्या जीवनावर लिहिलेल्या सत्तांतर या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. कथा व कादंबरी लेखनाबरोबरच त्यांनी तू वेडा कुंभार, सती इत्यादी नाटकेही लिहिली आहेत. याचबरोबर बिन बियाचे झाड, कुणाचा कुणाला मेळ नाही, पती गेले ग काटेवाडी इत्यादी लोकनाट्य, वगनाट्य लिहिलेली आहेत. याशिवाय पुढचे पाऊल, सांगते ऐका इत्यादी चित्रपट कथा त्यांनी लिहिल्या आहेत. परंतु माडगूळकर ओळखले जातात ते एक उत्तम दर्जाचे कथाकार म्हणून असे त्यांचे विपुल साहित्य आहे. बनगरवाडी या कादंबरीचा इंग्रजीत अनुवाद झाला आहे. माडगूळकर हे उत्तम चित्रकार व शिकारी होते.

नव कथेच्या मुख्य चार शिल्पकारांपैकी व्यंकटेश माडगूळकर हे एक नवकथेचे शिल्पकार आहेत म्हणून माडगुळकरांची ग्रामीण कथा कथावाङ्मयातील एक मैलाचा दगड ठरलेला आहे. माडगूळकर हे ग्रामीण कथेच्या पहिल्या पिढीतील ग्रामीण कथाकार आहेत. १९२० च्या दरम्यान टिळक युगाचा अस्त झाला आणि याच दरम्यान खेड्यकडे चला असा गांधीजींनी सल्ला दिला आणि हा गांधीजींचा शब्द प्रमाण मानून साहित्यिक ग्रामीण जीवनाकडे वळले. नवे ग्रामीण भागाचे चित्रण करू लागले. ग. ल. ठोकळ, मराठे, भोसले इत्यादी कथाकार ग्रामीण कथा लिहीत होते; पण यांचे कथालेखन रंजन करणारे होते. या लेखकांच्या कथा बहुरुप्यासारखी खोटी होती. ती वाचकांच्या चवीमध्ये बदल व्हावा म्हणून मध्यमवर्गीय जिवंत चित्रण सोडून ग्रामीण जीवन चित्रणाकडे लेखक वळले आहेत. खेड्यातील दूध, दही, कोहुडा, खळी, जनावरे, ग्रामीण निसर्ग या कल्पना कथाकारांच्या मन:चक्षुपुढे उभ्या होत्या म्हणून शेतकऱ्यांच्या तोंडातील गाणी शब्दबद्ध केली. परंतु त्यांच्या पायात बोचणारे काटे, घरटे त्यांना दिसले नाहीत. म्हणून खरी ग्रामीण कथा उदयास आली ती माडगूळकरांपासूनच स्वातंत्र्याचा लढा शेवटच्या टप्प्यात आला होता. दुसऱ्या महायुद्धाच्या मानवी जीवनाची उध्वस्तता सिद्ध झाली होती. अशावेळी १९४५–४६ साली काळया तोंडाची ही माडगूळकरांची पहिलीच कथा अभिरुची या मासिकातून पहिल्याच पानावर छापून आली. एका मुक्या वनवासी प्राण्यावर कथा लिहून माडगूळकरांनी आपल्या कथालेखनाचा श्रीगणेशा केला. पूर्वीच्या कथेची सांकेतिक बंधने झुगारून दिली व कथेला विषयाचे वावडे नसते. हे एका वेगळया तोंडाच्या कुत्रीवर कथा लिहून माडगूळकरांनी दाखवले. १९४९ साली माडगूळकरांचा माणदेशी माणसं हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यांना माणदेशांमध्ये जी काही माणसं होती त्यात धर्मा रामोशी, मौलानाचा गौस, शिवा माळी, कोंडीबा गायकवाड, सदा चांभार, रामा मास्तर,झेल्या इत्यादी पात्रे शब्दरूप धारण करण्यासाठी त्यांच्या मनात धडपडत होते आणि यातून या पात्रांना व्यक्तींना आपल्या सवंगड्यांना, गावकऱ्यांना त्यांच्या गुणदोषांसकट जिवंत हाडामासाच्या माणसासारखे आपल्या कथांमधून उभे केले आणि या त्यांच्या व्यक्तिरेखांना उभ्या महाराष्ट्राने डोक्यावर घेतले. या व्यक्तिरेखापैकीच शिक्षकाच्या नोकरीच्या निमित्ताने भेटलेल्या एका मुलावर माडगूळकरांनी कथा लिहिलेली आहे ही कथा म्हणजे झेल्या ही होय. ही कथा त्यांनी माणदेशी माणसं या कथासंग्रहातून घेतलेली आहे.

## २. बीजशब्द :–

माडगूळकरांनी मराठीमध्ये विपुल प्रमाणात दर्जेदार व सकस कथा लिहिलेल्या आहेत. त्यांच्या बहुतेक कथा या आत्मचरित्रपर कथा आहेत. प्रांजळ व रोखठोक अशा कथा माडगूळकरांनी लिहिलेल्या आहेत.शिक्षकाच्या नोकरी निमित्ताने ग्रामीण जीवनाशी त्यांचा अधिक संबंध आला. तसे तर ते ग्रामीण भागात जन्मले. परंतु आपले गाव सोडून ते जेव्हा निंबवडे या गावी तीन महिन्याकरिता शिक्षक म्हणून गेले असता या तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये दुसरीच्या वर्गातील जालंदर एकनाथ लोहार उर्फ झेल्या माडगूळकरांच्या मनामध्ये घर करून बसतो आणि एका लोहाराच्या पोराचा त्याचा स्वभाव गुणदोषांसह माडगूळकरांनी जिवंतपणे उभे केले आहेत. आत्मपर लिखाण करणे अवघड असते. हे लेखन नेहमी आकर्षक वाटते; पण असे आकर्षक लेखन नेहमीच आत्मगौरवपर होण्याचा मोठा धोका असतो. आई–वडील, भावंडे, कुटुंबीय, बालमित्र यांच्याबद्दल अलिप्तपणे लिहिण्यात कलावंताची खरी कसोटी असते. आपल्या माणसाच्या दुर्गूणालाही आपण नकळत कारणमीमांसा जुळवतो. त्याच्या आयुष्यातील महत्त्वाचा लक्षणीय भावविवश होतो. हे माडगूळकरांनी झेल्या या कथेत पूर्णपणे टाळले आहे. झेल्या माडगूळकरांचा एक विद्यार्थी आहे. कधीकाळी नींबवड्या या गावी नोकरी करत असताना भेटलेल्या झेल्याचे दरिद्री जीवन पाहून त्याचा अल्लड स्वभाव पाहून लेखक भावविवश होत नाही. तर ते स्वत:ला अलिप्तपणे मनाने बाजूला ठेवून नकळतपणे झेल्याचा उनाडपणा त्याचे मास्तरचे असलेले प्रेम आणि मास्तरमयझालेला झेल्या याचे चित्रण त्यांनी केलेले आहे. स्वत:च्या आत्मगौरवाला बाजूला सारून झेल्याच्या खट्याळ मनाचे व जीवनाचे दर्शन माडगूळकरांनी खरेखुरे दर्शविलेले आहे. यासंदर्भात वा.ल. कुलकर्णी यांचा माडगूळकरांच्या आत्मपर कथेसंबंधीचा अभिप्राय लक्षात घेण्यासारखा आहे ''माडगूळकर जीवनाचे दर्शन घडवित असताना खऱ्या अर्थाने 'स्व'ला विसरतात. म्हणूनच शेवटी ते त्या जीवनानुभवबरोबर स्वचे यथार्थ दर्शन घडवू शकतात. ते विलक्षण तटस्थ राहून करत असल्याचे दिसते.''

## ३. विषयप्रतिपादन :–

'झेल्या' या कथेतून माडगूळकरांनी आपल्या जीवनात भेटलेल्या एका विद्यार्थ्याची त्याच्या जीवनाचे यथार्थ असे दर्शन घडविले आहे. म्हणून ही कथा आत्मचरित्रात्मक असली तरी अतिशय सुंदर अशी बनलेली आहे. झेल्या या कथेत मनात बसण्याजोग्या, मनावर परिणाम करणाऱ्या, वाचकाच्या मनावर ठसा उमटविणाऱ्या प्रमुख दोनच व्यक्तिरेखा आहेत मास्तर आणि झेल्या या दोन व्यक्तिरेखांचे दर्शन मोठ्या ताकदीनिशी यथार्थपणे माडगूळकरांनी घडविले आहे. या कथेतील मास्तर मातृहृदय  असलेल्या जाणिवेचा दिसून येतो. शिक्षकाला आईचं हृदय असावं लागतं. याची जाणीव मास्तराच्या व्यक्तिरेखेतून होते.झेल्या वर्गात नियमित न येणारा मुलगा, मास्तर नव्यानेच गेल्यानंतर त्याला विद्यार्थ्यामार्फत बोलावून घेतात. त्याचा स्वभाव बघितल्यानंतर त्यातला उनाडपणा स्पष्ट दिसतो. तरी पण त्याच्यावर ते न रागावता त्याला मातृप्रेमाने जवळ करतात. पुन्हा दुसऱ्या दिवसी गैरहजर राहतो. तरी पण त्याच्यावर मास्तर रागावत नाहीत. त्याच्या बुद्धिमत्तेची खरी ओळख ओळखली होती.झेल्या एक चुणचुणीत मुलगा आहे. हे मास्तरला कळले होते. असा हाडाचा शिक्षक या कथेतून भेटतो. थोडक्यात या कथेतील मास्तर ही व्यक्तिरेखा वाचकांच्या मनापर्यंत घर करुन मनाला भिडते. हेच या कथेचे थोरपण आहे. माडगूळकरांच्या कथेमध्ये भेटणाराझेल्या हा त्यांच्या जीवनातील तीन प्रसंगातून चित्रित केलेला आहे. माडगूळकरांच्या कथेच्या मर्यादा सांगताना त्यांच्या कथेतील पात्रांचा विकास झालेला नाही. हा एक दोष समीक्षकांनी मांडलेला आहे, परंतु मास्तर आणि झेल्या या दोन पात्रांचा विकास झालेला आहे. असेही समीक्षकांनी म्हटलेले आहे. या दृष्टीने झोल्याचे अल्पवयीन जीवन माडगूळकरांनी तीन स्तरातून केलेले आहे. माडगूळकरांच्या कथेत भेटणारा हा झेल्याउनाड आहे. वयाने तेरा–चौदा वर्षांचा आहे. म्हणून त्याच्या स्वभावात अल्लडपणा आढळतो. शाळेत तो नियमित येत नव्हता. मुलं जेव्हा त्याला मास्तराच्या सांगण्यावरून शाळेत घेऊन येण्यासाठी जातात. तेव्हा त्या मुलांना आई–बहिणीवरून शिव्या देतो,म्हैस सोडावी लागते, घरी भाता फुकावा लागतो. अशी खोटी सबब सांगतो. मास्तरला तो गुर्मीने बोलतो.ही खोटी सबब असल्याचे पहिल्या नंबरला असलेला न्हाव्याचा सदाएकदम बोलतो. तेव्हा झेल्या म्हणतो,''चल की साळंबाहेर, जीवच घेतो तुझा!'' अशी झेल्याची गुंडगिरी, उनाडपणा, धाडस श्रेष्ठ असल्याची खात्री मास्तराला पटते. वर्गात बसला तरी तो गुपचूप बसत नसे. एका मुलाच्या कुडत्याची मागील बाजू आणि कोणाच्यातरी दप्तराचं टोक याची गाठ तो हलक्या हाताने मारायचा असा हा वात्रटपणा खोड्या करणारा उनाड झेल्या माडगूळकरांनी चित्रित केला आहे.झेल्याचे व्यक्तिचित्र तीन प्रसंगातून

चित्रित केलेले आहे. पहिल्या प्रसंगातून अल्लड झेल्या या कथेमध्ये भेटतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वात व्रात्यपणा व खोडकरपणा आहे. पण झेल्या एक चुणचुणीत मुलगा पण आहे हे मास्तरांनी ओळखले होते. झेल्याच्या गैरहजेरी बद्दल मास्तर त्याच्यावर रागावले नाहीत. आणि त्यामुळेच झेल्याचा मास्तरांशी लळा लागतो. पुढे तो नेहमीच शाळेत येतो.त्याच्या खोडकरपणातही बुद्धीची चमक दिसू लागते. त्याचीकल्पकता मास्तराला कळून येते आणि हा झेल्या मास्तरचा पट्टशिष्य होतो. एकलकोंडेपणा ने जीवन जगणाऱ्या मास्तराला झेल्या साथीदार वाटतो. दररोज मास्तराच्या खोलीवर येतो. त्यांना विविध प्रश्न विचारतो त्याच्या बाळ बुद्धीला पडलेले प्रश्न पाहून एकूण मास्तर त्याच्या प्रश्नाचे उत्तर देतात.झेल्याच्या सहवासाने त्यांना विरंगुळा मिळतो.झेल्याचा आणि मास्तरांचा लळाइतका लागतो की कधी हातावर पाणी पडल्याबरोबर तो धावतच मास्तराच्या खोलीवर येतो. त्यांना लाकूडफाटा आणून देतो. काट्याकुट्यांची मुळी डोक्यावर घेऊन येईजळणापाई मास्तराने पैसे खर्च करणे त्याला पसंत नव्हते.रानमळे हिंडून तो जळण घेऊन येई. खोली उखडली की, सारवून देई.पाण्याची कळशी भरून ठेवी. भांडे घासत, बाजार करून आणून देत असे. या संदर्भात पहिल्याप्रथम मास्तराला संकोच वाटे झेल्याचा माझ्यावर खरंच जीव आहे. तो या गोष्टी माझ्यावरील भक्ती खातर करतो. हे सर्व कामे करून झेल्या अभ्यासही करू लागतो आणि हा हा म्हणता झेल्याच्या बालवयातील अल्लडपणा निघून जातो मास्तराच्या मातृहृदयीपदस्पर्शाने झेल्याचे जीवन सुधारते असा हा झेल्या मास्तराच्या प्रेमरुपी झऱ्याने त्यांचा पट्टशिष्य बनतो.झेल्याचे व्यक्तिचित्र ज्या तीन प्रसंगात रेखाटले आहे. तो शेवटचा प्रसंग म्हणजे झेल्या मास्तरमय होऊन जातो त्याच्याशी लागलेला लळा अधिकच गडद होतो. उजळू लागतो नव्हेझेल्याचे जीवनच मास्तराच्या सहवासाने उजळू लागते. अशातच पाहतापाहता मास्तरांची तीन महिने संपून जातात. मास्तर दुसऱ्या गावी किंवा तालुक्याच्या गावी जाणार हे कळताच झेल्या म्हणतो,''मी येतो मास्तर तुमच्या संग'' मास्तरांनी सामानाची आवराआवर केली झेल्या सोबतच घुटमळत होता. शेवटी सर्वांचा निरोप घेऊन मास्तर निघतो.झेल्याव चार दोन मुलं त्यांना पाठवायला निघाली.वेशीपासूनच काही मुले परतलीझेल्या मात्र मास्तराबरोबर चालू लागतो.निंबवडया या गावाची हद्द संपते व मास्तर म्हणाले, ''झेल्या जा आता तू'' तसं एकाएकी ओंजळीत तोंड खुपसतो व रडू लागतो आणि म्हणतो,''मास्तर मी नाही जायचं त्या साळंत'' मास्तराच्या विरहाने झेल्याचे मनव्याकूळ होते त्याच्या मनाला अपरंपार दु:ख होते आणि दु:खाचा ताण डोळयावाटे अश्रूंना वाट मोकळी करून देतो. मास्तराच्या सांगण्यावरून तो परत येतो. पाऊलवाटेवर चालणारा एकटा झेल्या पाहून मास्तराच्या विरहाने भरलेला पाहिल्यानंतर झेल्याचे व्यक्तिचित्र वाचकाच्या मनाचा ठाव घेते. त्याच्या डोळयापुढे दाटून आलेला अंधार, वाचकाला अंतर्मुख करतो.झेल्या घरी येऊन काय करणार? तो पुन्हा शाळेत जाईल का? उनाडकी करण्यातच जीवन घालणार का? आता कुठे असेल? कसा असेल? शिकला सवरला असेल? या व अशा अनेक सूचना, प्रश्नही कथा वाचकांच्या मनात वाचताना पुढे उभे राहतात. मास्तराच्या प्रेमरुपी झऱ्याने त्याचे जीवन उजळत असताना मास्तर अचानकपणे तालुक्याच्या गावी निघून जातात. त्याच्या जीवनातील समोरचा काळा, गडद अंधार ही कथा वाचताना जाणवू लागते. मोठ्या ताकदीने माडगूळकरांनी झेल्याचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. हा झेल्या विसरावा म्हटलं तरी वाचकाच्या मनातून जात नाही. हीच खरी कथेची परिणामकारकता असते या दृष्टीने माडगूळकरांनी झेल्याच्या जीवनाचे वीरहभावनेने, अल्लडपणाने भरलेलं व्यक्तिचित्रण रेखाटले आहे.

संवाद लेखन हा कथेच्या अंगाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. संवादातून पात्राच्या ठिकाणच्याभावभावना कळून येतात. संवादामुळे कथानकाला गती येते. संवादरुपी कथालेखन कथेच्या ताकदीमध्ये भर घालते व यातूनच व्यक्तीचा स्वभाव, प्रसंग इत्यादी कळून येतात. या दृष्टीने झेल्या या कथेतील संवाद अतिशय बोलके आहेत. अगदी थोडे संवाद या कथेमध्ये आहेत. कथेमध्ये अनेक पात्रांची गर्दी नसते. मोजकेच एक दोन पात्रे असतात आणि यातून या पात्रांच्या मनोभावनाही कळून येतात.या कथेचे निवेदन प्रथमपुरुषी निवेदन आहे म्हणून फार काही या कथेत पेरलेले दिसून येत नाही.झेल्या ही माडगुळकरांची आत्मचरित्रात्मक कथा आहे व या कथेत फक्त झेल्यानेच माडगूळकरांशी संवाद साधलेला दिसून येतो. संवादाची भाषा प्रमाण व बोली या दोन्ही मिश्रणातून अवतरलेली आहे. माडगूळकर जेव्हा बोलू लागतात तेव्हा त्यांचे संवाद भाषेतून अवतरलेले आहेत झेल्याचे संवाद हे अस्सल माणदेशी बोलीतून अवतरलेले आहेत. उदाहरणार्थ—''काय रे शाळेत का येत नाहीस?''''काम असतं घरी'' झेल्या गुर्मीत बोलला.''कसलं''''म्हसहिंडवावी लागती, भातावडावा लागतं. तो दादा म्हणतो, शाळेत जाऊ नगंस!'' मास्तर आणि झेल्यामधील हा संवाद झेल्याच्या जीवनावर प्रकाश टाकतो, तो एक उपेक्षित जीवन जगतो आहे. पण हे झेल्याचे बोलणे नाटक आहे. म्हणून थोडीशी नाट्यत्मकता या संवादातून जाणवते व ग्रामीण भागातील शाळकरी मुलं उनाडपणा करण्यातच आनंद मानणारी असतात.हेही या कथेत दिसून येते. या कथेतील

काही संवादातून झेल्याचा स्वभाव कळून येतो. त्याची धाडसी वृत्ती दिसून येते. यादृष्टीने पुढील संवाद पाहण्यासारखा आहे. मास्तराला झेल्या गंभीरपणे म्हणतो, ''मास्तर मी तालुक्याच्या गावी जाणार आहे उद्या.''

यावर मास्तर म्हणतात, ''का रे?''

''फौजदाराला मारायला!''

''ठीक काय केले रे त्याने तुझं?''

''झेंडा घेऊन 'गांधी की जय' म्हणलं म्हणजे त्याचं पित्त का बरं उठतं? मी जाणार हाय. अन् राती त्यो निजला म्हणजे सळई तापवून त्याच्या डोळयात खूपसणार हाय!''

या मास्तर व झेल्याच्या संवादातून १३—१४ वर्षाच्या झेल्याच्या अंगी धाडसी वृत्ती नांदत असलेली दिसून येते.गांधीवादाचा परिणाम खेड्यापर्यंत पोचून गेला होता' स्वातंत्र्याचे प्रतिबिंबही या संवादातून पडलेले दिसून येतात. स्वातंत्र्यासाठी झटणाऱ्या गांधी भक्तांना फौजदार निर्बंध घालतो म्हणून त्याच्या डोळयात सळई खुपसण्याची भाषा झेल्याच्या ठिकाणची राष्ट्रभक्ती त्याच्यातील देशाभिमान या कथेतून सांगून जातो. थोडक्यात, कथेतील संवाद थोडकेच पण रेखीव आखीव व परिणामकारक ठरले आहेत.झेल्या या कथेतून माणदेशातील आर्थिक स्थितीचे दारिद्रयाचे चित्रण आलेले आहे त्यांना अंगभर वस्त्र परिधान करण्यास मिळत नाही. हे झेल्याच्या वर्णनावरून दिसून येते अंगामध्ये वस्त्र नाहीत अंगावर कसली तरी डाग पडलेले कपड्यांना ठिकठिकाणी ठिगळे लावलेले होते. हातमागचे कपडे झेल्याच्या अंगावर होते हातमाग कपडे जिल्ह्याच्या अंगावर होते खेड्यापाड्यात दारिद्र्याची झुंज देतात अंगभर वस्त्र पोटभर जेवण मिळत नाही अशा दरिद्री अवस्थेत जगणारी माणसं माणदेशांमध्ये होती. तेथील दारिद्याचे चित्रण म्हणजे मोहराचा एक पोर झेल्या होय.

निवेदन हा एक कथेचा महत्त्वाचा घटक आहे निवेदन म्हणजे कथा सांगणे. ज्या पद्धतीने कथा लेखकांनी सांगितले आहे त्यावर तिचे यश अवलंबून असते. कथेचा आरंभ, मध्य आणि शेवट तेथेच कथेची गती निवेदन सांभाळत असते. निवेदन हे कथेच्या यशाचे मोजक्या शब्दात वर्णन करते. निवेदन कथेतील वर्णनाला जागा करून देते. माडगूळकरांचे कथा निवेदन अतिशय अप्रतिम दर्जाचे आहे. या कथेचे निवेदन आतीशय नीट व रेखीव साधलेली आहे. माडगूळकरांनी निवेदनाचा वापर पात्रांच्या ठसठशीतणासाठी केलेला आहे. निवेदनातून मूर्तिमंत असा हाडामासांचा जिवंत झेल्या उभा केलेला आहे. म्हणून माडगूळकरांच्या निवेदन शैलीने वाचकांच्या मनाचा वेध घेतलेला दिसून येतो. पैरण नसलेला,कुडत्याला एका हाताने गळयाशी धरून बिथरलेल्या खोंडासारखा झेल्या उभा होता. अंगाने किरकोळ वयानंही फारसा नसावा. १३—१४ वर्ष वयाचा डोक्याला मळकट अशी पांढरी टोपी, अंगावर कसली तरी डाग पडलेले, मळलेल्या बाहीवर ठिगळ लावलेलं, हातमागाच्या कपड्याची कुडतं त्याला शोभेल अशी गांधी कापडाची चड्डी, तिच्या दोन्ही अंगाचे किसे फुगलेले. असे झेल्याचे सहज व नैसर्गिक वर्णन माडगूळकर करून जातात. निवेदनाची साधी भाषाच वाचकांच्या मनाला भुरळ पाडून जाते.हे माडगूळकरांच्या कथेचे मोठे यश आहे. माडगूळकरांच्या भाषाशैली मध्ये कृत्रिमता नाही. त्यांची कथा शहरी भाषेतच निवेदन करीत असले तरी त्यांच्या पात्रांची ते भाषा वापरायला विसरत नाहीत. म्हणून माडगूळकरांच्या निवेदनात बोलीभाषेला अधिकाधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे. कथेच्या निवेदनात बोली भाषेचे सामर्थ्य आहे. कथेचे निवेदन करताना माणदेशी बोलीचा उपयोग करतात. कोणत्याही ग्रामीण परिसराची बोली आणि जिवंत असते माडगूळकरांची भाषा सहज आणि साधी आहे तिच्यामध्ये अलंकार नाहीत तसेच प्रतिमांचा सोस कोठेही दिसून येत नाही परंतु कापसातून धागा निघत जावा असे अलंकार त्यांच्या भाषेतून नैसर्गिकपणे उमलत जातात व ती भाषा काव्यमय होऊन जाते. उदाहरणात वर्गात जेव्हा झेल्याला मुलांनी पकडून आणले तेव्हा त्याचे वर्णन माडगूळकर अतिशय सुंदर रीतीने करतात,''बिथरलेल्या खोंडासारखा झेल्या उभा होता.'' असे सहजच काव्यमय माडगूळकर लिहून जातात. माडगूळकरांच्या पाठीमागे ठासून भरलेला जीवनानुभव आहे. ते सहज सुंदर भावानुभव वापरतात. मी जे भोगले ऐकले सोसले त्या सर्वांनी माझी भाषा बनलेली आहे असे स्वत: माडगूळकर सांगतात.

## ४. सारांश

कथेचा आशय साधा तर निवेदनही साधेच आलेले आहे. त्यांचे निवेदन नैसर्गिक बनलेले आहे. साध्या घरगुती निवेदनामुळे ही कथा गेली पन्नास वर्षाची वाटत आहे. माडगूळकरांनी जवळपास आठ कथासंग्रह माणदेशाचे जिवंत चित्रण केलेले आहे. त्यांच्या अनेक कथांपैकी झेल्या ही एक वाचकांच्या मनात घर करून बसलेली कथा आहे त्याच्या जीवनाचे चित्रण अतिशय सुंदर रीतीने माडगूळकरांनी रेखाटलेले आहे. जोपर्यंत ग्रामीण साहित्याचा विचार होत राहील तोपर्यंत माडगूळकरांच्या निवेदन कथांना, ग्रामीण कथांना झेल्या या कथेला

कोणीही आव्हान देऊ शकणार नाही. त्यांच्या कथा नेहमीच ग्रामीण कथेमध्ये अव्वल दर्जाच्या राहिलेल्या आहेत. म्हणून माडगूळकर हे पहिल्या पिढीतील अव्वल दर्जाचे ग्रामीण कथाकार आहेत.

## ५. निष्कर्ष

१. नवकथेतील मुख्य कथाशिल्पकारांपैकी व्यंकटेश माडगूळकर हे एक नवकथेचे शिल्पकार आहेत. माडगुळकरांची ग्रामीण कथा वांग्मययात एक मैलाचा दगड ठरलेली आहे. माडगूळकर हे ग्रामीण कथेतील पहिल्या पिढीतील ग्रामीण कथाकार आहेत.

२. झेल्या या कथेतून माडगूळकरांनी आपल्या जीवनात भेटलेल्या एका विद्यार्थ्याचे त्याच्या जीवनाचे यथार्थ दर्शन घडविले आहे.ही कथा आत्मचरित्रात्मक असून ती अतिशय सुंदर बनली आहे.

३. झेल्या या कथेतील मास्तर मातृह्दयी असलेल्या जाणिवेचा दिसून येतो. याची जाणीव मास्तराच्या व्यक्तिरेखेतून होते.

४. संवाद लेखन हा या कथेतील महत्त्वपूर्ण घटक आहे. संवादातून पात्रांच्या ठिकाणी असणाऱ्या भावना कळून येतात.झेल्या कथेचे प्रथमपुरुषी निवेदन आहे. माडगूळकरांनी निवेदनाचा वापर करून पात्रांचा ठसठशीतपणा रेखाटला आहे. निवेदनातून मूर्तिमंत हाडामांसाचा जिवंत झेल्या उभा केलेला आहे. निवेदन शैलीमुळे वाचकांच्या मनाचा वेध घेतात.

५. कथेच्या निवेदनाप्रमाणे शहरी भाषेचा वापर केला असला तरी प्रामुख्याने माणदेशी बोलीभाषेचा वापर केल्यामुळे कथेला जिवंतपणा प्राप्त झाला आहे.

## ६. संदर्भ ग्रंथ

१. संपा. डॉ. वसंत बिरादार 'आठ कथाकार', रमेश प्रिंटिंग प्रेस, नांदेड, प्रथमावृत्ती २००३

२. सुधा जोशी, 'कथा: संकल्पना आणि समीक्षा', मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्रथमावृत्ती २०००

३. संपा. साळुंखे, 'ग्रामीण वाङमयाचा इतिहास', कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१६

४. डॉ. वासुदेव मुलाटे, 'ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास', साहित्यसेवा प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९९२

५. डॉ. मनोहर सुरवाडी, '१९८० नंतरची ग्रामीण कथा', बळीवंश प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती २०१०

६. डॉ. रमेश जाधव,'ग्रामीण कथा वास्तवात आणि रंजकता', गौरवाणी प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१०.

❖❖❖

# वाशिम जिल्ह्यातील पीक संयोगीकरणाच्या प्रारूपाचे भौगोलिक विश्लेषण

डॉ. विजय ब. खराते
भूगोल विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, कामरगाव, जि. वाशिम, महाराष्ट्र (India)
vijaykharate8@gmail.com भ्रमणध्वनी ८६६८६१४२६७

## प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणामध्ये वाशीम जिल्हयातील पीक सयोगीकरण या विषयाच्या अनुषंगाने वाशीम जिल्हयातील तालुकानिहाय कोणत्या भागात कोणत्या भागात कोणत्या पिकाचे प्राबल्य आहे तेथील पिकांचे स्वरूप किंवा प्रारूप हे कृषी धारकांच्या पिकांच्या निवडीवर कसे अवलूंबन आहे. त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्यामुळे अन्नधान्याची समस्या निर्माण झाली आहे. त्याचाही परीणाम पीकप्रारूपावर झालेला असतो. पीक सयोगीकरणाच्या प्रारूपावर सर्वात अधिक भौगोलिक घटकांचा होत असुन त्यानंतर सामाजिक व आर्थिक घटकांचाही प्रभाव पीक सयोगीकरणाच्या प्रारूपात घडवून आणण्यात सहाय्य भूत ठरतात.

## गृहितके :

ज्या तालुक्यातील कृषी भूमी उपयोजनात एखाद्या पिकांचे विशेषीकरण असते अशा क्षेत्रात एकाच प्रकरणाच्या पिक सयोगीकरण योग्य मानला जाऊ शकतो. अशा क्षेत्रात उत्पादीत केल्या जाणाऱ्या प्रमुख पिकांच्या समुहाला पीक संयोगीकरण असे मानले आहे.

संशोधन पध्दती व माहिती संकलन : प्रस्तुत संशोधनलेखा अंतर्गत वाशीम जिल्हयातील समाविष्ट एकूण सहा तालुकयातील वर्ष २०११ मधील कृषी विषयक पिकांचे आकडेवारी संकलन करून कृषीभूमी उपयोजनातील आकृतीबंधातंर्गत पीक संयागीकरण प्रारूपाच्या अध्ययनाकरीता सांख्यकिीय साधणांचा व पध्दतीचा आधार घेतला पीक प्रारूपाचा अध्ययन करण्याकरीता कमीत कमी धनात्मक विचलन पध्दती– जे.सी. विवर यांच्या सुत्राचा उपयोग करण्यात आला.

## अभ्यासक्षेत्र :

वाशिम जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या मध्यपूर्वी भागात असून दख्खनच्या पठराचा पैनगंगा नदीच्या खोऱ्याचा एक भाग आहे. विदर्भातील एक प्रतीनिधीक जिल्हा असून आर्थिक व सामाजिम दृष्टया तो एक विकसनशील भाग आहे १ जुलै १९९८ मध्ये पश्चिम विदर्भातील अकोला जिल्हयाचे विभाजन करून वाशिम जिल्हयाची निर्मिती करण्यात आली. वाशीम जिल्हयाचे अक्षवृत्तीय विस्तार १९°.६' ते २०°.४७' उत्तर आणि रेखावृत्तीय विस्तार ७६°७' ते ७७°.१४' पूर्व दरम्यान विस्तारलेले आहे संपूर्ण जिल्हयाचे भौगोलिक क्षेत्रफळ ५१९६ चौ. कि.मी. असून हा जिल्हा वाशिम, कारंजा, मंगरूळपीर, मानोरा, रीसोड, मालेगाव या ६ तालुक्यात विभागलेला आहेत्र २०११ च्या जनगणने नुसार वाशीम जिल्हयाची एकूण लोकसंख्या ११९६७१४ असून लोकसंख्येची घनता २४४ व्यक्ति प्रती चौ. कि.मीत्र आढळून येत अभ्यासक्षेत्रातील हवामान साधारण: उष्ण व कोरडे असून कमाल तापमान ४५° सेंटीमिटर व किमान तापमान २०°से.ग्रे. असून सरासरी पर्जन्यमान ७५० ते १००० मी.मी. पडतो. वाशीम जिल्हयातील प्रमुख नदी पैनगंगा असुन काटेपुर्णा, अडाण, अरूणावती बेंबडा, पुस, मन इत्यादी सहाय्यक नद्या आढळते.

## विश्लेषण :

एखादा कृषी क्षेत्रात उत्पादीत केल्या जाणाऱ्या प्रमुख पिकांच्या समुहाला पीक संयोगीकरण असे म्हणतात वातावरणातील पिक निवडीचा पिकांच्या प्रारूपावर परिणाम होत असतो. पीक संयोगीकरणाच्या अध्ययनाद्वारे उपाय–योजना करून चांगले भूमीउपयोजन साधल्या जाऊ शकते. म्हणजेच एका निश्चित

कालावधीमध्ये त्या विशीष्ट क्षेत्रात जेवढी पीके घेतली जातात. त्यांच्या वैशिष्टयावरून त्या क्षेत्रात जेवढी पीके घेतली जातात. त्यांच्या वैशिष्टांवरून त्या क्षेत्रात पीक प्रारूपासोबत पीक संयोगीकरण स्पष्ट होते या दृष्टीकोणातून वाशीम जिल्हयातील पीकांच्या संयोगीकरणाचे भौगोलिक/विश्लेषणाचे स्पष्टीकरण प्रस्तुत प्रकरणांतर्गत केलेला आहे. पीक संयोगीकरणाचे स्वरूप प्रामुख्याने प्राकृतीक (हवामान, मृदा, जलसिंचन) आणि आर्थिक व सामाजिक वातावरणाची देण असते व आजच्या काळात पीक संयोगीकरण क्षेत्राचा अभ्यास कृषी भूगोलाचे महत्वाचे अंग आहे. एखाद्या भूप्रदेशात पीक मुख्य असेल तरी ही त्या भूप्रदेशातील इतर अनेक पीके घेतली जातात यालाच Agricultural Mosaic असे संबोधतात म्हणून विविध पिकांची भीन्नता लक्षात घेऊन अभ्यास करणे अधीक सोयीचे होते या साठीच संयोगीकरण ही पध्दत उपयुक्त ठरते.

पीक संयोगीकरणाच्या आधारे कृषी विभाग निश्चित करण्यासाठी सर्वप्रथम सांख्यीकीय तत्वाचा वापर इ. सत्र १९५४ मध्ये विवर यांनी केलेला आहे ही पध्दत सर्वप्रथम विवर यांनी मांडलेली असल्याने या पध्दतील Weaver Method of Crop Combination असे संबोधल्या जाते विवरणे दिलेल्या सुप्रानुसार पीक संयोगाचे विचलन काढुन ज्या पीक संयोगाकरीता कमीत कमी विचलन आलेले आहे तो पीक संयोग त्या विशिष्ट प्रदेशाकरीता योग्य मानले आहे. याकरीता पुढील सारणी क्र १ व २ नुसार आर्थिक स्पष्ट करता येईल.

पीक संयोगीकरणाच्या आधारे कृषी विभाग अभ्यासका करीता विवर यांनी पुढील सुत्राचा उपयोग केलेला आहे

सूत्र $d = \frac{\sum d^2}{N}$ d = विचलन $d^2$ = विचलनाचा वर्ग **N** = पिकांची संख्या

उपरोक्त सुत्राच्या आधारे व विवर यांच्या अधोरेखांकीत विधानाची पुष्टी देवून वाशिम जिल्हयातील पीक संयोगीरकण व पीक पध्दती यावर निष्कर्षात्मक विश्लेषण पुढील प्रमाणे स्पष्ट केले आहे.

विवरणे दिलेल्या सुत्रानुसार प्रत्येक पीक संयोगाचे विचलन काढुन ज्या पीक संयागाकरीता कमीत कमी विचलन आलेले आहे तो पिक संयोग काढतांना सर्वप्रथम जास्त विचलन येऊन मध्यंतरी कमी होत पुन्हा वाढत जाते म्हणून मध्यंतरी जो कमी विचलनाचा पीक संयोग येतो तोच आदर्श व योग्य संयोग असून तोच पीक संयोग त्या विभागाच्या अंतर्गत कृषी भूमीउपयोजनामध्ये आदर्श ठरतो. वाशीम जिल्हयातील तहसिलनिहाय २०११ मधील विविध पिका खालील क्षेत्र आणि त्यांचे शेकडा प्रमाण सारणी क्र १ व २ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. त्यावरून पीक संयोगीकरण व काढून ते सारणी क्र २ मध्ये प्रस्तुत करण्यात आलेली आहे.

सारणी क्र. १

जे.सी. विवर – कमीत कमी धनात्मक विचलन पध्दती

पीक सयोगीकरण (२०११)

| अ. क्र | तहसिल | पीक संयोगीकरण | | | | | कमीत कमी धनात्मक विचलन पध्दत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एक पीक | दोन पीक | तीन पीक | चार पीक | पाच पीक | |
| १. | वाशीम | १२२५ | २४०.०५ | २६२.०५ | १७८.०८ | १५०.५ | चार पीक |
| २ | कारंजा | ३३६४ | ६१० | ३०५.८९ | २५६ | १४५.२५ | चार पीक |
| ३ | मंगरूळ पिर | २६०१ | ५१२.५ | २७१.८२ | २५६ | २४५.२५ | चार पीक |
| ४ | मालेगाव | ३७२१ | ४८१ | १२९९.१९ | २२३ | २११.२ | पाच पीक |
| ५ | मानोरा | ४४८९ | ३६५ | ३५०२ | १६३ | १२०.१५ | तीन पीक |
| ६ | रिसोड | ३७३५ | ३२५ | १२४७.४६ | १८३.८ | १५६.२५ | चार पीक |

सारणी क्र. २

जे.सी. विवर – कमीत कमी धनात्मक विचलन पध्दती प्रमाणे

वाशिम जिल्हयातील पीकांचे सयोगीकरण (२०११)

| अ.क्र | तहसिल | पिके | पीक संयोगीकरण |
|---|---|---|---|
| १. | वाशीम | सोयाबीन, तूर, ज्वारी, कापूस | चार पीक संयोगीकरण |
| २ | कारंजा | कापूस, ज्वारी, सोयाबीन, तूर | चार पीक संयोगीकरण |
| ३ | मंगरूळ पिर | तूर, ज्वारी, सोयाबीन, कापूस | चार पीक संयोगीकरण |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मालेगाव | तूर, कापूस, ज्वारी, सोयाबीन | चार पीक संयोगीकरण |
| ५ | मानोरा | कापूस, तूर, ज्वारी | तीन पीक संयोगीकरण |
| ६ | रिसोड | तूर, कापूस, ज्वारी, सोयाबीन | चार पीक संयोगीकरण |




<u>वाशीम</u> : वाशीम तालुक्यातील वर्ष २०११ मध्ये नियोजित झालेल्या कृषीभूमी उपयोजनांतर्गत पीकांचे संयोगीकरणामध्ये एक पिकांचा ऋणात्मक बदल होवून मुख्यत: चार पिक संयोग निश्चित होत असुन यामध्ये सोयाबीन, तुर, ज्वारी व कापूस या पिकांचा प्रामुख्याने समावेश होतो. पाण्याच्या कमतरतेमुळे गहु या पिकांच्या ऐवजी सोयाबीन या कमी कालावधीत येणाऱ्या व्यापारी तेलबीयाच्या पिकाच्या लागवडीचे क्षेत्र वाढलेले दिसून येते.

<u>मालेगाव</u> : संपूर्ण ग्रामीण लोकसंख्या असलेल्या मालेगाव तालुक्यामधील कृषीभूमी उपयोजनांतर्गत २०११ पूर्वी पीक वितरणक्रमा मध्ये ज्वारी या पिकांचे अधिक होते परंतु कालीक परिवर्तनाच्या बदल्यात कृषी विषयक दृष्टीकोनामुळे वर्षे २०११ मध्ये अनेक पिकांखालील कृषीचे भूमीउपयोजन साधले आहे. त्यामुळे विवरण यांच्या पध्तदीच्या अनुषंगाने या क्षेत्रात पाच पिकांचे संयोगीकरण आढळुन येते. त्यामध्ये प्रामुख्याने तूर, कापुस, गहु व सोयाबीन या पिकांचा समावेश होतो त्यातून कृषीधारकांना पीक निवडी संदर्भातील बदलत्या दुष्टीकोण स्पष्ट होतो.

<u>मानोरा</u> : २०११ मधील ज्वारी या परांपरागत पिकांतर्गत जास्तीत जास्त कृषीभूमीचे उपयोजन न राखता कापुस, तुर, या पिकांना प्राधान्य देवून या क्षेत्रात तीन पिकांचे संयोगीकरण विवरच्या पध्दतीनुसार निश्चित होत असुन यामध्ये कापुस, तूर, पिकांनरत, ज्वारी पिकाप्रारूपामध्ये तिसऱ्या क्रमांकावर प्राधान्य देऊन कृषी भूमी उपयोजनातील बदल साधला असल्याचे दिसून येते.

<u>रिसोड</u> : २०११ मधील कृषीभुमी उपयोजनामध्ये तुर, कापुस, सोयाबीन व ज्वारी या पिकांचे कृषी उपयोजनाचे नियोजन करीत चार पिकांचे संयोगीकरणातील पीक समानता कायम आहे.

<u>कारंजा</u> : २०११ मधील कृषीपिक प्रारूपामध्ये परंपरागत पिकांच्या प्राधान्य क्रमात बदल करीत ज्वारी, तुर, गहु या पिकांचे कृषी क्षेत्रामध्ये कापुस या नगदी व व्यापारी स्वरूपाच्या पिकांअंतर्गत कृषीधारकांनी पिक प्रारूपात मोठया प्रमाणात बदल केला. तृणधान्या खालील क्षेत्र कडधान्यांतर्गत आणून चार पिकांचे संयोगीकरण साधले आहे. यामध्ये कापुस, ज्वारी, उडीद, तूर या चार पिकांचा प्रामुख्याने समावेश झालेला आहे. वाढत्या मागणीनुसार व्यापारी पिकाकडे शेतकऱ्यांचा कल असल्याचे दिसुन येते.

मंगरूळपीर : मंगरूळपीर तालुकामध्ये २०११ मध्ये पीक प्रारूपात मोठा बदल झालेला आहे. ज्वारी, गहू या सारख्या पिकांच्या क्षेत्रावर तुर व दाळवर्गीय पिकाने व कापुस या तंतुपीकाने भुमी अधिग्रहीत केलेली दिसुन येते. परीणामत: वर्ष २०११ मध्ये चार पिकांचे संयोगीकरणात तूर, कापूस, ज्वारी व सोयाबीन या पिकांचा समावेश असलेल्या स्पष्ट होता जलसिचंनाच्या साधनाच्या कमतरतेमुळे गहू या पिकांच्या ऐवजी सोयाबीन या कमी कालावधीत येणाऱ्या व्यापारी तेलबियाण्याच्या पिकांच्या लागवडीचे क्षेत्र वाढलेले दिसून येते.

## निष्कर्ष :

वाशीम जिल्हा हा परंपरागत कृषी व्यवसायाशी व पार पारीक पीक प्रारूपाशी संबंधीत असुन कृषी पीक संयोगीकरणामध्ये काळानुसार बदल झालेला स्पष्टपणे दिसून येतो. २०११ मधील पिक प्रारूपांमध्ये सोयाबीन, तुर, ज्वारी, कापुस या पिकांना पीकसंयोगिकरणामध्ये प्राधान्य दिल्या गेले. अन्नधान्याच्या वाढत्या मागणीनुसार पीक संयोगीकरणामध्ये मागील ३० वर्षात बदल झाल्याचे स्पष्ट होते. विवरच्या पध्दतीनुसार पिकांचे सामान्यीकरण होत असुन कमी महत्वाच्या पिकांच्या समावेश झालेला आहे. परिणामत: पीक संयोगीकरणात जास्तीत जास्त पिकांची निवड होते. प्रामुख्याने गहु आणि ज्वारी पिकाखालील कृषी पिक प्रारूप बदलून सोयाबीन व तुर व काही प्रमाणात कापुस या पिंकानी पिंक संयोगीकरणात प्राबल्य ठेवले असे स्पष्ट होते.

## संदर्भ सूची :

१) माजिद हुसेन (२०००) कृषी भूगोल
२) जिल्हा आर्थिक समालोचन (२०११) वाशीम जिल्हा
३) Weaver, J.C. (1954) – Crop Combination Region in the Middle – West, Geog. Rev. 44
४) Washim District Census hand b ook – (2011) – Director Government Printer Stationery, Maharashtra State”
५) Sources Available from Concerned Govt. offices, Z. P. Washim.

❖❖❖

# संत कवयित्री–संत बहिणाबाई यांच्या काव्यातील विचार गांभीर्य (शके १५५० ते १६२२)

डॉ. मीना जुनघरे
मराठी विभाग प्रमुख
शिवशक्ती कला वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगाव
जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९४०५९०७९२९

## प्रस्तावना :–

स्वत:ला तुकारामशिष्य म्हणवून घेणाऱ्या तुकारामांना समकालीन ज्या व्यक्तींनी काव्यरचना केली त्यापैकी बहिणाबाई या सर्वश्रेष्ठ होत. संत तुकारामांनी स्वत: कोणाही व्यक्तीचे गुरूपद स्विकारले नाही, गुरू या संस्थेवर त्यांचा विश्वास नव्हता. परंतू तुकारामांच्या श्रेष्ठ आध्यात्मिक अधिकारामुळे उत्सफूर्तपणे स्वत:ला त्यांच्या शिष्या मानण्यात ज्यांनी धन्यता मानली त्या बहिणाबाई या अध्यात्मक्षेत्रातील एक अधिकारी व्यक्ती आणि काव्यक्षेत्रातील थोर रचनाकार होऊन गेल्या.

## ● बहिणाबाईंचे चारित्र :–

वयाच्या तिसऱ्या वर्षी तीस वर्षे वयाच्या बिजवराशी त्यांचा विवाह झाला. बहिणाबाईवर भागवत धर्माचे संस्कार होत ज्या पाठक घराण्यात त्यांचा विवाहझाला ते पाठक घराणे शक्तीचे उपासक आणि म्हणून भक्तीला विरोध करणारे होते. बहिणाबाईंचा कल लहानपणापासूनच कर्थाकिर्तन श्रवणाकडे होता. त्यामुळे पत्नीचे हे परमार्थाचे अन भक्तीचे वेड पतीला सहन होत नव्हते. त्यात पाठक ब्राम्हण आपल्या पत्नीने शुद्र जातीतल्या तुकोबांना गुरू मानावे हेही त्यांना सोसवत नव्हते. त्यामुळे पती–पत्नीत सदैववाद होत असत. स्त्री देहाची पराधीनता आणि वैराग्याची अनिवार ओढ अशा संघर्षात त्या निरंतर होत्या. त्यांचे बरेचसे अभंग आत्मचरित्रात्मक आहेत. त्यांच्या आत्मनिवेदनपर अभंगाात प्रांजलपणा, वैराग्याची तेजस्वीता आणि परवशतेमुळे आहे हे कारूण्य आहे.

## ● बहिणाबाईच्या कवितेचे स्वरूप :–

बहिणाबाईची कविता ही वारकरी संप्रदायाची कविता आहे. बहिणाबाईंच्या अध्यात्ममार्गावरील वाटचालीचा आणि त्यांच्या काव्यरचनेचा अतूट संबंध आहे. ज्याप्रमाणे त्यांचे लौकीक चारित्र त्यांच्या अभंगामधुन ध्यानात येते त्याचप्रमाणे त्यांचे पारलौकीक जीवनातील वाटचालही या अभंगामधुन दिसते. ईश्वरभेट घडावी यासाठी केलेल्या प्रार्थनेपासून ईश्वरभेटीनंतर अंगी आलेल्या सामर्थ्यापोटी केलेल्या उपदेशापर्यंतचे विविध भावतरंग या कवितेत आपल्याला दिसतात. आपली भक्तिभावना व्यक्त करतांना त्यांनी विठ्ठलाची करूणा भाकलीआहे, विठ्ठलाचा गौरव केला आहे. नामपर, बोधपर, ज्ञानपर, ब्रम्हकर्मपर अश विषयावरही त्यांनी रचना केलेली आहे. बहिणाबाईचा एकूण काव्यसंभर ७४० अभंगांचा आहे. त्यांच्या अभंगाचे विषयावर वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

● बीजशब्द :–
आदि परंपरा, आत्मनिवेदन, तत्त्वचिंतन , भक्तिमाहात्म्य, उपदेशपर, ब्रम्हकर्मपर, संकीर्ण अभंग

## १) आदि परंपरा (गुरूपरंपरा) :–

बहिणाबाईनी स्वत:च आपल्या अभंगात आपली गुरूपंरपरा नमुद केली आहे – आदिनाथ–मच्छेद्रनाथ–गोरखनाथ–गहिनीनाथ–निवृत्तीनाथ–ज्ञानेश्वर–सच्चिदानंद–विश्वशंकर–राघव चैतन्य–बाबाजी चैतन्य–तुकाराम–बहिणाबाई "आदिनाथाने उपदेश पार्वतीस केला" (अ.क्रं १)

## २) आत्मनिवेदन :—

मराठी वाङ्मयात आत्मचरित्रात्मक लेखनाचा उगम संतानी केलेल्या आत्मनिवेदनपर अभंगरचनेत शोधता येतो. नवविधा भक्तीच्या विविध प्रकारांमध्ये आत्मनिवेदन ही भक्तीची अत्युत्कट प्रत्येक संताने आत्मनिवेदनपर अभंग लिहिले आहे. बहिणाबाईंनी आपल्या अभंगातून आत्मचरित्रात्मक लेखन केले आहे. त्यांच्या आत्मपर लेखनात स्त्रीमनाचे कोमलत दिसते. स्त्रीमनाचे गुण जाणवतात त्या स्वतःचे जीवन अधिक नेटकेपणाने व सुसंगतपणे न्याहाळू शकल्या आहेत असे वाटते. कथनाच्या ओघात बहिणाबाईंची जीवनकथा परिणामकारकतेने लक्षात घेता येते. या आत्मचरित्र लेखनाचा विशेष म्हणजे आध्यात्मिक साधना करण्यासाठी बहिणाबाईला त्यांच्या पतीची परवानगी नव्हती. त्यामुळे एक प्रकारची परतंत्रता त्याना अनुभवावी लागली. त्यांची आध्यात्मिक साधना पतीच्या तंत्रानेच चालते. स्त्रियांचे सामाजिक स्थान दुय्यम असल्याने त्यांना विलक्षण छळ सोसावा लागला असे दिसते. स्त्रियांचे स्वतंत्र प्रश्न म्हणूनच त्या मांडताना दिसतात.

बहिणाबाईंनी आपल्या आत्मचरीत्रात्मक अभंगातून मातापित्यांचे नाव, जन्मगावचे नाव व वर्णन, स्वतःच्या जन्माच्या वेळी मातापित्यांना संतानयोगाविषयी झालेला 'स्वप्नदृष्टांत' ज्योतिषाने बदविलेले भविष्य आदी निवेदन संकेताना धरून केले आहे. त्यातुन हिंदु कुटूंबजीवनातील रूढी, परिस्थिती यांचेही दर्शन सहजतः घडले आहे. स्त्रियांकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन किती अनुदार व रूढीग्रस्त होता हेही त्यांच्या कथनातून सूचीत होते. बालविवाहाची पध्दत रूढ होती हेही त्यांच्या स्वतःच्या अनुभवावरून लक्षात येते. यानंतर कुटूंबावर ओढवलेले स्थलांतर व त्या निमित्ताने अंगिकारलेली तीर्थयात्रा यांचे वर्णन येते. पतीला दान करण्यात आलेल्या गायवासराची हकीगत त्यांनी विस्तारपूर्वक सांगितलेली आहे.

मनात तरळून जाणाऱ्या भावनांविषयी सूचकतेने लिहिलेले आहे. जयराम स्वामींच्या सहवासाने त्यांच्या मनात सद्गुरूविषयीचे आर्त निर्माण झाले. त्यातून बहीणाबाईंच्या अंतरंगाचे उत्कृष्ट दर्शन होते. बहीणाबाई नवविधाभक्तीचे स्वतःचे अनुभव जिवंतपणे रेखाटतात. गुरूविषयीचे आर्त विलक्षण सामर्थ्याने व्यक्त केले आहे. मनाच्या या अवस्थेतच त्यांना तुकारामांचा स्वप्नदृष्टांत घडतो व त्यांचे मन आनंदी बनते. या आनंदाने प्रत्ययी शब्दांत वर्णन केले आहे.

"गाय केले व वत्समुखी निघे धार। अमृत हे सार सेवी हेची।।
आनंदले मन चिद्रूपी कोंदले। उढोनी बैसले चमत्कारे।।
अमृत पाजिले चवी अनरिसी। साक्ष ज्याची त्यासी मनामाजी।।

बहिणाबाईच्या आत्मचरित्राचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्रामुळे त्यांचे एक स्वतःचे चारित्र तर समजतेच, पण तुकोबाभोवती फिरत असल्याने ते तुकारामचरित्राचेही अस्सल साधन बनले आहे. बहिणाबाईंनी या नोंदी केल्या नसत्या तर तुकाराम चरित्रातील महत्वाच्या भागाला आपण कायमचे मुकलो असतो.

## ३) तत्वचिंतन:—

बहिणाबाईच्या अभंगवाणीतून त्यांचे त्या त्या क्षणी उंचबळून आलेले भाव जसे व्यक्त होतात, तसेच त्यांचे परतत्वात रमणारे मन आणि त्या मनाने केलेले मुक्त चिंतन यांचा प्रत्यय सातत्याने येत राहतो.तत्वचिंतन हा आत्मप्रत्ययातून स्फुरलेलला उद्गार असतो. बहिणाबाईच्या अभंगातून प्रकटलेला तत्वविचार हा सुसुळा आणि सलळ असा नाही. याचे कारण की अभंग रचना प्रसंगानुरूप आणि स्फूट स्वरूपाची आहे. या रचनेतील विचारांना व्यापक जीवनसत्याचा स्पर्श आहे. या तत्वचिंतनामध्येबहिणाबाईच्या भक्तिकल्पनेबरोबरच बहिणाबाईची आध्यात्मिक वाटचाल, त्यांची उपदेशवाणी, तुकारामांचा सुस्पष्ट प्रभाव दिसून येतो.

तुकारामांप्रमाणे बहिणाबाई वेदप्रामाण्य मानतात. वेदनिष्ठा हे बहिणाबाईच्या अभंगवाङ्मयाचे वैशिष्ट्ये मानावे लागेल. वास्तविक स्त्रीयांना वेदाधिकार नाहित म्हणून त्या उदास झालेल्या दिसतात. आपल्या स्त्रीजन्माबद्दल त्यांना हळहळ वाटते.

लाधले नरदेह स्त्रियेचेनी रूपें। असंख्यात पाये फळा आली।।
अधिकार नाही वेदार्थश्रवणी। गायत्री ब्राम्हणी गुप्त केली।।
बहेणी म्हणे होतो जीव कासाविस। नये देवाजीस करूणामाझी।।

आणि तरीही बहिणाबाई अनन्य वेदनिष्ठा व्यक्त करतात कारण 'वेदांचा तो अर्थ आम्हासीस ठावा' असे छातीठोकपणे सांगणाऱ्या तुकारामांच्या अभंगानी त्यांच्या मनाला मोहिनी घातली असावी. वेदांचे महात्म्य वर्णन करतांना बहिणाबाई म्हणतात,

अव्दय ऐसे हे वचन। दुसरे ते नव्होचि जाण।।
स्वसंवेध अवघा आपण। सर्वी सर्वत्र
भूतमात्री व्यापक।तो चि तू वर्तनू देख।।
व्यतिरेकान्वये सूख। अनुभवे पहावे।।
बहेणि म्हणे वेदान्वये। ज्ञात ते निखल लाहे।
वरकड ते महिन होये । अंधाचे परी।।

'एकमेव द्वितीय ब्रम्ह' हेच तत्वज्ञान या अभंगात सुंदर रीतीने मांडले आहे. आत्मा म्हणजे देह नव्हे हा महत्वाचा विचार पंचतत्वाचा पाढणा— या रूपकात मांडला आहे. 'तू नव्हेसी, तू या वेगळा जाण, वेगळा म्हणजे' "तू तव यासी साक्षीभूत। तू नया अलक्ष सकळा।।"

पंचमहाभतूात्मक देह म्हणजे तू नव्हेस तर त्यांना पुरून उरणारा द्रष्टा, साक्षी असा आहेत हे जाणणे हीच ज्ञानाची गुरूकिल्ली आहे. असा कळकळीचा उपदेश बहिणाबाई करतात. आत्मा देहात प्रतिबिंबरूपात राहतो हे सांगण्याकरीता 'आत्मा काया भांडण' हे पती—पत्नीचे भांडण बहिणाबाईनी रंगविले आहे. त्या म्हणतात आत्म्याचे ज्ञान डोळ्यांना किंवा ज्ञानेद्रियांना होत नसते. तर मन चिन्मय झाले की मनाला होते हा महत्वाचा विचार बहिणाबाईनी "होय मना बोध 'ब्रम्हपणी' यातील 'या शब्दात सुंदर रीतीने मांडला आहे. बहिणाबाईची काव्यसंपदा परतत्वस्पर्शाने भारावली आहे. त्यांच्यामते भक्ती हे वरिष्ठ साधन आहे,  भक्ती हेच विरक्तीचे मुळ आहे, मोक्षदानी आहे विश्वव्यापी परतत्वाला पाहण्यासाठी ज्ञान दृष्टी हवी ही ज्ञानदृष्टी सगुण सत्वगुणानेप्राप्त होते पण जोपर्यंत गुरूकृपेने आत्मज्ञान होत नाही तोपर्यंत हर एक मानवातील आत्मनत्व जीवदशा भोगीत असते.

'जेथे विकल्प तुटला। तेथे वर्णभेद मिथ्या बोला'।।

म्हणजे त्याच्या मनाला कुठलाही विकल्प, संशय राहिला नाही, त्याचे बाबतीत लिंग, वर्ण जाती इत्यादीभेंदाचा विचार करणे दृष्ट नव्हे तो सर्वश्रेष्ठच मानला पाहिजे असा निर्वाळा त्या देतात. पुढे बहिणाबाई म्हणतात, शुद्रास व स्त्रीजातीस गुरूवृ नाही असे म्हणणाऱ्यांशी स्वप्नातही संभाषण करू नये. आपल्या स्त्रीत्वाची आणि त्यामुळे निर्माण झालेल्या मर्यादांची, एकंदरच दुर्भलतेची खंत बहिणाबाईंना आहे.

'वारिवरी वेष संताचा। भीतरी धुमकस इंद्रियांचा।।'

अशा भोंदू सांधूपासून सावध रहावे असे मार्गदर्शनही त्या करतात. पाखंडी, दुराचारी, अभिमानी लोकांचा संग धरू नये असेही त्या सांगतात. बहिणाबाईचे तत्वचिंतन अखंडपणे जीव—जगत् आणि जगदीश्वर या संबंधी होत राहीले. त्यांच्या तत्वचिंतनाच्या केन्द्रस्थानी भक्तीमार्गाचे प्रतिपादन येत राहते. त्या भक्तीमार्गाला सदाचाराची जोड द्यायला सांगातात बहिणाबाईच्या तत्वविचारात मुख्यत्वे तुकारामांच्या परमार्थ विचारांचा आणि अनुषंगाने ज्ञानदेवप्रणित तत्वप्रणालीचा आदरभाव दिसून येतो. ईश्वरभक्ती हे मानवी जीवनाचे साफल्य आहे असे बहिणाबाईच्या तत्वचिंतनाचे सार आहे.

## ४) भक्तीमहात्म्य :—

बहिणाबाईच्या मनात भक्तीची भावना बालपणापासूनच रूजलेली होती. अगदी बालवयातच त्या जेव्हा पंढरपूरला गेल्या तेव्हाच आता इथेच कायमचे रहावे असे त्यांना वाटू लागले. वारकरी संप्रदायात भक्तीची अखंड परंपरा जोपासलेली त्यांना दिसत होती त्यामुळे स्वाभाविकपणे भक्ती हाच त्यांचा धर्म बनला. भक्तीच्या जोरावरच आत्मिक उन्नती साधता येते आणि भक्तीविना परमेश्वर भेटत नाही ही त्यांची मनोमन श्रध्दा होती म्हणूनच बहिणाबाईनी भक्तीमहात्म्य गायीले. त्यांच्या भक्तीमहात्म्य रचनेत ज्ञान, भक्ती, सद्गुरूची थोरवी, संतवर्णन, तुलसीमहात्म्य, नाममाहात्म्य, पंढरीनाथ वर्णन, देवांशी भांडण या विषयांचा अंतर्भाव होतो.

भक्ति हे कारण साधन वरिष्ठ। रोकडे बैकुंठ हाती वसे।।
भक्तिपायी ज्ञानी वैराग्य आंदणे। सर्वही साधने लया जाती।।

या अभंगातून बहिणाबाईनी भक्ती आणि ज्ञान यांची सुंदर सांगड घातलेली दिसते. भक्तीने चितशुध्दी होते. चितशुध्दीमुळे वैराग्य उत्वन्न होते. वैराग्यामुळे सर्व विषय मृगजळाप्रमाणे आहेत हे समजते त्यामुळेमन विरक्त झाले की प्रपंचाची आसक्ती सुटते 'जैसे हे वमन सर्व तैसे' अशी पूर्णपणे विरक्ती आली की ज्ञान त्याची सेवा

करू लागते 'ज्ञान हे तयासी वोळंगण।।' सर्व साधनांत श्रेष्ठ साधन असलेल्या व ज्ञानप्राप्ती करून देणाऱ्या भक्तीचे स्वरूप बहिणाबाई असे वर्णन करतात.

'संताचे वचनी दृद ज्या भव। भक्ति अभिनव हे चि खरी।।
बहिणी म्हणे संतपायी जया आर्त। हाचि भक्तिपंथ वोळखावा।।

बहिणाबाई म्हणतात,गुरूमंळा, देव व औषध ही भावबळानेच फळाला येतात पाषाणाची प्रतिमाही भावाने भजव्यास इच्छित फळ देते. भक्तीमध्ये भाव महत्वाचा आहे. पण तो उत्पन्न होने हीच मोठी कठिण गोष्ट आहे. देवाबद्दल निरपेक्ष भक्तिप्रेम उत्पन्न होण्यासाठी प्रथम चित्त शुध्द झाले पाहिजे. यासाठी अनेक साधने आहेत पण सद्‌गुरूकृपेनेच खऱ्या भक्तीची प्राप्ती होते. भक्तीची परिणती आत्मज्ञानात होऊन साधनक जीवनमुक्त होतो. ज्ञानाचे महत्व विशद करतांना त्या म्हणतात कर्मकांडाच्या फेऱ्यात न अडकता नामसंकीर्तनाच्या साध्या, सोप्या व सुलभ मार्गाने भक्ती करावी. सर्वशक्तीमान परमेश्वर आपल्या पाठीशी आहे, तो आपला उध्दार करणारा आहे. अशा विचारातून निर्माण होणारी सुरक्षिततेची भावना भक्ताच्या मनात अखंड जागी असते. तो सर्वत्र भरून राहील्यामुळे मानवी जीवनाला सौदर्य आणि समृध्दी प्राप्त होते. ही श्रध्दा भक्ताचे मनात निरंतर जागी असते हे त्या आवर्जुन सांगतात.

## ५) उपदेशपर अभंग :—

तुकारामाप्रमाणे बहिणाबाईनेही उपदेशपर रचना केली आहे. त्यांनी स्वत: जेअनुभव घेतले त्या अनुभवातील आनंदामुळे हा 'शाश्वत आनंद'सर्वसामान्यांना मिळावा असे त्यांना वाटते. या आनंदाच्या आड येणारे जे जे मायामोह आहेत ते टाळावे असे त्या तळमळीने सांगतात हे सांगताना आपण कोणी थोर आहोत या भूमिकेतून त्या बोलत नाही.ज्यांना आपले कल्याण कशात आहे ते कळत नाही त्यांना त्या उपदेश करतात. हा उपदेश सन्मार्ग, भक्ती, श्रध्देचा असतो बहिणाबाईनी आपल्या मन:पर अभंगात पतिव्रताधर्मपर अभंग, बोधपर अभंग, अनुपातपर अभंग, टोणप्यांचे अभंग, करूणापर अभंग, निवृत्तीपर अभंग इत्यादी अभंगाच्या द्वारे सर्वसामान्यांना उपदेश केला आहे.

त्या म्हणतात परमार्थात मन हे मुख्य आहे. मनोजय हा परमार्थ मार्गातील महत्वाचा टप्पा आपल्या मन:पर अभंगात तुकारामाप्रमाणे बहिणाबाईही आपुलाही आपणासी संवाद करतात. त्यांचे मन आणि त्या यातील संघर्षाचे अनेक पदर आहेत. कधी त्या मनाला खडसावतात, कधी मनाची समजुन काढतात तर कधी मनाची करूणा भाकतात. मानवी मन हे मूलत: विषयाकडे धावणारे आहे मनाची ही अवस्था बहिणाबाईनी सुरेख दृष्टांताच्या आधारे विशद केली आहे.

विषयांकडे धावणाऱ्या बंडखोर मनाचे दंडन करण्याचा मार्ग सांगण्यासाठी मन:पर अभंग हे त्यांच्या गाथेतील प्रकरण अवतरले आहे. पण हे सर्व विवेकाच्या बळावरच शक्य आहे. 'दमुनी इंद्रिये आणिला विवेक। दाखविल सुख आत्म्याचे। या शब्दांत आत्मसुख प्राप्तीचा मार्ग बहिणाबाई सुचवितात. श्रीगुरूला शरण गेल्यानेच विवेक साधता येतो मीपणा सुटतो, अहंकार सुटतो आणि निवांत सुखाची प्राप्ती होते. अत्मसंयमन साधले की ब्रम्हसायुज्यतेचे सुख प्राप्त होते.

## ६) ब्रह्मकर्मपर अभंग :—

बहिणाबाईच्या गाथ्यात 'ब्रह्मकर्मपर अभंग एकणू ४९ आहेत. बहिणाबाईचे गुरू तुकाराम तुकारामांचा स्वप्नबोध त्यांना झाला या घटनेने त्या धन्य झाल्यापरंतुत्यांच्या कर्मठ पतीला हे रूचले नाही 'कैचा शुद्र तुका स्वप्नीचे दर्शनी। बिघडली पत्नी काय करू?'असा त्या संताप झाला.ब्राम्हणाने शुध्द्राला गुरू करणे त्यांच्या मनाला पटणे शक्य नव्हते. त्याने आपल्या पत्नीचा अनन्वीत छळ केला. हा छळ सुरू असतांना विवेकनिष्ठ बहिणाबाईच्या मनात असे विचारमंथन सुरू झाले की खरा ब्राम्हणकोण? तुकारामांसारख्या परमानुभूतीने रंगलेल्या महामानवाला शुद्र मानायचे आणि आपण केवळ जन्माने ब्राम्हण आहोत म्हणून त्याच्यापुढे नमायचे नाही हे योग्य आहे काय? त्यांच्या मनातील या संघर्षात त्यांना 'वज्रसूचिकोपनिषदाने' दिलासा मिळाला असावा. आणि त्यातुनच 'ब्रम्हणकर्मपर' अभंगाची निर्मिती साली असावी असा तर्क केला जातो. कारण 'वज्रसुचिकोपनिषद' हे जन्मजपत ब्राम्हण्यावर कठोर आघात करणारे उपनिषद आहे. ब्राम्हण कोण? हा या उपनिषदाचा प्रतिपाद्य विषय आहे. जीव, देह, जाती, ज्ञान, कर्म वा धर्म यांनी ब्राम्हण्य सिध्द होत नसून केवळ अद्वितीय आत्म्याचा

साक्षात्कारानेच ब्राम्हण्य सिध्द होते असा त्याचा मतितार्थ आहे. म्हणूनच बहिणाबाईचे 'ब्रम्हकर्मपर अभंग' हे त्यांचे वेगळेपण म्हणावे लागते. बहिणाबाई स्वत: ब्राम्हण, नवरा कर्मठ, तामसी वृत्तीचा, अशा परिस्थितीत 'वज्रसूचिकोप निषदाचा' अनुवाद करणे ही केवढी धाडसाची गोष्ट होती. त्या काळात एका ब्राम्हण स्त्रीने हे धाडस दाखवावे हे खरोखरच आश्चर्य होते.'वज्रसुची' चा अनुवाद हे बहिणाबाईचे योगदान आहे. हे योगदान आजच्या काळाशी तुलना करता किती महत्वाचे होते हे लक्षात येते. मती गुंग होते. बहिणाबाईची त्या काळाची धारणा आजच्या समाजानेही लक्षात घेण्याजोगी निश्चितच आहे आणि या अर्थी बहिणाबाईवर खरोखरच अन्याय झाला आहे.

चार वर्णामध्ये ब्राम्हण हाच प्रधान वर्ण आहे असे श्रुतीनी आणि स्मृतीनीही म्हटले आहे. बहिणाबाई म्हणतात ब्राम्हण कोण? सर्व मनुष्याचा देह एकसारखा पंचमहाभूतांची बनलेला आहे. शरीराचे भोग सारखेच आहेत. देह ब्राम्हण नाही. जाती ब्राम्हण नाही. ज्ञान ब्राम्हण नाही. कर्म ब्राम्हण नाही. धर्मही ब्राम्हण नाही. तर मग ब्राम्हण कोण? आदिद्वीय, जातिगुण क्रियाहीन, दोषरहित, सत्यज्ञानानंद स्वरूप, निर्विकल्प, सर्वभूतांच्या अंतर्यामी राहणारा, आत बाहेर सर्वत्र  आकाशाप्रमाणे व्यापून असलेला, अखंडानंद स्वभाव, अप्रमेय, केवळ अनुभवाचा विषय असलेला व अपरोक्षतेने भासणारा असा जो आत्मा षडविकारांचा त्याग करून व शमदमाही गुणांनी संपन्न बनून कृतार्थतेने राहतो तोच केवळ ब्राम्हण होय.

## ७) संकीर्ण अभंग :—

बहिणाबाईची संकीर्ण रचना वैविध्याने भरलेली आहे त्यात स्फुट अभंग, पदे, गौळणी, भारूडे, श्लोक, आरत्या या प्रकारची रचना समाविष्ठ आहे. बहिणाबाईनी वारकरी संप्रदायाचे सर्व काव्याविषय आपल्या अभंगरचनेत हाताळले आहेत. स्वत:च्या जीवनानुभूतीतुन त्यांच्या उपदेशावर रचनेचा जन्म झाला. 'पंचतत्वाचा पाळणा, 'प्रवृत्ती निवृत्तीचे भांडण' चौवाचा निरूपम', 'आत्मकाया भांडण','सर्व प्रकारची भारूडे', अशा कौशल्यपूर्ण रचनेद्वारे त्यांनी हे कार्य सुलभ पध्दतीने साधले आहे. स्फुट काव्याच्या माध्यमातुन तत्वज्ञानाची भरघोस देणगी हे बहिणाबाईचे आगळे वैशिष्ट्य आहे. सगुण रूपाचे वर्णन बहिणाबाईने जितक्या तन्मयतेने केले आहे. तितकेच त्यांना झालेल्या निर्गुण साक्षात्काराचेही वर्णन केले आहे.

सौरी—'सौरी' व डौर' या माध्यमांचा वापर करून त्यांनी पाच भारूडे लिहिली आहेत. "जातीकुळधर्म नाही सौरीयेच्या वेषा बहिणी म्हणे नि:शंकपणे हिंडो दाही दिशा।।" परमेश्वर प्राप्तीसाठी सौरीसारखा नि:संगपण व निलाजरेपणा आवश्यक आहे हे तत्व त्या मांडतात. "पुरूष व्याली कन्या झाली' या भारूडात परमात्म्यापासून माया जन्मली व तिने परमेश्वरालाच संसार मांडायला लावला अशी विश्वोत्पत्तीची कथा सांगितली आहे."

पंचतत्वाचा पाळणा—यात परविद्येतील शिकवणुकीने जो लाभ झाला तो सांगितला आहे. श्रीकृष्ण चरित्राबाद्दलही त्यांचे अभंग आहेत. पंढरीचे आणि विठ्ठलाचे वर्णन त्यांनी मुक्त कंठाने केले आहे. काव्यसौंदर्य त्यांच्या अभंगात अनेकविघता दिसून येते. शब्दालंकार, अर्थालंकाराची उदाहरणे सापडतात. सर्व रंसाचा पारिपोष आहे. उपमा, उत्प्रेक्षा, उपहास पदोपदी प्रगट झाले आहेत. इतकेच नव्हे तर योग आणि वेदांत शास्त्रातील गुढ प्रमेये उलगडून दाखविणारे अभंग आहेत.

त्यांच्या अभंगात तुकारामांसारखा रोखठोकपणा, तळमळ, तीव्र अर्थाचे शब्द वापरण्याचा निर्भिडपणा आहे. जे जे चांगले त्याचा स्विकार करण्यातील तत्परता, सद्गुण विषयील पवित्रतम विचार, मन:पर अभंगातील उत्कटता, बोधपरअभंगातील कळकळ हे त्यांच्या मनाची श्रेष्ठता पटवितात. अनुभवांची सुंदर पखरण करतांना त्यांच्या कल्पना शक्तीला अनंत घुमाने फुटतात.कुटरचना—गूढानुभवाची रहस्यमय भाषेत केलेही रूपकाश्रयी अभिव्यक्ती म्हणजे कूटरचना होय. असंभाव्य वाटणाऱ्या घटना अलौकीक पातळीवर अनुभवास येतात हे अशा प्रकारच्या कुटरचना सुचवित असतात. 'नवल वर्तले', "मुंगी उडाली आकाशी' यासारख्या रचना, त्यांनी आपले आध्यात्मीक अनुभव कूटरचनेद्वारे ही व्यक्त केले आहे. बहिणाबाईने आपल्या आत्मतिनषेदनपर अभंगात आपल्या योग साधनेतील अनुभव स्पष्टपणे सांगितले आहेत.

कुटात्मकता हे भारूडाचे वैशिष्ट्य बहिणाबाईच्या भारूडांमधील खेळीया, हुंबरी, सौरी यामध्ये दिसून येते. बहिणाबाईचे वाङ्मय काव्यगुण संपन्न व उच्च दर्जाचे आहे. 'शांतरस' हा येथील मुख्य रस आहे. बहिणाबाई दृष्टांताची मालिका गुफतात यात त्यांचे कल्पना वैचित्र्य व प्रतिभा सामर्थ्य दिसून येते. त्यांची विनोद बुध्दी प्रगट होऊन हास्यरसाची प्रचिती येते त्यांच्या सर्व भारूडात उत्कृष्ट व मर्नस्वशी काव्य आहे. बहिणाबाईचे काव्य भक्तीरसाचे ओथंबलेले आहे.

## ● सारांश :–

बहिणाबाईचे वाङ्मय काव्यगुण संपन्न व उच्च दर्जाचे आहे. 'शांतरस' हा येथील मुख्य रस आहे. आत्मानुभुतीतून प्रकटलेले विचारसौंदर्य हा त्यांच्या काव्याचा एकदम नजरेत भरणारा गुण आहे. वेदांत, तत्वज्ञान पचवून मुरलेले बोल त्यांच्या काव्यात उस्फुर्तपणे प्रकटले आहेत. स्वानुभूतीपर उद्‌गारांनी त्यांच्या काव्याला परतत्वस्पर्शझालेला आहे. म्हणूनच ते साक्षात्कारी व दिव्य काव्य आहे. बहिणाबाईंची कविता केवळ व्यक्तिगत पातळीवर राहात नाही तर ती साऱ्या समाजाला आवाहन करते.

तुकारामांचा अभंग हाच त्यांचा अखंड चिंतनाचा विषय असल्यामुळे आशय, विषय, आविष्करण पध्दती, शैली, सर्वत्र बाबतीत बहिणाबाई आणि तुकाराम यांच्या अभंगात किती तरी ठिकाणी साम्य दिसते. तुकारामांच्या काव्यानेच त्यांनी तुकारामांना गुरू मानले. प्रौढ विचारगांभीर्य बहिणाबाईच्या लेखनाचा स्थायीभाव वाटतो.

बहिणाबाईच्या अभंगावरून त्या काळातील विविध प्रकारची सामाजिक माहिती आपणास मिळते. बहिणाबाईच्या अभंगातून वैचारिक दृष्टी स्पष्टपणे जाणवते. तत्कालीन दृष्टीकोनातून पाहता ब्राम्हण वर्गाचे सामाजिक उच्चस्थान बहिणाबाईने नमूद केले आहे. हे स्वाभाविक आहे. पण खरा ब्रम्हण कोण हे सांगातात बहिणाबईनी जी परखड विचारसरणी मांडली आहे ती त्यांच्या बुध्दीमतेची साक्षपटविणारी आहे.

संतकृपा झाली । इमारत फळाआली। ह्या एका अभंगावरूनही त्यांचा वारकरी संप्रदायातील वावर स्पष्ट होतो.

## ● संदर्भग्रंथ :–

१) संत साहित्य – आकलन आणि अध्यापन– महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे.
२) संत तुकारामांच्या–शिष्य पविार–डॉ. शोभा घोलप
३) संकलसंत गाथा –खंड १
४) संतकवयित्री – विरोज आनंदकर
५) संतपरंपरा – विद्यावाचस्वती शंकर अभ्यंकर
६) तुकारामदर्शन – सदानंद मोरे

❖❖❖

# बालकामगार आणि कायदेशीर सुधारणा

डॉ. नीता तिवारी
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री धाबेकर कला महाविद्यालय
खडकी (चा.), अकोला, महाराष्ट्र (India)
neetatiwari201456@gmail.com भ्रमणध्वनी ९९२३०३६१२६/९८३४५८८४९९

## प्रस्तावना

बालकामगाराची प्रथा हा समाजाला लागलेला कलंक आहे असे म्हटल्यास वावगे ठरु नये.हा कलंक दूर करुन बालकामगारांचे शिक्षण करणे ही सामाजिक गरज बनली आहे. गरिबीमुळे शाळा न शिकणारी मुळे, मुळी कामधंदा करुन अर्थार्जन करतात. बालवयात त्यांना धोकादायक उद्योग,व्यवसायात कामावर न ठेवता त्यांची शारिरीक व मानसिक वाढ होण्यासाठी, त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी बालकामगार प्रथा निर्मूलन होणे गरजेचे आहे.

राष्ट्रीय बाल कामगार कायद्याच्या धोरणांपैकी धोकादायक व्यवसाय तसेच सर्वसामान्य व्यवसायामधली बाल मजुरी टप्प्याटप्प्याने नाहीशी करणे हे एक महत्वाचे धोरण असल्यामुळे भारतात यासाठी ठोस कायदेशीर कृती आराखडा अस्तित्वात आहे. कोणताही कायदा प्रभावीपणे वापरता येण्यासाठी त्याच्या परिणामात्मक अमलबजावणीतल्या पळवाटा आणि तरतूदीपासून तो मुक्त असायला हवा. सर्व प्रकारचे व्यवसाय आणि व्यवहारामध्ये मुलांना कामगार म्हणून ठेवण्यावर प्रतिबंध लावण्यासाठी आणि त्यांना मुक्त आणि अनिवार्य शिक्षण मिळण्याच्या हक्कांचा कायदा २००९ अन्वये शाळेत प्रवेश मिळणे सोपे व्हावे म्हणून बालकामगार प्रतिबंध आणि नियामक कायदा १९८६ मध्ये २०१६ साली काही सुधारणा करण्यात आल्या. संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या १३८ व्या आणि १८२ व्या परिषदेत झालेल्या निर्णयांना अनुसरून या सुधारणा केल्या होत्या. त्यानुसार पौगंडावस्थेतल्या मुलांना धोकादायक व्यवसाय आणि प्रक्रियांच्या कामामध्ये कामगार म्हणून नियुक्त करण्यावर प्रतिबंध घालण्यात आला. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या १३८ व्या परिषदेमध्ये म्हणजेच किमान वयाच्या मुद्दयावर भरलेल्या परिषदेमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार कोणत्याही प्रकारच्या नोकरीसाठी भरती केलेल्या कामगाराचे वय अनिवार्य शिक्षण पूर्ण करण्याच्या वयापेक्षा कमी नसावे आणि ते कुठल्याही परिस्थितीत १५ वर्षांपेक्षा कमी नसले पाहिजे. संघटनेच्या १८२ व्या परिषदेत बाल कामगार पध्दतीचे अत्यंत वाईट स्वरूप या विषयाच्या लेखातल्या पहिल्या नियमानुसार बाल कामगार पध्दतीचे अत्यंत वाईट स्वरूप ही अत्यंत तातडीने निवारण करायची समस्या असून तिचा प्रतिबंध आणि निराकरण लगेच आणि परिणामकारक उपयांयाद्वारे व्हायलाच पाहिजे. भारतात काम करणाऱ्या मुलांच्या परिस्थितीच्या संदर्भात, बाल कामगार कायद्यात नजिकच्या काळात करण्यात आलेल्या सुधारणाबद्दल या लेखामध्ये विस्तृत चर्चा करण्यात आली आहे. बालकामगार हा स्वत:च परस्परविरोधी दोन संज्ञांनी बनलेला शब्द आहे. बाल ही संज्ञा निष्पापपणा आणि कोमलता दर्शवते. तर कामगार या संज्ञेतून खूप अंगमेहनत आणि परिश्रमाचा अर्थ ध्वनित होतो. आपल्यांना माहित असलेल्या इतिहासकाळापासून मुले विविध व्यवसायामध्ये काम करीत असल्याची उदाहरणे आहेत. असे मानले गेले आहे की, कामामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. त्यांना स्वाभिमान कमवायला मदत होते आणि या सर्वामुळे सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेला मदत होते. लहान वयापासून कौशल्ये शिकल्यामुळे पारंपरिक कौशल्यांची जपणूक चांगल्या प्रकारे होते आणि त्या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोप्या पध्दतीने हस्तांतरीत होतात. पण कामाबाबतचे हे सकारात्मक दृष्टीकोन नाटयमयरित्या बदलून जातात जेव्हा लहान मुलांना त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य धोक्यात येईल अशा वातावरणात अनेक तासासाठी राबवून घेतले जाते आणि त्यांना त्यांचे बालपण आणि शैक्षणिक तसेच इतर हक्क आणि संधीपासून वंचित ठेवले जाते. कामाच्या ठिकाणी मुलांना अत्यंत कमी मोबदला दिला जातो किंवा कधी कधी अजिबात मोबदला दिला जात नाही, कारण त्यांच्या पालकांनी किंवा कुटुंबातल्या इतर सदस्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी त्यांचा पगार वापरला जातो. पगारी किंवा बिनपगारी बाल कामगार, करारावर बांधून घेतलेले बालकामगार, कुटुंबाचा एक भाग म्हणून परंपरागत कौटुबिक व्यवसायात काम करणारे, स्वयंरोजगार मिळवणारी मुले, घरगुती किंवा विविध उद्योगांमध्ये काम करणारी

मुले,स्थलांतर करणारे वा न करणारे बालमजुर अशा विविध प्रकारांमध्ये आणि स्वरूपामध्ये बालकामगार पध्दत सुरू असते.

माहिती गोळा करणाऱ्या विविध स्त्रोतांकडून वेगवेगळया वेळी विविध टप्प्यांमध्ये गोळा केलेल्या माहितीवरुन औपचारीक अर्थव्यवस्थेचा विविध क्षेत्रामध्ये उदाहरणार्थ कृषी, पशुपालन, वनविभाग, उत्पादन, अन्नप्रक्रिया आणि इतर सेवा क्षेत्रामध्ये बाल कामगार पध्दत अस्तित्वात आहे ही बाब ठळकपणे समोर येते. काही व्यवसायांमध्ये कच्चा माल गोळा करण्यापासून तयार उत्पादनापर्यंतच्या सर्व टप्प्यांवर बाल मजुरांचा समावेश होतो. आर्थिक क्षेत्र कोणतेही असो बाल मजुर अत्यंत अनारोग्यकारक परिस्थितीत काम करतात आणि त्यांना विषारी रसायने, कीटकांचे चावे तसेच उंचावरून पडून शारीरिक इजा होणे इत्यादी गोष्टींना तोंड द्यावे लागते. विविध कारखान्यामध्ये काम करणाऱ्या बाल कामगारांना धातु आणि इतर धुलिकरणाच्या वातावरणाला सामोरे जावे लागते ज्यामुळे ते विविध आजारांना बळी पडतात. उदाहरणार्थ काच तयार करण्याच्या कारखाण्यात काम केल्यामुळे सिलिकोसिक, सिमेंट आणि दगडी पाटया बनवण्याच्या उदयोगामध्ये काम केल्यामुळे ऍस्टेस्टॉसिस, रेशीम कापड, कपडे तसेच गालिचे उद्योगांमध्ये कामकरणाऱ्यांच्या श्वसन श्वासनलिकेला दमा हा आजार लागतो. तसेच बिडी वळणाऱ्यांना क्षयरोग, चिंध्या डबे वाटल्या गोळा करणाऱ्यांना धनुर्वात, जरदोसी हथारी, जरी करचोब अशा प्रकारचे भरतकाम करणाऱ्या मुलांना डोळयांचे रोग होतात. त्यापैकी काही आजार असाध्य आहेत. त्यावर काहीही उपचार होत नाहीत.

'क्राय' या सामाजिक संस्थेने भारतातील १५ ते १८ वयोगटातील मुलांबाबत प्रसिद्ध केलेल्या एका अहवालातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अहवालामध्ये देशातील या वयोगटातील मुलांच्या स्थितीवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. या अहवालानुसार भारतातील १५ ते १८ वयोगटातील सुमारे २३ दशलक्ष मुले बालकामगार आहेत. यापैकी १९दशलक्ष मुलांनी शिक्षणही सोडून दिले आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो (एनसीआरबी) च्या आकडेवारीनुसार:

१४ ते १८ वर्षे वयोगटातील १४ आणि १० वर्षाखालील ७ मुले कारखाने आणि मशीन संबंधित अपघातामुळे मरण पावली आहेत.

१४ ते १८ वर्षे वयोगटातील १४ व ११ वर्षाखालील मुलांचे ९ वर्षाखालील मुले खाणी तसेच उत्खनन, बांधकाम या ठिकाणी काम करताना मरण पावले आहेत. (२०१५)

नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरो (एनसीआरबी) अहवालाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार व गृह मंत्रालयाने (एमएचए) संसदेत दिलेल्या माहितीनुसार (LSQ NO३९२८,२०/०३/२०१८) २०१६ या वर्षापर्यंत एक लाखाहून अधिक बालके (खरा आकडा १,११,५६९)हरवली असल्याची नोंद करण्यात आली आहे व वर्षाअखेरीपर्यंत त्यापैकी ५५,६२५ बालकांचा काहीच पत्ता लागलेला नाही. थोडक्यात सांगायचे तर, भारतात २०१६मध्ये दररोज १७४ बालके हरवली आणि त्यापेक्षा चिंतेची बाब म्हणजे, त्यापैकी केवळ निम्मी बालके त्याच कालावधीत परत आली (MHA –२०१६). दहाच्या प्रमाणानुसार विचार केल्यास, २०१६पर्यंत हरवलेल्या प्रत्येका दहामधील पाच बालके अद्यापही बेपत्ता होती.एमएचएने जाहीर केलेल्या आकडेवारीच्या अधिक विश्लेषणातून समोर आले की, देशातील सर्व बेपत्ता बालकांपैकी निम्म्याहून अधिक बालके केवळ पाच राज्यांमधली आहेत, ती राज्ये आहेत – पश्चिम बंगाल, दिल्ली यूपी, मध्य प्रदेश, महाराष्ट्र व बिहार. २०१६मधील, देशातील सर्व बेपत्ता बालकांपैकी तब्बल १५.१३ प्रतिशत प्रमाण नोंदवून पश्चिम बंगाल पहिल्या स्थानावर आहे, तर दिल्ली यूपीमधील प्रमाण त्याच कालावधीत १३.१४प्रतिशत होते. भारतातील बेपत्ता बालकांमधील अनुक्रमे १०.८ प्रतिशत, ८.९ प्रतिशत व ५.२ प्रतिशत बालके अनुक्रमे मध्य प्रदेश, महाराष्ट्र व बिहार या राज्यांतील आहेत.बेपत्ता बालकांचा संघटित गुन्ह्यांशी असलेल्या निकटच्या संबंधाविषयी माहिती देताना, क्राय– चाइल्ड राइट्स अँड यूच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पूजा मरवाहा यांनी सांगितले, बालके बेपत्ता होतात व आपण त्यांना परत आणू शकत नाही, ही बाब अस्वस्थ करणारी आहे. यासंदर्भातील पुरावे व आकडेवारी सांगते की, बेपत्ता असलेल्या अनेक बालकांचे खरे तर ट्रॅफिकिंग झालेले असते, अपहरण किंवा त्यांना पळवून नेलेले असते.

आयएलओचे ध्येय –

आईएलओचे महासंचालक गे रायडर म्हणाले, १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलामुलींना कामाला जुंपणे हे मोठ्यांपेक्षा नक्कीच धोकादायक आहे. ज्या ठिकाणी वयात नसणाऱ्या मुलांना जोरजबरदस्तीने कामाला लावले जाते त्यांच्यावर नक्कीच कठोर कारवाई व्हायला हवी.

आंतरराष्ट्रीय बालकामगार प्रथाविरोधी दिनानिमित्त सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी बालकामगारांची सुरक्षा आणि आरोग्य सुधारण्यासाठी आणि बालमजुरी कायमची नष्ट होण्यासाठी संयुक्त कार्य अभियान सुरु केले आहे. मुलांची सुरक्षा आणि आरोग्यविषयक आंतरराष्ट्रीय बालकामगार प्रथाविरोधी या जागतिक दिवसापासून या अभियानाची सुरुवात करण्यात आलेली आहे.

या मोहिमेचाही उद्देश्य २०३० पर्यंत सर्व बालकामगारांसाठी सुरक्षित वातावरण तयार करणे आहे.या मोहिमे अंतर्गत (एसडीजी) चे लक्ष्य ८.८ टक्के बालकांना सुरक्षित वातावरण द्यायचे आहे. तर एसडीजी २०२५ पर्यंत सर्वप्रकारच्या बाल श्रमांची समाप्ती करण्याचे ध्येय आहे.

## भारतात बालकामगार होण्यामागची कारणे —

अशिक्षितपणा
दारिद्र्य
कर्जबाजारीपणा
व्यसने
कमी पैशात मिळणारी मुलं / मालकाचा स्वार्थ
शैक्षणिक सुविधांचा अभाव
बेकारी
वेतन पद्धती
हुंडा

## भारतात बालकामगारांची भयानक परिस्थिती —

भारतात बालमजुरीच्या विळख्यात अडकलेल्या मुलांची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. अनेक सामाजिक संस्था या मुलांसाठी काम करत असतात तरी देखील आपण पोहचू न शकणाऱ्या समाजाच्या दुसऱ्या बाजूला अनेक बालकांचे बालपण या समस्येत हरवत जात आहे. अनेक ठिकाणी बेकायदेशीर कृत्य करण्यासाठी या मुलांना मादक पदार्थ दिले जातात, जोखमीची कामे दिली जातात अशावेळी मुलांच्या आरोग्यावर कोणीही लक्ष देत नाही आणि याचमुळे मुलांना गंभीर आजार जडतात.

खरं तर सरकार बालमजुरी मिटवण्यासाठी अनेक उपाय योजना करते मात्र या विषयाची खोली पाहता हा प्रश्न समाज आणि सरकार या दोघांच्या समन्वयातून सुटायला हवा. लहान मुले समाजाचा अविभाज्य भाग आहेत. मुले अडचणीत आली तर सारा समाज अडचणीत येईल, अशी धारणा ज्यावेळी होईल, त्याचवेळी या वयोगटातील मुलांच्या समस्या सोडवण्यात आपल्याला यश येईल.

## बालकामगारांविषयी अस्तित्वात असणारे कायदे —

घटनात्मक उपाय योजना: भारतीय घटनेने शोषण विरूद्धचा अधिकार भारतीय नागरिकांना दिला आहे. त्यानुसार १४ वर्षाखालील मुला—मुलींना धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास मनाई करण्यात आली आहे.

## वैधानिक तरतुदी:

१) कंपनी कायदा १९४८ नुसार १४ ते १८ वयोगटातील बालकामगारांना ओळखपत्र देणे आणि प्रत्येक दिवशी १/२ तास काम देणे व रात्री १० ते ६ या वेळेत कामावर बोलवण्यास मनाई करण्यात आली आहे.
२) मळे कामगार कायदा १९५१— च्या कायद्यानुसार १२ वर्षाखालील बालकाला माळ्यास काम देण्यात मनाई करण्यात आली आहे.
३) खान कामगार कायदा —१९५२खाणीत काम करणाऱ्या कामगारांचे किमान वय १५ वर्ष असणे आवश्यक आहे.
बालश्रम प्रतिबंधक आणि नियामक कायदा — १९८६ या कायद्यानुसार वयाच्या १६ वर्षाच्या आतील व्यक्तींना धोकादायक उद्योगात काम करण्यास बंदो घालण्यात आली आहे.

बालकामगार विषयक राष्ट्रीय धोरण –१९८७

तरतुदी :

१. १९४८आणि १९८६ सालच्या कायद्यांची कडक अंमलबजावणी करण्यात यावी.

२. एकात्मिक बालकार्यक्रमात बालकामगारांचा समावेश करण्यात यावा.

३.बालकामगार आणि त्यांच्या पालकांना साक्षर करण्यावर भर देण्यात यावा.

४.बालकामगारांना त्यांच्याव्यवसायाशी निगडीत व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात यावे.

५.या धोरणाची कार्यवाही होण्यासाठी पाठपुरावा करणे.

वय वर्षे १४ खालील मुलांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करणे, हे या अधिनियमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. विशेषत: १४ वर्षाखालील कोणत्याही मुलांना धोकादायक उद्योगांमध्ये व हानिकारक प्रक्रियांमध्ये कामावर ठेवण्यास प्रतिबंध करतो. त्याचप्रमाणे तो, मुलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यास हानिकारक मानले गेलेले १६ व्यवसाय व धोकादायक समजल्या गेलेल्या ६५ प्रक्रियांमध्ये मुलांना कामावर ठेवण्यास मनाई करतो. तसेच ज्या आस्थापनांमध्ये मुलांना कामावर ठेवण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, अशा सर्व कारखान्यांवर हा अधिनियम नियंत्रण ठेवतो. दोषींवर कडक दंडात्मक कारवाई करण्याच्या, किंवा तुरुंगवासाच्या शिक्षा देण्याच्या तरतुदीही त्यामध्ये आहेत. मात्र, या अधिनियमाच्या कक्षेमधून कुटुंबे व प्रशिक्षण संस्थांना वगळण्यात आलेले आहे. नियमभंग करणाऱ्याना ३ महिन्यांपासून ते १ वर्षापर्यंत तुरुंगवास, व त्यासोबत रु १०,०००ते रु २०,००० दंड होऊ शकतो. राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये बालकामगारांच्या पुनर्वसनासाठी राष्ट्रीय बालकामगार योजना राबवण्यात आलेली आहे.

बालग्राम योजना –

बालकामगार संरक्षण विषयक कायदे –

बालश्रम कायदा:१९३३

बाल रोजगार कायदा:१९३८

कंपनी कायदा:१९४८

मुले कामगार कायदा:१९५१

खानकामगार कायदा:१९५२

बालश्रम प्रतिबंधक आणि अधिनियम कायदा:१९८६

बालकामगार कायदा:१९९२

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण:२०००

ज्युव्हेनाईल जस्टिस ऑफ चिल्ड्रेन कायदा:२०००

उज्ज्वल भारताचे महासत्ता बनण्याचे स्वप्न अशा परिस्थितीत अपूर्ण

भारतामध्ये बालमजूर ही अत्यंत गंभीर समस्या बनली आहे. सरकारने या समस्येच्या मुळाशी जाण्याचा कधी ही प्रयत्न केला नाही, जर सरकारने गंभीरपणे या समस्येकडे पहिले असते तर २०१८ च्या ताज्या अहवालानुसार २३ दशलक्ष बालकामगार देशात निर्माण झाले नसते. फक्त कायदा निर्माण करून काही होत नाही तर उत्तम भारत निर्माण करण्याच्या स्वप्नात कायद्याची अंमलबजावणी कशा प्रकारे होतेय याकडे देखील सरकारचे लक्ष असायलाच हवे. मात्र कायदा अस्तित्वात आणून सरकारला आपली जवाबदारी संपली असं वाटतं, यापुढे जाऊन बालमजूर म्हणून जी लोकं कायद्याचे उल्लंघन करतात अशा लोकांना सरकारने कठोर शिक्षा द्यायला हवी. मात्र या बाबतीत सरकारची उदासीनता दिसून येते. बालकामगार होण्याचे मूळ कारण दारिद्रय आहे. त्यामुळे दारिद्रय नष्ट करण्यासाठी सरकारने राजकीय इच्छाशक्ती दाखवते फार गरजेचे आहे. वरील नमूद केले कायदे अस्तित्वात आहेतच मात्र त्याची अंमलबजावणी गावातील तळागाळातील लोकांपासून ते शहरातील लोकांपर्यंत होत आहे कि नाही, याची दखल सरकारने वेळोवेळी घ्यायला हवी.

बालकामगार कायद्यात मे २०१५मध्ये प्रस्तावित दुरुस्तीला हिरवा कंदील दाखवला आहे. मात्र हे काहीसे धक्कादायक आहे. बाल कामगारांसंबंधीची नियमावली शीर्षकातील बालकामगार कायद्यासोबतच १९४८चा कारखान्यांसाठीचा कायदा, १९५२चा खाणींसंबंधीचा कायदा तसेच २००० सालचा ज्युव्हेनाईल जस्टिस ऑफ चिल्ड्रेन कायदा व २००९ सालच्या मुलांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाबद्दलच्या हक्काबद्दलच्या कायद्यांत कमी–अधिक प्रमाणात अंतर्भूत केली गेलेली आहे.

या सर्व बालकामगारांच्या हिताशी संबंधित कायद्यांतील कालानुरूप होत जाणाऱ्या सुधारणांच्या आधारे १९८६ सालच्या बालकामगार बंदी कायद्याने १४ वर्षाखालील बालकामगारांना १८ घातक उद्योगांत गुंतवण्याला बंदी घातली होती. (इथे मुद्दाम नमूद करावेसे वाटते की ही यादी सुरुवातीला १४ व्यवसायांपुरतीच मर्यादित होती!) पण, वर उल्लेखलेल्या स्वीकृत प्रस्तावानुसार हीच यादी आता चारवर आणून १८ व्यवसायांना सवलत दिली गेलेली आहे.

सवलतीच्या १४ व्यवसायांत कार्यरत असणाऱ्या बालकामगारांच्या कुटुंबांना फक्त तो व्यवसाय वारसा हक्काने त्यांच्याकडे आल्याचे सिद्ध करावे लागणार आहे. इथे कायद्यातील पळवाटा शोधण्यात पारंगत असलेली आपली मानसिकता लक्षात घेता या दुरुस्तीबद्दल एकच प्रश्न सतावतो, 'नक्की कोण कोणाला मूर्ख बनवतंय?'

या प्रथेवर अंकुश ठेवण्यासाठी २०१२ साली जाहीर केलेली बालकामगारांवरील बंदी किंवा १२ जूनला पाळण्यात येणारा बालकामगारविरोधी दिवस असे पुढाकार आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेले आहेत. पण अशा पुढाकारांना यश प्राप्त करून देण्यासाठी शाळांना अशा मुलांपर्यंत न्यायला हवे. त्याचबरोबर मुलांना आकर्षित करण्यासाठी कल्पक योजना अमलात आणाव्या लागतील. आता, ट्रॅफिकिंग ऑफ पर्सन्स (प्रिव्हेन्शन, प्रोटेक्शन अँड रीहॅबिलिटेशन) विधेयक, २०१८ आता प्रगतीपथावर असल्याने, तसेच ट्रॅकचाइल्ड, ऑपरेशन स्माइल व मुस्कान असे सरकारी उपक्रम बेपत्ता मुलांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत असल्याने, ही समस्या तातडीने व चांगल्या पद्धतीने सोडवण्यासाठी देशात ठोस पावले उचलली जातील, याची अपेक्षा करायला हरकत नाही.

## निष्कर्ष –

१९४८ मध्ये भारताचं भविष्य किती अनिश्चित होतं, हे तो काळ पाहिलेले लोक जाणतात. तेव्हा सगळीकडे एकच एक प्रश्न विचारला जात होता, भारत टिकेल काय?' पण आज साठ वर्षांनंतर या भीतिदायक प्रश्नाची जागा खूप मोठ्या आश्वासक प्रश्नाने घेतली आहे– भारत महासत्ता बनेल काय?' तत्कालीन सरकार २०२० साली भारताला महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहत आहे अशा वेळी हे स्वप्न पूर्ण करणारे आजचे कोवळे हात उद्याचे सुजाण नागरिक असणार आहे, जर तुमच्या समोर ते बालमजुरीच्या जाळ्यात अडकले असतील तर त्यांना तेथून काढण्यासाठी आपण मिळून प्रयत्न करायला हवा. प्रत्येक ठिकाणी पोलीस पोहचू शकत नाही, सरकारी प्रयत्नांतून व कायदे करून हा गंभीर प्रश्न सुटणारा नाही, अशावेळी खऱ्या अर्थाने 'निर्मितीक्षम' तरुणांची पिढी घडवण्याचे कार्य आपण करू शकलो तर महासत्तेचे स्वप्न पाहणारा भारत उद्या जगातील सर्वात तरूण देश असेलच यात काहीच शंका नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) सुधारणा विधेयक २०१२ मध्ये सुधारणा करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे.

बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) सुधारणा विधेयक २०१२ तील सुधारणांमुळे बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) सुधारणा विधेयक १९८६ च्या कायद्यात बरेच बदल होतील.

१. सर्व प्रकारच्या श्रमांमध्ये १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलामुलींना कामावर ठेवण्यास प्रतिबंध असेल. हे वय मुक्त व अनिवार्य शिक्षण कायदा, २००९ शी जोडण्यात आले आहे. परंतु यास एक अपवाद आहे:

अ. जर मुल कुटुंबात किंवा कौटुंबिक व्यवसायात काम करत असेल व जे काम करण्यात कोणताही धोका नाहीय तसेच शाळेव्यतिरिक्त वेळात व सुट्ट्यांमध्ये काम करत असेल.

ब. जाहिरात, चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका यांसारख्या मनोरंजन क्षेत्रात किंवा सर्कस सोडून इतर क्रीडा क्षेत्रात मुल काम करत असेल (यामध्ये देखील अटी व सुरक्षा नियम समाविष्ट आहेत) तर अशा कामांमुळे मुलांचे शालेय शिक्षण प्रभावित होऊ नये.

मंत्रिमंडळाने १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना कामावर ठेवण्यास प्रतिबंध करण्यासंबंधी प्रस्तावास मान्यता दिली आहे. अर्थात हे पाऊल उचलताना देशातील सामाजिक–आर्थिक परिस्थिती लक्षात घ्यावी लागेल. देशात मोठ्या प्रमाणावर कुटुंबांमध्ये मुले शेती कामात अथवा कारागिरीत आपल्या आई–वडिलांना मदत करतात. हे करत असताना ते कामात पारंगत होत जातात. त्यामुळे मुलांचे शिक्षण व देशाची सामाजिक–आर्थिक परिस्थिती यांमध्ये संतुलन राखणे गरजेचे आहे. याच कारणाने मंत्रिमंडळाने बालकामगार विधेयकात सुधारणा करण्यास मान्यता देताना कुटुंबास हातभार लावण्याचीही परवानगी दिली आहे. परंतु हे कौटुंबिक व्यवसाय धोकादायक असू नयेत. मुले ही कामे शाळेतून परत आल्यानंतर व सुट्ट्यांमध्ये करू शकतात. मुले जाहिरात,

चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका यांसारख्या मनोरंजन कार्यक्रमात किंवा सर्कस सोडून कोणत्याही खेळात काम करू शकतात. अर्थात यामध्येही काही अटी व सुरक्षेचे मुद्दे समाविष्ट होऊ शकतात. ही कामे मुलांचे शालेय शिक्षण प्रभावित करणारी नसावीत.

२. बाल कामगार (प्रतिबंध व नियमन) कायद्या अंतर्गत कुमारवयीन (१४ते १८ वर्ष वय) मुलामुलींच्या कामाची नवी व्याख्या ठरवण्यात आली आहे. यामध्ये धोकादायक कामांमधील मुलांचा सहभाग प्रतिबंधित करण्यात आला आहे.

३. कायद्याचे उल्लंघन होऊ नये यासाठी नव्या सुधारणांमध्ये असे काम करून घेणाऱ्यांविरुद्ध कडक दंडात्मक कारवाईचा प्रस्ताव आहे.

अ. पहिल्यांदा कायद्याचे उल्लंघन करून अपराध केल्यास कमीतकमी सहा महिन्याची कैद होईल. हा कालावधी २ वर्षांपर्यंत वाढू शकतो. दंडाची रक्कम २० हजार ते ५० हजार रु आहे. याशिवाय दंड व कैद एकत्र होऊ शकते. यापूर्वी कैदेची कालावधी ३ महिने व दंड १० हजार ते २० हजार रु होता.

ब. दुसऱ्यांदा गुन्हा केल्यास किमान एक वर्षांची तर कमाल तीन वर्षांची कैद होऊ शकते. यापूर्वी हा कालावधी ६ महिने ते १० वर्ष इतका होता.

४. कायद्याचे उल्लंघन करून लहान मुले किंवा किशोरवयीन यांना कामावर ठेवणे, हा दखलपात्र गुन्हा बनविण्यात आला आहे.

५. आई–वडील/पालक यांसाठी शिक्षा:

या कायद्यामध्ये आई–वडिलांसाठी देखील हीच शिक्षा आहे. मात्र आई–वडील/पालक यांची सामाजिक–आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन पहिल्यांदा हा अपराध केल्यास कोणतीही शिक्षा होणार नाही. दुसऱ्यांदा व त्यानंतर अपराध केल्यास १० हजार रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो.

६. एक किंवा अधिक जिल्ह्यात बाल व किशोर श्रम पुनर्वसन निधी उभारला जाईल. या निधीतून श्रमातून मुक्त केलेल्या मुलांचे पुनर्वसन होईल. अशा पदधतीने पुनर्वसन कार्यक्रम घेण्यासाठी या कायद्यातच निधीची तरतूद करण्यात आली आहे.

## संदर्भ ग्रंथ –

१. मासिक पत्रिका योजना –एप्रिल२०१७
२. www.mahanews.gov.in/home
३. mh.vikaspedia.in/social

❖❖❖

# दलित नियतकालिकांचे दलितांच्या जीवनातील योगदान

## (१९०८ ते १९५६ मधील नियतकालिके)

डॉ. संतोष विष्णू चतुर
मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ, महाराष्ट्र (India)
santoshchatur78@gmail.com भ्रमणध्वनी ९४२२८१६२२६

## सारांश :—

शिक्षणाचा प्रसार, वाचन—लेखनाची आवड, दळणवळणाची साधने, प्रवासाची व बातम्या मिळण्याची सोय, छापखाने, अल्पमोलाने व श्रमाने लेखनप्रसाराचे साधन ह्या सर्वांमुळे नियतकालिकांच्या उदयाला व प्रसाराला उत्तेजन मिळाले. समाजात वैचारिक जागृती घडवून आणण्याच्या प्रमुख प्रेरणेतून नियतकालिके उदयास येत असतात. त्यामुळे समाजात ते अंत:प्रवाह वाहात असतात. त्यांचे नियतकालिके ही वैचारिक अग्रदूत असतात. नियतकालिकांच्या या प्रभावी सामर्थ्याचा उपयोग दलितांच्या जीवनात कितपत झाला हे अभ्यासणे अगत्याचे ठरते. हिंदू धर्मातील चातुवर्ण्य, जातिव्यवस्था, दुष्ट रूढी आणि अनिष्ट चालीरीती यांनी दलितांना शतकानुशतके शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक गुलामगिरीत जखडून ठेवले होते. या गुलामगिरीत ते मूकपणे अपमान, अवहेलना, दास्य यांनी ग्रासलेले जीवन जगत होते. त्यांच्या व्यथा समाजाच्या वेशीवर टांगण्याचे आणि त्यांना त्यांच्या हक्कासाठी, उन्नतीसाठी जागृत करण्याचे कार्य या दलित नियतकालिकांनी हाती घेतले. उपेक्षा आणि तिरस्कार मी सहन करणार नाही. याची जाणीव दलितांना सर्वप्रथम कुणी करून दिली असेल तर ती या नियताकालिकांनी. दलित नियतकालिकांमधून प्रकाशित होणारे लेख, कथा, कविता इत्यादींद्वारे दलित जीवनाचे दु:ख, दुबळेपणा, अन्याय, गुलामगिरी, अस्पृश्यता याविरुद्ध मानवी मन जागृतीचे कार्य झाले. ही नियतकालिके म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे प्रतिध्वनी होत. एकूणच दारिद्र्य, उपासमार आणि अस्पृश्यता यांनी गांजलेल्या दलितांच्या मनात नव विचारांची जाणीव निर्माण करून वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे मोलाचे कार्य दलित नियतकालिकांनी केल.

## प्रस्तावना :—

नियतकालिकांची प्रथा भारतीयांनी इंग्रजापासून उचलली. ‘‘इंग्रजपूर्व काळात अभवानेच जाणवणाऱ्या मराठी गद्याचे इंग्रजी आमदानीत नियतकालिकांनीच उत्तम प्रकारे पोषण केलेले आहे. इंग्रजी वाङ्.मय परिचयानंतर आधुनिक मराठीत रूढ झालेले निबंध, लघुकथा, कादंबरी, कविता इत्यादी वाङ्.मयप्रकार प्रथम मराठी नियतकालिकांतच प्रसिद्ध होऊन मान्यता पावलेले आहेत.’’[१] या प्रथेला आवश्यक अशी परिस्थिती यापूर्वी निर्माण झालीच नव्हती. शिक्षणाचा प्रसार, वाचन—लेखनाची आवड, दळणवळणाची साधने, प्रवासाची व बातम्या मिळण्याची सोय, छापखाने, अल्पमोलाने व श्रमाने लेखनप्रसाराचे साधन ह्या सर्वांमुळे नियतकालिकांच्या उदयाला व प्रसाराला उत्तेजन मिळाले. लोकशिक्षण देणे, ज्ञानप्रसार करणे, भौगोलिक शास्त्रांचा जनसामान्यांना परिचय करून देणे. म्हणजेच मनोरंजनापेक्षाही उद्‌बोधनाचेच उद्दिष्ट या नियतकालिकांमध्ये होते आणि यातूनच होणाऱ्या विचार जागृतीमुळे प्रबोधनाच्या प्रक्रियेला गती मिळत होती. ही वस्तुस्थिती महत्त्वाची आहे. विचारांचा परिणाम मनावर होतो. समाजात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर मानवी मनात विचारांची बीजे रुजवावी लागतात. दलित नियतकालिके दलितांच्या मनात वैचारिक जागृती घडविण्यात कितपत यशस्वी ठरली याचा शोध घेणे प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.

बीजशब्द :— नियतकालिक, वैचारिक जागृती, मासिक, साप्ताहिक

## ‘नियतकालिक’ शब्दाचा अर्थ :—

‘नियतकालिक’ शब्दाचा अर्थ स्पष्ट करतांना श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ‘‘जे प्रकाशन एकाच शीर्षकाखाली किमान एक आठवड्याच्या किंवा त्याहून अधिक कालावधीने सामान्यत: नियमितपणे प्रसिद्ध होते आणि ज्यात अनेक लेखकांचे विविध विषयांवरचे (किंवा प्रकाशन विशिष्ट विषयाला वाहिलेले असल्यास त्या एकाच विषयावरचे) साहित्य संकलित केलेले असते ते ‘नियतकालिक’, अशी सर्वसाधारणपणे नियतकालिकाची

व्याखा करता येईल.''[२] डॉ. प्र. न. जोशी यांच्या मते, ''ठराविक काळानंतर म्हणजे सात दिवसांनी, पंधरा दिवसांनी, एक महिन्यानंतर, तीन महिन्यानंतर वा दररोज प्रसिद्ध होणाऱ्या मुद्रित लेखनास साधारणपणे 'नियतकालिक' म्हणतात.''[३] एकूणच एकाच शीर्षकाखाली नियमित किंवा ठराविक काळानंतर एकाच विषयावर किंवा विविध विषयावर साहित्य संकलित करून मुद्रित स्वरूपात प्रकाशित होणारे ते 'नियतकालिक'. असा नियतकालिक शब्दाचा अर्थ दिसून येतो.

दलित नियतकालिकांचे दलितांच्या जीवनातील योगदान :—

उद्‌बोधनाद्वारे समाजात वैचारिक जागृती घडवून आणण्याच्या प्रमुख प्रेरणेतून नियतकालिके उदयास येत असतात. त्यामुळे समाजात ते अंत:प्रवाह वाहात असतात. त्यांचे नियतकालिके ही वैचारिक अग्रदूत असतात. स्वाभाविकच, समाजातील असत्य समजुतींच्या अंध:काराचा नायनाट करून तेथे सम्यक विचारांचा प्रकाशझोत टाकणे हा नियतकालिकांचा परमधर्म बनतो. नियतकालिकांच्या या प्रभावी सामर्थ्याचा उपयोग दलितांच्या जीवनात कितपत झाला हे अभ्यासणे अगत्याचे ठरते.

मराठी भाषेतील पहिले नियतकालिक 'दर्पण' १८३२ साली सुरू झाले असले तरी, दलितांच्या सामाजिक जीवनाचे पुनरुत्थान घडवून आणण्याच्या भूमिकेतून दलितांचे पहिले नियतकालिक उदयास यावयाला १९०८ साल उजाडावे लागले. शिवराम जानबा कांबळे यांनी १ जुलै १९०८ राजी 'सोमवंशीय मित्र' या मासिकाची पुण्यात स्थापना करून सतत दोन वर्षे स्वसमाजात आत्मविश्वास व स्वाभिमान जागृतीचे कार्य केले. दुसरा प्रयत्न किसन फागू बनसोडे यांनी 'निराश्रित हिंद नागरिक' या साप्ताहिकाची नागपूरला स्थापना करून समाज बांधवांना आश्रय मिळविण्यासाठी आपली लेखणी यथाशक्ती झिजवली. १९ व्या शतकात सुरुवातीवासूनच सामाजिक व राजकीय घडामोडीला अनेक आंदोलने व चळवळींच्या माध्यमातून अधिक चालना मिळाली. या आंदोलन व चळवळींकरिता मानवी मन तयार करून समाजाला जागृत करण्याचे मोलाचे कार्य नियतकालिकांनी केले आहे. डॉ. अ.ना. देशपांडे यांच्या मते, ''राजकीय, सामाजिक आणि धार्मिक सुधारणांना अनुकूल—प्रतिकूल अशी अनेक आंदोनले महाराष्ट्रात झाली. ही आंदलने यशस्वी करण्याकरिता आवश्यक असलेली लोकजागृती मुख्यत: नियतकालिकांनीच मोठ्या प्रमाणावर घडवून आणली.''[४] याच कालावधीत दलितांची अनेक नियतकालिके उदयास आली.

डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वामुळे दलित चळवळींना १९२० पासून जोर चढला आणि आत्मोद्धाराचा मार्ग दाखविण्यासाठी दलितांच्या नियतकालिकांच्या संख्येमध्ये भर पडत गेली. हिंदू धर्मातील चातुवर्ण्य, जातिव्यवस्था, दुष्ट रूढी आणि अनिष्ट चालीरीती यांनी दलितांना शतकानुशतके शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक गुलामगिरीत जखडून ठेवले होते. या गुलामगिरीत ते मूकपणे अपमान, अवहेलना, दास्य यांनी ग्रासलेले जीवन जगत होते. त्यांच्या व्यथा समाजाच्या वेशीवर टांगण्याचे आणि त्यांना त्यांच्या हक्कासाठी, उन्नतीसाठी जागृत करण्याचे कार्य या नियतकालिकांनी हाती घेतले. दलितांच्या समस्यांची विविध अंगे, अन्यायावरील उपाययोजना आणि उन्नतीविषयक अनुकूल—प्रतिकूल मतांची चर्चा त्यांच्या रकान्यातून झाली. महाराष्ट्रभर चाललेल्या दलितांच्या चळवळींचे साद—प्रतिसाद त्यातून उमटले.

मुंबई येथे स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' सुरू केले. वर्षानुवर्षे गुलामगिरी सहन करणाऱ्या समाजाचे नेतृत्व या पाक्षिकाने मोठ्या निर्धाराने स्वीकारले. याच वर्षी म. अ. गवई यांनी अमरावतीला 'बहिष्कृत भारत' हे मासिक सुरू केले. १९२४ साली तीन नियतकालिके उदयास आली. शिवराम जानबांनी 'आदि हिंदू' हे साप्ताहिक सुरू करून परत एकदा दलित जागृतीचा प्रयत्न केला. मुंबईला म. अ. कांबळे आणि दा. ना. पटवर्धन यांनी अनुक्रमे 'आत्मोद्धार (मासिक)' व 'अस्पृश्यतानिवारण' (साप्ताहिक) सुरू केले.

'मूकनायक'चा अस्त झाल्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी स्वत: संपादकीय सुत्रे हाती घेऊन ३ एप्रिल १९२७ रोजी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक नव्या उमेदीने सुरू केले. त्यांच्याच नेतृत्वाखाली १९२८ साली 'समता' पाक्षिक सुरू झाले. त्याचे संपादकत्व देवराव नाईक या पूर्वानुभवी संपादकाकडे देण्यात आले. मुंबईहून प्रकाशित होणारी ही नियतकालिके जिद्दीने कार्यरत राहिली. परंतु 'समता'ला एक वर्ष व 'बहिष्कृत भारत'ला तीन वर्षाहून अधिक आयुष्य लाभले नाही. दरम्यान पुण्याला पां. ना. राजभोज यांनी 'दलितबंधू'ची स्थापना केली. वीस वर्षाचे आयुष्य लाभलेल्या या साप्ताहिकाने आंबेडकरांची विचारप्रणाली दलितांच्या मनात सतत तेवत ठेवली. दलितांची आत्यंतिक गरज लक्षात घेऊन आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली 'जनता' हे साप्ताहिक २४ नोव्हेंबर १९३० रोजी सुरू झाले. त्यांच्या संपादकत्वाची धुरा सर्वश्री देवराव नाईक, भा. र. कद्रेकर, गं. नी. सहस्त्रबुद्धे, बी. सी. कांबळे,

यशवंतराव आंबेडकर, सवदकर प्रभूतींनी निष्ठेने सांभाळली. सव्वीस वर्षाचे आयुष्य लाभलेल्या 'जनता'ने दलितांना मानवी मूल्यांची शिकवण दिली.

२ ऑगष्ट १९३० रोजी पतितपावनदासांनी 'पतितपावन' सुरू केले, तर १९३१ मध्ये बनसोड यांनी 'चोखामेळा' हे दुसरे साप्ताहिक सुरू केले. १ जून १९४१ रोजी धुळ्याला काकासाहेब बरवे यांनी 'दलित सेवक' हे मासिक सुरू केले. ते महात्मा गांधींच्या विचारप्रणालीचा ठसा समाजावर वीस वर्षे उमटवीत राहिले. १९४७ मध्ये मा. ई. कुरणे यांनी कोल्हापूरला 'दलित निनाद', ना. खं. तिरपुडे यांनी नागपूरला 'अरूण', दि. मा. खैरकर यांनी जळगावला 'सिद्धार्थ' तर ध. रा. बिऱ्हाडे यांनी 'दलित भारत' या साप्ताहिकांची स्थापना केली. १९४८ मध्ये पुण्यात द. सा. गायकवाड यांनी 'सिद्धार्थ', बडनेरा येथे सुरेश संसारे यांनी 'जयभिम', तर १९५० मध्ये मुंबईला आर. डी. भंडारे यांनी 'निर्धार' सुरू केले. या साऱ्याच साप्ताहिकांनी दलितांमध्ये वैचारिक जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु एक–दोन वर्षापेक्षा अधिक ती जगू शकली नाहीत. दलितांच्या सामाजिक समस्यांचा विचार करणारी अनेक नियतकाजिके १९५० नंतरही उदयास आली. मुंबईला नामदेव व्हटकर यांचे 'नजर' १९५१ साली सुरू झाले. वर्ध्याला १९५३–५४ साली अनुक्रमे भा. शी. बाभळे यांचे 'सिद्धार्थ' आणि धर्मदास मेश्राम यांचे 'जागृती' उदयास आले. १९५५ साली मुंबईला आसूळ व रणविसे यांचे 'भीमगर्जना' सुरू झाले आणि भैय्यासाहेब आंबेडकरांनी बाबासाहेबांच्या 'जनता'चे 'प्रबुद्ध भारत' असे नामकरण केले. नागपूरला सिद्धार्थकुमार यांचे 'धर्मदीप', र. म. मेश्राम यांचे 'बोधिसत्व' आणि स. म. मेश्राम यांचे 'बौद्धभारत' ही नियताकलिके १९५६ मध्ये सुरू झाली.

या नियताकलिकांचे संपादन दलितांना वैचारिक जागृती घडविण्याच्या प्रमुख उद्देशाने झाल्याने, त्यातून प्रकाशित झालेले वाङ्.मय वैचारिकच असणे स्वाभाविकच आहे. लेख, स्फुटलेख, पत्रव्यवहार असे हे वैचारिक लेखन असे लेखनाचे स्वरूप बव्हंशी निबंध वाङ्.मयाचे आहे. या नियतकालिकांच्या लेखनाधारे पहिल्या निबंधकाराचा मान शिवराम जानबा कांबळे यांच्याकडे जातो. पण विद्रोही निबंधकाराच्या लेखनातील आग, आक्रमकता, बंडखोरी, आवेश आणि त्वेष शिवरामांच्या लेखनात नसावा. या दृष्टीने विद्रोही लेखनाचा प्रणेता, समर्थ चिकित्सक आणि खंदा निबंधकार म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. त्यांचे निबंध सामाजिक अनुभवाच्या दाहकतेतून साकारलेले आहेत. लोकहितवादी, आगरकर यांच्या लेखनाशी बरोबरी करणारे, किंबहुना स्पष्टता आणि परखडतेच्या दृष्टीने अधिक सरस आहेत असे दिसून येते. मराठी निबंध वाङ्.मयात अत्यंत मोलाची भर घालणाऱ्यांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र बाण्याचे आणि व्यक्तिमत्वाचे यशस्वी निबंधकार होत. याची प्रचीती त्यांच्या 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' व 'जनता' मधून लिहिलेल्या सुमारे १७५ निबंधांवरून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या लेखनाचा परिणाम देवराव नाईक, कद्रेकर, राजभोज, माधव कुरणे, तिरपुडे, बी.सी. कांबळे आदि संपादक निबंधकारांवरही झालेला दिसतो. या निबंधकारांचेही अंत:करण अस्पृश्यतेच्या वेदनांनी पिळवटून निघालेले होते. त्यामुळे त्यांच्या लेखनालाही एक प्रकारचा जळजळीतपणा आपोआपच प्राप्त झाला. बहुतेकांच्या लेखनात आक्रमकपणा होता. अन्याय, गुलामगिरी, अस्पृश्यता यांविरुद्ध ते नेहमीच आग ओकीत असत. आवेश आणि त्वेष यांनी परिपूर्ण असलेल्या निबंधांचे एक आगळे रूप येथे पाहावयास मिळते. अन्यायाबद्दलची चीड व सामाजिक हक्काबाबतची पोटतिडीक हा त्यांचा मूलाधार आहे. यांपैकी सवर्णांच्या मनात दलितांविषयी सहानुभूती निर्माण करण्याच्या उद्देशाने लिहिलेले काकासाहेब बरवे यांचे सुमारे दीडशे निबंध त्यांना दलितांविषयी वाटणाऱ्या आत्मियतेची व कणवेची साक्ष देतात.

दलितांच्या जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण करणाऱ्या अनेक नवोदितांच्या असंख्य कथा ह्या नियतकालिकांनी प्रसिद्ध केल्या. अस्पृश्यतेचे दाहक चटके आणि वतनदारी यामुळे वाट्याला येणाऱ्या अनैच्छिक पण अटळ मरणाला सामोऱ्या जाणाऱ्या अनेक नायकांपासून, स्वाभिमान जागृतीनंतर सत्याग्रहाचे रणशिंग फुंकणाऱ्या आणि शेवटी हवालदिलपणे माणुसकीसाठी धर्मांतर करणाऱ्या विविध नायक नायिकेंचे चित्रण या कथांमधून आले आहे. या दृष्टीने पहिली विद्रोही कथाकार म्हणून शरश्चंद्र पवार यांचा उल्लेख करावयास हवा. दलित स्त्रियांच्या जीवनातील व्यथा–वेदना आणि कारुण्य सांगणाऱ्या कथाही या नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाल्या. विशेष म्हणजे यातील स्वानुभवांचे चित्रण अनेक स्त्रियांनी केले आणि ताराबाई शेंडे, शारदाबाई चव्हाण यांनी पहिल्या पिढीतील दलित कथालेखिका म्हणून प्रसिद्धी मिळविली. दलितांचे सामूहिक दु:ख, त्यांचा दुबळेपणा, कायद्याचे संरक्षण मिळूनही त्यांचा होणारा कोंडमारा आणि त्यांच्याकडे पाहण्याची सवर्णांची पूर्वग्रह–दुषित दृष्टी या सर्वांचेच चित्रण या नियतकालिकातील कथाकार अत्यंत समर्थपणे करतात. त्यामध्ये प्रामुख्याने माधवराव बागल, दौलत जाधव, के. अ. घेगडे, गोविंद रामटेके, रामचंद्र बनसोडे, बळवंत सावंत

आदींचा उल्लेख करता येईल. या सर्वांच्या कथा दीर्घ स्वरूपाच्या असल्या तरी, त्यामधील दाहक अनुभूती मन पिळवटून काढते.

दलित नियतकालिकांमधील कवितेचे स्वरूप वैविध्यपूर्ण आहे. दलित जीवनाचे वास्तव दर्शन घडविणाऱ्या, सनातन्यांचा ढोंगीपणा, हिंदू धर्मातील अनिष्ट चाजीरीतींचा समाचार घेऊन त्यावर सडेतोड अभिप्राय नोंदविणाऱ्या, सत्याग्रहाचा इशारा देणाऱ्या आणि निर्भय धडाडी, स्वाभिमानी सत्याग्रहींचे अभिनंदन करणाऱ्या, सवर्णांच्या दास्यातून मुक्त होण्यासाठी धर्मांतराचा संदेश देणाऱ्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड आदि दलितोद्धारकांचे कौतुक व गुणगौरव करणाऱ्या अशा अनेकविध विषयांवर या कविता आधारित आहेत. त्यांचे विषय वेगळे असले तरी त्यांमधील आशय एकच आहे. या कवितांमध्ये एका व्यक्तीच्या दु:खापेक्षा दलितांचे सामूहिक दु:ख आहे. ते या कवितेला चव्हाट्यावर मांडावयाचे आहे. या कविता लिहिणारे बळवंत वैराळे, बाळानंद विटेकर, चिंतामण साळवे, चांगदेव माहिमे, गुंडो कांबळे, भामगरे, शांताकांत, राजा पैठणरकर आदि कवी निर्भय आणि निधडे आहेत.

## निष्कर्ष :—

दलित नियतकालिकांची महत्त्वाची फलनिष्पत्ती म्हणचे दलितांना मानवी धर्माची मूल्ये गवसली. मी गुलाम नाही, अस्पृश्य नाही, तर स्पृश्य माणसांसारखा मीही एक माणूस आहे, मलाही मन आहे, भावभावना आहेत, माझ्याही मनात काही सलते आहे, ते मी व्यक्त केलेच पाहिजे. आता उपेक्षा आणि तिरस्कार मी सहन करणार नाही. याची जाणीव दलितांना सर्वप्रथम कुणी करून दिली असेल तर ती या नियताकलिकांनी. दलित नियतकालिकांमधून प्रकाशित होणारे लेख, कथा, कविता इत्यादींद्वारे दलित जीवनाचे दु:ख, दुबळेपणा, अन्याय, गुलामगिरी, अस्पृश्यता याविरुद्ध मानवी मन जागृतीचे कार्य झाले. ही नियतकालिके म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे प्रतिध्वनी होत. एकूणच दारिद्र्य, उपासमार आणि अस्पृश्यता यांनी गांजलेल्या दलितांच्या मनात नव विचारांची जाणीव निर्माण करून दलितांच्या जीवनात वैचारिक क्रांती घडवून आणण्याचे मोलाचे कार्य दलित नियतकालिकांनी केल.

## संदर्भ :—

१) डॉ. अ. ना. देशपांडे, 'आधुनिक मराठी वाङ्.याचा इतिहास भाग पहिला', व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी
ऑक्टोबर १९९२, पृ. ५८.
२) संपादक श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, 'मराठी विश्वकोश खंड ८', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७९, पृ. ६४७.
३) डॉ. प्र. न. जोशी 'मराठी वाङ्.याचा विवेचक इतिहास — अर्वाचीन काळ', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २४ एप्रिल २००९, पृ. ४३.
४) डॉ. अ. ना. देशपांडे, 'आधुनिक मराठी वाङ्.याचा इतिहास भाग पहिला', तत्रैव, पृ. ५८.

❖❖❖

Research Journal of India / Vol. 6 / Issue 1 / Oct. 2019 / ISSN 2349-9370 /
Peer Reviewed International Indexed Journal with Impact Factor 5.455 (SJIF) / 120

# महानुभावीय श्रीकृष्णचरित्र

डॉ. गोपाल ढोले
कला व वाणिज्य महाविद्यालय, जरूड
ता. वरूड, जि. अमरावती, महाराष्ट्र (India)
भ्रमणध्वनी ९५६१४८५८१४

## प्रस्तावना :

पंचकृष्णातील पहिला अवतार श्रीकृष्ण चक्रवर्ती श्रीचक्रधरांनी श्रीकृष्णाच्या ४७ लीळा सांगितलेल्या असून त्या म्हाइंभटांनी संकलीत केलेल्या आहेत. या ४७ लीळा हस्तलिखित स्वरूपात प्रा. सुरेश डोळके यांच्याकडे होत्या. याच ४७ लीळांचे विस्तारलेले रूप ज्यामध्ये आहे अशी श्रीकृष्णचरित्राची एक पोथी ऋद्धिपूर येथे महंत गोपीराज महानुभाव यांना उपलब्ध झाली आहे. आणि ती 'श्रीचक्रधर निरूपित श्रीकृष्ण चरित्र' या नावाने मुंबईच्या मराठी संशोधन मंडळाने प्रसिद्ध केली आहे.[१] श्रीकृष्णचरित्राचे तीन भिन्न पाठ आहेत. त्यापैकी १. पिढी पाठ २. तळेगावकर ३. वाइंदेशकर पाठ. पैकी पहिले दोन अपूर्ण असून तिसरा पूर्ण आहे. तसेच पिढीपाठ आकाराने सर्वात लहान असून त्यात सुमारे ४८ लीळा आहेत. त्या मानाने इतर पाठ विस्तृत असून त्यापैकी तळेगावकर पाठात ८२, तर वाइंदेशकर पाठात १०९ लीळा आहेत. वाइंदेशकरांचे लिहिणेही थोडे ऐसपैस असते. उदा. 'सूत्रपाठाची' मुळातील सुमारे साडेबाराशे वचने त्यांनी पाच हजारापर्यंत वाढविली आहेत. या तीन पाठापैकी पहिला जो पिढी–पाठ त्याचा लेखक म्हाइंभट असण्याची शक्यता पुष्कळ आहे. डॉ. पारखे यांच्या मते तळेगावकर–पाठाचा, म्हणजे मोठया 'श्रीकृष्णचरित्रा'चा लेखक दत्ताबोस तळेगावकर असून त्याचा रचनाकाळ ते शके १२३१ च्या पूर्वीचा मानतात.[२] त्यांचे हे म्हणणे म. आराध्य मुरलीधरशास्त्री[३] यांनी सप्रमाण खोडून काढले असून त्यांच्या मते 'श्रीकृष्णचरित्राचा' मूळ लेखक म्हाइंभटच आहे. इतकेच की त्याचा समावेश 'लीळाचरित्रात' झालेला असल्यामुळे ते म्हाइंभटाच्या नावावर स्वतंत्रपणे उल्लेखिले जात नाही. पण ते त्यानेच लिहिलेले आहे याला 'इतिहास प्रकरण' व 'चरित्रआबाब' यातून दुजोरा मिळतो.

## विषय विवेचन :

'श्रीकृष्णचरित्रा'च्या वर उल्लेखिलेल्या तिन्ही पाठांची तौलनिक पाहणी करून म. मुरलीधरशास्त्री यांनी त्याच्या पिढीपाठाचे कर्तृत्व म्हाइंभटाकडे दिले आहे. या वादाचे मूळ वरील तीन भिन्न पाठात आहे. पिढीपाठ मूळचा व इतर दोन पाठ मागावहून त्यात भर घालून निर्माण झालेले ही भूमिका एकदा मान्य केली की मग डॉ. पारखे व म. मुरलीधरशास्त्री या दोघांच्याही म्हणण्यातील तथ्य दिसू लागते ते असे की मूळ लेखक म्हाइंभट व तळेगावकर आणि वाइंदेशकर हे त्याचे वृद्धिकार किंवा वाढवणारे आहेत. या संबंधात डॉ. कोलते[४] म्हणतात की ''श्रीकृष्ण व दत्तात्रेय यांच्या अनुक्रमे ४६ व ४७ लीळा स्वतंत्रपणे लिहिलेल्या असून त्यांनाच श्रीकृष्णचरित्र व श्रीदत्तात्रेयचरित्र अशी नावे आहेत. चक्रधरांनी ज्या शब्दात या लीळा भक्तांना सांगितल्या त्याच शब्दात नागदेवांनी त्या म्हाइंभटाला सांगितल्या व त्याने त्या लिहून घेतल्या......'' 'लीळाचरित्र' आणि 'श्रीऋद्धिपुरचरित्र' याबरोबर प्रारंभीच्या काळात श्रीकृष्णचरित्राचीही रचना झाली होती असे दायंबासाच्या 'अन्वयस्थळा'मधील पुढील उतारा सांगतो[५] ''तेही हीरांबा पाठ प्रधान करूनि परशरामबास : रामेश्वर बास : आणिकचि आचार्ये तयांची वासनांतरे एकवटुनि पूर्वार्धचरित्रे : उत्तरार्धचरित्रे (म्ह:लीळाचरित्र) : द्वापारचरित्रे : ऋद्धपुरचरित्रे : अजातचरित्रे अन्वयी लाविली :'' वरील उतान्तील 'द्वापारचरित्रे' म्हणजे श्रीकृष्णचरित्र अर्थात पिढीपाठाचे संक्षिप्त श्रीकृष्णचरित्र ते म्हाइंभटांनी संकलित केले असण्याची शक्यता पुष्कळच आहे. कारण ते अशा प्रकारच्या उद्योगात गढलेले होते. तेव्हा 'श्रीकृष्णचरित्रा'च्या या पिढीपाठाचे कर्तृत्व भास्कराकडे किंवा आणखी कोणाकडे न देता ते म्हाइंभटाकडेच देणे वस्तुस्थितीस धरून होईल. अर्थात वर म्हटल्याप्रमाणे त्यांचा हा पिढीपाठ अतिसंक्षिप्त असून त्याचे स्वरूप टिपणवजा असल्याने तेवढयावरून लेखकाच्या कौशल्याची विशेष कल्पना येऊ शकत नाही.

वाइंदेशकर पाठाची गोष्ट वेगळी आहे. त्यात पिढीपाठाचाच आशय, पण तो फुलवून, फुगवून सांगितला आहे. याचे एक उदाहरण म्हणून त्या पाठातील 'श्रीकृष्णगुणनामश्रवणी रूक्मिणीदेवी–वेधु–कथन' ही ५५ वी

लीळा पहावी तिची छापील पृष्ठे सात—आठ भरतील इतकी ती प्रदीर्घ आहे. पण तीच लीळा, किंवा तिच्यातील आशय सांगणाऱ्या दोन लीळा 'श्रीकृष्णचरित्रा'च्या पिढीपाठात पुढीलप्रमाणे आढळतात —

रूक्मिणी आवस्था श्रवण : महदाइसे पुराण आदूकौनि आली : मग महदाइसी पुसीले, ''जी : श्रीकृष्णचक्रवर्ती एकलियाचि बीजे केले?'' सर्वज्ञे भणितले : ''श्रीकृष्णचक्रवर्ती सुदेवाते पुसीले : 'तुम्ही निगाले नि तेव्हळी रूक्मिणीसी कैसी अवस्था?' : 'जी : मी निगाला तेव्हळी मज वीडा दीधला : तवं तीए हातिची पाने सुकली : तेव्हळी हाडपिणीसी कोपली : मग लेणी लुगडी देऊनि माते पाठवीले :' तेव्हळी श्रीकृष्णचक्रवर्ती भणितले : 'आता वेळु लाउ नए : आता वेळु लाविजैल तरि देह जाइल': तैसेचि श्रीकृष्णचक्रवर्ती बीजे केले ।। ५ ।। तथा रथावरि पतन : ।। महदाइसे पुराण आइकौनि आली : महदाइसी पुसीले : ''जी : रूक्मिणीआउसे तेथौनीचि उडी घालिती तरि काइ होते?'' सर्वज्ञे भणितले : ''तिये तेव्हळीसींचि रथावरि पडती : सुदेवे धरिले भणौनि तेतुले अंतर पडिले :'' ।। ६ ।।

वरील उदाहरणावरून 'श्रीकृष्णचरित्रा'चा वाइंदेशकर पाठ किती वाढवलेला, फुगवलेला आहे त्याची कल्पना येईल. या सर्वच चरित्रग्रंथाचे वाइंदेशकर पाठ तसे आहेत. पण 'श्रीकृष्णचरित्रात' अशा प्रकारच्या वाढीला किंवा फलवण्याला विशेष वाव मिळाला आहे. कारण बोलूनचालून हे एक पौराणिक चरित्र आहे. त्यात पुराणिक आपल्या कल्पनेप्रमाणे व मगदुराप्रमाणे पाहिजे तेवढी भर घालू शकतो. 'लीळाचरित्रा'चे किंवा 'गोविंदप्रभुचरित्रा'चे तसे नाही. त्यांचे चरित्रनायक ऐतिहासिक व्यक्ती असल्यामुळे त्यांचे चित्रण करताना किंवा त्यांच्या लीळा सांगताना वास्तवाची थोडी तरी मर्यादा राखावीच लागते. 'श्रीकृष्णचरित्रा' वाइंदेशकर पाठ मूळ पिढीपाठाच्या अवाच्या सवा फुगवलेला दिसतो. त्याचे कारण या दोन चरित्रविषयातील हे अतर आहे. हा वाढवलेला पाठ म्हणजे मूळ श्रीकृष्णचरित्र नव्हे, तर त्यावर आधारित असा एक स्वतंत्रच ग्रंथ असल्याचे स्पष्ट होते. मुळातील संक्षिप्त लीळांचा हा विस्तार नेमका कोणी व केव्हा केला ते सांगणे कठीण आहे. पण या वर्धित 'श्रीकृष्णचरित्रा'वर शके १२३८ मध्ये रचिलेल्या दामोदर पंडितांच्या 'वच्छाहरणा'चा जो परिणाम विशेषत: त्यातील 'अधासुरवध' या २१० व्या लीळेवर दिसून येतो, त्यावरून त्याचा हा पाठ त्यानंतर केव्हा तरी निर्माण झाला असणार हे स्पष्ट होते. तसेच त्यात कोठेही फारशी शब्द आढळत नाही नसल्याने त्याचा रचनाकाळ फार पुढे जाऊ शकणार नाही त्यातील भाषाही म्हाइंभटांच्या 'लीळाचरित्रा'तील भाषेप्रमाणे कमावलेली वाटत नसली तरी तिचे एकंदर स्वरूप यादवकालीन गद्य भाषेशी जुळते आहे. एकंदरीत वाइंदेशकर पाठाचे हे 'श्रीकृष्णचरित्र' चौदाव्या शतकाच्या अखेरीस निर्माण झालेले असावे असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

या चरित्रग्रंथाचे महानुभावांच्या इतर चरित्रग्रंथाशी काही बाबतीत साम्य आहे, तर काही बाबतीत तो त्याहून निराळा आहे. साम्य चरित्राच्या विषयात, स्वरूपात, रचना पध्दतीत व भाषाशैलीत दिसते. इतर चरित्रग्रंथाप्रमाणे या 'श्रीकृष्णचरित्रा'चा विषय परमेश्वरावतार हाच आहे. आज आपल्या हाती असलेले अपूर्ण चरित्र आख्यायिकांच्या स्वरूपाचे आहे व उद्य जरी ते संपूर्ण उपलब्ध झाले तरी त्यामुळे फारतर या आख्यायिकात भर पडेल, पण चरित्राचे स्वरूप बदलणार नाही. प्रकार तोच राहील, प्रमाण बदलेल, इतकेच इतर चरित्रग्रंथांप्रमाणे हे 'श्रीकृष्णचरित्र'ही निवेदनपद्धतीने निर्माण झालेले असून मुळात ते चक्रधरांनी महादयिसेची जिज्ञासा तृप्त करण्यासाठी तिला सांगितलेले आहे. या चरित्राची एकंदर रचनाही इतर चरित्रग्रंथांप्रमाणेच दिसते. श्रीकृष्णाच्या चरित्रातील काही विशेष प्रसंग निवडून ते ते येथे आख्यायिकांच्या किंवा लीळांच्या रूपाने सांगितले आहेत. ही निवड करताना भर अर्थातच त्याच्या विभूतीमत्त्वावर किंवा अवतारित्वावर दिलेला आहे. तसेच हे चरित्रही मुळात चक्रधरांनी तोंडी सांगितलेले असल्यामुळे त्याच्या शैलीत ग्रंथिक भाषेची कृत्रिमता न येता इतर चरित्रग्रंथांप्रमाणे ती बोली भाषेच्या सहजसौंदर्याने नटली आहे. याप्रमाणे या चरित्राचे इतर चरित्रग्रंथांशी साम्य पुष्कळच आहे. पण त्याबरोबरच काही भेदही स्पष्टपणे जागवतात. पैकी मुख्य म्हणजे इतर चरित्रे ऐतिहासिक व्यक्तींची आहेत, तर 'श्रीकृष्णचरित्र' पौराणिक व्यक्तीचे आहे. गोविंदप्रभू व चक्रधर यांच्या चरित्रांना जसे ऐतिहासिक अधिष्ठान आहे, तसे ते श्रीकृष्णाच्या चरित्राला नाही. त्या दोघांची चरित्रे जशी डोळयासमोर प्रत्यक्ष घडली तशी ती आठवून नागदेवाचार्यांनी म्हाइंभटांना सांगितली व त्यांनी ती लिहून काढली. श्रीकृष्ण चरित्राचे असे होणे शक्यच नव्हते. कारण श्रीकृष्ण हा द्वापारयुगात होऊन गेलेला परमेश्वराचा अवतार होता. तसेच कलियुगात अवतार धारण करणाऱ्या चक्रधरांनी त्याचे चरित्र पाहिले असण्याची शक्यता सुतराम नव्हती. त्यामुळे त्यांनी जे श्रीकृष्णचरित्र महदायिसेला सांगितले ते एक तर पुराणातून किंवा स्वत:च्या सर्वज्ञतेतून सांगितले असणार हे उघड आहे. याचे आणखी एक समर्थन असे, की श्रीकृष्ण व श्रीचक्रधर हे दोघेही एकाच परमेश्वराचे अवतार असल्याने त्यांच्यात भेद नाही व त्यामुळे पूर्वकाळातील अवताराचे चरित्र उत्तरकाळातील अवताराला ज्ञात असणारच, ते त्याने

पुराणातून जाणून घेण्याचे कारण नाही. या युक्तिवादाला 'लीळाचरित्रा'त आधारही आहे. तेथे चक्रधरांनी आपण स्वत: द्वापारीचे श्रीकृष्ण असल्याचे अनेक प्रसंगी सूचित केले आहे. (उदा. पूर्वार्ध १२, ४३, २९०, २९४ उत्तरार्ध ८६). ''आता साक्षात कृष्ण तुम्हाला वाट दाखविल'' असे आऊसेला आत्मप्रत्ययपूर्वक सांगणारे चक्रधर (ली. पूर्वार्ध ३४९) म्हणजे पूर्वावतारातील श्रीकृष्णच होत. पण ही भूमिका घेतल्यावर मग हे चरित्रनिवेदनही राहत नाही, तर ते चरित्रसंस्मरण होते. कारण चरित्राचा विषय व त्याचा निवेदक दोन्ही एकच होतात. त्यात फरक इतकाच, की चरित्राचा विषय द्वापारयुगातील तर त्याचा निवेदक कलियुगातील. पण हा कालीक भेद व्यावहारिक पातळीवरील असून त्यामुळे चरित्राचा वक्ता व चरित्राचे वक्तव्य यांच्यातील अद्वैताला बाध येण्याचे कारण नाही. याचा अर्थ, हे 'श्रीकृष्णचरित्र' एका दृष्टीने कृष्णचरित्राचे चक्रधरांनी केलेले निवेदन आहे, तर दुसऱ्या दृष्टीने ते त्यांच्या स्वत:च्याच पूर्वावताराचे संस्मरण आहे.[६] मात्र ते एकाच सुरात सांगितल्याप्रमाणे वाटते. तसेच चक्रधरांचे व गोविंदप्रभुंचे चरित्र त्यांच्या समकालीन लेखकाने लिहिलेले असल्यामुळे त्यात जो जिवंतपणा पदोपदी जाणवतो तोही 'श्रीकृष्णचरित्रात' जाणवत नाही. कारण तो इतिहास आहे, हे पुराण आहे. दत्तोबासांनी किंवा आणखी कोणी वाढवलेले हे पुराण भागवताच्या दशम स्कंधास धरून लिहिलेले असून डॉ. पारखे त्याला 'दशम स्कंधाचा पहिला गद्य अवतार' म्हणतात.[७] त्याचबरोबर संत नामदेवांचे 'बाळकीडे'चे अभंगही या पुराणकर्त्याच्या समोर असावे असे त्यांचे म्हणणे आहे. 'रामायण' त्याच्यासमोर होते हे तर त्यातील काही कथाच सांगतात. या सर्व पुराव्यावरून डॉ. पारखे यांनी जो निष्कर्ष काढला आहे तो मात्र धाडसी वाटतो. तो असा की ''वैष्णव साहित्याच्या साच्यावर हे 'श्रीकृष्णचरित्र' विणले गेले. महानुभाव ग्रंथकारांच्या मनात पूर्वापार चालत आलेल्या परंतु पंथीय दडपणामुळे दबून राहिलेल्या वैष्णव भक्तीचा स्त्रोत त्यात अंतस्थ वाहत असताना जाणवतो.'' 'श्रीकृष्णचरित्रात' श्रीकृष्ण हा विष्णूचा अवतार असल्याचे श्रीचक्रधरांच्या मुखाने वदवले आहे. या विसंगतीचा उलगडा वरील सिद्धांताने होउ शकतो असे डॉ. पारखे मानतात. परंतु एकतर ही विसंगती चक्रधरांच्या नव्हे तर ज्यांनी हे 'श्रीकृष्णचरित्र' आपल्या कल्पनेनुसार वाढविले त्या वाइंदेशकरांच्या मनातील आहे. आणि मुख्य म्हणजे म. आराध्य मुरलीधरशास्त्री उपर्युक्त लेखान्ती म्हणतात त्याप्रमाणे श्रीकृष्णाला विष्णूचा अवतार मानणे ही वाइंदेशकरांची 'तत्त्वच्युति'च म्हटली पाहिजे. तेव्हा त्यापेक्षा ''या 'श्रीकृष्णचरित्राची' जडणघडण बहुविध आहे. बहुरंगी आहे, जेथे जेथे श्रीकृष्णचरित्राची लीळा आढळेल ते ते स्थळ धुंडाळून श्रीकृष्णपरमात्म्याचे पूर्ण दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला आहे''[८] हे डॉ. पारखे यांचे म्हणणे अधिक मान्य होण्यासारखे आहे.

## संदर्भ :

१. देशपांडे अ. ना., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास — पहिला भाग, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९५, पृ. ३२४.
२. वाइंदेशकर पाठाची एक संपूर्ण प्रत म. आराध्य मुरलीधरशास्त्री यांच्या संग्रही आहे. डॉ. सुरेश डोळके यांनी आपणाजवळील वाइंदेशकर पाठाची संपूर्ण प्रत (१०९ लीळा असलेली) 'नवभारत' मासिकातून क्रमश: प्रसिद्ध केली आहे.(इ. स. १९७५).
३. पारखे, श्रीकृष्णचरित्र : कर्तृत्व आणि कलाविचार (महानुभाव, २५.५)
४. 'महानुभाव' मासिक, २५.८ (नोव्हेंबर १९७३)
५. कोलते वि. भि., श्रीचक्रधरचरित्र, १९५२, पृ. २१२ — २१३.
६. नेने ह. ना., संशोधनलेखसंग्रह—भाग १, पृ. १४५.
७. तुळपुळे शं. गो. (संपा.), श्रीचक्रधरचरित्र, १९७३, पृ. १३ — १८.
८. पारखे, श्रीकृष्णचरित्राची जडणघडण, महानुभाव (मासिक) २५.६

❖❖❖

# रवींद्र ठाकूर यांची कादंबरी

डॉ. विनोद राठोड
बाबा नाईक महाविद्यालय कोकरूड
ता. शिराळा, जि.सांगली, महाराष्ट्र (India)
(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)
rvinod2404@gmail.com भ्रमणध्वनी ९४२३२७२४०४

मराठी साहित्यात रवींद्र ठाकूर यांनी चार कादंबऱ्या लिहून विविध विषयांना स्पर्श केला आहे. मराठी कादंबरीमध्ये त्यांनी चरित्रात्मक, पौराणिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक यासारखे विषय हाताळले आहेत. महात्मा फुलेंच्या जीवनावर त्यांनी 'महात्मा' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीचा इंग्रजी, हिंदी अनुवादही झाला. साहित्य संमेलनातील राजकारणावर 'उद्या पुन्हा हाच खेळ' ही कादंबरी लिहिली. महाभारतातील कर्णाच्या जीवनावर त्यांनी 'कर्णपर्व' ही कादंबरी लिहिली. उच्च शिक्षणातील राजकारणावर 'व्हायरस' ही कादंबरी लिहिली.

## उद्या पुन्हा हाच खेळ

रवींद्र ठाकूर यांनी 'उद्या पुन्हा हाच खेळ' या कादंबरीत साहित्यसंमेलनातील राजकारणाची आतली बाजू उघड केली आहे. साहित्य कसे निर्माण होते, लेखक महान साहित्यिक म्हणून कसे मिरवून घेतात, साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष होण्यासाठी, निवडून येण्यासाठी कसे मार्ग अवलंबिले जातात. साहित्यसंमेलनाला आलेले यात्रेचे स्वरूप, सत्कार, स्वागत यासाठी हपापलेले साहित्यिक आणि त्याचबरोबर राजकारणी यांची सांगड कशी जुळून येते. संमेलनांमध्ये लेखक, कवी, कवयित्री, प्रकाशक, प्राध्यापक, संस्थापक, पत्रकार हे खोटी प्रतिष्ठा जपत, स्वार्थासाठी नीतीमूल्ये गहाण टाकून कसे श्रेष्ठपणा मिरवतात, याचे वास्तव चित्रण ठाकूरांनी केले आहे. कादंबरीत पुस्तकाला पुरस्कार मिळविण्यासाठी हपापलेले लेखक आहेत. खोट्या प्रतिष्ठेसाठी हवे ते करायला तयार असणाऱ्या कवयित्री आहेत. लेखकांना मनासारखे नाचायला लावणारे प्रकाशक आहेत, प्राध्यापकांना राबवून घेणारे संस्थापक आहेत. अशा अनेक प्रवृत्तींची माणसे कादंबरीत आहेत.

साहित्य हे समाजाला घडविण्यासाठी असते, पण तसे घडतांना दिसत नाही. ही खंत ठाकूर व्यक्त करतात. प्रत्येकजण आपापल्या जातीच्या प्रांतात कंपू करून, एकमेकांची पाठ थोपटतांना दिसतो. दलित, ग्रामीण, मुस्लीम साहित्याची चर्चा होते. मात्र जात, धर्मविरहीत साहित्य निर्माण होत नाही. साहित्य हे सामाजिक बांधिलकी जपते की, जातीनिष्ठा, धर्मनिष्ठा जपते हा प्रश्न निर्माण होतो. साहित्यिक वादविवाद, साहित्यसंकल्पनांबद्दल घनघोर चर्चा, सामाजिक प्रश्नांना साहित्यविश्वाशी जोडत चिंतनात्मक मंथन साहित्यसंमेलनामधून घडावे, अशी आजची परिस्थिती ठाकूरांना या साहित्यसंमेलनात उरलेली दिसत नाही. उलट साहित्यबाह्य कारणांनीच साहित्यसंमेलन गाजत आहेत, ही ठाकूरांची खंत आहे.

राजकीय नेते, ज्यांचा साहित्याशी दुरान्वयानेही संबंध नाही अशांचा साहित्य संमेलनात सहभाग हा विषयही अनेक वर्षे नुसता चर्चेत आहे. राजकीय क्षेत्रातील व्यक्तींनी संमेलनांना हजेरी लावणे यात डॉ.रवींद्र ठाकूरांच्या दृष्टीने गैर काही नाही. त्यांना स्वभाषेबद्दल आपुलकी वाटणे, मराठी भाषकांच्या अशा मेळाव्यात भाग घेण्याची त्यांची इच्छा असणं स्वाभाविकच आहे. कित्येक राजकीय नेते, लेखनही करतात. साहित्यविषयक कार्यक्रमातून काही नेते उत्कृष्ट भाषणेही करतात. शिवाय ही संमेलने भरवतांना अनेक बाबतीत नेत्यांचे सहकार्य लागते. तसे ते आनंदाने देतातही. साहित्य संमेलनात त्यांचा आदर सत्कारही करणे योग्य आहे. तथापी या बाबतीत ठाकूरांचा आक्षेप आहे तो साहित्य, संमेलनाध्यक्ष आणि इतर मान्यवर साहित्यिक यांना राजकीय क्षेत्रातील नेते आणि आमंत्रित 'सेलिब्रिटिज' यांच्या तुलनेत प्राप्त होणारे गौणस्थान. साहित्यसंमेलने हा लेखक, रसिक यांचा मेळावा आहे आणि त्यात साहित्यिक यांचे स्थान गौण नसून प्रधान असले पाहिजे. ही ठाकूरांची तळमळ आहे.

अरविंद हा या कादंबरीचा नायक आणि निवेदक साहित्यिकांचा दुटप्पीपणा उघड करतो. याठिकाणी अरविंदची नैतिकता प्रभावी ठरल्यामुळे, अनैतिकता दाखविण्यात कादंबरी यशस्वी ठरली आहे. मराठी साहित्य संमेलनाचे पडघम वाजू लागले की तेच तेच मुद्दे चर्चिले जातात. कारण त्यातील काही मुद्दे महत्त्वाचे असूनही

संबंधीत साहित्यसंस्था, महामंडळ त्यावर ठोस अशी कारवाई तर करीत नाहीतच, पण त्या दिशेने प्रमाणिक प्रयत्न करतांनाही आढळत नाहीत.

संमेलनाचे आयोजक राजकीय नेत्यांचा मानसन्मान, सरबराईत करण्याच्या लगबगीत असतात आणि साहित्य संमेलनात सर्वात महत्त्वाचे मानले जाणारे अध्यक्षीय भाषण, अध्यक्ष गडबडगोंधळात कसेतरी उरकत असतात. म्हणून ही साहित्य संमेलने आहेत की राजकीय संमेलने आहेत असा प्रश्न डॉ.रवींद्र ठाकूर विचारतात. ही परिस्थिती बदलणार की 'उद्या पुन्हा हाच खेळ' सुरू राहणार हा ठाकूरांचा प्रश्न आहे.

## महात्मा

मराठी साहित्यात पौराणिक पुरूष, संत, ऐतिहासिक राष्ट्रपुरूष, समाजसेवक, लेखक अशा अनेक थोर व्यक्तींच्या जीवनावर चरित्रात्मक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. डॉ.रवींद्र ठाकूर यांची 'महात्मा' ही म.फुले यांच्या जीवनचरित्रावर लिहिलेली कादंबरी असून फुले यांनी केलेल्या समाजजागृतीचे, कामगिरीचे चित्रण, त्यांना त्या त्या वेळेस झालेला त्रास, त्यांच्यावर ओढवलेली संकटे, या संकटांना न डगमगता त्यांनी केलेले कार्य, या सर्वांचे चित्रण या कादंबरीत आले आहे. कादंबरीतून शूद्र, अतिशूद्र समजल्या जाणाऱ्या लोकांच्या हितासाठी, त्यांच्या कल्याणासाठी झटणे असे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन जगणाऱ्या म.फुले यांच्या जीवनाचे हे चरित्र आहे. वर्षानुवर्ष चालत आलेल्या रूढी, परंपरा बदलण्यासाठी सतत झटणारे म.फुले म्हणजे 'तात्या' या कादंबरीतून साकार झाले आहेत.

ठाकूरांनी कादंबरीत इतिहास आणि कादंबरी यांचा मेळ घातलेला आहे. दोन घटना प्रसंगांमधील जागा त्यांनी आपल्या कल्पनाशक्तीने भरून काढल्या आहेत. त्यामुळे दोन्ही घटनांमध्ये एकसंघपणा राहून प्रत्यक्ष घटनाच आपल्यासमोर घडते आहे असा भास होतो. म.फुले यांच्या आयुष्यातील घडलेल्या घटनानंतर होणारी मानसिक अवस्था, विचारमंथन आणि संघर्ष यांचे तपशिलाने दर्शन कादंबरीत घडत जाते.

कादंबरीमधून म.फुलेंच्या संपूर्ण जीवनाचा आलेख पाहावयास मिळतो. बालवयापासून म.फुले यांची तयार होत गेलेली मानसिकता, त्यांच्यावर झालेला अन्याय, त्यांच्यावरील अपमानाचा प्रसंग, त्यातून आकारास येत गेलेले त्यांचे ध्येय, या ध्येयांकडे केलेली वाटचाल, त्यासाठी त्यांना मित्रांकडून मिळालेले सहकार्य हे सर्व ठाकूरांनी कादंबरीत रेखाटले आहेत. ही एक चरित्रात्मक कादंबरी असल्याने फुलेंच्या जीवनाविषयीचे व तत्कालीन राजकीय, सामाजिक परिस्थितीचे आकलन या कादंबरीतून होते. 'महात्मा' ही केवळ चरित्रात्मक कादंबरी नाही तर ते महात्मा फुलेंच्या विचाराचे गाठोडे आहे. ते उकलण्याचा प्रयत्न कादंबरीत लेखकाने केला आहे. हे करत असतांना ही एक व्यक्तीप्रधान कादंबरी आहे, याचे भान ठेवून त्या त्या व्यक्तींच्या भाषेचा विचार केला आहे. त्यासाठी ठाकूरांनी स्वत:ची निवेदनशैली हृदयाला भिडवली आहे.

म.फुलेंनी पुण्यात भिडेवाड्यात मुलींची शाळा काढून कर्त्या सुधारकाची भूमिका पार पाडली. त्यांचे हे कार्य तत्कालीन रूढीप्रिय समाजाला रूचले नाही. त्यातून उद्भवलेला संघर्ष पचवून फुलेंनी पुन्हा सामाजिक सुधारणांकडे लक्ष केंद्रित केले. व्यक्तिस्वातंत्र्य, समता आणि बुद्धीप्रामाण्यासाठी ते झगडले. सतीप्रथा, विधवा पुर्नविवाह, भ्रुणहत्या अशा समाजविघातक गोष्टींना त्यांनी कडाडून विरोध केला. त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. आपल्या घरचा पाण्याचा हौद त्यांनी अस्पृश्यांसाठी खुला करून दिला. सत्यशोधक समजाची स्थापना केली. गुलामगिरीने त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना संघटीत करण्याचे काम केले. 'शेतकऱ्यांचा आसूड', 'ब्राह्मणांचे कसब', 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'शिवाजीचा पोवाडा', 'तृतीयरत्न' नाटक असे विपूल स्वरूपाचे लेखन त्यांनी केले. व्याख्याने दिली. त्यांच्या कार्याची दखल घेऊन जनतेने त्यांचा सत्कार करून 'महात्मा' ही पदवी त्यांना बहाल केली. फुलेंची या सर्व कार्याची दखल ठाकूरांनी कादंबरीत घेऊन नाट्यमय रितीने या घटना प्रसंगांचा उलगडा केला आहे.

## कर्णपर्व

महाभारतात येणारे विषय विविध प्रकारचे आणि विपुल आहेत. या अनुषंगाने येणाऱ्या व्यक्तिरेखा आदर्श पण सामान्यत्त्वाचा स्पर्श झालेल्या आहेत. केवळ आदर्श अशा असामान्य व्यक्तिरेखा त्या नाहीत. मानवी सुष्ट—दुष्ट भावनांचे स्पंदन रेखाटणाऱ्या आहेत. यातील जवळपास सर्वच व्यक्तिरेखा कोणत्या ना कोणत्या कारणाने वैफल्यग्रस्त आहेत. या सर्वामध्ये अतिवैफल्यग्रस्त कुणी असेल तर तो कर्ण आहे. वेगवेगळ्या

दृष्टिकोनातून लेखकांनी त्याच्या चरित्राकडे पाहिले. कुणाला तो दैवहत उत्तुंग पुरूष वाटला, कुणाला अहंकारी, स्वार्थी, दृष्ट वाटला. कुणाला तो, ज्याच्यावर सतत अन्याय झाला आहे, असा पददलितांचा प्रतिनिधी वाटला. तर कुणी मृत्युंजय महापुरुष म्हटले. डॉ.रवींद्र ठाकूर यांची 'कर्णपर्व' ही याच धर्तीवरची कादंबरी.

कर्ण उदार आहे, शूर आहे, पराक्रमी आहे, पण आपण कुढल्या कुळातील आहोत, आपली परंपरा कोणती, अशा प्रश्नांनी तो अस्वस्थ आहे. आयुष्यभर तो 'स्व' चा शोध घेतो. कर्णाच्या अंगी असणारे धैर्य, कृतज्ञता, मानवता, औदार्य, न्यायप्रियता, तत्वनिष्ठा असे जे विविध गुण आहेत, त्यातून त्याचे अलौकिक व्यक्तिमत्त्व साकारण्याचा प्रयत्न ठाकूरांनी केला आहे.

कर्णाचा महत्त्वाचा गुण म्हणजे त्याचा अतुलनीय पराक्रम आहे. त्याचे धैर्य, त्याची निडर क्षात्रवृत्ती आणि त्याचे धर्नुविद्येतले अपूर्व कौशल्य ठाकूरांना मोहित करते. कर्ण पराक्रमी आहे, सर्वश्रेष्ठ धनुर्धर आहे, परंतु केवळ सूतकुळाचे दुदैव त्याला प्राप्त झाल्याने उपेक्षा, अपमान, हेटाळणी यांना आयुष्यभर तोंड द्यावे लागले. सामाजिक प्रतिष्ठेपासून त्याला वंचित राहावे लागले म्हणून त्याची उदात्तता कोठेही ठासळलेली नाही. या गुणांमुळेच ठाकूरांनी त्याच्या श्रेष्ठतेला उजाळा दिला. कर्णाचा ध्येयवाद आणि प्रयत्नवाद अभिव्यक्त करून शेवटी कुंतीला दिलेले वचन पाळून स्वीकारलेले वीरमरण या सर्वांचे रसाळ शैलीने चित्रण करून कर्णाची अभिमानास्पद प्रतिमा साकारण्याचा प्रयत्न ठाकूरांनी केला आहे.

कर्णाच्या अंगी असणाऱ्या चांगल्याच गुणांच्या आहारी न जाता ठाकूर कर्णाचे अवगुणही लक्षात घेतात. कर्णाच्या अंगी असणारा सर्वात महत्त्वाचा अवगुण म्हणजे त्याचा क्रोध. अनेक प्रसंगी क्रोधाच्या आहारी जाऊन त्याच्याकडून अतिरेक घडतो. कर्णाचा क्रोधामुळे अनेक ठिकाणी तोल सुटलेला आहे. अनेक ठिकाणी त्याच्या हातून वृद्धांचा अपमान करण्याचा प्रमाद घडला आहे. पांडवांचा पराक्रम कमी लेखतांना कर्णाची घमेंडखोर, अहंकारी वृत्तीही व्यक्त होत जाते. द्रौपदी विषयीचा क्रोध व्यक्त करतांना तो म्हणतो, 'एका स्त्रीला एकच पती असावा हा आर्यधर्म आहे; परंतु तिला पाच पती आहेत. का कुठला धर्म आहे? अरे, एकापेक्षा अधिक पुरूषांशी रममाण होणारी स्त्री वारांगनाच असते. अशी स्त्री सवस्त्र असली काय आणि विवस्त्र असली काय? त्याचं कोणालाच आश्चर्य वाटायला नको.'(१७१) कर्णाचा हा क्रोध द्रौपदी स्वयंवराच्या वेळी झालेल्या अपमानाचा किंवा भीमाने प्रेक्षगृहप्रसंगी केलेल्या अपमानाचा सूड असावा. म्हणून ठाकूरांनी कर्णाच्या या बेताल वक्तव्याकडे दुर्लक्ष केले असावे.

ठाकूरांनी महाभारत मूळ कथेचा आवाका लक्षात घेऊन शेकडो व्यक्तिरेखा, त्यांची नावे, तत्कालीन धर्म, चालीरीती, प्रथा, परंपरा, खानपान, आचारविचार, नीती, अनीती, कोण कोणाचा मित्र, कोण कोणाचा शत्रू, राज्ये, त्या राज्यांच्या सीमा, अरण्ये, तेथील विविध वनस्पती, त्यांचे उपयोग, अश्वांची नावे, त्यांच्या जाती, रथांचे प्रकार, त्यावरील ध्वजचिन्हे, त्या ध्वजचिन्हांचे अर्थ, अशा अनेक सूक्ष्म संदर्भासह कादंबरी एक भव्य पट उलगडत जाते. संस्कृतीत जे नवे विचार येऊ पाहतात ते चार्वाकाच्या विचारातून स्पष्ट होत जातात. कादंबरीतील युद्धवर्णने प्रत्यक्षात वास्तव साकारतात. प्रेक्षणगृह प्रसंग, द्यूतप्रसंग, घोषयात्रा, कर्णदिग्विजय, कृष्ण—कर्ण भेट, कर्ण—कुंती भेट, कृष्णशिष्टाई, युद्ध अशा अनेक प्रसंगांना साकार करत 'कर्णपर्व' आकारत जाते.

## व्हायरस

रवींद्र ठाकूर यांची 'व्हायरस' ही शैक्षणिक वातावरणावर, शिक्षणक्षेत्रातल्या अपप्रवृत्तींवर लिहिलेली कादंबरी आहे. ही कादंबरी एका विद्यापीठाचे वास्तवदर्शी सूत्र घेऊन वाचकांसमोर येते. कोल्हापूर, पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नांदेड, जळगाव अशा विविध विद्यापीठातून समाजात जे चाललेलं आहे त्याचं छोटं पणं परिपूर्ण रुप या कादंबरीत प्रकट झालं आहे. कादंबरी ज्या वातावरणात घडत गेली त्या वातावरणाचा प्रभाव ठाकूरांवर असल्यामुळे त्यातील बारीकसारीक तपशिलांसह ती अवतरली आहे. कादंबरीतील घटना केवळ विशिष्ट परिणाम साधण्यासाठी रंगवलेल्या नाहीत तर स्वत: लेखक नोकरी करत असलेल्या अनुभवाचे पाठबळ त्याला आहे. त्यामुळे नोकरदार समाजाचे, त्यातील परस्परसंबंधाचे त्यांनी जवळून निरीक्षण केले आहे. याचा 'व्हायरस' मधून प्रत्यय येतो.

वरिष्ठ स्तरांवरून होणाऱ्या अन्यायाला बळी पडलेल्यांची ही कथा आहे. ही कथा स्वतंत्रपणे येत नाही. त्यात अखंडता आहे. त्यामुळे पात्रांच्या सलगतेचे भान कादंबरीत राखले जाते. विद्यापीठात कुलगुरू, प्रोफेसर, रिडर, लेक्चरर, कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी अशी सगळी रचना असली तरी प्रत्येकाची जगण्याची

आणि काम करण्याची रीत वेगळी असते. एकमेकांविषयी प्रेम, हेवेदावे, बढतीसाठी होणारे प्रयत्न, वशिलेबाजी, एकमेकांवर केली जाणारी कुरघोडी या सगळ्यांचे वास्तव येथे आहे.

कोण्या व्यक्तीविरूध्दचा हा संघर्ष नाही तर तो एका प्रवृत्तीविरूद्धचा संघर्ष आहे. शिक्षणक्षेत्राचं पावित्र्य आणि भवितव्य धोक्यात येऊ द्यायचे नसेल तर समाजातील बुद्धिवंतांनी जागृत राहिले पाहिजे आणि अनिष्ठ प्रवृत्तींविरूद्ध आवाज उठवला पाहिजे ही शेळक्यांची भूमिका आहे. लेखकाने डॉ.शेळक्यांची होणारी मानसिक कुचंबणा अचूकपणे हेरून संपूर्ण कादंबरीभर रेखाटली आहे. कादंबरीतील शेळके हे पात्र अगदी पोरके ठरते. आयुष्यभराच्या नोकरीत आपणास वरिष्ठांकडून योग्य ती वागणूक मिळालीच नसल्याचे त्यांना मनोमन जाणवते. ही त्यांची वेदना फार उत्कटतेने ठाकूरांनी रेखाटली आहे. या वेदनेमुळेच शेळक्यांची वेदना ही केवळ त्या पात्राची न राहता ती आधुनिक होते. आधुनिक माणसाची ही व्यथा मोठ्या यशस्वीतेने ठाकूरांनी व्हायरस ठरलेल्या वातावरणाला रेखाटण्यासाठी अवलंबली आहे.

शैक्षणिक कार्यासाठी स्थापन केलेल्या विद्यापीठाचा अनागोंदी कारभार, भ्रष्टाचार, राजकारण, सूडबुद्धी, दांभिकता यावर भेदक प्रकाश टाकत एकूणच अशा संस्थातील वास्तवतेला सामोरे आणणे हे या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. शिक्षणव्यवस्थेत शिरलेल्या प्रदूषणाचे आणि अंतर्गत राजकारणाचे संदर्भ ही कादंबरी व्यक्त करते. शिक्षणाचा उद्देश मानवता या मूल्यांची प्रतिष्ठापना करणे हा असतो, परंतु मूल्यप्रदूषित वातावरणामध्ये मानवताच पायदळी तुडवली जातांना दिसत आहे. द्वेष, मत्सर, तिरस्कार, विचारांची क्षुद्रता यांनी बरबटलेले हे वातारवरण अंतर्मुख करणारे आहे. विद्यापीठामध्ये चाललेल्या राजकारणाचा सूत्रधारच जर कुलगुरूसारखी व्यक्ती असेल तर संपूर्ण व्यवस्थेलाच किड लागल्याशिवाय राहत नाही, याचे वास्तवदर्शी चित्र ही कादंबरी रेखाटते.

ही प्रवृत्ती उलगडतांना ठाकूर म्हणतात,''ही मानसिकताच मोठी अवघड आहे. कॉम्प्युटरमध्ये एखाददुसरा प्रोग्रॅमच काय, पण संपूर्ण सिस्टिमच करप्ट करणारा व्हायरस असतो. तसा हा एक व्हायरस आहे. कॉम्प्युटरमध्ये तो बाहेरून घुसू शकतो किंवा काही वेळा कॉम्प्युटरच्या सिस्टीममध्येच तो दडलेला असतो आणि संधी मिळताच ॲक्टिव्हेट होतो. त्याला समूळ नष्ट करू शकेल असा एकही उपाय आजवर उपलब्ध झालेला नाही. अगदी तसचं आहे हे. फरक एवढाच, की हा व्हायरस बाहेरून आलेला नाही. या व्यवस्थेच्या पोटातच तो आहे. किंबहूना त्यावरच ही सगळी सिस्टीम उभी आहे. मग ती चांगली कशी निपजणार? बदलायची तर संपूर्ण सिस्टीमच बदलली पाहिजे. परंतु नवी सिस्टीम उभारण्याचा प्रयत्न म्हणजे त्याला टाळण्याचा प्रयत्न ठरतो. बाकी काही नाही. शिक्षणाचं सार्वत्रिकीकरण हा एक प्रोग्रॅमच होता ना. त्याचं काय झालं? तुम्ही कितीही नवे प्रोग्रॅम तयार करा. तुमच्या नकळत तो त्यात शिरतोच आणि सगळी सिस्टीम क्रॅश करून टाकतो.'' (४३)

एखाद्या भव्यदिव्य संस्थेचा भोंगळपणा, त्यातून चालणारा गैरव्यवहार, वरिष्ठांचा मनमानीपणा, आक्षेपार्ह वर्तन, दबावतंत्र, जातीयता, भ्रष्टाचार, विद्यार्थीनींवर होणारे लैंगिक अत्याचार, अशा असंख्य घटनाप्रसंगांमधून लेखकाने संस्थेतील अनागोंदी, मनमानी कारभाराची चिरफाड करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या व्यवस्थेचे समग्र अंतरंग एकाच कथासूत्रात उलगडून दाखविणे अशक्य आहे. या कादंबरीला कथासूत्र असले तरी ते बंदिस्त नाही. कादंबरीच्या शेवटी लेखक जेथे थांबतो तेथून वाचकांच्या मनामध्ये अनेक प्रश्नांचा कोलाहल सुरू होतो.

डॉ.रवींद्र ठाकूर यांनी कविता, कादंबरी, समीक्षा, संपादने, अनुवाद अशा विविध स्वरूपाचे लेखन करून मराठी साहित्यात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. त्यांनी जे भोगले अनुभवले ते आपल्या साहित्यातून मांडले आहे. जीवनाचं निरिक्षण करतांना त्यांना जी शल्ये जाणवत होती त्याचं चित्रण त्यांनी साहित्यातून मांडले आहे. त्यासाठी त्यांनी कधी ऐतिहासिक कादंबरीचा, कधी पौराणिक कादंबरीचा तर कधी सामाजिक कादंबरीचा आधार घेतला आहे. ठाकूर यांनी चार कादंबऱ्या लिहून विविध विषयांना स्पर्श केला आहे. मराठी कादंबरीमध्ये त्यांनी चरित्रात्मक, पौराणिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक यासारखे विषय हाताळून आपल्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाला वाव दिलेला आहे.

## संदर्भग्रंथ

१. 'उद्या पुन्हा हाच खेळ', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९
२. 'महात्मा', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, १९९९
३. 'कर्णपर्व', रिया पब्लिकेशन्स कोल्हापूर, २००३
४. 'व्हायरस', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, २००९

❖❖❖

## Form IV
### (See Rule 8)
### Statement about ownership and other particular about the Journal
## Research Journal of India

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | Dr. Bhau Mandavkar Research Centre, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | Annual |
| 3. Printer's Name | - | Seva Prakashan, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | Dr. Mrs. Veera Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | Dr. Pavan Mandavkar |
| Nationality | - | Indian |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.


Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**



KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401

☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in



e mail for Govt. & General : imvkalamb@yahoo.co.in

For University : indiram414@sgbau.ac.in

For Research centre : researchjournalofindia@gmail.com

marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE


| | | | |
|---|---|---|---|
| Annual Subscription | - | Individual / Institutional | ₹ 500/- |
| Account Details : Bank | - | Bank of Maharashtra | |
| Branch | - | Azad Maidan Road, Yavatmal | |
| IFSC code | - | MAHB0000047 | |
| MICR coe | - | 445014001 | |
| A/c No. | - | 60175373000 | |
| Mode of Payment | - | By NEFT transfer or crossed Multi city cash at par cheque or by Demand Draft of Nationalized Bank favorably Bank of Maharashtra payable at Yavatmal or by cash deposit in A/c in favour of Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre | |


(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)



ISSN 2349-9370

9 772349 937002